
# इतिहास

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.01.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

J9Z4H6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित असलेले अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

## इतिहास विषय समिती

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
डॉ. शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ. प्रिया गोहाड, सदस्य
डॉ. नलिनी वाघमारे, सदस्य
डॉ. प्रशांत देशमुख, सदस्य
प्रा. शामा कुलकर्णी, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

## लेखक

डॉ.गणेश राऊत

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री. देवदत्त बलकवडे
**नकाशाकार** : श्री. रवीकिरण जाधव
**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2022-23/Qty.- 25,000
**मुद्रक** : M/s. Kisan Printing Industries, Beed

## इतिहास अभ्यासगट समिती

डॉ. शिवानी लिमये
श्री. वैजनाथ काळे
डॉ. धनंजय चौधरी
प्रा. श्रीधर घुंडरे
श्री. समीर मानकर
डॉ. धनाजी मासाळ
श्री. कृष्णा देशमुख
डॉ. सिद्‌धार्थ जाधव
प्रा. अनुरथ काळे
डॉ. मुशीर शेख
श्री. संदीप डोईफोडे
श्री. बाळासाहेब चावरे
डॉ. सचिन डेंगळे
श्रीमती. शिवकन्या कदेरकर
डॉ. डी.पी.खराडे
डॉ. रावसाहेब शेळके
श्री. मोहन शेटे
प्रा. अश्विनी बेडगे
प्रा. सुषमा नानगुडे

## संयोजक

सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

## निर्मिती

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

## निमंत्रित

श्री. मोगल जाधव

## प्रकाशक

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इतिहास हा विषय भूतकाळ आणि वर्तमानकाळ समजून घेण्यासाठी मदत करतो. त्याच्या आधारे आपणास भविष्यकाळ घडवता येतो. हा भविष्यकाळ उज्ज्वल घडवण्यासाठी इतिहासाचे आकलन योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. अशा आकलनासाठी इतिहासाचे हे पाठ्यपुस्तक उपयुक्त आहे.

इयत्ता बारावीच्या पाठ्यपुस्तकात आपणास युरोप, अमेरिका, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया या खंडांचा ओझरता इतिहास ज्ञात करून देण्यात आला आहे. युरोपातील प्रबोधन, वसाहतवाद, वसाहतवादाविरुद्ध भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात उभारला गेलेला लढा, निर्वसाहतीकरणाची चळवळ, शीतयुद्ध आणि बदलता भारत यांचा अंतर्भाव या पाठ्यपुस्तकात केला आहे.

या पाठ्यपुस्तकात गेल्या जवळपास पाचशे वर्षांचा आढावा घेण्यात आला आहे. भूतकाळातील घटना ते समकालीन घटना असा व्यापक आढावा घेऊन जागतिकीकरणात भारताची वाटचाल कशी चालू आहे याचा मागोवा घेतला आहे. इयत्ता बारावीच्या पाठ्यपुस्तकात तसेच पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावर देण्यात येणाऱ्या Q.R.Code वर अध्यापनासाठी पूरक साहित्य उपलब्ध करून देत आहोत.

अकरावी आणि बारावीची दोन्ही पाठ्यपुस्तके आपणास प्राचीन ते अर्वाचीन कालखंडाची ओळख करून देतात. इतिहास विषयाच्या सखोल अभ्यासासाठी तसेच स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना ही पाठ्यपुस्तके उपयुक्त आहेत. इतिहास विषयाचा आशय समजून घेण्यास आणि विषयाची व्यापकता समजून घेण्यासाठी ही पाठ्यपुस्तके उपयोगी आहेत.

इतिहास विषय समिती, इतिहास अभ्यासगट समिती, लेखक, चित्रकार यांनी या पाठ्यपुस्तकाचा आशय लक्षात घेऊन पुस्तक अधिकाधिक उत्तम होण्याच्या दृष्टीने परिश्रम घेतले आहेत. पाठ्यपुस्तकातील आशय समजून घेण्यासाठी वेबसाईटस् दिल्या आहेत. त्यांचा अध्ययनासाठी निश्चितच उपयोग होईल.

वाचक, पालक, विद्यार्थी आणि अभ्यासक यांच्याकडून सदर पाठ्यपुस्तकासंदर्भात काही सूचना आणि शिफारशींचे स्वागतच आहे. आम्ही अशी आशा करतो की, समाजातील सर्वच घटकांकडून या पाठ्यपुस्तकाचे स्वागत होईल.

**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीच्या अभ्यासक्रमात आपण प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास अभ्यासला. या पाठ्यपुस्तकात मध्ययुगीन जग, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक जग असा पाचशे वर्षांचा विशाल पट आपण अभ्यासणार आहोत. युरोपातील प्रबोधन, भारतातीलच नव्हे तर जगभरातील वसाहतवाद आणि त्याला झालेला प्रतिकार, महायुद्धोत्तर जग आणि बदलता भारत या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जग कसे बदलते याचे भान निर्माण करता येईल.

युरोपातील प्रबोधनाचा काळ आणि विज्ञानाचा विकास यातून औद्योगिक क्रांती आकारात आली. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवाद वाढला आणि वसाहतवादामुळे औद्योगिक क्रांतीस अधिकच चालना मिळाली. यातून साम्राज्यवाद वाढला आणि जगभरात वसाहतवादाची प्रक्रिया वाढीस लागली. याचे भान आपण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणार आहोत.

'वसाहतवाद आणि महाराष्ट्र' हा पाठ स्थानिक इतिहासातला महत्त्व देणारा आहे. या पाठाच्या माध्यमातून महाराष्ट्राने युरोपीय सत्तांना केलेला विरोध आपण समजून घेणार आहोत. भारतात आलेल्या सर्वच युरोपीय वसाहतवाद्यांशी मराठी सत्तेने संघर्ष केला. प्रसंगी त्यांचा पराभव सुद्‌धा केला. हा रोमहर्षक लढा तत्कालीन मोडी कागदपत्रे, उत्तरकालीन कागदपत्रे वा बखरींमध्ये नोंदवला आहे. इंग्रज व्यापाऱ्यांच्या संदर्भातील छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. या आज्ञापत्रातून महाराजांचे द्रष्टेपण दिसून येते. या संघर्षाच्या पलीकडचे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे दूरदर्शित्व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देणे महत्त्वाचे आहे. त्याद्‌वारे वसाहतवाद्यांशी स्थानिक लोकांनी दिलेला लढा अभ्यासण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

भारतातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा लढा या अभ्यासक्रमातील एक महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा लढा देण्याची गरज या समाजात का निर्माण व्हावी असे विचारमंथन या निमित्ताने घडून नेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या मनात 'का' असा प्रश्न निर्माण होणे गरजेचे आहे. या पाठाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांचे निवासस्थान, प्रार्थना समाजाचे मंदिर इत्यादी ऐतिहासिक वारसा असणाऱ्या वास्तूंचे दर्शन घडवता येईल. इतिहास जेथे घडला तेथे जाऊन इतिहास अनुभवता येईल.

वसाहतवादाविरुद्‌धचा लढा भारतात १८१७ पासून ते १९४७ पर्यंत चालू होता. फ्रेंच आणि पोर्तुगीज यांच्या विरोधात भारताला १९६० पर्यंत लढा द्यावा लागला. या भागाचे अध्यापन करताना १८५७ चा स्वातंत्र्यलढा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना आणि टिळक व गांधी युगांची वैशिष्ट्ये, सशस्त्र लढा, स्वातंत्र्यप्राप्ती, संस्थानांचे विलीनीकरण, फ्रेंच आणि पोर्तुगीज वसाहतींची मुक्तता यांची माहिती विद्यार्थ्यांना अस्सल समकालीन साधनांच्या आधारे देता येईल. समकालीन राष्ट्रीय आणि स्थानिक वृत्तपत्रे, माहितीपट, अनुबोधपट, ध्वनीफिती यांच्या आधारे विशेषतः इंटरनेटरवरील साहित्य यांच्या सहभागाने अध्ययन-अध्यापन अधिक रंजक आणि उपयुक्त करता येईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात विसाव्या शतकात घडून आलेले निर्वसाहतीकरण आणि त्याला कारणीभूत ठरलेली महायुद्‌धांची पार्श्वभूमी यांचे अध्यापन समकालीन चित्रपट, वृत्तपत्रे, चरित्रे, आत्मचरित्रे ही दुय्यम साधने तसेच अधिकृत कागदपत्रे ही प्राथमिक साधने यांच्या आधारे करता येईल. विसाव्या शतकात जागतिक राजकारणात असणारे भारताचे स्थान या पद्‌धतींनी समजून घेता येईल. शीतयुद्‌धाचा उदय आणि विस्तार व शेवट हा भाग नव्या जागतिक राजकारणाची सुरुवात करणारा कसा आहे हे विद्यार्थ्यांना समजावून दिल्यास २१ व्या शतकाचे आकलन होणे सोपे होईल.

जागतिकीकरणानंतरचा भारत या भागात विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा प्रत्यक्ष अभ्यास करता येणार आहे. दैनंदिन जीवनावर परिणाम घडवून आणणारी राज्य वा राष्ट्रीय स्तरावरील घटना आपल्या आयुष्यात कशी महत्त्वाची आहे याची जाणीव 'बदलता भारत' या पाठांमधून करून देता येईल.

पाठ्यपुस्तकातील आशयाच्या आधारे चर्चा, गटचर्चा, प्रकल्प, भित्तीपत्रके अशा उपक्रमांच्या आधारे एकाच पाठयघटकाचे अनेक ऐतिहासिक पैलू समजून घेता येतील, असे उपक्रम राबवता येतील. पाठ्यपुस्तकातील रचना करताना ज्ञानरचनावादी शिक्षण आणि कृतियुक्त अध्यापन यांना विशेष महत्त्व दिले आहे. पाठांमध्ये रंजक व विचारप्रवृत्त करणाऱ्या चौकटी दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचा सहभाग अधिकाधिक वाढावा याची काळजी घेतलेली आहे. 'माहिती, विचार आणि कृती' या त्रिसूत्रीच्या आधारे प्रत्येक पाठाची रचना करून विद्यार्थ्याला स्वमत प्रकटीकरणासाठी वाव दिला आहे. पूरक माहिती क्यूआर कोड आणि वेबसाइटच्या माध्यमातून दिली आहे. तिचाही अध्ययन-अध्यापन करताना उपयोग करणे अपेक्षित आहे.

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | युरोपातील घडामोडींचा भारतावरील परिणाम | - 'धर्मयुद्धे' म्हणजे काय हे सांगता येणे.<br>- 'धर्मयुद्धे' सुरू होण्याची पार्श्वभूमी सांगता येणे.<br>- युरोपातील प्रबोधन या संकल्पनेचे आकलन होणे आणि त्या संदर्भात ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रांतील प्रगतीची चर्चा करणे.<br>- भौगोलिक शोधांमुळे नवीन सागरी मार्गाचा शोध लागला याची मांडणी करणे.<br>- भारताकडे येणाऱ्या सागरी मार्गाचे विवेचन करणे.<br>- जगावर झालेला औद्योगिक क्रांतीचा परिणाम याची चिकित्सा करणे. |
| २. | वसाहतीकरणाची प्रक्रिया | - 'वसाहतवाद' या संकल्पनेचा अर्थ सांगता येणे.<br>- अमेरिका खंडात झालेल्या युरोपीय वसाहती आणि अमेरिकेची स्वातंत्र्यप्राप्ती याची माहिती घेणे.<br>- युरोपीय वसाहतवादाच्या प्रसारामुळे आशिया आणि आफ्रिका खंडांमधील प्रदेशांवर काय परिणाम झाला याची चिकित्सा करणे.<br>- वसाहतीकरणाचे भारतावर काय परिणाम झाले याचे विश्लेषण करणे. |
| ३. | भारताचे वसाहतीकरण | - भारतामध्ये पोर्तुगिजांचे झालेले आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश यासंबंधीची माहिती घेणे.<br>- भारतामध्ये झालेले डचांचे आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश यासंबंधीची माहिती घेणे.<br>- भारतात झालेले इंग्रज व फ्रेंचांचे आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाची माहिती घेणे. |
| ४. | युरोपीय वसाहतवादाला महाराष्ट्रात झालेला विरोध | - युरोपीय वसाहतवादाला महाराष्ट्र कसा सामोरा गेला याची चिकित्सा करणे.<br>- पोर्तुगिजांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अंगिकारलेले धोरण स्पष्ट करणे.<br>- इंग्रज आणि मराठे यांच्यातील राजनैतिक संबंध समजून घेणे.<br>- छत्रपती शिवाजी महाराजांची निर्णयक्षमता व धैर्य यांचे अभ्यासपूर्ण विवेचन करणे.<br>- छत्रपती संभाजी महाराजांनी युरोपीय वसाहतवादाला विरोध केला याची माहिती घेणे. |
| ५. | वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष | - भारतात १८५७ पूर्वी इंग्रजांविरुद्ध झालेल्या लढ्यांची समीक्षा करणे.<br>- १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा इंग्रजांच्या अन्यायी धोरणांविरुद्ध भारतीयांनी केलेला संघर्ष होता हे समजून घेणे.<br>- भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना होण्यामागील कारणमीमांसा करणे.<br>- स्वातंत्र्यलढ्यातील भारतीय नेत्यांच्या योगदानाची माहिती घेणे. |
| ६. | निर्वसाहतीकरण ते एकीकरण | - 'निर्वसाहतीकरण' या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करता येणे.<br>- निर्वसाहतीकरण ते एकीकरण ही वाटचाल समजून घेणे.<br>- गोवा, दीव, दमण, पुदुच्चेरी या वसाहतींच्या मुक्तिलढ्याची चर्चा करणे.<br>- भारतीय स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती नकाशाच्या साहाय्याने स्पष्ट करणे. |
| ७. | भारताबाहेरील प्रदेशांचे निर्वसाहतीकरण | - आशिया खंडात कोणत्या प्रदेशांमध्ये युरोपीय वसाहती होत्या याची सूची तयार करता येणे.<br>- आफ्रिकेतील कोणत्या प्रदेशांमध्ये युरोपीय वसाहती होत्या हे सांगता येणे.<br>- निर्वसाहतीकरणाच्या संदर्भातील घटनांचे स्पष्टीकरण करता येणे. |
| ८. | जागतिक महायुद्धे आणि भारत | - पहिल्या महायुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- दुसऱ्या महायुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- जागतिक महायुद्धांच्या संदर्भात भारताच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.<br>- महायुद्धांच्या भारतावर झालेल्या परिणामांची कारणमीमांसा करणे. |
| ९. | शीतयुद्ध | - 'शीतयुद्ध' ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>- शीतयुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- नाटो, सिएटो, सेंटो, ॲन्झुस या करारांची माहिती घेणे.<br>- युरोप व आशिया खंडातील शीतयुद्धाच्या टप्प्यांविषयी चर्चा करणे.<br>- भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची चिकित्सा करणे. |
| १०. | बदलता भारत | - सन १९९० पासून भारताने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा चिकित्सक अभ्यास करणे.<br>- भारताने विविध क्षेत्रांत केलेल्या बदलांची माहिती घेणे.<br>- भारतामध्ये नव्याने निर्माण झालेल्या राज्यांची माहिती सांगता येणे.<br>- भारतातील वारसा जतन व जागृती करणाऱ्या INTACH या संस्थेची माहिती घेणे. |

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास ......... | १ |
| २. | युरोपीय वसाहतवाद ............................... | १० |
| ३. | भारत आणि युरोपीय वसाहतवाद..................... | १९ |
| ४. | वसाहतवाद आणि मराठे............................ | २४ |
| ५. | भारत : सामाजिक व धार्मिक सुधारणा................ | ३३ |
| ६. | वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष................ | ३९ |
| ७. | भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण................. | ५३ |
| ८. | जागतिक महायुद्धे आणि भारत...................... | ५८ |
| ९. | जग : निर्वसाहतीकरण ............................. | ६६ |
| १०. | शीतयुद्ध ........................................... | ७० |
| ११. | बदलता भारत– भाग १............................. | ८० |
| १२. | बदलता भारत – भाग २ ............................ | ९० |



• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2020. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/ Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

# १. युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास


१.१ युरोपातील धर्मयुद्धे (क्रुसेडस्) आणि त्याचे दूरगामी परिणाम
१.२ युरोपातील प्रबोधनाचा काळ
१.३ विज्ञानाचा विकास
१.४ विविध क्षेत्रांतील वैज्ञानिक शोध
१.५ भौगोलिक शोध व शोधक
१.६ औद्योगिक क्रांती
१.७ आर्थिक राष्ट्रवाद


युरोपमध्ये मध्ययुगाच्या अखेरच्या टप्प्यात प्रबोधन, भौगोलिक शोध व धर्मसुधारणेची चळवळ या घटनांमुळे आधुनिक युगाचा पाया घातला गेला. या काळाला ‘प्रबोधनयुग’ असे म्हणतात.

या काळात कला, स्थापत्य, तत्वज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये प्राचीन ग्रीक व रोमन परंपरांचे पुनरुज्जीवन घडून आले. मात्र प्रबोधन म्हणजे केवळ प्राचीन परंपरांचे पुनरुज्जीवन नव्हते. प्रबोधनाने सर्वांगीण प्रगतीला चालना दिली आणि नवयुगाची सुरुवात झाली.

## १.१ युरोपातील धर्मयुद्धे (क्रुसेडस्) आणि त्याचे दूरगामी परिणाम

जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस्) म्हणतात.

**धर्मयुद्धांना पाठिंबा :** मध्ययुगात धर्मयुद्धाच्या कल्पनेने युरोपमधील सामान्य जनता भारावून गेली होती. या काळातील ख्रिस्ती धर्माचे प्रमुख धर्मगुरु पोप यांनी जे लोक धर्मयुद्धामध्ये सामील होतील त्यांना पापक्षालनासंदर्भात विशेष सवलती जाहीर केल्या. त्यामुळे जनतेने या युद्धांमध्ये मनापासून सहभाग घेतला. युरोपातील सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी या युद्धांना कारणीभूत झाली.

रोमन सम्राटांना धर्मयुद्धाच्या आधारे सीरिया आणि आशिया मायनर येथे स्वतःची सत्ता प्रस्थापित करायची होती. इटली या देशातील व्हेनिस आणि जेनोवा या व्यापारी शहरांमधील धनिकांना मध्य आशियात बाजारपेठा प्रस्थापित करायच्या होत्या. यांसारख्या विविध कारणांनी युरोपमधील सत्ताधारी आणि व्यापारी यांनी धर्मयुद्धांना पाठिंबा दिला.

इ.स.१०९६ मध्ये पहिले धर्मयुद्ध झाले. दुसऱ्या धर्मयुद्धाच्या दरम्यान पोप युजिनिअस (तिसरा) याने फ्रेंच राजा सातवा लुई आणि जर्मन सत्ताधीश तिसरा कॉनरॅड यांना मदतीस घेतले. तुर्कांनी त्यांचा पराभव केला. इजिप्तचा प्रमुख सलादिन याने इ.स.११८७ मध्ये जेरुसलेम जिंकून घेतले. एकूण नऊ धर्मयुद्धे झाली. या धर्मयुद्धांचा शेवट झाला तरीही जेरूसलेम आणि त्याच्या परिसरातील प्रदेश हा इस्लामी सत्तांच्या ताब्यात राहिला होता.

**धर्मयुद्धांच्या अपयशाची कारणे :** युरोपीय धर्मयुद्धामध्ये ख्रिस्ती धर्मयोद्ध्यांना अपयश आले, कारण पोप आणि युरोपातील सत्ताधीश यांनी या युद्धांकडे संकुचित हेतूंनी पाहिले. धर्मावरील कमी झालेली श्रद्धा, युरोपातील विविध राजांमधील एकीचा अभाव, पोप व जर्मन सम्राटातील वितुष्ट, बायझॅन्टाईन सम्राटांच्या सहकार्याचा अभाव या बाबी धर्मयुद्धांच्या अपयशास कारणीभूत होत्या.

**धर्मयुद्धांचे परिणाम :** काही इतिहासकारांच्या मते धर्मयुद्धांमुळे सरंजामशाहीचा अस्त झाला. लोकांची पोपवरील श्रद्धा कमी झाली. मध्य आशियाबरोबर वाढलेल्या व्यापारामुळे इटली आणि जर्मनीतील शहरांना नवी क्षेत्रे खुली झाली. नवा व्यापारी वर्ग उदयाला आला.

युरोपीय युद्धतंत्रात अनेक बदल घडून आले. किल्लेबांधणी, किल्ल्यांचा लढाईचे ठाणे म्हणून उपयोग, लष्कराच्या वाहतुकीसाठी पूलबांधणी, शत्रूचे मार्ग उद्ध्वस्त करणे इत्यादी गोष्टींमध्ये युरोपीय राष्ट्रांनी प्राविण्य मिळवले. लढाईचा खर्च भागवण्यासाठी युरोपमधील राजांनी नवीन कर लागू केले. हे कर थेट

राजाच्या तिजोरीत जमा होऊ लागले.

युरोपीय लोकांना अपरिचित असलेल्या वनस्पती, फळे, अत्तरे, पोषाखाचे वेगवेगळे प्रकार, साखर, सुती व रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, औषधे इत्यादी गोष्टी परिचित झाल्या. धर्मयुद्धांच्या काळात अरबांशी आलेल्या संपर्कातून युरोपीय राष्ट्रांचा अनेक नवीन विषयांशी संपर्क आला. रसायन, संगीत, व्यापार या क्षेत्रांतील अनेक अरबी शब्द युरोपीय लोकांनी आत्मसात केले.

### १.२ युरोपातील प्रबोधनाचा काळ

चौदावे शतक हा प्रबोधनाचा आरंभ तर १५-१६ वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो. या तीनशे वर्षांत बुद्धिवाद आणि वैज्ञानिक विचारसरणीवर आधारित असलेल्या संस्कृतीचा पाया घातला गेला.

या कालखंडात माणसाच्या बुद्धीला, प्रतिभेला आणि जीवन पद्धतीला नवी दिशा मिळाली. विश्वाची रहस्ये वैज्ञानिक पद्धतीने कशी उलगडता येतात हे समजून घेण्यात लोकांना स्वारस्य निर्माण झाले. काव्य, नाटक, साहित्य इत्यादी क्षेत्रांमध्ये आजवर दुर्लक्षित राहिलेले विषय हाताळण्यात येऊ लागले. विज्ञानात नवे नवे प्रयोग करण्यास सुरुवात झाली. विश्वाच्या अस्तित्वाचा विचार करताना पूर्वी ईश्वर हा केंद्रबिंदू होता. आता मात्र मानव हा या विचाराचा केंद्रबिंदू बनला. यालाच 'मानवतावाद' असे म्हणतात.


गॅलिलिओची दुर्बिण

या काळात धाडसी दर्यावर्दींना दूरवरचे प्रदेश शोधण्यासाठी युरोपीय राज्यकर्त्यांकडून प्रोत्साहन मिळाले. पाहिलेल्या देशांतील वनस्पती, फळे, फुले, झाडे, नवनवे प्राणी, विविध शस्त्रास्त्रे आणि त्यांची माहिती या दर्यावर्दींनी मायदेशी आणली.

इ.स.१५४३ मध्ये निकोलस कोपर्निकस याने ग्रहमाला पृथ्वीकेंद्रित नसून सूर्यकेंद्रित आहे असे प्रतिपादन केले. इ.स.१६०९ मध्ये गॅलिलिओने अधिक सुधारित दुर्बिण तयार केली. या दुर्बिणीमुळे खगोल संशोधनाला गती मिळाली. कोपर्निकस आणि केपलर यांच्या संशोधनाला गॅलिलिओने वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे पुष्टी दिली. यामुळे भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधनास चालना मिळाली.

**असेही झाले !**

**गॅलिलिओ (इ.स.१५६४-१६४२) :** गॅलिलिओ याने निरीक्षण करणे व सिद्धान्त मांडणे, अशी तर्कशुद्ध पद्धती रूढ केली. त्यामुळे गॅलिलिओला आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक म्हणतात. 'भिन्न वजनाच्या वस्तूंचा खाली पडण्याचा वेग सारखाच असतो.' या सिद्धान्ताची सत्यता गॅलिलिओने पिसाच्या झुकत्या मनोऱ्यात प्रयोग करून पटवून दिली. यामुळे जड वस्तू हलक्या वस्तूच्या मानाने अधिक लवकर खाली पडेल, हे ॲरिस्टॉटलचे मत खोडले गेले. गॅलिलिओने सुधारित दूरदर्शक (दुर्बिण) बनवून मोठी क्रांती घडवून आणली. सुरुवातीच्या काळातील दुर्बिणीची क्षमता वाढवण्यात गॅलिलिओला यश आले. याचा फायदा दर्यावर्दींना मिळाला. समुद्रातील दूरवरच्या छोट्या-मोठ्या भूमी शोधणे त्यांना सोपे जाऊ लागले. दुर्बिणीच्या साहाय्याने त्यांनी गुरु या ग्रहाचे चार मोठे व तेजस्वी उपग्रह शोधले. चंद्र गुळगुळीत व स्वयंप्रकाशी असल्याचे ॲरिस्टॉटलचे मत गॅलिलिओने साधार खोडले. चंद्रावर डोंगर व दऱ्या असून तो सूर्यप्रकाशाच्या परावर्तनाने प्रकाशतो, हे गॅलिलिओने सिद्ध केले. सूर्याला स्वतःभोवती फेरी मारण्यास सत्तावीस दिवस लागतात, असेही गॅलिलिओने सांगितले होते. गॅलिलिओ हा सूर्यावरील डागांचे निरीक्षण करणारा पहिला शास्त्रज्ञ होता, असे मानले जाते.

गॅलिलिओच्या आधी अनेक शतकांपूर्वी सूर्यावरील डागांचा (तमसकीलक) उल्लेख भारतातील वराहमिहीर यांनी लिहिलेल्या 'बृहत्संहिता' (सुमारे सहावे शतक) या ग्रंथात आढळतो हेही लक्षात घेण्याजोगे आहे.

बंदुकीची दारू आणि छपाई या शोधांमुळे युद्धतंत्र आणि ज्ञानाचा प्रसार यांत आमूलाग्र बदल घडून आले. जर्मनीतील जोहान्नेस गुटेनबर्ग याने इ.स.१४४० मध्ये छापखाना सुरू केला. इ.स.१४५१ मध्ये इटलीत पहिला छापखाना सुरू झाला. छपाईचा शोध जगाला प्रबोधनकाळात मिळालेली सर्वोच्च देणगी होय. यामुळे विविध प्रकारची माहिती आणि ज्ञान सर्वसामान्य माणसांपर्यंत पोचणे शक्य झाले. अठराव्या शतकात युरोपातील सुरुवातीची आधुनिक विद्यापीठे स्थापन झाली. युरोपातील विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात होमरची इलियड आणि ओडिसी ही महाकाव्ये, ग्रीक नाटके, ख्यातनाम वक्त्यांची भाषणे, ललित साहित्य, चित्र, शिल्पकला, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र आणि इतिहास इत्यादी विषयांचा समावेश झाला. या विषयांच्या अभ्यासामुळे लोक स्वतंत्रपणे विचार करू लागले.

**करून पहा.**

प्रारंभीच्या काळातील युरोपीय विद्यापीठांच्या कार्यपद्धतीची माहिती मिळवा.

**कॅथॉलिक चर्च :** प्रबोधनपूर्व कालखंडात चर्च ही धार्मिकच नव्हे तर लोकांच्या व्यक्तिगत जीवनाचे नियंत्रण करणारी संस्था होती. चर्चमधील धर्मगुरूंनी चर्चच्या नावाने आज्ञापत्रे काढून सामान्य लोकांची आर्थिक पिळवणूक सुरू केली होती. तसेच स्वतंत्र विचार करण्यास किंवा मांडण्यास बंदी घातली होती. 'बायबल' या पवित्र ग्रंथावर चर्चच्या परंपरेपेक्षा भिन्न भाष्य करणाऱ्याला मृत्युदंडाची शिक्षा दिली जाई. या सगळ्याच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी प्रबोधनकाळातील मानवतावादी विचारसरणीने योग्य ती पार्श्वभूमी तयार केली.

**आधुनिक विज्ञान :** प्रत्यक्ष अनुभवाच्या निकषावर आधारलेल्या वैज्ञानिक पद्धतीद्वारे माणूस सत्याचे आकलन करून घेऊ लागला. हाच आधुनिक विज्ञानयुगाचा पाया होय. गणित, विज्ञान व कला यांच्या शिक्षणाला या काळात महत्त्व प्राप्त झाले. आधुनिक युगाच्या प्रारंभी निसर्गवैज्ञानिक होऊन गेले. उदा., लिओनार्दो-दा-विंची.

**कला :** प्रबोधनकाळात विज्ञानाचा प्रभाव कलाक्षेत्रावरही पडला. याच कालखंडात 'किमया' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शास्त्रातील गूढवाद कमी होऊन ते वैज्ञानिक पायावर उभे राहिले. त्याचे रूपांतर रसायनशास्त्र या वैज्ञानिक शाखेत झाले. प्रबोधन कालखंडात किमया शास्त्रातील प्रगतीमुळे खनिजांचे स्रोत आणि मूलद्रव्ये यांच्यासंबंधीच्या ज्ञानात भर पडली. त्यातूनच तैलरंगात रंगवलेले फलक तयार करण्यास सुरुवात झाली. वैज्ञानिक पद्धतीने केलेल्या निसर्ग निरीक्षणांमुळे निसर्गाचे सूक्ष्म चित्रण करणे, तसेच वैज्ञानिक पद्धतीच्या निरीक्षणातून मनुष्याच्या शरीररचनेची वैशिष्ट्ये दर्शवणाऱ्या आकृती चित्रित करणे सुलभ झाले. या संदर्भात लिओनार्दो-दा-विंची आणि मायकेल अँजेलो यांचे काम महत्त्वाचे आहे.

## १.३ विज्ञानाचा विकास

युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनी आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला असे मानले जाते. या काळातील शास्त्रज्ञांचा पुढील गोष्टींवर भर होता; प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे वैज्ञानिक सिद्धान्तांना स्थलकालातीत महत्त्व आहे हे सिद्ध करणे, नव्याने शोधून काढलेले नियम सूत्रबद्ध करणे, नवी वैज्ञानिक परिभाषा तयार करणे. या प्रयत्नांतून आधुनिक विज्ञान प्रगत होत गेले.

**वैज्ञानिक संस्था :** विज्ञानातील संशोधनासाठी युरोपात काही संस्थाही स्थापन करण्यात आल्या होत्या. इंग्लंड-फ्रान्समध्ये शास्त्रज्ञांचे लेख प्रकाशित करणारी नियतकालिके चालवणे आणि पत्रव्यवहार, शंका समाधान, वैचारिक देवाण-घेवाण यांसाठी या संस्था काम करत. त्यांमध्ये रोममधील 'अॅकेडमी ऑफ द लिंक्स आइड (लिंक्सिएन अॅकॅडमी)', फ्लॉरेन्समधील 'अॅकेडमी फॉर एक्सपिरिमेंट', लंडनमधील 'रॉयल सोसायटी फॉर इम्प्रुव्हिंग नॅचरल नॉलेज', फ्रान्समधील 'फ्रेंच अॅकेडमी ऑफ सायन्सेस' इत्यादी संस्था महत्त्वाच्या होत्या.

## १.४ विविध क्षेत्रांतील वैज्ञानिक शोध

होकायंत्र, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, तपमापक यंत्र तसेच भारमापक यंत्र यांचा शोध या काळात लागला.

सूक्ष्मदर्शक यंत्रामुळे सूक्ष्मजंतूंचा अभ्यास करणे सोपे झाले. रॉबर्ट बॉईल याने वायूचे घनफळ त्यावरील दाबाच्या व्यस्त प्रमाणात बदलते हे शोधून काढले. हायड्रोजन, नायट्रोजन, ऑक्सिजन या वायूंसंदर्भात संशोधन सुरू झाले. भौतिकशास्त्रात उष्णता, ध्वनी यांच्या अभ्यासाला प्राधान्य मिळाले. प्राणीशास्त्रामध्ये प्राण्यांची वर्गवारी केली गेली.

**वस्त्रोद्योग :** इंग्लंडमध्ये लोकरीपासून वस्त्र विणणे हा व्यवसाय पूर्वापार चालत आलेला होता. हा व्यवसाय घरगुती स्वरूपाचा होता. इ.स.१७३८ मध्ये जॉन के याने 'धावता धोटा' तयार केला. या धोट्यामुळे वस्त्र विणण्याच्या कामाची गती वाढली. त्याच्या पुढचा टप्पा 'स्पिनिंग जेनी' या यंत्राने गाठला. इंग्लंडमधील जेम्स हरग्रीव्हज याने 'स्पिनिंग जेनी' नावाचे यंत्र तयार केले. या यंत्रावर एकाच वेळी सुताची आठ रिळे लावता येऊ लागली. त्यामुळे कामातील श्रम कमी झाले आणि कामाचा वेग वाढला. इ.स.१७६९ मध्ये रिचर्ड आर्कराईट याने सूत कातण्यासाठी सुधारित यंत्र बनवले. या यंत्राद्वारे अधिक पीळदार व मजबूत धागे वेगाने तयार होऊ लागले. इ.स.१७७९ मध्ये सॅम्युएल क्रॉम्प्टन याने 'म्यूल' नावाचे सुधारित सूतकताई यंत्र तयार केले. या यंत्रामुळे वस्त्र बनवण्याच्या कामाचा वेग जवळपास दोनशे पटींनी वाढला. इ.स.१७८५ मध्ये एडमंड कार्टराईट याने 'यंत्रमाग' बनवला. इ.स.१७९३ मध्ये 'कॉटन जीन' नावाचे यंत्र आले. या यंत्राद्वारे कापसापासून सरकी वेगाने वेगळी करता येणे शक्य झाले.

**धातुविज्ञान :** इंग्लंडमध्ये लोखंडाच्या खाणी होत्या. तिथे मिळणाऱ्या लोहखनिजापासून शुद्ध लोखंड निर्माण करण्याच्या तंत्रात सुधारणा करण्याची गरज होती. हे खनिज वितळवण्यासाठी लाकडाऐवजी दगडी कोळसा वापरण्यात येऊ लागला. त्यामुळे उच्चतम तापमान असणाऱ्या भट्ट्या तयार करता आल्या. परिणामी लोखंडाचे उत्पादन वाढले. पुढे कोळशाच्या भट्ट्या रसरशीतपणे तापवणे आणि कोळशाच्या भट्टीत हवा खेळवणे या कामासाठीही स्वतंत्र यंत्रे निर्माण केली गेली. याच दरम्यान १७८३ मध्ये लोखंडाचा रस साच्यात ओतून लोखंडी पट्टिका (उदा., रेल्वे रूळ) तयार करण्याची पद्धत आली. १८६५ मध्ये लोखंड रसाचे रूपांतर पोलादात करण्याच्या प्रक्रियेचा शोध लागला आणि धातुउद्योग बदलून गेला.


**यंत्रांचा उपयोग :** एका क्षेत्रात एका यंत्राचा शोध लागला की माणसे तेच यंत्र दुसऱ्या क्षेत्रात कसे वापरता येईल, याचा विचार करायला लागली. यातूनच नवनवी यंत्रे तयार झाली. इ.स.१७८३ मध्ये बेल याने 'रोलर सिलिंडर प्रिंटींग' (कापडावरील छपाईसाठी) यंत्राची निर्मिती केली. १८०९ मध्ये बुटाचे आतील तळवे आणि टाचा एकत्र जोडण्याचे काम यंत्राद्वारे केले जाऊ लागले. कपडे शिवण्यासाठी शिलाई यंत्रे आली. जेम्स वॅटने बाष्पशक्तीवर चालणारे 'स्टीम इंजिन' तयार केले. हे इंजिन सुरुवातीला खाणीतून कोळसा व कच्चे लोखंड बाहेर आणण्यासाठी वापरले जात असे. पुढे ते वस्त्रोद्योगातही वापरले जाऊ लागले.

बाष्पशक्तीवर चालणारा नांगर, कापणीयंत्रे, गवत कापणारी यंत्रे तयार करण्यात आली. यामुळे शेतीची कामे जलदगतीने होऊ लागली. अमेरिकेत रॉबर्ट फुल्टन याने 'क्लेरमाँट' ही बोट बाष्पशक्तीवर चालवली. बाष्पशक्तीच्या मदतीने जमिनीवरून वाहतूक करण्याचा पहिला प्रयोग जॉर्ज स्टीफन्सन याने केला. बाष्पशक्तीवर चालणारे आगगाडीचे इंजिनही तयार करण्यात आले. लिव्हरपूल ते मँचेस्टर हे अंतर या रेल्वे इंजिनने पार पाडले. पुढे रेल्वे सेवा विस्तारली. युरोपमध्ये रेल्वे सुरू झाल्यामुळे तेथील प्रवासाचा वेळ कमी झाला. या सगळ्या शोधांमुळे इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना इतर देशांमध्ये त्यांच्या वसाहती प्रस्थापित करण्यास मदत झाली.

## १.५ भौगोलिक शोध व शोधक (१३ ते १९ वे शतक)

**मार्को पोलो :** मार्को पोलो या इटालियन प्रवाशाने युरोपला सर्वप्रथम चीनची आणि आशिया खंडातील इतर देशांची ओळख करून दिली. मार्को पोलो चीनमध्ये कुबलाईखान या राजाच्या दरबारात राहिला. तेथे त्याने मंगोलियन आणि चिनी भाषांचा अभ्यास केला.

**इब्न बतूता :** विविध कारणांसाठी भारत, मालदिव, सुमात्रा, चीन, स्पेन, सार्डिनिया, पूर्व आणि पश्चिम आफ्रिका या प्रदेशात इब्न बतूता फिरला. हा मध्ययुगातील प्रसिद्ध प्रवासी होता.


सागरी सफरींचा मार्ग
आर्क्टिक महासागर
उत्तर ध्रुववृत्त
उत्तर अमेरिका
मेक्सिको
कर्कवृत्त
विषुववृत्त
मकरवृत्त
दक्षिण ध्रुववृत्त
पॅसिफिक महासागर
मॅगेलन १५२१
इंग्लंड
अॅझोरेस
स्पेन
पोर्तुगाल
फ्रान्स
युरोप
कोलंबस
अमेरिगो वेस्पुसी
१४९२
अटलांटिक महासागर
दक्षिण अमेरिका
मॅगेलन सामुद्रधुनी
वास्को-द-गामा १४९७
केप ऑफ गुड होप
आफ्रिका
आशिया
चीन
भारत
कालिकत
वास्को-द-गामा १४९८
हिंदी महासागर
मादागास्कर
मॅगेलन १५२२
जपान
उ.
माली
न्यू गिनी
मॅगेलन
डेक १५७९
ऑस्ट्रेलिया
अंटार्क्टिका

**हेन्री द नॅव्हीगेटर :** पंधराव्या शतकातील पोर्तुगालच्या या राजपुत्राने युरोपातील अज्ञात प्रदेश शोधण्यास प्रोत्साहन दिले. यातूनच आफ्रिकेच्या जवळ असलेल्या 'मॅडेरा' व 'अॅझोरेस' या दोन द्विपसमूहांचा शोध लागला (हे दोन्ही द्वीपसमूह पोर्तुगिजांच्या अंतर्गत असलेले स्वायत्त प्रदेश आहेत). पोर्तुगिजांनी आफ्रिकेतील लोक युरोपात आणले आणि त्यांना गुलाम बनवले. आफ्रिकेत मिळालेले सोने त्यांनी मायदेशी आणले.

**बार्थोलोम्यु डायस :** पोर्तुगालचा राजा दुसरा जॉन याच्या आज्ञेनुसार डायस मोहिमेवर निघाला. आफ्रिकेचे दक्षिण टोक त्याला सापडल्यावर त्याने या भागाला प्रथम 'केप ऑफ स्टॉर्मस्' (वादळाचे भूशीर) असे नाव दिले. पुढे ते बदलून 'केप ऑफ गुड होप' (आशेचे भूशीर) असे करण्यात आले. आफ्रिका खंडाला वळसा घालणारा तो पहिला दर्यावर्दी होता.

**ख्रिस्तोफर कोलंबस :** १४५३ मध्ये तुर्कांनी इस्तंबूल (कॉन्स्टॅन्टिनोपल) जिंकल्यामुळे युरोपीय लोकांना आशियात येण्याचा पर्यायी मार्ग शोधणे आवश्यक झाले होते. स्पेनचा राजा फर्दिनांद आणि राणी इसाबेल यांच्या पाठिंब्याने कोलंबस भारताच्या शोधात निघाला. पृथ्वी गोल असल्याने पश्चिम दिशेने प्रवास केल्यास भारत सापडेल अशी खात्री त्याला होती. परंतु प्रत्यक्षात मात्र तो अमेरिका खंडाजवळ पोचला.



ख्रिस्तोफर कोलंबस

**अमेरिगो वेस्पुसी :** इटली येथील अमेरिगो याने स्पेनच्या वतीने पहिली शोध मोहीम इ.स.१४९७ मध्ये काढली असे समजले जाते. त्याच्या तिसऱ्या मोहीमेत जो प्रदेश त्याने शोधला त्याला 'व्हेनेझुएला' असे नाव दिले. त्याने अॅमेझॉन नदीच्या मुखाचा प्रदेश शोधला. त्याच्या नावावरून 'अमेरिका' खंडाचे नाव पडले असे मानले जाते.

**वास्को-द-गामा :** १४९७ मध्ये ४ जहाजे आणि १७० खलाशी घेऊन वास्को-द-गामा हा पोर्तुगीज दर्यावर्दी भारताकडे निघाला. आफ्रिकेच्या प्रवासात 'मालिंदी' या बंदराच्या भागातील एका भारतीय वाटाड्याबरोबर वास्को-द-गामा कालिकत (कोझीकोडे) बंदरात १४९८ साली पोचला. त्याने कालिकतचा राजा झामोरीन याच्याकडे व्यापाराची परवानगी मागितली. परवानगी मिळाल्यावर तो पोर्तुगालला परतला. तो पुन्हा दोनदा भारतात आला. गोवा आणि कोची येथे पोर्तुगिजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर तो पहिला व्हाईसरॉय झाला. युरोपीय देश आणि भारत यांच्यातील व्यापारी संबंध त्याच्या प्रयत्नातून सुरू झाले.



वास्को-द-गामा

**हे जाणून घ्या.**

आफ्रिकेत युरोपीय वसाहती वाढल्या कारण या खंडात हिरे, सोने, तांबे यांच्या खाणी, सुपीक भूमी, लाकूड व अन्य वनसंपत्ती या गोष्टींची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता होती. पुढे पोर्तुगिजांनी आफ्रिकेतून स्थानिक लोकांना पकडून नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा व्यापार सुरू केला. स्वस्तात उपलब्ध असणारे श्रम ही युरोपीय राष्ट्रांची महत्त्वाची गरज होती. त्यामुळे गुलामांचा व्यापार वाढला.

**फर्डिनंड मॅगेलन :** फर्डिनंड मॅगेलन हा पृथ्वी प्रदक्षिणेला निघालेला पहिला प्रवासी म्हणून ज्ञात आहे. स्पेनचा राजा पहिला चार्लस् याने ही मोहीम आखली होती. मोहीम सुरू असतानाच मॅगेलन फिलीपाईन्स येथे मारला गेला. मात्र त्याच्या सहकाऱ्यांनी पृथ्वी प्रदक्षिणेची मोहीम पूर्ण केली.

**सॅम्युअल डी शॅम्प्लेन :** फ्रान्समध्ये जन्मलेल्या शॅम्प्लेन याने उत्तर अमेरिकेत शोध मोहिमा काढल्या. तेथे फ्रेंच वसाहती स्थापन केल्या. त्याने कॅनडातील 'क्यूबेक' या शहराची स्थापना केली.

**अेबल जानस्वाँ टासमन :** याचा जन्म हॉलंडमध्ये झाला. नवनवीन प्रदेशांचा शोध घेण्याच्या वसाहतवादी स्पर्धेत त्याने 'न्यूझीलंड'च्या प्रदेशाचा शोध लावला. १६४४ मध्ये त्याने न्यूगिनी बेटांच्या किनाऱ्यांचे सर्वेक्षण करून ईशान्य ऑस्ट्रेलियातील क्वीन्स लँडमधील कारा पेन्टारिया या प्रदेशाचा शोध लावला.

**कॅप्टन जेम्स कुक :** न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या प्रदेशांवर इंग्लंडच्या शाही नौदलातील जेम्स कुक याने इंग्लंडचा झेंडा फडकवला. त्याने पॅसिफिक महासागरातल्या बेटांची पाहणी केली आणि अचूक नकाशे तयार केले. तीन वर्षात कॅप्टन कुक याने ६० हजार सागरी मैल प्रवास केला.

**लुई ॲन्टोनी द बोगनविले:** हा फ्रेंच दर्यावर्दी होता. तो पॅसिफिक महासागर पार करून 'ताहिती' येथे पोचला. या प्रवासाचे वर्णन करणारे 'व्हॉयेजेस अराऊन्ड द वर्ल्ड' हे पुस्तक त्याने १७७१ मध्ये लिहिले. याच पुस्तकातील माहितीच्या आधारे १९ व्या शतकात फ्रेंच मिशनरी ताहिती येथे पोचले. त्यांनी या भागात फ्रेंच वसाहत स्थापन केली. पॅसिफिक महासागरातल्या एका बेटाला आणि फुलवेलीला (बोगनवेल) त्याचे नाव दिलेले आहे.

**मंगो पार्क :** स्कॉटलंडचा रहिवासी असणारा मंगो पार्क त्याच्या पश्चिम आफ्रिकेतील शोध मोहीमेसाठी प्रसिद्ध आहे. १७९५ मध्ये मंगो पार्क याने 'नायजर' नदीच्या प्रवाहाचा मागोवा घेतला.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**अल्बेरूनी (इ.स.९७३-१०४९) :** अल्बेरूनी गझनीच्या सुलतान महमूदबरोबर भारतात आला होता. त्याने पृथ्वीचा व्यास मोजण्याचा प्रयत्न केला होता. अक्षांश-रेखांश ठरवण्याची त्याची पद्धत बिनचूक होती. त्या काळाच्या संदर्भात विचार करता हे काम अत्यंत कठीण होते. त्याने पृथ्वीचा गोल नकाशा तयार केला.

## १.६ औद्योगिक क्रांती

औद्योगिक क्रांती म्हणजे हस्तोद्योगाकडून यांत्रिक उत्पादनाकडे झालेले संक्रमण. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात बाष्पशक्ती आणि जलशक्ती यांचा उपयोग करून उत्पादनाच्या प्रक्रियेत यंत्रांचा उपयोग करण्यास युरोपमध्ये सुरुवात झाली.

औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी 'भांडवलशाही' चा विकास होणे आवश्यक होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्यांची मालकी किंवा उद्योगधंद्यात गुंतवणूक करण्यासाठीचे भांडवल ज्यांच्याकडे आहे असा भांडवलदार वर्ग अस्तित्वात आला. लोकांना लागणाऱ्या वस्तू कमीत-कमी किमतीत तयार करणे, अशा वस्तूंची किंमत कमी ठेवण्यासाठी श्रमाचा मोबदला कमी देणे, अधिकाधिक नफा मिळवणे अशी या भांडवलशाही व्यवस्थेची वैशिष्ट्ये असतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत खासगी मालकी, उत्पादकाला वस्तूचे उत्पादन करून तिची किंमत ठरवणे, तसेच नफ्याचे प्रमाण ठरवणे याचे स्वातंत्र्य आणि उपभोक्त्याला निवडीचे स्वातंत्र्य यांसारख्या गोष्टी अंतर्भूत असतात.

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी होती. तेथे लोहखनिज व कोळशाचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. दमट हवामानामुळे सुती धागे बनवणे तुलनेने सोपे जाते. त्यामुळे सुती कापडाचा उद्योग तेथे भरभराटीस आला. इंग्लंडच्या ताब्यात वसाहतींचा मोठा प्रदेश होता. उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल या प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर आयात करणे इंग्लंडला सहज शक्य झाले. नाविक सामर्थ्याच्या जोरावर हा कच्चा माल प्रक्रिया करून पुन्हा पक्क्या मालाच्या रूपात इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या वसाहतींमध्ये विक्रीसाठी पाठवता येऊ लागला. मिळणाऱ्या नफ्यातून इंग्लिश व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त भांडवल उपलब्ध झाले. याच्याच जोडीला कमी मोबदल्यात कामगारांचे श्रम उपलब्ध असल्याने वस्तूंच्या किमती प्रमाणाबाहेर वाढू न देणे शक्य झाले. या पार्श्वभूमीवर इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. या औद्योगिक क्रांतीचे भारतावर दूरगामी परिणाम झाले. घरगुती उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाला. भारतातील कापड उद्योग मंदावला.

सरकारचे आर्थिक धोरण भारतापेक्षा इंग्लंडच्या हिताचे झाले. रेल्वे वापरात आल्यामुळे युरोपीय राष्ट्रांचा माल भारतात खेडोपाडी नेणे सोपे झाले. यातूनच भारताचे आर्थिक शोषण झाले.

**शोधा पाहू.**

युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीचा प्रसार पहिल्या टप्प्यात ज्या देशांमध्ये झाला, त्यांची नावे शोधा.

### १.७ आर्थिक राष्ट्रवाद

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात आर्थिक राष्ट्रवाद पुढे आला. आर्थिक राष्ट्रवादात आपल्या राष्ट्राच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देण्याबरोबर आपल्या प्रतिस्पर्धी राष्ट्राची आर्थिक नाकेबंदी करणे आवश्यक झाले. स्पर्धक राष्ट्राच्या व्यापारावर आर्थिक निर्बंध कसे घालता येतील याचा विचार होऊ लागला. आयात-निर्यातीवर बंदी; इतर राष्ट्रांच्या मालावर जबर जकात आकारणी; परदेशात आपले प्रतिस्पर्धी राष्ट्र जेथे वसाहती स्थापन करत असेल, तेथे आपल्याही वसाहती स्थापन करणे; प्रसंगी प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध युद्ध करणे या गोष्टींचा आर्थिक राष्ट्रवादात समावेश होता. औद्योगिक क्रांतीने ज्या अतिरिक्त उत्पादनाला जन्म दिला त्याच अतिरिक्त उत्पादनाने आर्थिक राष्ट्रवादाला आणि पर्यायाने साम्राज्यवादाला बळ पुरवले. यातूनच भांडवलदारांसाठी नव्या बाजारपेठा मिळवणे; कच्च्या मालाची पुरवठा केंद्रे शोधणे; त्याचा अविरत पुरवठा चालू ठेवणे; त्यासाठी अधिकाधिक गुंतवणूकदारांना आकर्षित करणे; ती गुंतवणूक अबाधित राखणे असे चक्र सुरू झाले. त्यासाठी वसाहतींचे शोषण करणे सुरू झाले.

टोकाचा राष्ट्रवाद, औद्योगिकरण, वंशश्रेष्ठत्वाच्या कल्पना, आक्रमक प्रवृत्ती यांमुळे साम्राज्यवाद अधिकच वाढीस लागला. यातूनच इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी इत्यादी राष्ट्रांनी कित्येक लक्ष चौरस मैल प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला. पुढील पाठात आपण युरोपीय वसाहतवादाविषयी माहिती घेऊ.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. इ.स.१४४० मध्ये ............ याने छापखाना सुरू केला.
(अ) जेम्स वॅट (ब) गुटेनबर्ग
(क) ॲरिस्टॉटल (ड) होमर

२. इ.स.१६०९ मध्ये ............ ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.
(अ) जॉन के (ब) कोपर्निकस
(क) गॅलिलिओ (ड) केपलर

३. आफ्रिका खंडाला वळसा घालणारा ............ हा पहिला दर्यावर्दी होता.
(अ) हेन्री द नॅव्हीगेटर (ब) मार्को पोलो
(क) बार्थोलोम्यु डायस (ड) कोलंबस


**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | जॉन के | - | धावता धोटा |
| २. | सॅम्युएल क्रॉम्प्टन | - | कॉटन जीन |
| ३. | एडमंड कार्टराईट | - | यंत्रमाग |
| ४. | जेम्स वॅट | - | स्टीम इंजिन |

**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.**

१. आधुनिक विज्ञानाचा जनक -
२. ग्रहमाला सूर्यकेंद्रित आहे, असे प्रतिपादित करणारा शास्त्रज्ञ -
३. वराहमिहीर यांनी लिहिलेला ग्रंथ -

**प्र.३ खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ टीपा लिहा.**

१. युरोपातील धर्मयुद्धे
२. युरोपातील धातुविज्ञान

**प्र.५ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. युरोपातील १५-१६ वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो.
२. औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली.

**प्र.६ तुमचे मत नोंदवा.**

१. युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनीच आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला.
२. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात आर्थिक राष्ट्रवाद व साम्राज्यवाद उदयास आला.

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे आणि परिणाम स्पष्ट करा.
२. प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती लिहा.

**उपक्रम**

बार्थोलोम्यू डायस आणि वास्को-द-गामा यांच्या समुद्रसफरींची माहिती गोळा करून ती वर्गात वाचा.

# २. युरोपीय वसाहतवाद


२.१ वसाहतवाद : अर्थ आणि स्वरूप

२.२ वसाहतवाद

२.२.१ उदयाची कारणे

२.२.२ परिणाम

२.३ युरोपीय वसाहतवाद

२.३.१ अमेरिका

२.३.२ ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड

२.३.३ आशिया

२.३.४ आफ्रिका


प्रगत देशाने आपल्या सामर्थ्याच्या बळावर एखादा भूप्रदेश ताब्यात घेऊन त्यावर आपले राज्य स्थापन करणे, या प्रक्रियेला 'वसाहतवाद' असे म्हणतात. वसाहतवाद हा साम्राज्यवादाचा एक प्रकार आहे. इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देशांवर कब्जा करून तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. भारत ही इंग्लंडची वसाहत होती. वसाहतीमधील कच्चा माल आपल्या देशात नेऊन पक्क्या मालासाठी वसाहतींचा बाजारपेठ म्हणून उपयोग करणे हे वसाहतवादाचे प्रमुख लक्षण आहे.

वसाहतवाद हा निव्वळ राजकीय व आर्थिक गुलामगिरीच निर्माण करतो असे नसून तो मानसिक गुलामगिरीही निर्माण करतो. वसाहतवादी देशांची वंशश्रेष्ठत्ववादी विचारसरणी आणि वागणूक यांमुळे वसाहतीतील लोकांच्या मनात न्यूनगंड निर्माण झाला, त्यांना स्वतःच्या संस्कृती व इतिहासाबद्दल कमीपणा वाटायला लागला, त्यांचा आत्मविश्वास नष्ट झाला. इंग्लंडने एका शतकात एवढा साम्राज्यविस्तार केला की त्यांच्या साम्राज्यावरील सूर्य मावळत नव्हता असे म्हटले जाऊ लागले. जगातील आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या चार खंडांत ब्रिटिशांचे साम्राज्य विस्तारले होते.

१५ व्या शतकात युरोपात व्यापारी क्रांती घडून आली. युरोपीय दर्यावर्दींनी नव्या जलमार्गांचा शोध लावल्यानंतर पारंपरिक व्यापारपद्धतींमध्ये बदल घडून आला. या युरोपीय व्यापाऱ्यांनी जगभरात आपले पाय रोवायला सुरुवात केली.

## २.१ वसाहतवाद : अर्थ आणि स्वरूप

धाडसी कृत्ये करणे, कीर्ती संपादन करणे, अज्ञात भूमीचा शोध घेणे, धर्माचा प्रसार करणे, सोन्याच्या खाणींचा शोध घेणे अशा विविध कारणांनी युरोपीय लोक जगभर पोचले. पुढे व्यापार वाढत गेला आणि युरोपीय राष्ट्रांमध्ये एका नव्या स्पर्धेचा उदय झाला.

युरोपीय व्यापारी जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांनी वसाहती स्थापन केल्या. त्या वसाहतींमध्ये स्वतःचे आर्थिक, सामाजिक, राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. युरोपीय लोक अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड येथे गेले. तेथे त्यांना राहण्यास अनुकूल हवामान होते. आशिया खंडात त्यांना हवामानाशी जुळवून घेणे अवघड गेले. हवामान अनुकूल असो किंवा नसो, युरोपीय लोकांनी स्थानिकांना हुसकावून लावले. वसाहतींमधील स्थानिक लोकांचे मानसिक खच्चीकरण करण्यात इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच यांनी पुढाकार घेतला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडचा व्यापार औद्योगिक क्रांतीमुळे भरभराटीस आला होता. आरमारी सामर्थ्याच्या जोरावर इंग्लंडने आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. व्यापारातून अतिरिक्त नफा, अतिरिक्त नफ्याची गुंतवणूक, गुंतवणुकीसाठी वसाहत आणि वसाहतींशी व्यापार, त्यातून नफा अशी ही साखळी होती. इंग्लंडप्रमाणेच फ्रान्स, बेल्जियम, इटली आणि जर्मनी हे देशही वसाहती स्थापन करण्यात आघाडीवर होते.

## २.२ वसाहतवाद

### २.२.१ उदयाची कारणे

**औद्योगिक क्रांती :** औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली. आधुनिक यंत्रांमुळे

उत्पादनात प्रचंड वाढ झाली. देशांतर्गत बाजारपेठेत सगळे उत्पादन खपणे शक्य नव्हते. अतिरिक्त उत्पादन खपवण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती. यासाठी हक्काची बाजारपेठ आणि हुकमी वर्चस्व आवश्यक होते.

**कच्च्या मालाची गरज :** व्यापारी स्पर्धेत अन्य स्पर्धक राष्ट्रांपेक्षा स्वतःच्या मालाचा उत्पादन खर्च कमी ठेवणे आवश्यक होते. स्वतःची मक्तेदारी निर्माण करण्याची आवश्यकता, मालाचा उत्पादन खर्च कमी व्हावा म्हणून कच्चा माल स्वस्त किंमतीत मिळवणे गरजेचे होते. त्यासाठी वसाहतींवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करणे युरोपातील राष्ट्रांना आवश्यक होते.

**अतिरिक्त भांडवलाची गुंतवणूक :** औद्योगिक क्रांतीनंतर युरोपातील भांडवलदार वर्ग अधिकच श्रीमंत झाला. अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी त्याने सुरक्षित बाजारपेठांचा शोध घ्यायला सुरुवात केली. यादृष्टीने आर्थिकदृष्ट्या अप्रगत वसाहतींमधील बाजारपेठ अधिक सुरक्षित होती. अतिरिक्त भांडवलाने वसाहतवादाच्या उदयाला आणि विकासाला चालना दिली.

**खनिज साठे :** आशिया-आफ्रिका खंडांतील देशांमध्ये सोने, हिरे, चांदी, कोळसा यांचे नैसर्गिक साठे मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे युरोपमधील व्यापाऱ्यांना आशिया-आफ्रिकेतील प्रदेशांचे आकर्षण होते.

**भौगोलिक महत्त्व :** आशिया-आफ्रिका खंडातील काही प्रदेश भौगोलिकदृष्ट्या मोक्याच्या स्थानावर आहेत, हे युरोपीय राष्ट्रांच्या लक्षात आले. अशा प्रदेशांपैकी माल्टा, जिब्राल्टर, एडन, सिंगापूर, अंदमान-निकोबार यांसारखे प्रदेश इंग्लंडने स्वतःच्या वर्चस्वाखाली आणले.

**मजुरांची उपलब्धता :** युरोपीय व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आणि स्वस्तात मजूर मिळवण्याची गरज होती. ही गरज वसाहतींमधून भागली. यातूनच पुढे गुलामांचा व्यापार वाढीस लागला.

**वंशश्रेष्ठत्वाची कल्पना :** आफ्रिका आणि आशिया खंडातील जनतेला सुसंस्कृत करण्याची जबाबदारी आपणावर आहे, अशी भूमिका युरोपीय वसाहतवाद्यांनी घेतली. या भूमिकेतून ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराला चालना दिली गेली. यातून वसाहतवाद अधिक वाढीस लागला.

### २.२.२ परिणाम

आशिया व आफ्रिका या खंडांतील लोकांचे आर्थिक शोषण करण्यात आले. वसाहतीतील लोकांनी त्यांचे स्वातंत्र्य गमावले. आर्थिक शोषणाची परिणती स्थानिक लोक दरिद्री होण्यात झाली.

वसाहतवादाच्या विघातक परिणामांच्या जोडीला वसाहतींमध्ये काही विधायक गोष्टी घडल्या. वसाहतींमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक जागृती झाली. लोकशाही पद्धत आणि त्यातील स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसारख्या आधुनिक जीवनमूल्यांचा त्यांना परिचय झाला. कायद्याचे राज्य, न्यायव्यवस्था, सर्वांसाठी शिक्षण यांसारखे विचार पुढे आले. आपले प्रश्न आपणच सोडवले पाहिजेत हा विचार पुढे आला. त्यामुळे वसाहतींमधून स्वातंत्र्याची चळवळ उदयाला आली.

**करून पहा.**

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असलेले पुढील प्रदेश नकाशावर पहा; भूमध्यसागरातील जिब्राल्टर, माल्टा, पश्चिम गोलार्धातील ब्रिटिश गुयाना, ब्रिटिश होन्डुरास, ब्रिटिश वेस्ट इंडिज, बर्मुडा आणि फॉकलंड बेटे, आशिया खंडातील एडन, श्रीलंका, म्यानमार, हाँगकाँग, भारत आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रे.

## २.३ युरोपीय वसाहतवाद

### २.३.१ अमेरिका

अमेरिकेतील वसाहतवादाचा अभ्यास करताना आपल्या असे लक्षात येते की या काळात बलाढ्य युरोपीय राष्ट्रांनी अन्य दुर्बल राष्ट्रांवर आपले प्रभुत्व स्थापून वसाहतींना राजकीय गुलामगिरीत ढकलले. वसाहतवादी युरोपीय स्थलांतरितांनी अमेरिका खंडातील मूळ रहिवाशांच्या जमिनी बळकावून प्रसंगी त्यांची कत्तल केली. मेक्सिको आणि पेरू देशातील स्थानिकांची राज्ये नष्ट केली. त्यांच्यावर गुलामगिरी लादली.

युरोपीय राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा सुरू झाल्यावर पोर्तुगाल आणि स्पेन या देशांनी त्यात पुढाकार घेतला. पोर्तुगालने अमेरिका खंडातील ब्राझील

आणि स्पेनने मेक्सिको ताब्यात घेतले. तेथे त्यांना सोन्याचे साठे सापडले. अमेरिकेच्या भूमीवर ऊस आणि तंबाखू पिकवण्यासाठी स्पॅनिश लोकांनी आफ्रिकेतून गुलाम आणले. पेरू, मेक्सिको आणि व्हेनेझुएला येथे सोन्या-चांदीचे साठे सापडताच स्पेनने शेतीपेक्षा सोने मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी दक्षिण अमेरिकेमध्ये संपूर्ण किनारपट्टीवर प्रभुत्व स्थापन केले. दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश स्पॅनिश लोकांनी ताब्यात घेतला. येथे त्यांनी अमेरिकेतील रेड इंडियन लोक आणि आफ्रिकेतून आणलेले गुलाम यांच्याकडून शेती करून घ्यायला सुरुवात केली. शेतीबरोबर खाणींमधून अफाट खनिज संपत्ती त्यांच्या



हाती लागली. स्पेनने या भागात आपला कारभार सुरळीत चालवण्यासाठी गव्हर्नर नेमले. स्पेनचा राजा हा या वसाहतींचा सर्वोच्च सत्ताधीश होता. 'कौन्सिल ऑफ दी इंडिज' या संघटनेद्‌वारे सत्ता राबवण्यात येऊ लागली. ही कौन्सिल वसाहतींमधील व्यापारही सांभाळत होती. या वसाहतींमधून कच्चा माल स्पेनला नेला जाई. त्यापासून बनवलेला पक्का माल स्पेनमधून वसाहतींच्या बाजारपेठेत विक्रीसाठी आणला जाई. या प्रदेशातील सोने आणि चांदीच्या व्यापारात राजाला मोठा नफा मिळत असे. स्पेनची भरभराट पाहून इंग्लंड, हॉलंड आणि फ्रान्स यांनीही अमेरिका खंडात आपल्या वसाहती स्थापण्यास सुरुवात केली.

इंग्लंडची राणी एलिझाबेथ पहिली हिच्या काळात सागरी मोहिमांना प्रोत्साहन मिळाले. तसेच वसाहती स्थापन करण्यास प्राधान्य दिले गेले. राणी एलिझाबेथ पहिली हिच्या काळात व्यापारी नफ्याच्या जोडीने स्वराष्ट्राचे हित हे उद्‌दिष्ट वसाहतवादाला जोडले गेले. इ.स. १४९६ मध्ये जॉन कॅबट याला इंग्लंडने अमेरिकन भूमीवर वसाहती स्थापन करण्याची परवानगी दिली. त्याने उत्तर अमेरिकेत इंग्लंडचे बस्तान बसविले. इ.स. १६०७ मध्ये जेम्स नदीच्या काठावर ब्रिटिशांनी जेम्सटाऊन ही वसाहत उभारली. तिला पुढे 'व्हर्जिनिया' नाव देण्यात आले. पुढील काळात उत्तर अमेरिकेतील पूर्व किनारी प्रदेशात न्यू इंग्लंडपासून ते कॅरोलिनापर्यंत इंग्रजांच्या वसाहती स्थापन झाल्या.

इंग्लंडने वसाहतींची अधिकच नाकेबंदी करण्याचे धोरण आखले. यातूनच जलवाहतुकीसंबंधीचा कायदा केला गेला. या कायद्यान्वये मालाची वाहतूक करण्याची मक्तेदारी फक्त इंग्लंडमधील कंपन्यांना मिळाली.

१७६५ च्या कायद्यानुसार महत्त्वाच्या वस्तूंवर स्टॅम्प ड्युटी भरणे इंग्लंडने बंधनकारक केले. त्यामुळे वस्तूंच्या किमती वाढल्या. 'स्टॅम्प ॲक्ट'द्‌वारे लादल्या गेलेल्या करास आणि इंग्लंडने अमेरिकेतील त्यांच्या वसाहतींवर घातलेल्या इतर निर्बंधांना व्हर्जिनिया, मॅसॅच्युसेटस् या वसाहतींनी प्रथम विरोध केला. मॅसॅच्युसेटस्‌मधील बोस्टन या शहरात ५ मार्च १७७० रोजी ब्रिटिश सैनिकांच्या गोळीबारात काही लोक ठार झाले. यामुळे बोस्टनमध्ये असंतोष वाढला. १७७३ मध्ये सर्व वसाहतींनी स्वातंत्र्याची मागणी केली.

ब्रिटिश संसदेने अमेरिकेतील वसाहतीत चहा विकण्याची मक्तेदारी ईस्ट इंडिया कंपनीला दिली होती. वसाहतींवरील निर्बंध इंग्लंडने रद्‌द करावेत, वसाहतींना त्यांचा राज्यकारभार करण्याची स्वायत्तता द्यावी अशी मागणी तेथील नागरिक करू लागले. इंग्लंडने याला नकार देताच वसाहतींनी इंग्लंडच्या मालावर बहिष्कार टाकला. १७७३ साली बोस्टन बंदरात स्थानिक जनतेने निषेध दर्शवण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीकडून आलेल्या चहाच्या पेट्या समुद्रात फेकल्या. या घटनेस 'बोस्टन टी पार्टी' असे म्हणतात. या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील ब्रिटिश वसाहतींची सभा (कॉन्टिनेन्टल काँग्रेस) निर्माण करण्यात आली. १७७४ मध्ये फिलाडेल्फिया येथे या वसाहतींचे अधिवेशन भरले. त्यांनी ब्रिटनमधील मालाच्या आयात व निर्यातीला विरोध केला आणि ब्रिटिश माल वापरू नये, असा निर्णय घेतला. यातूनच अमेरिकेतील वसाहतींनी वसाहतवादाविरुद्‌ध लढा पुकारला.

अमेरिकेतील तेरा ब्रिटिश वसाहतींनी एकत्र येऊन आपण इंग्लंडच्या सत्तेपासून स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले. ४ जुलै १७७६ रोजी 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' हा दस्तऐवज संमत करण्यात आला. हा दस्तऐवज थॉमस जेफरसन याने तयार केला होता. जेफरसनने 'जीवन जगणे, स्वातंत्र्य आणि आनंद मिळवणे हे मानवाचे तीन निसर्गसिद्‌ध हक्क असल्याचे व ते कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत' असे नमूद केले.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्‌ध झाल्यावर ब्रिटिश सैन्य आणि १३ वसाहतींमधील नागरिक यांच्यात लढाया होत राहिल्या. सरतेशेवटी सॅराटोगा येथील लढाईत ब्रिटिश सैन्याचा निर्णायक पराभव झाला. फ्रेंचांनीही वसाहतींच्या संघर्षात अमेरिकनांना मदत केली. १७७९ मध्ये स्पेन अमेरिकेच्या बाजूने युद्‌धात उतरले. वसाहतींचा प्रमुख सेनापती जॉर्ज वॉशिंग्टनने इंग्रजांचा पराभव केला.


जॉर्ज वॉशिंग्टन

इंग्रजांचा सेनानी लॉर्ड कॉर्नवॉलिस १९ ऑक्टोबर रोजी शरण आला. अमेरिका स्वतंत्र झाली. मानवाचे निसर्गसिद्ध हक्क नाकारणाऱ्या राज्यकर्त्यांविरुद्ध लढण्याचा जनतेला हक्क असतो हे अमेरिकेने जगाला दाखवून दिले. 'राजाविना राज्य' ही अमेरिकेने जगाला दिलेली एक महत्त्वाची देणगी आहे.

अमेरिकेजवळील कॅनडा प्रदेश १७६३ च्या पॅरिस तहानुसार इंग्रजांकडे गेला. त्यांनी पुढे कॅनडाला संघराज्याचा दर्जा दिला आणि इंग्लंडसारखी द्‌विगृही संसद दिली. इंग्रजांनी कॅनडामध्ये एक राजप्रतिनिधी नेमला होता.

### २.३.२ ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड

१८ व्या शतकात ऑस्ट्रेलिया खंडात इंग्लंडमधून हद्दपार केलेल्या गुन्हेगारांची पहिली वसाहत स्थापन झाली. पुढे १९ व्या शतकात ऑस्ट्रेलियात इतर स्वतंत्र प्रदेशांचे वसाहतीकरण झाले. त्याखेरीज टॅस्मानिया बेट आणि न्यूझीलंडमध्ये वसाहती स्थापन केल्या गेल्या. १९०० मध्ये टॅस्मानिया बेट ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अंतर्भूत करून स्वयंशासित असे ऑस्ट्रेलियाचे प्रजासत्ताक राज्य स्थापण्यात आले. त्यांना इंग्लंडप्रमाणे द्‌विगृही संसद देण्यात आली. इंग्लंडच्या राजाने ऑस्ट्रेलियातील राजप्रतिनिधी म्हणून 'गव्हर्नर जनरल'ची नेमणूक केली. ऑस्ट्रेलियात फक्त युरोपीय नागरिकांनाच स्थलांतरीत म्हणून जाण्याची परवानगी होती.

न्यूझीलंडला साम्राज्यांतर्गत स्वयंशासित देशाचा दर्जा १९०७ मध्ये देण्यात आला. न्यूझीलंडमधील वसाहतींनी लोकशाही पद्‌धतीचा अवलंब केला. सार्वत्रिक मताधिकार, सरकारी मालकीची रेल्वे, आग व अपघाताचा विमा, वृद्‌धांसाठी निवृत्ती वेतन, कामगारांना कामावर जखमी वा मृत झाल्यास नुकसान भरपाई या गोष्टी १९०० पूर्वीच न्यूझीलंडमध्ये राबवल्या गेल्या.

### २.३.३ आशिया

इतर युरोपीय वसाहतवाद्यांच्या आक्रमणांपासून वसाहतींचे संरक्षण करणे आणि सीमावर्ती प्रदेशांमध्ये व्यापाराचा विकास करून स्वार्थ साधणे हे इंग्रजांचे उद्‌दिष्ट होते.

**म्यानमार :** भारताचे ईशान्येकडील शेजारी राष्ट्र म्हणजे म्यानमार. त्याचे पूर्वीचे नाव ब्रह्मदेश (बर्मा) असे होते. म्यानमारमधील नैसर्गिक संपत्ती आणि बाजारपेठेची उपलब्धता यांमुळे त्या देशावर कब्जा मिळवणे हा इंग्रजांचा हेतू होता.

म्यानमारमधील राज्यकर्त्यांनी १७६० पर्यंत म्यानमार एकछत्री अंमलाखाली आणला होता. त्यांनी एकोणिसाव्या शतकात मणिपूर जिंकून आसामवर धडक मारली. इंग्रजांच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा होती. पुढे भारताचा गव्हर्नर लॉर्ड ॲम्हर्स्ट याने म्यानमार विरुद्‌ध युद्‌ध पुकारले. ते दोन वर्षे चालले. ते पहिले 'ब्रह्मी युद्‌ध' म्हणून ओळखले जाते. या युद्‌धात इंग्रजांच्या आरमाराने रंगून (यॉंगॉन) बंदर जिंकून घेतले. त्यानंतर इंग्रज आणि म्यानमारचे राज्यकर्ते यांच्यात तह झाला. या तहान्वये म्यानमारकडून इंग्रजांनी मणिपूर परत घेतले. तसेच म्यानमारचा किनारी प्रदेश आणि तेथील जंगल व खनिज संपत्ती इंग्रजांच्या ताब्यात आले. इंग्रजांनी म्यानमारकडून लष्करी भरपाई म्हणून मोठी रक्कम वसूल केली. म्यानमारची तत्कालीन राजधानी ॲव्हा येथे इंग्रज रेसिडेंट नेमण्यात आला.

'दुसरे ब्रह्मी युद्‌ध' लॉर्ड डलहौसीच्या काळात लढले गेले. म्यानमारमध्ये राहणाऱ्या दोन इंग्रज नागरिकांना म्यानमार प्रशासनाने दंड ठोठावला. डलहौसीला हस्तक्षेप करण्याचे जणू कारणच मिळाले. डलहौसीने जॉर्ज लॅम्बर्ट या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली फौजा पाठवून युद्‌ध पुकारले. ब्रह्मी सैन्याचा पराभव केला. रंगून (यॉंगॉन), पेगू (बेगो), प्रोम ही ठिकाणे इंग्रजांनी जिंकून घेतली. पेगूचा प्रदेश इंग्रजांनी त्यांच्या साम्राज्यात विलीन केला. या विजयामुळे इंग्रजांचा म्यानमारच्या किनाऱ्यावरील प्रभाव वाढला. म्यानमारविरुद्‌धच्या या लढाईत इंग्रजांच्या सैन्यात भारतीय सैनिकांचा समावेश होता. या युद्‌धाच्या खर्चाचा भारसुद्‌धा भारतीयांवर टाकण्यात आला.

'तिसरे ब्रह्मी युद्‌ध' १८८५ च्या सुमारास झाले. या युद्‌धासाठी ब्रह्मी सरकारचा फ्रान्सशी वाढत चाललेला संपर्क हे एक कारण होते. फ्रेंचांनी व्हिएतनाम (इंडोचायना) मध्ये स्वतःचे प्रभावक्षेत्र निर्माण केले होते. इंग्रजांना संभाव्य धोक्याची कल्पना आली. त्यापूर्वी म्यानमारचा राजा थिबा याने इटली व जर्मनी या देशांशी

व्यापारी करार करण्याचा प्रयत्न केला. त्याने फ्रान्सशी व्यापारी करार केला. अशातच थिबा राजाने 'बॉम्बे-बर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन' या ब्रिटिश व्यापारी संस्थेला दंड ठोठावला. लॉर्ड डफरीन याने म्यानमारशी लढण्यासाठी सैन्य पाठवले. या युद्धात इंग्रजांनी मंडाले हे शहर जिंकले. थिबा राजा इंग्रजांना शरण आला आणि उत्तर म्यानमार इंग्रज साम्राज्याचा भाग बनले. १९३५ च्या कायद्यान्वये इंग्रजांनी म्यानमार भारतापासून वेगळा केला.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यापासून प्रेरणा घेऊन जानेवारी १९४८ मध्ये म्यानमार स्वतंत्र झाला.

**नेपाळ :** हिमालयाच्या कुशीत वसलेले नेपाळ हे एक छोटे राष्ट्र आहे. ब्रिटिशांनी आपले प्रतिनिधी नेपाळमध्ये पाठवले होते. परंतु ब्रिटिशांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यातूनच इंग्लंडविरुद्ध नेपाळ अशी दोन युद्धे झाली.

नेपाळी १० ते १२ हजार तर इंग्रजांची फौज ३० हजाराच्या पुढे होती. नेपाळवर इंग्रजांनी आक्रमण केले. नेपाळी सैन्याने इंग्रजांना जेरीस आणले. इंग्रजांनी १८१६ मध्ये नेपाळचा मकवानपूर येथे पराभव केला. त्यानंतर झालेल्या तहानुसार इंग्रजांनी तराई, कुमाऊँ, गढवाल हे प्रदेश ताब्यात घेतले. काठमांडू येथे इंग्रज रेसिडेंट नेमला गेला. १९२३ मध्ये इंग्रजांनी नेपाळच्या सार्वभौमत्वाला मान्यता दिली.

**सिक्कीम :** भारताच्या आसपासचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट होते. भारताच्या उत्तर सीमेवर भूटान, बंगाल, नेपाळ आणि तिबेट यांनी वेढलेले सिक्कीम हे एक छोटे राज्य होते. १८१५ मध्ये सिक्कीमच्या राजाने दार्जिलिंग भोवतालचा प्रदेश ब्रिटिशांकडे सुपूर्द केला. त्या बदल्यात राजाला ब्रिटिशांकडून वार्षिक तनखा सुरू झाला. पुढे लॉर्ड

**माहीत आहे का तुम्हांला ?**

इंग्रजांनी म्यानमार ताब्यात घेतल्यानंतर तेथील राजा 'थिबा' याला कैद केले. त्याने भविष्यात पुन्हा उठाव करू नये आणि त्याचा प्रजेशी काही संबंध राहू नये म्हणून ब्रिटिशांनी त्याला भारतात, महाराष्ट्रातील रत्नागिरीच्या परिसरात आणले. राजाला नजरकैदेत ठेवण्यासाठी तीन मजली प्रशस्त राजवाडा उभारण्यात आला. राजवाड्याच्या तळमजल्यावर संगमरवरी फरशीचे सभागृह आहे. छताला सुंदर नक्षीकाम केलेल्या लाकडी पट्ट्या लावलेल्या आहेत. अर्धवर्तुळाकार खिडक्यांना रंगीबेरंगी इटालियन काचा लावलेल्या आहेत. या राजवाड्याच्या परिसरात थिबा राजाने म्यानमारमधून आणलेली भगवान गौतम बुद्धांची मूर्ती आहे.

पूर्वी दिल्लीचा बादशाह 'बहादुरशाह' यास १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्याबद्दल इंग्रजांनी म्यानमार या देशातील यॉंगॉन येथे पाठवले होते. बादशाह तिकडेच मृत्यू पावला.

योगायोगाची गोष्ट म्हणजे पुढे याच रत्नागिरी जिल्ह्यात जन्मलेल्या लोकमान्य टिळकांना इंग्रजांनी राष्ट्रीय चळवळीपासून दूर ठेवण्यासाठी म्यानमार या देशातील मंडालेच्या कारागृहात सहा वर्षे ठेवले होते. येथेच टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ रचला. पुढे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सुद्धा इंग्रज सरकारने मंडालेच्या तुरूंगात ठेवले होते.



थिबा राजाचा राजवाडा-रत्नागिरी

डलहौसी याने सैन्य पाठवून सिक्कीमचा आणखी काही प्रदेश ताब्यात घेतला. त्यामुळे सिक्कीम इंग्रज व्यापाऱ्यांसाठी खुले झाले. यामुळे भारत-तिबेट व्यापारावरील जकातीचे अधिकार इंग्रजांना मिळाले. १८८६ मध्ये तिबेटी लोकांनी सिक्कीमवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करताच इंग्रजांनी तिबेटी लोकांविरुद्ध कारवाई सुरू केली. १८९० मध्ये ब्रिटिश-चीन तहानुसार सिक्कीम इंग्रजांचे संरक्षित राष्ट्र असल्याचे मान्य करण्यात आले. दार्जिलिंग परिसरातील चहाचे मळे संरक्षित ठेवणे इंग्रजांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. सिक्कीमला मध्यगत राष्ट्र (बफर झोन) बनवून त्याचे अंतर्गत प्रशासन व परराष्ट्र धोरण इंग्रजांनी स्वतःच्या ताब्यात घेतले. परंतु सिक्कीमचा दर्जा मात्र एक स्वतंत्र राज्य म्हणून राहिला. १९७५ मध्ये सिक्कीमच्या जनतेने भारतीय संघराज्यात सामील होण्याच्या बाजूने मतदान केले आणि त्यानुसार सिक्कीमला भारतीय संघराज्यात घटकराज्याचा दर्जा मिळाला.

**भूटान :** भारताच्या उत्तर सीमा भागात आणि सिक्कीमच्या पूर्वेला भूटान हा देश आहे. या प्रदेशाचे भौगोलिक आणि व्यापारी महत्त्व जाणून वॉरन हेस्टिंग्ज याने भूटानशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे बंगाल ते तिबेट हा भूटानच्या प्रदेशातून जाणारा व्यापारी मार्ग खुला झाला. १८४१ मध्ये ॲशले एडन याने भूटानविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. १८६५ मध्ये भूटान विरुद्ध इंग्रज असे युद्ध झाले. त्यानंतर झालेल्या तहानुसार भूटानने जिंकून घेतलेले प्रदेश ब्रिटिशांच्या हवाली करणे आणि त्या मोबदल्यात ब्रिटिशांनी भूटानच्या राजाला वार्षिक तनखा देणे या दोन गोष्टी ठरवल्या गेल्या. १९१० च्या तहानुसार भूटानच्या राजाने संरक्षण व परराष्ट्र धोरणाचे अधिकार इंग्रजांना दिले. इंग्रजांनी भूटानच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे मान्य केले. ८ ऑगस्ट १९४९ रोजी भारत आणि भूटान यांच्यामध्ये झालेल्या करारान्वये भूटानचे परराष्ट्र धोरण आणि संरक्षणासंबंधीची धोरणे यांमध्ये भारताची भूमिका सल्लागार राष्ट्राची आहे.

**तिबेट :** तिबेटचा प्रदेश दलाई लामांच्या प्रभावाखाली होता. रशियाला अटकाव करणे आणि स्वतःचा व्यापार वाढवणे यांसाठी तिबेटच्या प्रदेशावर इंग्रजांची नजर होती. लॉर्ड कर्झनच्या काळात इंग्रजांच्या फौजा तिबेटच्या राजधानीत म्हणजे ल्हासापर्यंत पोचल्या. १९०७ मध्ये इंग्लंड व रशियात झालेल्या करारानुसार तिबेटमधील चीनच्या वर्चस्वाला तत्वतः मान्यता देण्यात आली. त्यामुळे चीनला पुढील काळात तिबेटवर संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करण्यास वाव मिळाला.

### २.३.४ आफ्रिका

आशिया खंडाप्रमाणेच आफ्रिका खंडातही युरोपीय प्रवासी पोचले. घनदाट जंगले, विस्तीर्ण सरोवरे, दलदल आणि वाळवंटे यांनी युक्त असणारा आफ्रिकेचा परिसर युरोपीय लोकांसाठी अनोळखी होता. बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्ड याने कांगोवर वर्चस्व मिळवले होते. त्याने १८७६ मध्ये ब्रुसेल्स येथे एक परिषद भरवली. येथे युरोपातील भूगोल शास्त्रज्ञ आणि संशोधक एकत्र आले होते. आफ्रिकेत ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द एक्सप्लोरेशन अँड सिव्हिलायझेशन ऑफ सेंट्रल आफ्रिका' या नावाची संस्था स्थापण्याचे या परिषदेत ठरले. आफ्रिकेत आपल्यासाठी कोणत्या संधी आहेत याचा विचार करण्यासाठी १८८४ मध्ये बर्लिन येथे युरोपीय राष्ट्रांची एक परिषद भरली. प्रत्यक्षात मात्र ही परिषद युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेचा प्रदेश आपापसात शांततापूर्ण रीतीने कसा वाटून घ्यावा हे ठरवण्यासाठी बोलावली होती.

बर्लिन परिषदेत बेल्जियमच्या कांगोवरील प्रभुत्वाला मान्यता देऊन तो प्रदेश 'कांगो फ्री स्टेट' म्हणून ओळखण्यास मान्यता देण्यात आली. स्वतःच्या प्रभुत्वाखाली असलेल्या आफ्रिकन वसाहतीमधील मानवी आणि नैसर्गिक संपत्तीचा पूर्ण विनियोग करण्यात एखादे युरोपियन राष्ट्र अयशस्वी ठरले तर त्या राष्ट्राने तो प्रदेश दुसऱ्या सक्षम राष्ट्राच्या हवाली करावा असे या परिषदेत ठरले.

जॉर्ज टॉबमन गोल्डी याने इंग्लंडमध्ये 'युनायटेड आफ्रिकन कंपनी' स्थापन केली होती. इंग्लंडने त्याला नायजेरियात व्यापार करण्याची सनद दिली. पुढे इंग्रज सरकारने ही कंपनीच ताब्यात घेतली. 'नायजेरिया' ही इंग्रज सरकारच्या अधीन असलेली वसाहत बनली.

जर्मनीचा चॅन्सेलर बिस्मार्क याने १८८३ मध्ये

पश्चिम आफ्रिकेत जर्मनीची टोगोलँड ही पहिली वसाहत स्थापन केली. पुढे कामरून, नैऋत्य आफ्रिका येथेही जर्मनीने स्वतःच्या वसाहती स्थापन केल्या.

सेनेगल, गांबिया आणि कांगोच्या उत्तरेकडील प्रदेश फ्रान्सने स्वतःच्या वर्चस्वाखाली आणला. १८८३ मध्ये आयव्हरी कोस्ट येथेही फ्रान्सने वसाहत स्थापन केली. पुढे पोर्तुगालच्या ताब्यातील दाहोमे या आफ्रिकन प्रदेशावर फ्रान्सने ताबा मिळवला. फ्रान्सने १९१४ पर्यंत वायव्य आफ्रिकेच्या सहारा वाळवंटापासून पश्चिमेला आयव्हरी कोस्टपर्यंत आणि फ्रेंच गिनी या प्रदेशावर वर्चस्व स्थापले.

पूर्व आफ्रिकेतील केप कॉलनी आणि नाताळ या वसाहती इंग्लंडच्या ताब्यात, तर मोझांबिक स्पेनच्या ताब्यात होते. इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी यांना पूर्व आफ्रिकेच्या प्रदेशांमध्ये रस होता. या तिघांनी मिळून परस्परांचे हितसंबंध राखण्यासाठी एक करार केला. त्यानुसार झांजीबारच्या सुलतानाला झांजीबार, पेम्बा बेट आणि पूर्व आफ्रिकेची किनारपट्टी देण्याचे ठरले. मादागास्कर बेट फ्रान्सला तसेच आफ्रिकेच्या किनारपट्टीचा उत्तरेचा भाग इंग्लंडला तर दक्षिणेचा प्रदेश जर्मनीला द्यायचा असे ठरले. १८९७ मध्ये जर्मनीने 'जर्मन ईस्ट आफ्रिका कंपनी' कडून पूर्व आफ्रिकेतील प्रदेश स्वतःकडे घेतला. इंग्लंडने झांजीबार, पेम्बा बेट व न्यासालँड (मालावी) हे ब्रिटिश संरक्षित प्रदेश म्हणून जाहीर केले. इंग्लंडच्या प्रभावाखालील प्रदेश 'ब्रिटिश ईस्ट आफ्रिका' या नावाने ओळखला जाऊ लागला.

उत्तर आफ्रिकेत मोरोक्को, अल्जेरिया, ट्युनीस, त्रिपोली (लीबिया) आणि इजिप्त हे भाग मोडतात. फ्रान्सने १८३० मध्ये अल्जेरियावर प्रभुत्व निर्माण केले होते. ट्युनिसवर इटली, फ्रान्स आणि इंग्लंडचे लक्ष होते. या संघर्षात फ्रान्सने बाजी मारून तुर्की सुलतानाकडून ट्युनिस जिंकून घेतले. पुढे फ्रान्सने मोरोक्को ताब्यात घेतले. इटलीने त्रिपोली, सायरेनिका जिंकून घेतले.

इजिप्तच्या भूमीत इंग्लंड आणि फ्रान्स दोघांनाही रस होता. इंग्रजांनी अलेक्झांड्रिया ते कैरो रेल्वेमार्ग बांधला. भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र जोडण्यासाठी सुएझचा कालवा फ्रेंच अधिकारी फर्डिनंड दि लेसेप्स याच्या देखरेखीखाली खोदला. सुरुवातीला हा सर्व खर्च इजिप्त करत होता.

सुएझ कालव्याचा खर्च एवढा वाढला की, इजिप्तला त्यासाठी कर्ज घ्यावे लागले. कर्जावरचे व्याजही फेडता येईना म्हणून सुएझ कालवा कंपनीचे समभाग (शेअर्स) विक्रीसाठी काढले गेले. इंग्लंडने यातील समभागांचा काही भाग विकत घेतला. यामुळे सुएझ कालव्यावर इंग्लंडचे वर्चस्व निर्माण झाले. पुढे १९२२ मध्ये इजिप्त स्वतंत्र झाला.

सुदान हा इजिप्तच्या दक्षिणेकडील देश इजिप्तचा मांडलिक होता. इजिप्तवरील वर्चस्वाच्या आधारे इंग्लंडने सुदानवरही हक्क सांगितला. सुदानमधील स्थानिक सत्तांनी या गोष्टीस विरोध केला. आपले सैन्य सुदानमध्ये विना अडथळा नेण्याची सोय व्हावी म्हणून इंग्लंडने युगांडा ते सुदानपर्यंतचा रेल्वेमार्ग तयार करण्यास सुरुवात केली. नाईल नदी इजिप्तची जीवनदायिनी होती. तिचा उगम सुदानमध्ये असल्याने सुदानवर ताबा असणे इंग्लंडच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. फ्रान्सने सुदानवरील इंग्लंडच्या हक्कास मान्यता दिली. त्याबदल्यात पश्चिम आफ्रिकेत स्वतःला काही सवलती घेतल्या. स्थानिक जनतेचा विरोध लक्षात न घेता शस्त्रास्त्रांच्या बळावर इंग्लंडने सुदानवर वर्चस्व प्रस्थापित केले.

आफ्रिकेच्या दक्षिण भागात केप कॉलनी व नाताळ या भागावर ब्रिटिशांचे वर्चस्व होते. तर ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या प्रदेशांवर डच लोकांचे वर्चस्व होते. जोहान्सबर्ग येथे सोन्याच्या खाणी सापडल्यानंतर युरोपातील राष्ट्रे या भागाकडे आकर्षित झाली. १९०९ पर्यंत दक्षिण आफ्रिकेतील आपल्या वर्चस्वाखाली वसाहतींचे एकीकरण करून त्यास 'युनियन ऑफ साऊथ आफ्रिका' असे नाव इंग्लंडने दिले. याच काळात पोर्तुगालने अंगोलाच्या भागात आपले वर्चस्व निर्माण केले. गिनी कोस्टमधील काही बेटे, मोरोक्कोचा काही भाग स्पेनच्या वर्चस्वाखाली आले.

आतापर्यंत युरोपीय वसाहतवादाच्या इतिहासाचा आढावा आपण घेतला. पुढील पाठात आपण 'युरोपीय वसाहतवादाचा भारतावरील प्रभाव' या विषयाची माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. ‘स्वातंत्र्याचा जाहिरनामा’ ........... याने तयार केला.

(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) थॉमस जेफरसन
(क) लॉर्ड ॲमहर्स्ट (ड) लॉर्ड कॉर्नवॉलिस

२. दुसरे ब्रह्मी युद्ध ........... च्या काळात लढले गेले.

(अ) लॉर्ड ॲम्हर्स्ट (ब) लॉर्ड डफरीन
(क) लॉर्ड डलहौसी (ड) ॲशले एडन

**(ब) पुढील संचामधील ‘ब’ गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| १. | टोगोलँड | – | जर्मन वसाहत |
| २. | इजिप्त | – | ब्रिटिश वसाहत |
| ३. | ऑरेंज फ्री स्टेट | – | डच वसाहत |
| ४. | आयव्हरी कोस्ट | – | पोर्तुगीज वसाहत |

**प्र.२ (अ) ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. अमेरिकेच्या दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश या सत्तेच्या ताब्यात होता –


२. या राणीच्या काळात इंग्लंडच्या सागरी मोहिमांना प्रोत्साहन मिळाले –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१. म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्‌दिष्ट होते. कारण –

(अ) ब्रिटिशांना साम्राज्यविस्तार करायचा होता.
(ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.
(क) ब्रिटिशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.
(ड) म्यानमारचा राजा थिबा याला त्यांना धडा शिकवायचा होता.

**प्र.३ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ टीपा लिहा.**

१. वसाहतवादाचे स्वरूप
२. अमेरिकन स्वातंत्र्युद्ध

**प्र.५ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली.
२. युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या.

**उपक्रम**

१. आफ्रिका खंडाच्या नकाशाचे आंतरजालाच्या साहाय्याने निरीक्षण करा.
२. आफ्रिका खंडातील जैववैविध्य, खनिजसंपत्ती यांची माहिती मिळवा.

# ३. भारत आणि युरोपीय वसाहतवाद


३.१ पोर्तुगीज
३.२ ब्रिटिश
३.३ डच
३.४ फ्रेंच


मागील पाठात युरोपीय वसाहतवाद आणि त्याचा जगाच्या इतिहासावर झालेला परिणाम यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. जागतिक आढावा घेतल्यावर युरोपीय वसाहतवादाचा भारतातील विस्तार आणि भारतावरील परिणाम या पाठात पाहणार आहोत.

## ३.१ पोर्तुगीज

पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को-द-गामा इ.स.१४९८ मध्ये कालिकत (कोझीकोडे) येथे पोचला. पोर्तुगिजांनी अरब आरमाराचा पराभव करून भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली. दक्षिण हिंदुस्थानातील राज्यांमध्ये असणाऱ्या आपापसातील भांडणांचा त्यांनी फायदा घेतला. पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वसाहती स्थापल्या. पोर्तुगिजांनी वसाहतींच्या रक्षणासाठी किल्ले उभारले. किल्ल्यांच्या आधारे बाह्य हल्ल्यांपासून आपल्या वसाहतींचे रक्षण करायचे आणि समुद्रमार्गे किल्ल्यांना रसद पुरवायची ही पोर्तुगिजांची युद्धनीती होती. त्यांचे आरमार प्रबळ होते. किनाऱ्यावर आरमारी छापा घालून शत्रूचा मुलुख ते उद्ध्वस्त करत असत. या आरमाराचा सामना करणे स्थानिक भारतीय सत्तांना शक्य झाले नाही. पुढे हिंदी महासागरावर पोर्तुगिजांनी वर्चस्व स्थापल्यावर भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर पोर्तुगिजांचे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक झाले. परवान्याशिवाय प्रवास केल्यास पोर्तुगीज जहाज जप्त करत किंवा ते बुडवत असत. पोर्तुगिजांचे आरमारी सामर्थ्य एवढे होते की, मुघल, आदिलशाही व कुतुबशाही या सत्तांनासुद्धा कार्ताझ घेणे गरजेचे झाले. इ.स.१६०८ पर्यंत भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर दीव, दमण, चौल, गोवा (साष्टी व बारदेशसह), होनावर, गंगोळी, बसरूर, मंगलोर, कन्नूर, कोडुंगल्लूर, कोची आणि कोल्लम येथे पोर्तुगिजांनी वसाहती उभारल्या. तसेच पूर्व किनाऱ्यावर नागपट्टिणम, मयिलापूर (सांव थोम) आणि बंगालमध्ये हुगळी येथे पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी वसाहती उभारल्या. पोर्तुगिजांच्या या पूर्वेकडील साम्राज्याची राजधानी गोवा येथे होती.

**करून पहा.**

केरळ राज्यात वास्को-द-गामाच्या नावाने असलेल्या चर्चची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**कार्ताझ** : कार्ताझच्या दस्तऐवजांमध्ये सामान्यतः जहाजाचे नाव, तांडेलाचे नाव, कोठून कोठे जाणार, त्यात स्वसंरक्षणार्थ असलेली शस्त्रास्त्रे इत्यादी तपशील असे.

केप ऑफ गुड होपपासून पूर्वेस चीनमधील मकावपर्यंत पोर्तुगिजांच्या ज्या वसाहती होत्या त्या सर्वांचा समावेश एकत्रितपणे त्यांच्या भारतीय साम्राज्यात ('एस्तोदा द इंडिया') होत असे. त्यावर पोर्तुगालच्या राजाने नेमलेल्या मुख्य अधिकाऱ्यांमध्ये 'विजरई-इ-कपितांव-जराल' (राजप्रतिनिधी व सेनापती) असत. ही नेमणूक तीन वर्षांसाठी असायची. मुख्य अधिकाऱ्याला सल्ला देण्यासाठी राज्य सल्लागार मंडळ असे. या मंडळात गोव्याचा 'अर्सेबिश्पु' (मुख्य धर्मगुरु), 'शान्सेलर' (न्यायाधीश), 'वेदोर द फझेंद' (मालमत्तेवरील अधिकारी) आणि गोव्याचा 'कपितांव' (कॅप्टन) यांच्या बरोबरीने काही वंशपरंपरागत उमराव या मंडळात असत. विजरई हा मंडळाच्या अध्यक्षस्थानी असे.

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात दरवर्षी पोर्तुगालमधून सरासरी पाच जहाजे भारतात येत होती. या जहाजांवर तोफा असत. पोर्तुगीज दमण, वसई आणि गोवा येथे जहाजे बांधत. त्यासाठी लागणारे सागाचे उत्तम, टिकाऊ

लाकूड येथे उपलब्ध होते. पोर्तुगीज आरमारातील सैनिक पोर्तुगालहून भारतात पाठवले जात. सतराव्या शतकात हिंदी महासागरात झालेल्या नाविक लढायांमध्ये डच व इंग्रजांनी पोर्तुगिजांचा पराभव केला. या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचा अपवाद वगळल्यास इतर भारतीय सत्तांकडे स्वतःचे आरमार नव्हते. त्यामुळे पोर्तुगिजांशी सामना करणे भारतीयांना अवघड होते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पोर्तुगीज व्यापार :** कालिकतचा राजा झामोरीन याने वास्को-द-गामाबरोबर पोर्तुगालच्या राजाला पाठवलेल्या पत्रात लिहिले, ''आमच्या राज्यात दालचिनी, लवंग, सुंठ, मिरी आणि जवाहिर यांची समृद्धी असून आपलेकडून सोने, चांदी, पोवळी इत्यादी जिन्नस आम्हाला मिळावे, अशी आमची इच्छा आहे.'' कालिकत आणि कन्नूर येथून गेलेला माल वास्को-द-गामाने पोर्तुगालमध्ये विकला त्या मालातून त्याने पोर्तुगाल ते भारत आणि परतीच्या प्रवासाच्या खर्चाच्या साठपट किंमत वसूल केली.

पोर्तुगिजांनी त्यांच्या सत्तेखालील प्रदेशात ख्रिस्ती धर्माखेरीज इतर धर्मांची प्रार्थना स्थळे बांधण्यास वा दुरुस्त करण्यास बंदी केली. त्यांनी अन्य धर्मियांना त्यांच्या पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे करण्यास वा लग्न समारंभ साजरे करण्यास बंदी घातली. स्थानिक भाषांचीही गळचेपी केली. धर्मांतर करणाऱ्यांना पोर्तुगिजांनी नोकऱ्या देण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या सुरुवातीच्या कारकिर्दीत गोव्याला मुक्त बंदराचे स्वरूप दिले. त्यामुळे आशियातील देशोदेशींचे व्यापारी गोव्यात येत असत.

### ३.२ ब्रिटिश

ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना ३१ डिसेंबर १६०० रोजी झाली. इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.

जहाजे पूर्वेकडील देशात पाठवणे, तेथे माल विकून जो पैसा मिळेल त्यातून आणि पाठवलेल्या रोख रकमेतून प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ खरेदी करणे, ते इंग्लंडमध्ये विकणे व नफा मिळवणे हे कंपनीच्या कामाचे सुरुवातीचे स्वरूप होते. या काळातील जहाजे शिडांवर चालणारी असल्यामुळे त्यांना वर्षाच्या ठरावीक काळात निघणे आणि ठरावीक वेळी परतणे अपरिहार्य होते. यामुळे माल खरेदी करणे आणि विकणे जिकीरीचे होऊ लागले. भाव कमी असताना खरेदी केलेला माल ठेवण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीला कायमस्वरूपी जागा मिळवणे आवश्यक झाले. इंग्लंडहून डिसेंबर ते एप्रिल मध्ये निघायचे आणि भारतातील व्यापार आटोपून पुढील वर्षी जानेवारीत परत जायचे असा कमाल १३ आणि किमान ९ महिन्यांचा क्रम ठरलेला असायचा. यामुळे कंपनीने भारतात वखारी (मालाची खरेदी-विक्री करण्याचे आणि साठवणुकीचे केंद्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अशा वखारीला 'फॅक्टरी' आणि नोकरांना 'फॅक्टर्स' म्हणत असत. इ.स.१६२३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना नागरी व लष्करी कायद्यानुसार कंपनीतील नोकरवर्गाला शिक्षा करण्याचा अधिकार दिला गेला. कंपनीला पूर्वेकडील देशांमध्ये व्यापार करण्याचा एकाधिकार मिळाला. इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याने कंपनीला एकाधिकाराची नवी सनद देऊन पूर्वेकडील देशात किल्ले बांधणे, सैन्य बाळगणे आणि इतर धर्मियांशी युद्ध वा तह करण्याचे अधिकार दिले.

**करून पहा.**

भारतातील स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील जहाज बांधणी प्रकल्पाच्या ठिकाणांची यादी तयार करून जहाज बांधणीमध्ये झालेल्या प्रगतीची माहिती मिळवा.

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात कंपनीचा कारभार सुरत आणि चेन्नई (मद्रास) येथून चालत असे. चेन्नईच्या कार्यकक्षेत भारताचा पूर्वकिनारा, ओडिशा, बंगाल आणि पूर्वेकडील इतर देश होते. सुरतेच्या कार्यकक्षेत महाराष्ट्रातील राजापूर, तांबड्या समुद्रातील मोखा, पर्शियन आखातातील बसरा येथील वखारी होत्या. सुरतेच्या वखारीत एक हिशेबनीस, एक कोठारप्रमुख, एक खजिनदार, काही वखारदार, कारकून असत.

त्यांच्या जोडीला धर्मगुरु, सर्जन व मदतनीस, स्वयंपाकी, प्रेसिडेंटचा नोकर, एक तुतारीवाला असे लोक असत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**वखार :** इंग्रज वखारीसाठी मोठ्या जागा घेत असत. मालाचे कोठार, निवासस्थाने, कार्यालय यासाठी ही जागा असे. वखारीवर इंग्रजांचा झेंडा (पांढऱ्या पार्श्वभूमीवर तांबडा क्रॉस) असे. वखारीतील जेवणात पाव, मांस, भात, डाळ-तांदुळाची खिचडी, लोणचे यांचा समावेश असे. मनोरंजन किंवा नोकरांच्या श्रमपरिहारासाठी कंपनीने सुरत, कारवार, मच्छलीपट्टण, पेतापोली, चेन्नई आणि मुंबई येथे बागा उभारल्या होत्या.

प्रत्यक्ष वखारीत काम करणाऱ्या इंग्रजांमध्ये शिकाऊ उमेदवार (ॲप्रेंटिस), कारकून आणि फॅक्टर असे हुद्दे होते. शिकाऊ उमेदवार ते प्रेसिडेंट सगळे वखारीच्या आवारात राहत असत. तेथे भोजनाची सोय होती. कंपनीने मनाई केलेल्या वस्तू वगळून (कापड, नीळ, मसाल्याचे पदार्थ, लोकर, शिसे, प्रवाळ, हस्तिदंत इत्यादी) अन्य वस्तूंचा खासगी व्यापार करण्यास त्यांना परवानगी होती.

कंपनीने संरक्षणासाठी किल्ले बांधण्याचे धोरण सुरू केले. त्यांनी अर्मगाव (चेन्नईच्या उत्तरेस सुमारे ९० कि.मी. अंतरावर) येथे किल्ला तर चेन्नई येथे वखार आणि किल्ला बांधला. या किल्ल्याला 'फोर्ट सेंट जॉर्ज' हे नाव देण्यात आले. तेथेच टांकसाळ सुरू करून त्यात सोने-चांदी, मिश्र धातू आणि तांब्याची नाणी पाडण्यास इंग्रजांनी सुरुवात केली.

**करून पहा.**

देश-विदेशामधील चलने विविध नावांनी ओळखली जातात. देशाचे नाव आणि त्यांच्या वापरातील चलनाचे नाव अशी यादी तयार करा.

इ.स. १६६१ मध्ये इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याचे पोर्तुगीज राजकन्या ब्रॅगांझा हिच्याशी लग्न ठरले. पोर्तुगालच्या राजाने त्याला मुंबई बेट आंदण म्हणून दिले. चार्ल्सने अब्राहम शिपमन याला ५०० सैनिक देऊन मुंबईचा गव्हर्नर नेमले. १६६५ मध्ये मुंबई सर्वाथाने इंग्रजांच्या ताब्यात गेली. मुंबईमध्ये मुंबई, माहीम, परळ, वडाळा, वरळी, शीव आणि माझगाव या सात बेटांचा समावेश होता. मुंबईच्या कारभारासाठी जेवढा खर्च व्हायचा त्या मानाने उत्पन्न कमी असल्यामुळे चार्ल्सने मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले. कंपनीने इ.स. १६६९ मध्ये सुरतेचा प्रेसिडेंट सर जॉर्ज ऑक्झिंडेन यास मुंबई बेटाचा गव्हर्नर व कमांडर इन चीफ नेमले. मुंबईत इंग्रजांनी टांकसाळ सुरू करून चांदी, तांबे आणि जस्त या धातूंची नाणी पाडण्यास सुरुवात केली. कंपनीने मुंबई बेटावर व्यापारी आणि कारागिरांना येऊन राहण्यास उत्तेजन दिले. मुंबईच्या रक्षणार्थ कंपनीकडे पाच-सहा लहान जहाजे आणि सुमारे तीनशेच्या आसपास सैनिक होते. या सैन्याकडे बंदुका आणि तलवारी असत.

## ३.३ डच

इ.स.१६०२ मध्ये अनेक डच कंपन्यांनी एकत्र येऊन 'युनायटेड ईस्ट इंडिया' कंपनी स्थापन केली. त्या कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा अधिकार डच सरकारने दिला. त्याअंतर्गत कंपनीला नोकर ठेवणे, वखारी स्थापणे, किल्ले बांधणे, नाणी पाडणे, पौर्वात्य देशांशी युद्ध वा तह करणे असे अधिकार मिळाले. कंपनीने त्यासाठी गव्हर्नर जनरल हा अधिकारी नेमला. १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत कंपनीने आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून ते जपानपर्यंत वसाहती आणि वखारी उभारल्या. त्यामध्ये सध्याचे मोझांबिक, दक्षिण आफ्रिका, येमेन, इराक, इराण, पाकिस्तान, भारत, बांगलादेश,

**माहीत आहे का तुम्हांला ?**

मच्छलीपट्टण येथे डचांची पहिली वसाहत स्थापन झाली. हे बंदर इ.स.पू. ३ ऱ्या शतकापासून अस्तित्वात होते. त्याचा उल्लेख 'पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी'मध्ये आहे. त्यामध्ये मच्छलीपट्टणचे नाव 'मसालिया' असे आहे.

म्यानमार, सयाम, व्हिएटनाम, लाओस, कांपूचिया, तैवान, चीन, जपान, इंडोनेशिया आणि मलेशिया या देशांचा समावेश होता. डचांनी वखारींच्या इमारती बांधून त्याला तटबंदी करून संरक्षणार्थ तोफा ठेवायला सुरुवात केली. डचांच्या नोकरवर्गात स्थानिक लोकांचाही समावेश असे.

डचांनी भारतात मच्छलीपट्टण, पेतापुली, पुलिकत, तिरूपापुलियर, पूर्त नोव्हू, कारिकल, चिन्सुरा, ठठ्ठा, आग्रा, अहमदाबाद, भडोच, खंबायत, सुरत, नागपट्टण येथे वखारी स्थापल्या. विजयनगरच्या शासकीय परवानगीने त्यांनी पुलिकत आणि नागपट्टण येथे किल्ले बांधले. पुढे डचांनी पोर्तुगिजांचा पराभव करून कोची, कोडुंगलूर, कन्नूर आणि कोल्लम येथील किल्ले स्वतःच्या ताब्यात घेतले. कोचीच्या राजाशी तह करून डचांनी काळ्या मिरीची निर्यात करण्याचा एकाधिकार मिळवला. १७ व्या शतकाच्या सुरुवातीला डचांचे आरमार प्रबळ होते. कोणत्याही बिकट प्रसंगी भारताच्या किनाऱ्यावर वीस जहाजांचे आरमार आणि ३-४ हजार सैनिक उतरविण्याची त्यांची क्षमता होती. मुघल, आदिलशाही आणि कुतुबशाही जहाजांना डचांकडून परवाना घ्यावा लागे. परवाना न घेता प्रवास केल्यास जहाज जप्त केले जाई.

### ३.४ फ्रेंच

इ.स.१६६४ मध्ये फ्रान्सचा अर्थमंत्री कोल्बेर याच्या पुढाकाराने 'फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी' (La Compagnie des Indes Orientales) स्थापण्यात आली. फ्रान्सचा राजा चौदावा लुई याने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा, सैन्य व आरमार बाळगण्याचा आणि कर माफीचा अधिकार दिला. पौर्वात्य राजांशी तह वा युद्ध करण्याचाही अधिकार कंपनीला मिळाला. कंपनीने इ.स. १६६६ मध्ये मुघल बादशाह औरंगजेब याच्या दरबारात एक शिष्टमंडळ पाठवून सुरत येथे वखार टाकण्याची परवानगी मिळवली. फ्रेंचांनी १६६८ मध्ये पहिली वखार सुरत येथे स्थापन केली. त्यानंतर पाँडिचेरी (पुदुच्चेरी), चंद्रनगर, माहे, कारिकल, राजापूर, बालासोर, कासिमबझार, मच्छलीपट्टण येथे वखारी स्थापल्या. या काळात फ्रेंचांचा कुतुबशाही, डच यांच्याशी संघर्ष चालू होता. पाँडिचेरी हे फ्रेंचांचे मुख्य ठाणे होते. या प्रदेशावर कर्नाटकच्या नवाबाची सत्ता होती. हे नवाबपद मिळवण्यासाठी नवाबाच्या घराण्यांत सत्तास्पर्धा सुरू झाली. ब्रिटिश आणि फ्रेंच दोघांनीही यामध्ये हस्तक्षेप सुरू केला. यातूनच इ.स.१७४४ ते १७६३ या काळात इंग्रज-फ्रेंच यांच्यात तीन युद्धे झाली. याला 'कर्नाटक युद्धे' म्हणतात. तिसऱ्या युद्धात इंग्रजांनी फ्रेंचाचा पराभव केला. सत्तास्पर्धेत फ्रेंच नामोहरम झाल्यामुळे भारतात इंग्रजांना प्रबळ युरोपीय स्पर्धक उरला नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांच्या वसाहतवादाला कसे तोंड दिले, याची माहिती आपण पुढील पाठात घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**


१. वास्को-द-गामा हा ........ या देशाचा दर्यावर्दी होता.
(अ) पोलंड (ब) इंग्लंड
(क) फ्रान्स (ड) पोर्तुगाल

२. इंग्लंडच्या ........ ने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.
(अ) सर जॉर्ज ऑक्झिंडेन
(ब) एलिझाबेथ राणी
(क) राजकन्या ब्रॅगंझा
(ड) दुसरा चार्ल्स

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | अर्सबिश्पु | - | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | शान्सेलर | - | न्यायाधीश |
| ३. | वेदोर द फझेंद | - | मालमत्तेवरील अधिकारी |
| ४. | कपितांव | - | कॅप्टन |

### प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




### प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.


१. भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते.
२. पोर्तुगिजांशी लढा देणे भारतीयांना अवघड झाले होते.

### प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. भारतात पोर्तुगिजांनी कोठे कोठे वसाहती स्थापन केल्या ?
२. डच सरकारने युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीला कोणकोणते अधिकार दिले ?

**उपक्रम**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या (१६०० ते १८५७ काळातील) गव्हर्नरांची नावे संकलित करा.



इंग्रजांची वखार – सुरत

# ४. वसाहतवाद आणि मराठे

४.१ मराठी सत्तेचे वसाहतवादविरोधी धोरण
४.१.१ पोर्तुगीज-मराठे
४.१.२ डच-मराठे
४.१.३ फ्रेंच-मराठे
४.१.४ इंग्रज-मराठे
४.१.५ सिद्दी-मराठे
४.१.६ अफगाण-मराठे

मागील प्रकरणात आपण भारतात युरोपीय वसाहतवाद कसा पसरला याचा आढावा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी या परकियांचे छुपे हेतू आणि त्यांची घुसखोरी ओळखून त्याचा प्रतिकार केला. परकीय वसाहतवादाच्या विरोधात नौदल उभारणे, जलदुर्ग बांधणे इत्यादी उपाय त्यांनी केले. इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी त्यांनी त्यावर जकात बसवली. अशा तऱ्हेने परकीय वसाहतवाद्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रखर विरोध केला. छत्रपती संभाजी महाराजांनीही पोर्तुगिजांविरुद्ध तीव्र संघर्ष केला. पुढे थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे पोर्तुगिजांचा पराभव केला. परकीय सत्तेचा अशा रीतीने पराभव करणारी एकमेव भारतीय सत्ता म्हणजे मराठ्यांची सत्ता होय.

## ४.१ मराठी सत्तेचे वसाहतवादविरोधी धोरण

पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज हे सर्व परकीय भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले. त्यांचा प्रवास 'तराजू-तलवार-तख्त' असा झाला. भारतात पोर्तुगीज सर्वप्रथम आले. पोर्तुगिजांचा उल्लेख समकालीन मराठी कागदपत्रांमध्ये 'फिरंगी'* असा केलेला आहे. त्यांच्या ताब्यातील प्रदेशाला 'फिरंगाण' असे म्हणत.

**फिरंग म्हणजे पोर्तुगीज लोकांनी तयार केलेली तलवार आणि फिरंगी म्हणजे पोर्तुगीज लोक. कालांतराने सर्वच युरोपीय लोकांचा उल्लेख 'फिरंगी' असा केला जाऊ लागला.*

**जाणून घ्या.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी युरोपीय व्यापाऱ्यांना ओळखण्यात जी दूरदृष्टी दाखवली ती समकालीन राज्यकर्त्यांमध्ये अभावानेच आढळते. युरोपीय व्यापाऱ्यांविषयी आज्ञापत्रातील पुढील धोरण मननीय आहे.

''सावकारांमध्ये पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि डॅनिश लोक आहेत. हे व्यापारी नेहमीच्या सावकारांसारखे नाहीत. हे लोक आपल्या देशातील राज्यकर्त्यांच्या मदतीने आपल्या भागात येतात. परदेशातील राज्यकर्त्यांना आपल्या देशात जागेचा मोह आहेच. येथील प्रदेशांवर त्यांना राज्य करण्याची इच्छा आहे.''

''युरोपीय व्यापारी सगळीकडे जात आहेत. आपला जम बसवत आहेत. युरोपीय व्यापारी हट्टी लोक आहेत. हाती घेतलेली जागा ते सोडणार नाहीत. प्रसंगी मृत्यू पत्करतील परंतु जागा सोडणार नाहीत. त्यांचे आणि आपले संबंध कामापुरतेच असो द्यावेत. त्यांना जलदुर्गाजवळ अजिबात जागा देऊ नका. वखारीसाठी जागा देणे अपरिहार्य झाले तर त्यांना खाडीच्या तोंडाशी किंवा समुद्रकिनारी जागा देऊ नका. जोपर्यंत हे लोक आपल्या मर्यादेत वागत आहेत तोपर्यंत त्यांची काळजी नाही. परंतु वेळ येताच हे लोक आरमार, तोफा, दारूगोळा यांच्याद्वारे आपली ताकद दाखवून देतात. आरमाराच्या मदतीने हे लोक बंदरांच्या परिसरात नवीन जलदुर्ग निर्माण करतात. यासाठी त्यांना जागा न देणे, दिल्यास समुद्रकिनाऱ्यापासून लांब आणि गावाच्या जवळ द्यावी. ज्यायोगे गावात या लोकांच्या वखारीचा त्रास होणार नाही. त्यांना पक्क्या इमारती बांधू देऊ नका. अशा प्रकारे ते राहिले तर बरे, नाही तर त्यांचा उपयोग काय? आपण त्यांच्या मार्गात आडवे येऊ नये, त्यांना आपल्या मार्गात आडवे येऊ देऊ नये. शत्रू मुलखात स्वारी केल्यास तेथे परकीय व्यापारी सापडल्यास त्यांच्याकडून दंड वसूल करावा. दंड घेतल्यावर त्यांना त्यांच्या स्थळी पाठवून द्यावे. शत्रूशी वागण्याची पद्धती या लोकांबरोबर वापरणे योग्य नाही.''

### ४.१.१ पोर्तुगीज आणि मराठे

दीव, दमण, संजान, वसई, करंजा, उरण, चौल येथे पोर्तुगिजांचे बुरुजयुक्त किल्ले होते. बारदेश प्रदेश* या किल्ल्यांच्या साखळीमुळे सुरक्षित होता. पनवेल येथे पोर्तुगिजांचा युद्धासाठी लागणारा दारूगोळा होता.

**बारदेश प्रदेश म्हणजे गोव्याच्या उत्तरेचा भाग होय. आजच्या गोवा राज्यामध्ये याच नावाचा एक तालुका आहे.*



छत्रपती शिवाजी महाराज

**करून पहा.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गनिर्मितीबाबत मांडलेले विचार 'आज्ञापत्र' या पुस्तकातून मिळवा.

शिवाजी महाराजांनी कल्याण-भिवंडी ताब्यात घेतल्यामुळे त्यांचा पोर्तुगिजांशी संपर्क आला. शिवाजी महाराजांनी आरमार उभारल्यामुळे या परिसरातील पोर्तुगीज सावध झाले. पुढील काळात मराठ्यांनी पोर्तुगिजांना जेरीस आणले. पोर्तुगीज सुरुवातीला मराठ्यांना तंत्रज्ञानाची मदत करत होते. गोव्याच्या व्हॉईसरॉयने दडपण आणताच ही मदत बंद झाली. जंजिऱ्याच्या सिद्दीविरोधात मराठ्यांच्या हालचाली वाढताच पोर्तुगिजांनी सिद्दीला मदत केली.

पोर्तुगीज आणि मराठे यांचे परस्परसंबंधांविषयीचे राजकीय धोरण लवचीक होते. १६६५ मध्ये मराठ्यांचे आरमार कर्नाटकच्या सागरकिनाऱ्याच्या प्रदेशातून जात असताना पोर्तुगिजांनी मराठ्यांची तेरा जहाजे पळवून नेली. पुढे त्यांना ती मराठ्यांच्या धाकामुळे सोडून द्यावी लागली. १६६६ मध्ये मराठ्यांनी आदिलशाहाच्या ताब्यात असलेल्या फोंड्याच्या किल्ल्याला वेढा दिला असता पोर्तुगिजांनी तेथील किल्लेदाराला दारूगोळा पुरवला. सुरतेच्या स्वारीच्या प्रसंगी शिवाजी महाराज पोर्तुगीज प्रदेशातूनच सुखरूप स्वराज्यात आले. मिर्झा राजे जयसिंग याच्या आक्रमणावेळी पोर्तुगिजांनी मराठ्यांना सहानुभूती दाखवली. शिवाजी महाराजांच्या परवानगीने पोर्तुगिजांनी दाभोळ येथे वखार उघडली. पोर्तुगिजांनी धर्मांतराला पोषक कायदे केले म्हणून स्थानिक लोक असंतुष्ट होते. यामुळेच इ.स.१६६७ मध्ये शिवरायांनी बारदेशावर स्वारी केली तेव्हा तेथील रहिवाशांनी शिवरायांचे स्वागत केले. १६६९ मध्ये मराठ्यांनी सिद्दीच्या ताब्यात असलेल्या दंडाराजापुरी या परिसराला वेढा घातला तेव्हा पोर्तुगिजांनी सिद्दीस धान्य व दारूगोळा पुरवला. आदिलशाही-मराठे संघर्षात पोर्तुगीज तटस्थ असल्याचे भासवून ते आदिलशहाला मदत करत

**नोंद घ्यावी असे काही...**

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या संदर्भातील एका पोर्तुगीज लेखकाने लिहिलेला ग्रंथ महत्वाचा आहे. कास्मो-द-ग्वार्द या पोर्तुगीज इतिहासकाराने 'Vide de Celebre Sevagy' (Life of celebrated Shivaji) हा ग्रंथ लिहिला. छत्रपती शिवाजी महाराजांवर ग्रंथ लिहिणारा तो पहिला युरोपीय लेखक होता. त्या पुस्तकातील काही उतारे पुढे दिले आहेत.

''छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा दरारा इतका आहे की, कोणीही त्यांना आव्हान देण्याचे क्वचितच धाडस करतो.''

''कोणतेही बक्षिस अथवा शिक्षा ते (छत्रपती शिवाजी महाराज) देण्यात अतिशय निःपक्षपाती असतात... कोणत्याही गुणाला बक्षिसाशिवाय अथवा गुन्ह्याला शिक्षेशिवाय (त्यांनी) सोडले नाही, त्यांचे शौर्य व चांगल्या वागणुकीमुळे त्यांच्यावर सर्व माणसे प्रेम करतात. ते सगळ्या हिंदुस्थानात दरारा बसवणारे तसेच प्रजेची काळजी घेणारे सर्वश्रेष्ठ राजे म्हणून ओळखले जातात.''

असत. या घटनेपूर्वीच रायगडावर पोर्तुगिजांचा वकील गोंसालू मार्तीस हा शिवाजी महाराजांना भेटायला येऊन गेला होता. उभयतांनी संघर्ष टाळण्याचे ठरवले. गोव्यातून पोर्तुगिजांची सत्ता समूळ नष्ट करण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपली माणसे गटागटाने गोव्यात पाठवली होती. पुरेशी संख्या झाल्यावर सर्वांनी उठाव करायचा आणि पोर्तुगीज सत्तेचे जोखड फेकून द्यायचे असे ठरले. पोर्तुगीज व्हॉईसरॉयला याचा सुगावा लागला. त्यामुळे ही योजना अयशस्वी झाली. १० फेब्रुवारी १६७० च्या पोर्तुगीज आणि मराठे यांच्यातील तहान्वये, खालील अटी मान्य करण्यात आल्या – उभयतांनी परस्परांची जहाजे लुटली असल्यास त्याबद्दल योग्य ती नुकसान भरपाई द्यावी, मुघलांना जहाजांच्या संदर्भात देण्यात येणाऱ्या सवलती मराठ्यांनाही मिळाव्यात व एकमेकांच्या हद्दीत किल्ले बांधू नयेत, सिद्दीला स्वराज्याविरुद्ध मदत करू नये, रामनगरच्या सरहद्दीत (जव्हार तालुका, पालघर जिल्हा) किल्ले बांधू नयेत, असे ठरले. रामनगरच्या राज्याच्या चौथाईच्या* प्रश्नावरून मराठे-पोर्तुगीज यांच्यात संघर्ष कायमच राहिला. हा संघर्ष मिटावा म्हणून महाराजांनी पितांबर शेणवी, जिवाजी शेणवी या वकिलांची नेमणूक केली होती. पण त्या वकिलांनाही फारसे यश आले नाही. १६७९ मध्ये खांदेरी-उंदेरी बेटांवरून मराठे-इंग्रज लढा सुरू असताना पोर्तुगिजांनी इंग्रजांना गुप्तपणे मदत केली.

***चौथाई म्हणजे मराठ्यांनी एखाद्या राज्याच्या रक्षणासाठी आकारलेला कर किंवा एकूण उत्पन्नाच्या १/४ कर म्हणजे चौथाई.***

छत्रपती शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचा निर्धार केला होता. चौल येथील मराठ्यांच्या बांधकामाला विरोध, गोव्यातील स्थानिक जनतेची जबरदस्तीने चालवलेली धर्मांतरे, समुद्री व्यापारातील लुटालूट या कारणांमुळे त्यांनी पोर्तुगिजांविरुद्ध संघर्ष सुरू केला. फोंड्याच्या वेढ्यात मराठ्यांनी पोर्तुगिजांना पराभूत केले.

''छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य भीती निर्माण करणारे होतेच याबद्दल शंका नाही, परंतु त्यांची शत्रूसंबंधीची धोरणे शांततेच्या काळातही भीतीदायक होते आणि त्यांच्या मृत्यूनंतर पोर्तुगीज राज्य भयमुक्त झाले आहे,'' असा अभिप्राय तत्कालीन पोर्तुगीज गव्हर्नरने व्यक्त केला आहे. यावरून महाराजांच्या युद्ध कौशल्याबद्दल पोर्तुगिजांच्या मनात असलेली भीती कळते.

गोव्याच्या पोर्तुगिजांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या विरुद्ध मुघल बादशाह औरंगजेब याच्याशी हातमिळवणी केली होती. त्यामुळे मराठ्यांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे ठरवले. छत्रपतींनी पोर्तुगिजांच्या रेवदंडा बंदरावर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगिजांनी गोव्याच्या सीमेवरील मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला. मराठ्यांनी वेढा मोडून काढला आणि गोव्यावर चढाई केली. या लढाईत येसाजी कंक (मराठ्यांच्या पायदळाचे प्रमुख आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सहकारी) यांनी पराक्रमाची शर्थ केली. यात पोर्तुगीज गव्हर्नर जखमी झाला. त्याला माघार घ्यावी लागली. छत्रपती संभाजी महाराजांनी त्याचा पाठलाग केला. पोर्तुगीज मोठ्या संकटात सापडले. त्याच वेळी मुघलांनी दक्षिण कोकणवर आक्रमण केल्याची बातमी छत्रपती संभाजी महाराजांना मिळाली. त्यामुळे हाताशी आलेला गोव्याचा विजय सोडून त्यांना मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी परतावे लागले.

पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मराठे आणि पोर्तुगीज यांचा संघर्ष पुन्हा एकदा सुरू झाला. मुघलांचा दक्षिणेतील प्रमुख प्रतिनिधी हुसेन अली सय्यद याच्याशी झालेल्या कराराने मराठ्यांनी कल्याण-भिवंडीचा ताबा घेतला. मराठ्यांनी पोर्तुगिजांकडे चौथाईची मागणी केली परंतु वसईच्या गव्हर्नरने ती फेटाळली. मराठ्यांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी पोर्तुगिजांनी वसई, अशेरी, तारापूर, केळवे, माहीम, दमण आणि रेवदंडा येथे लष्करी चौक्या उभारल्या. पोर्तुगिजांनी स्थानिक प्रजेवर अत्याचार करण्याचे प्रमाण वाढविले.


चिमाजीअप्पा

थोरले बाजीराव पेशवे यांचे धाकटे बंधू चिमाजीअप्पा यांच्याकडे पोर्तुगिजविरोधी मोहिमेची सूत्रे देण्यात आली. चिमाजीअप्पांनी पहिल्याच धडाक्यात ठाण्याचा किल्ला घेतला. मार्च १७३७ मध्ये

मराठ्यांनी साष्टी बेट जिंकून घेतले. दुसऱ्या आघाडीवर शंकराजीपंत फडके यांनी वसई बेटावर प्रवेश केला. छोटी-छोटी ठाणी जिंकून घेतली तरी जोपर्यंत वसईचा किल्ला जिंकला जात नाही तोपर्यंत आजूबाजूच्या प्रदेशावर कायमस्वरूपी मालकी प्रस्थापित करणे अवघड होते. मराठ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. परंतु मराठ्यांकडे प्रभावी आरमार नव्हते. यामुळे वेढा दोन वर्षे चालला. अखेर मराठ्यांनी पोर्तुगिजांस नमवले.

### ४.१.२ डच-मराठे

वेंगुर्ला येथे डचांची वखार असल्याने स्वराज्याशी त्यांचा संबंध येणे अपरिहार्य होते. १६४९ मध्ये सुरू झालेल्या वेंगुर्ल्याच्या वखारीमुळे डचांचे व्यापारात चांगले बस्तान बसले होते. कुडाळवर शिवाजी महाराजांची स्वारी झाल्याने डचांच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला.

१६६५ मध्ये सुरतेच्या मुघल सुभेदाराने मराठ्यांचे आरमार नष्ट करण्याकरता डचांची मदत मागितली. डचांनी ती नाकारली. शिवाजी महाराजांनी दाभोळ येथे वखार काढण्यास डचांना जागा देण्यास परवानगी दिली होती. परंतु काही कारणास्तव ती वखार सुरू झाली नाही. मराठे आणि डचांमधील राजकीय संबंध लवचीक होते. मुंबईतून इंग्रजांचे उच्चाटन करण्यास मराठ्यांनी आपणास मदत करावी अशी डचांची इच्छा होती. सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत मराठ्यांनी डचांच्या वखारीला नुकसान पोचवले नाही. कर्नाटक स्वारीत डच वखारीचे संरक्षण आणि परवान्यांसाठी डचांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मोठा नजराणा दिला. पोर्टो नोव्हो किंवा परंगी पेट्टाई, तेगनापट्टम उर्फ देवनापट्टिनम् येथील डचांच्या वखारी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरक्षित राहू दिल्या.

### ४.१.३ फ्रेंच-मराठे

१६६८ च्या डिसेंबर महिन्यात राजापूर येथे शिवाजी महाराजांच्या परवानगीने फ्रेंचांनी वखार सुरू केली. फ्रेंचांनी स्वराज्याला दारूगोळा पुरवला. फ्रेंचांशी असलेले मित्रत्वाचे संबंध लक्षात घेऊन सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत मराठ्यांनी फ्रेंचांच्या वखारीस नुकसान पोचवले नाही. त्यामुळे फ्रेंचांनी मराठ्यांना मोठा नजराणा दिला. १६७७ मध्ये पुदुच्चेरीचा गव्हर्नर जनरल फ्राँस्वाँ मार्टिन याने फ्रेंच वखारीस संरक्षण व परवाना मिळवला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयानंतर चोळमंडलच्या किनाऱ्यावर मराठ्यांचे प्रभुत्व निर्माण झाले. नंतरच्या काळात फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामधील सत्तासंघर्षाचे पडसाद भारतातही उमटले. भारतातील वेगवेगळ्या राज्यांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात चुरस लागली. दोघेही स्थानिक राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करू लागले. आधुनिक युरोपीय युद्धतंत्र शिकवण्याच्या अमिषाने फ्रेंचांनी निजामाच्या दरबारात प्रवेश केला.

फ्रेंचांच्या तालमीत तयार झालेल्या इब्राहीमखान गारदी याला सदाशिवरावभाऊ पेशवे यांनी मराठ्यांच्या लष्करात तोफखान्याचा प्रमुख म्हणून नेमले होते. इ.स.१७६१ मध्ये इब्राहीमखानाने पानिपतच्या तिसऱ्या युद्धात केलेल्या पराक्रमाने प्रभावित होऊन महादजी शिंदे यांनी फ्रेंच प्रशिक्षक डिबॉईन आणि पेराँ यांच्या मदतीने आधुनिक कवायती फौज तयार केली आणि तोफखाना सुसज्ज केला. या कवायती फौजेच्या जोरावर त्यांनी उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. तसेच इंग्रजांनाही धाकात ठेवले.

### ४.१.४ इंग्रज-मराठे

छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम अफझलखान प्रकरणात आला. अफझलखान भेटीपूर्वी मराठ्यांनी दाभोळ बंदर जिंकून घेतले. या बंदरात अफझलखानाची तीन जहाजे माल उतरवण्याच्या तयारीत होती. खानाच्या मृत्यूची बातमी ऐकताच खानाचा दाभोळ येथील प्रतिनिधी महमूद शरीफ सर्व संपत्ती, माल व जहाजे घेऊन राजापूरला पळून गेला. खानाचा मुलगा फाझलखान याने राजापूरचा सुभेदार अब्दुल करीम याला आपल्या वडिलांच्या जहाजावरील माल उतरवण्यास सांगितले. मराठ्यांनी संधी साधून राजापूर बंदरावर हल्ला केला आणि ते जिंकून घेतले. अब्दुल करीमने इंग्रजांचे कर्ज घेतले होते. तो कर्जफेड करू शकत नव्हता. इंग्रजांनी याचा फायदा घेऊन अब्दुल करीमच्या ताब्यात असणाऱ्या तीन जहाजांपैकी एक जहाज कर्जफेडीसाठी ताब्यात घेतले. मराठ्यांनी जहाजांचा ताबा मिळावा म्हणून इंग्रजांच्या मागे लकडा लावला. परंतु इंग्रजांनी जहाजे परत देण्यास नकार दिला. त्यावर उपाय म्हणून मराठ्यांनी जैतापूर येथील इंग्रजांचा दलाल

वेलजी याला अटक केली. त्याच्या सुटकेसाठी फिलिफ गिफर्ड हा अधिकारी मराठ्यांना भेटायला गेला. त्यालाही कैदेत टाकण्यात आले. पुढे या दोघांची सुटका मराठ्यांनी केली. या घटनेने इंग्रज-मराठे यांच्यात वितुष्ट आले.

शिवाजी महाराज पन्हाळ्याच्या किल्ल्यात अडकून पडलेले असताना आदिलशहाला तोफांचा दारूगोळा पुरवण्यासाठी रेव्हिंग्टन, गिफर्ड, वेलजी यांनी मदत केली. या वेढ्यात शिवाजी महाराज हाती लागणार याची खात्री या सगळ्यांना होती. मात्र स्वतःची सुटका करून घेण्यात शिवाजी महाराज यशस्वी झाले. पुढील वर्षी राजापूरच्या स्वारीत त्यांनी इंग्रजांचा पराभव केला. हेन्री रेव्हिंग्टन, रिचर्ड टेलर, रँडॉल्फ टेलर, फिलिफ गिफर्ड या इंग्रज अधिकाऱ्यांना पकडून दोन वर्षे तुरूंगात टाकण्यात आले.

त्यापूर्वी इंग्रजांच्या वतीने स्टीफन उस्टीक हा अधिकारी शिवाजी महाराजांकडे वखारींच्या संदर्भात बोलणी करण्यासाठी रायगडावर आला होता. शिवाजी महाराजांचे वकील सुंदरजी व पिलाजी हे सुद्‌धा इंग्रजांना भेटले. पण ही भेट अयशस्वी ठरली.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी हेन्री ऑक्झिंडेन हा इंग्रज वकील आला. त्याने राजापूरला वखार काढण्याची परवानगी मिळवली. १२ जून १६७४ रोजी इंग्रज आणि मराठे यांच्यामधील तहावर सह्या झाल्या. स्वराज्यात व्यापार करण्यास परवानगी मिळणे; राजापूर, दाभोळ, चौल, कल्याण येथे वखारी उघडणे; इंग्रजांच्या मालावर अडीच टक्केच जकात घेणे इत्यादी अटी या तहान्वये मान्य करण्यात आल्या. इंग्रजी शिक्क्याची नाणी मराठ्यांच्या राज्यात चालणार नाहीत, अशी भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतली. जहाजे फुटून किनाऱ्यास लागलेला इंग्रजांचा माल त्यांस परत द्यावा, जंजिऱ्याच्या सिद्‌दीशी तह करावा, त्यास बुडवू नये अशा इंग्रजांनी घातलेल्या अटी छत्रपती शिवाजी महाराजांनी फेटाळून लावल्या. यावरून मराठ्यांचे सार्वभौमत्व अबाधित राखण्याचे धोरण स्पष्ट होते.

छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतरच्या काळात नानासाहेब पेशवे यांनी इंग्रजांची मदत घेतल्यामुळे त्यांना मराठ्यांच्या राज्यकारभारात प्रवेश मिळाला. नानासाहेबांच्या नंतर त्यांचे द्‌वितीय चिरंजीव थोरले माधवराव पेशवे झाले. त्यांचे चुलते रघुनाथराव यांना पेशवेपद हवे होते. रघुनाथराव उर्फ राघोबा यांनी सत्ता प्राप्तीसाठी इंग्रजांपुढे हात पसरले. यातूनच इंग्रजांचा वकील पुण्याच्या दरबारात आला. १७६५ मध्ये इंग्रजांनी मालवण किल्ला जिंकला. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधू नारायणराव पेशवे पदावर आले. त्यांच्या कारकिर्दीत इंग्रजांनी ठाणे, वसई, विजयदुर्ग, रत्नागिरी काबीज करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. उत्तरेत मुघल बादशाह शिंदे-होळकरांच्या प्रभावाखाली होता. बादशाहाला आपल्या प्रभावाखाली घेणे आणि नागपूरकर भोसल्यांचा बंगालमध्ये प्रभाव कमी करणे यासाठी इंग्रज सक्रिय झाले.

व्यापाराच्या दृष्टीने इंग्रजांना साष्टी-वसई ते कोकणपर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात असणे आवश्यक वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या. रघुनाथराव पेशवे इंग्रजांच्या आश्रयाला गेलेले होते. त्यांना सोबत घेऊन इंग्रजांची फौज मुंबईहून पुण्याला निघाली. पुण्याजवळील वडगाव येथे इंग्रज-मराठे यांच्यात पहिले युद्‌ध घडून आले. या युद्‌धात इंग्रजांचा पराभव झाला. युद्‌धाच्या अखेरीस जो तह झाला त्याला 'वडगावचा तह' असे म्हणतात. पुढे नाना फडणवीस यांनी पेशवे, नागपूरकर भोसले, निजाम आणि हैदर यांचा इंग्रजांविरुद्‌ध चतुःसंघ उभा केला. परंतु इंग्रजांनी या चतुःसंघातून निजामाला फोडले. या सर्व घडामोडींच्या दरम्यान हिंदुस्थानमध्ये इंग्रजांची कायमस्वरूपी सत्ता स्थापन करायची असेल तर मराठ्यांना पराभूत करणे आवश्यक आहे हे इंग्रज गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्जच्या लक्षात आले. पुढे १७९५ च्या खर्डा (ता.जामखेड जि. अहमदनगर) येथील लढाईत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. परंतु या लढाईत मराठ्यांच्या छावणीत असलेल्या इंग्रज वकिलाने मराठ्यांच्या युद्‌धपद्‌धतीचा तपशीलवार अभ्यास केला. त्याच्या आधारे लॉर्ड वेलस्लीने मराठ्यांचा पराभव करण्यात यश मिळवले.

कारभारी नाना फडणवीसांचा मृत्यू दुसरा बाजीराव पेशवा याच्या काळात झाला. दुसरा बाजीराव पेशवा आणि होळकरांमध्ये वितुष्ट आलेले होते. त्यामुळे यशवंतराव होळकरांनी पुण्यावर आक्रमण केले. परंतु भीतीपोटी दुसरा बाजीराव पेशवा इंग्रजांच्या आश्रयाला गेला. त्यांच्यात जो तह झाला त्याला 'वसईचा तह'




असे म्हणतात. शिंदे-होळकर या सरदारांना हा तह मान्य नव्हता. त्यामुळे १८०३ मध्ये इंग्रज-मराठे यांच्यात दुसरे युद्ध झाले. परंतु यात मराठा सरदारांचा पराभव झाला. १८१७ मध्ये इंग्रज-मराठ्यांमध्ये तिसरे युद्ध झाले. यात मराठ्यांचा पराभव झाला आणि मराठी सत्ता १८१८ मध्ये संपुष्टात आली. दुसऱ्या बाजीरावाला उर्वरित आयुष्य कानपूरजवळील बिठूर येथे व्यतीत करावे लागले. ब्रिटिशांकडून त्याला वार्षिक तनखा मंजूर करण्यात आला.

### ४.१.५ सिद्दी-मराठे

१५व्या शतकाच्या उत्तरार्धात आफ्रिकेतील ॲबिसिनियातून सिद्दी लोक भारतात आले. त्यांनी जंजिरा येथे बस्तान बसवले. इ.स.१६४८ मध्ये शिवरायांनी कल्याण प्रांत विशेषतः तळे, घोसाळे आणि रायरी हे किल्ले ताब्यात घेतले तेव्हा सिद्दीला धोक्याची जाणीव झाली.

**करून पहा.**

छत्रपती शिवाजी महाराज आणि वसाहतवादी सत्ता यांच्यात तह झाले आहेत. अशा काही तहांची माहिती मिळवा.

मार्च १६७१ मध्ये मराठ्यांनी जंजिरा किल्ल्याची नाकेबंदी केली. सिद्दीने मराठ्यांना किल्ला देण्याचे कबूल केले, परंतु त्याचवेळी मुघलांकडे मैत्रीचा प्रस्ताव पाठवला आणि मुघलांचे मांडलिकत्व पत्करले. त्यामुळे सिद्दी सुखरूप राहिला आणि किल्ला घेण्यात मराठे अपयशी ठरले.

सिद्दी आणि इंग्रज दोघेही एकमेकांना आपल्या शत्रूविरुद्ध कायम मदत करत असत. १६७९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी या दोघांनाही धडा शिकवण्यासाठी खांदेरी बेटावर किल्ला बांधण्यास सुरुवात केली. बांधकाम मायनाक भंडारी याच्या नेतृत्वाखाली चालले होते. बांधकाम बंद पाडण्यासाठी इंग्रज अधिकारी ह्यूजेस आला. इंग्रजांनी रसद बंद करण्याचा प्रयत्न केला. मायनाक भंडारी व आरमारप्रमुख दौलतखान यांनी इंग्रजांना तीव्र प्रतिकार केला. त्यांनी इंग्रजांची गलबते पकडली व अधिकाऱ्यांस कैद केले. मुंबईहून इंग्रजांनी एक मोठे जहाज व ७ गलबते पाठवली. मराठ्यांच्या ४०-५० गलबतांनी त्यांना टक्कर दिली. १६८० मध्ये खांदेरीच्या प्रदेशातून इंग्रजांना माघार घ्यावी लागली.

जंजिऱ्याचा सिद्दी स्वराज्याला त्रास देऊ लागला म्हणून छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दीला धडा शिकवण्यासाठी मोहीम हाती घेतली. उंदेरी, आपटे, नागोठणे आणि जंजिरा परिसरात मराठ्यांनी सिद्दीला जेरीस आणले.

छत्रपती संभाजी महाराज सिद्दीचा नाश करण्यास सिद्ध झाले असतानाच मुघल स्वराज्यावर चालून आले. एकाच वेळी दोन शत्रूंना सामोरे जाण्यात शहाणपण नाही म्हणून मराठ्यांनी सिद्दीचा नाद सोडला.

छत्रपती संभाजी महाराजांनंतर छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांना आपली सर्व शक्ती औरंगजेबाच्या विरोधात एकवटावी लागल्यामुळे पाश्चात्य शत्रूंकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात (१७३३) पुन्हा एकदा सिद्दीच्या विरोधात मराठ्यांनी जोर धरला. थोरले बाजीराव पेशव्यांचे धाकटे बंधू चिमाजीअप्पा यांनी सिद्दी विरुद्ध लढा पुकारला. त्यात मराठ्यांना मोठा विजय मिळाला. मराठे आणि सिद्दी यांच्यात तह झाला. सिद्दीने मराठ्यांचे मांडलिकत्व मान्य केले.

### ४.१.६ अफगाण-मराठे

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्लीचा बादशाह दिल्ली, आग्रा आणि पंजाब या भागाचा सत्ताधीश होता. इ.स.१७४८ मध्ये अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशहा अब्दाली याची भारतावर पहिली स्वारी झाली. दिल्लीच्या बादशाही फौजेने अब्दालीचा पराभव केला. याच वेळी दिल्लीच्या गादीवर अहमदशहा होता. अब्दालीच्या स्वारीच्या वेळी अयोध्या, दिल्ली आणि आग्रा परिसरातील अफगाणांनी अहमदखान बंगश याच्या नेतृत्वाखाली अब्दालीला पाठिंबा दिला होता. अब्दाली परत गेल्यावर बंगशने मुघलांविरुद्ध युद्ध केले. मुघलांनी शिंदे-होळकरांची मदत घेऊन अफगाणांचा पराभव केला.

इ.स.१७५२ मध्ये मराठा आणि मुघल यांच्यात एक करार झाला. त्या करारानुसार उत्तर भारताचे, विशेषतः मुघलांच्या ताब्यातील प्रदेशांचे संरक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांनी स्वीकारली. त्यासाठी मुघल सम्राटाने मराठ्यांना रोहिलखंडाची चौथाई वसूल करण्याचा हक्क दिला आणि मुघल साम्राज्यातील काही प्रदेश मराठ्यांच्या हवाली केले. इ.स.१७५७ मध्ये अब्दालीने भारतावर तिसऱ्यांदा आक्रमण केले. दिल्ली आणि मथुरा लुटून तो अफगाणिस्तानला परत गेला. या वेळेस रघुनाथराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची फौज पुण्याहून निघाली. मराठ्यांचे सैन्य दिल्लीला पोचेपर्यंत अब्दाली परत गेला होता. मराठ्यांनी दिल्ली ताब्यात घेऊन येथील परिस्थिती पूर्ववत केली. मराठे आणि शीख यांनी पंजाब मोहीम आखली. सरहिंद प्रांताचा पाडाव केला. लाहोर ताब्यात घेऊन मराठे अटक शहरापर्यंत पोचले.

१७५९ मध्ये अब्दालीने भारतावर चौथी स्वारी केली. त्याचा प्रतिकार दत्ताजी आणि जनकोजी शिंदे यांनी केला. अब्दालीचा वेग आणि आक्रमण एवढे तीव्र

होते की पहिल्याच धडाक्यात त्याने पंजाब जिंकला. या लढाईत दत्ताजी शिंदे यांना वीरमरण आले. अब्दालीने दिल्लीवर अंमल बसवला. अफगाणांना भारतातून कायमचे घालवण्यासाठी सदाशिवरावभाऊ पेशवे आणि विश्वासराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठे पुण्यातून उत्तरेकडे निघाले. १४ जानेवारी १७६१ रोजी यमुना नदीच्या तीरावर पानिपत येथे अब्दाली आणि मराठे यांच्यात मोठा रणसंग्राम झाला. हे युद्ध पानिपतचे 'तिसरे युद्ध' म्हणून ओळखले जाते. या युद्धात सदाशिवराभाऊ पेशवे, विश्वासराव पेशवे मारले गेले. 'दोन मोत्ये गळाली, २७ मोहरा गमावल्या व चांदी आणि तांब्याची नाणी किती गेली याची गणतीच नाही.' असा सांकेतिक निरोप पुण्यास पोहचला. 'भारतीयांसाठी भारत' अशी व्यापक भूमिका घेऊन मराठे पानिपतावर लढले. दिल्ली सांभाळणे अशक्य असल्याने अब्दाली दोनच महिन्यात अफगाणिस्तानला परतला. मराठ्यांकडून होणाऱ्या कडव्या प्रतिकाराची जाणीव झाल्यामुळे त्याची किंवा त्याच्या वारसदारांची भारतावर परत आक्रमण करण्याची हिंमत झाली नाही.

पुढे एकोणिसाव्या शतकापर्यंत इंग्रजांचे भारतावर अनिर्बंध वर्चस्व प्रस्थापित झाले. या वर्चस्वाविरुद्ध भारतीयांनी लढा दिला. याशिवाय भारतीय समाजातील अनिष्ट चालीरीती आणि रूढी-रिवाज याविरुद्धही त्यांना लढा द्यावा लागला.

पुढील पाठात आपण भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणांची माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. मराठ्यांनी पोर्तुगिजांना .................... च्या वेढ्यात पराभूत केले.
(अ) वेंगुर्ला (ब) फोंडा
(क) सुरत (ड) राजापूर

२. शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम .................... या प्रकरणात आला.
(अ) कुडाळ स्वारी (ब) अफजलखान
(क) फाजलखान (ड) राज्याभिषेक

३. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे .................... यांचा पराभव केला.
(अ) इंग्रज (ब) फ्रेंच
(क) डच (ड) पोर्तुगीज

४. पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि .................... यांच्यात झाले.
(अ) इंग्रज (ब) अब्दाली
(क) अहमदखान बंगश (ड) नजीबखान

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | कास्मो-द-ग्वार्द | पोर्तुगीज इतिहासकार |
| २. | गोंसालू मार्तीस | पोर्तुगीज वकील |
| ३. | फ्रांस्वाँ मार्टिन | डच वखारीचा प्रमुख |
| ४. | हेन्री रेव्हिंग्टन | इंग्रज अधिकारी |

**प्र.२ (अ) ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. भारतात सर्वप्रथम आलेले युरोपीय -
२. पोर्तुगिजांचा दारूगोळा असलेले ठिकाण -
३. वखारीचे संरक्षण आणि परवान्यासाठी शिवाजी महाराजांना नजराणा देणारे -
४. जैतापूरचा इंग्रज दलाल -

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या. कारण -
(अ) पोर्तुगिजांना विरोध करण्यासाठी
(ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी
(क) स्वराज्यात पैसा उभा करण्यासाठी
(ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी

**प्र.३ तुमचे मत नोंदवा.**

१. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.
२. मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून युरोपीय व्यापाऱ्यांविषयी धोरणातील महत्त्वाच्या बाबी लिहा.

२. छत्रपती शिवाजी महाराजांचे मराठ्यांचे सार्वभौमत्व अबाधित राखण्याचे धोरण स्पष्ट करा.

३. भारतातील सर्वात प्रभावी मराठी सत्ता का संपुष्टात आली?

**प्र.५ पृष्ठ क्र.२९ वरील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारताच्या पश्चिम समुद्रकिनारपट्टीवर डचांच्या वसाहती कोठे होत्या?

२. पूर्व किनारपट्टीवर फ्रेंचांनी कोठे वसाहती उभारल्या?

३. आग्रा आणि अलाहाबाद येथे कोणाची वखार होती?

**उपक्रम**

युरोपीय वसाहतवाद्यांनी विविध देशांमध्ये वसाहती केल्या होत्या त्याची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.



पहिल्या इंग्रज-मराठे युद्धाचे विजयस्मारक - वडगाव मावळ

# ५. भारत : सामाजिक व धार्मिक सुधारणा


५.१ सामाजिक व धार्मिक सुधारणांची आवश्यकता
५.२ सुधारणा पर्व
५.३ धार्मिक सुधारणा चळवळी
५.४ समाजसुधारकांचे कार्य
५.५ संस्थानिकांचे योगदान


इंग्रजी शिक्षण घेऊन त्या शिक्षणपद्धतीच्या आधारे येथे उदयाला आलेल्या नवीन पिढीने सामाजिक क्षेत्रात जे काम केले ते महत्वाचे आहे. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या अभावी राजकीय स्वातंत्र्य अपूर्ण असते याची जाणीव पहिल्या पिढीतील समाजधुरीणांना होती. यामुळे राजा राममोहन रॉय यांच्यापासून सुरू झालेल्या सामाजिक-धार्मिक सुधारणांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

## ५.१ सामाजिक व धार्मिक सुधारणांची आवश्यकता

भारतीय समाजातील अंधश्रद्धा, रूढीप्रियता, जातिभेद, उच्च-नीचतेच्या भ्रामक कल्पना, चौकस व चिकित्सक वृत्तीचा अभाव यांमुळे येथील समाज मागे पडला होता. इंग्रजी शिक्षणामुळे येथील समाजसुधारकांची जगाकडे बघण्याची दृष्टी बदलली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवता यांवर आधारित नवसमाजाची निर्मिती करणे समाजसुधारकांना आवश्यक वाटू लागले. यामुळे समाज सुधारकांनी जनजागृती करण्यास सुरुवात केली.

## ५.२ सुधारणा पर्व

राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगालमध्ये झाला. त्यांनी उपनिषदांचे संस्कृतमधून बंगालीत भाषांतर केले. त्यांच्या वहिनीला सती जावे लागले. या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध एक पत्र इंग्रजी भाषेत लिहून प्रसिद्ध केले. धर्मग्रंथामध्ये सती जाणे हे धर्मकर्तव्य असल्याचा उल्लेख नाही, हे रॉय यांनीच सर्वप्रथम सिद्ध केले. १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक याने सती प्रथा नष्ट केली. त्यामागे रॉय यांचे प्रयत्न कारणीभूत होते. बालविवाह आणि पडदा पद्धत यालाही त्यांचा विरोध होता. त्यांनी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली. बंगाली भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू केले. पुढे त्यांनी पर्शियन भाषेतील दैनिक सुरू केले.



राजा राममोहन रॉय

रॉय यांनी 'आत्मीय सभे'च्या माध्यमातून सर्व धर्मांमधील समान तत्वे शोधण्याचा प्रयत्न केला. १८२८ मध्ये 'ब्राह्मो समाज' स्थापन करून 'ईश्वर एकच आहे आणि त्याला प्रसन्न करण्यासाठी मूर्तिपूजेची गरज नाही' असे प्रतिपादन त्यांनी केले.

राजा राममोहन रॉय यांनी दक्षिण अमेरिका खंडातील स्पॅनिश, वासाहतिक साम्राज्याविरुद्ध चाललेल्या स्वातंत्र्यचळवळीची दखल घेऊन तिला पाठिंबा दर्शवला. स्पेनमधील राजेशाहीच्या विरोधातील उदारमतवादी लोकांना रॉय यांचा पाठिंबा होता. इ.स.१८३० मध्ये मुघल बादशाहाची बाजू मांडण्यासाठी ते इंग्लंडला गेले. मुघल बादशाहाने त्यांना 'राजा' हा किताब दिला. ते

**जाणून घ्या.**

१८२४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने वृत्तपत्रांवर कडक नियंत्रणाचा कायदा केला. रॉय यांनी चंद्रकुमार ठाकूर, द्वारकानाथ ठाकूर, हरचंद्र घोष, गौरीचरण बॅनर्जी आणि प्रसन्नकुमार ठाकूर यांच्या स्वाक्षऱ्यांचे एक निवेदन सरकारला पाठवले. गव्हर्नर जनरलने या निवेदनाकडे दुर्लक्ष केल्यावर रॉय यांनी इंग्लंडच्या राजाकडे अर्ज पाठवला. त्यातील दोन ओळी महत्वाच्या आहेत. रॉय लिहितात, ''सत्तास्थानावर असलेल्या व्यक्तींचा वृत्तपत्रस्वातंत्र्याला विरोध असतो कारण त्यामुळे त्यांच्या कारभारावर न रुचणारे नियंत्रण येण्याची शक्यता असते.''

इंग्लंडमध्ये दोन वर्षे राहिले. पुढे ते फ्रान्सला गेले. ते भारतात होते तेव्हा भारतीयांना त्यांनी युरोप समजावून सांगितला आणि युरोपात गेले तेव्हा तेथील लोकांना हिंदुस्थान समजावून सांगितला.

इंग्रजी राजवटीत तयार झालेल्या रॉय यांनी आधुनिकतेची पायाभरणी आपल्या लेखनातून आणि कार्यातून केली. रॉय यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन 'मानवधर्म सभा', 'परमहंस सभा' आणि 'ज्ञानप्रसार सभा' सुरू झाल्या.

### ५.३ धार्मिक सुधारणा चळवळी

**प्रार्थना समाज :** दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेतूनच पुढे 'प्रार्थना समाजा'ची स्थापना झाली. डॉ.आत्माराम पांडुरंग, न्यायमूर्ती म.गो.रानडे, डॉ.रा. गो.भांडारकर या प्रार्थना समाजाच्या संस्थापक सदस्यांनी मूर्तिपूजेला विरोध करून एकेश्वरवादास प्राधान्य दिले. कर्मकांडाला विरोध करून प्रार्थनेवर भर दिला. अनाथालये, स्त्री शिक्षणसंस्था, कामगारांसाठी रात्रशाळा सुरू केल्या. स्त्री-पुरुष समानतेची चळवळ, जातिभेद नाकारणे आणि ऐहिक जीवनाला महत्त्व देणे या गोष्टींना प्राधान्य दिले.


डॉ.रा.गो.भांडारकर


**सत्यशोधक समाज :** महात्मा जोतीराव फुले यांनी १८७३ मध्ये पुणे येथे 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. अन्याय्य धर्माच्या परंपरेवर बौद्धिक आक्रमण करणारा विचार यामागे होता. बहुजन समाजाला नाडणाऱ्या प्रवृत्तींवर महात्मा जोतीराव फुले यांनी प्रहार केला. शेतकरी, कारागीर, कामगार आणि अठरा पगड जातींचे भले साधण्याचा मार्ग महात्मा जोतीराव फुले यांनी दाखवला. एकेश्वरवाद, वेद व पुराणांचे प्रामाण्य नाकारणे, विवेचक बुद्धीचे प्रामाण्य, पुरोहितांच्या वर्चस्वाला व मध्यस्थीला विरोध, मूर्तीपूजा विरोध, तीर्थयात्रा विरोध, चमत्कारांवर अविश्वास, परलोक कल्पनेला विरोध ही सत्यशोधक समाजाची वैशिष्ट्ये होती. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणाच्या कार्यास सुरुवात केली. स्त्री-स्वातंत्र्याचा मार्ग शिक्षणातून जातो याची जाणीव या दोघांनी येथील समाजाला करून दिली. स्त्री-शिक्षणाचे कार्य पुढे पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांनी चालवले.


महात्मा जोतीराव फुले


सावित्रीबाई फुले

भारतातील समाजरचना विषमतेवर आधारित होती. महात्मा जोतीराव फुले यांचे समतेचे कार्य गोपाळबाबा वलंगकर यांनी पुढे चालवले. 'विटाळ विध्वंसन' या पुस्तकातून त्यांनी अस्पृश्यतेवर कोरडे ओढले. शिवराम जानबा कांबळे यांनी मुरळी, जोगतिणी आणि देवदासी यांच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले.

**आर्य समाज :** १८७५ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना केली. या समाजाने वेदांना पवित्र ग्रंथ मानले. जातिभेद अमान्य करून स्त्री-शिक्षण, विधवा पुनर्विवाह, मिश्रविवाह यांचा आर्य समाजाने पुरस्कार केला.


स्वामी दयानंद सरस्वती

**रामकृष्ण मिशन :** इ.स.१८९७ मध्ये स्वामी विवेकानंद यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. रामकृष्ण मिशनने लोकसेवेच्या कार्याला महत्त्व दिले. दुष्काळग्रस्तांना मदत, आजारी लोकांना औषधोपचार, दीन-दुबळ्यांची सेवा, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार आणि आध्यात्मिक उन्नती या क्षेत्रांत कार्य केले. 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा संदेश त्यांनी भारतीय तरुणांना दिला.


स्वामी विवेकानंद

**करून पहा.**

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री पंडित, वीरेशलिंगम पंतलु आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या कार्याची माहिती शिक्षकांच्या आणि आंतरजालाच्या साहाय्याने गोळा करा.

## ५.४ समाजसुधारकांचे कार्य

**सर सय्यद अहमद खान :** यांचा जन्म १८१७ मध्ये दिल्ली येथे झाला. त्यांचे उर्दू, पर्शियन, अरेबिक आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. 'आइन-ए-अकबरी' (अबुल फैज याने सम्राट अकबराच्या प्रशासन पद्धतीवर लिहिलेला ग्रंथ) या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले होते. १८६४ मध्ये त्यांनी मुस्लिमांसाठी 'सायंटिफिक सोसायटी' स्थापन केली. या सोसायटीचे सदस्य इतिहास, विज्ञान आणि राजकीय अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास करत. १८६९ मध्ये ते इंग्लंडला गेले. इंग्लंडहून परत आल्यावर त्यांनी १८७५ मध्ये 'मुहम्मदन अँग्लो ओरिएन्टल कॉलेज' ची स्थापना केली. नंतर या कॉलेजचे रूपांतर 'अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी'मध्ये झाले. अहमद खान यांनी 'मोहम्मदन सोशल रिफॅार्मर' या नावाचे नियतकालिक सुरू केले. त्यांनी आधुनिक शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला.



सर सय्यद अहमद खान

**चला शोधूया.**

अमृतसर येथे स्थापन झालेल्या 'सिंगसभा' या सभेची माहिती मिळवा.

**ताराबाई शिंदे :** यांचा जन्म १८५० मध्ये झाला. त्यांनी स्त्री-पुरुषांच्या परिस्थितीची तुलना करणारा निबंध लिहिला. यातून त्यांनी अत्यंत जहाल भाषेत स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार केला. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, सतिप्रथाबंदी या सुधारणांच्या पुढे जाऊन ताराबाई शिंदे यांनी थेट स्त्री-पुरुष समानतेची मागणी केली. हे त्या काळाचा विचार करता अत्यंत धाडसाचे होते. पुरुषसत्तेला थेट आव्हान देणाऱ्या त्या भारतातील पहिल्या विचारवंत होत. ताराबाईंच्या दृष्टीने धर्म स्त्रियांचे दमन करणारा आहे कारण तो पुरुषांनी निर्माण केलेला आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी ताराबाईंच्या विचारांचे समर्थन करून त्यांच्यावर टीका करणाऱ्यांना चोख उत्तर दिले.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :** यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'च्या माध्यमातून मुंबईत परळ, देवनार या भागात तसेच पुणे येथे मराठी शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या उद्योगशाळा काढल्या. पुण्यातील पर्वतीचा मंदिर प्रवेश सत्याग्रह, दलितांची शेतकी परिषद, संयुक्त मतदारसंघ योजना या संदर्भात त्यांनी जनजागरण केले.


महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर समाजउभारणी करण्याचे ठरवले. जातीसंस्थेला विरोध आणि समतेला प्राधान्य देणारा लढा त्यांनी उभारला. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी समाजाला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला. यातूनच पुढे महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. सार्वजनिक पाणवठे सर्वांना खुले असले पाहिजेत अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यांनी विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. नाशिकच्या काळाराम मंदिरात सर्वांना मुक्त प्रवेश मिळावा यासाठी १९३० मध्ये सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले होते.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर

वृत्तपत्रे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अतूट नाते होते. जनजागरण करणे आणि लढा उभारणे या कामासाठी त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक हत्यार म्हणून पाहिले. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'समता' अशी वृत्तपत्रे त्यांनी सुरू केली. कष्टकरी वर्गाला उज्ज्वल भवितव्य लाभावे म्हणून 'स्वतंत्र मजूर

पक्ष' त्यांनी स्थापन केला. पुढे 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' पक्ष स्थापन करून समतेवर आधारित समाजरचना निर्माण करण्यावर भर दिला. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. भारतीय संविधानाच्या निर्मितीतून त्यांनी मोठे योगदान दिले.

**रामस्वामी नायकर :** तमिळनाडूतील एरोड या शहरात १८७९ मध्ये रामस्वामी नायकर यांचा जन्म झाला. १९२० मध्ये त्यांनी काँग्रेस मधून आपल्या कार्यास सुरूवात केली. गांधीवादी विचारसरणीचा स्वीकार करून स्वदेशीचा प्रसार आणि सर्व जातींना मंदिरप्रवेश यासाठी ते कार्यरत होते. अस्पृश्यांवरील निर्बंध दूर करण्यासाठी त्रावणकोरमध्ये झालेल्या 'वायकोम सत्याग्रहा'त त्यांनी भाग घेतला होता. तमिळनाडूमध्ये त्यांनी स्वाभिमान आंदोलन सुरू केले. वर्णव्यवस्था, बालविवाह यांच्या विरोधात त्यांनी लढा उभारला. या कामांमुळे लोक त्यांना पेरियार (महान आत्मा) म्हणून ओळखू लागले. ते प्रभावी वक्ते आणि लेखक होते. त्यांनी स्त्रियांचे हक्क, संततीनियमन या विषयांवर क्रांतिकारक भूमिका घेतली.


रामस्वामी नायकर

**कमलादेवी चट्टोपाध्याय :** कमलादेवी काँग्रेसच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहात स्त्रियांना भाग घ्यायला परवानगी द्यावी यासाठी त्यांनी महात्मा गांधीजींचे मन वळवले. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांच्या संदर्भात आयुष्यभर काम केले. मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. कामगार-शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी आंदोलने केली. शेतात काम करणाऱ्या स्त्री-मजूरांना न्याय्य वागणूक मिळावी यासाठी त्या आग्रही होत्या. कारखान्यात स्त्रियांसाठी कामाचे चांगले वातावरण असावे असा आग्रह त्यांनी धरला. स्त्रियांना बाळंतपणाची पगारी रजा मिळावी म्हणूनही त्यांनी पाठपुरावा केला. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत इंग्रजांनी त्यांना वर्षभर तुरूंगात ठेवले.


कमलादेवी चट्टोपाध्याय

## ५.५ संस्थानिकांचे योगदान

**महाराजा सयाजीराव गायकवाड :** बडोदा संस्थानात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पुरोगामी धोरण आखले होते. यांनी अस्पृश्य-आदिवासींना सरकारी खर्चाने शिक्षण आणि वसतिगृह उपलब्ध करून देण्याचा हुकुम काढला. स्त्री-शिक्षणास प्रोत्साहन आणि स्त्रियांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा त्यांनी सुरू केली. महाराजांनी राजवाड्यात सर्व जातींचे एकत्र सहभोजन, गाव तेथे ग्रामपंचायत, ग्रामपंचायत सदस्य किमान साक्षर पाहिजे, गाव तेथे वाचनालय, सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, शालेय मुला-मुलींना शारीरिक शिक्षण सक्तीचे केले. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेतीपूरक कौशल्य विकासाधारित अभ्यासक्रम संस्थानात सुरू केले. बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, संस्थानात विधवा स्त्रीबरोबर मुलींना माहेरच्या मिळकतीत वाटा देण्याचा त्यांनी कायदा केला.


महाराजा सयाजीराव गायकवाड

**राजर्षी शाहू महाराज :** कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करत असतानाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वास पाठिंबा दिला. राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा जाहीरनामा काढला. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. राजर्षी शाहू महाराज यांनी रोटीबंदी, बेटीबंदी आणि व्यवसाय बंदीवर टीका केली. आंतरजातीय विवाहाचा कायदा त्यांनी केला. संस्थानात कोणताही व्यवसाय


राजर्षी शाहू महाराज

कोणालाही करण्याची परवानगी देण्यात आली.

समाजसुधारकांनी भविष्यातला देश आपल्या डोळ्यासमोर ठेवला होता. स्वातंत्र्य चळवळीसाठी लढणारा डोळस समाज निर्माण करायचा असेल तर विचारशील नागरिक तयार करणे आवश्यक असते.

भारतीयांनी युरोपीय वसाहतवादाविरुद्ध कसा लढा दिला याचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.

**हे ही माहीत हवे.**

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास शिक्षणक्षेत्रात कर्मवीर भाऊराव पाटील आणि पंजाबराव देशमुख, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोदावरी परुळेकर, ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करायला हवा. भजन-कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे काम संत गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केले. समाजसेवेच्या क्षेत्रात डॉ.शिवाजीराव पटवर्धन, बाबा आमटे आणि डॉ.रजनीकांत आरोळे यांची कामगिरी मोलाची आहे. डॉ.बाबा आढाव यांनी 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ सुरू केली. समाजजीवनात बुद्धिप्रामाण्यवादाची बैठक देण्यात र.धों.कर्वे अग्रेसर होते. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रयत्नांमुळे अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीने जोर धरला.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. राजा राममोहन रॉय यांनी .................. प्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.

(अ) जातिप्रथा (ब) बालविवाह
(क) सती (ड) पडदा पद्धती

२. आर्य समाजाची स्थापना .................. यांनी केली.

(अ) स्वामी विवेकानंद
(ब) महात्मा जोतीराव फुले
(क) स्वामी दयानंद सरस्वती
(ड) रामस्वामी नायकर

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | ब्राह्मो समाज | राजा राममोहन रॉय |
| २. | सत्यशोधक समाज | महात्मा जोतीराव फुले |
| ३. | परमहंस सभा | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे |
| ४. | रामकृष्ण मिशन | स्वामी विवेकानंद |

**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. मुघल शासकाने राजा राममोहन रॉय यांना दिलेला किताब -
२. मुहम्मदन अँग्लो ओरिएन्टल कॉलेजची स्थापना करणारे -
३. वायकोम सत्याग्रहात भाग घेणारे -
४. कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करणारे -

**प्र.३ टीपा लिहा.**

१. प्रार्थना समाज
२. सत्यशोधक समाज

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. राजा राममोहन रॉय यांनी कोणत्या सुधारणांचा आग्रह धरला होता?
२. रामकृष्ण मिशनने केलेले कार्य लिहा.
३. सर सय्यद अहमद खान यांनी केलेले कार्य लिहा.

४. रामस्वामी नायकर यांनी केलेल्या कार्याची माहिती लिहा.

**उपक्रम**

स्त्री-शिक्षणासाठी महाराष्ट्रात झालेल्या प्रयत्नाची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.




महात्मा जोतीराव फुले यांचा वाडा, पुणे

# ६. वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष

६.१ १८५७ पूर्वीचे लढे
६.२ १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध
६.३ भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी
६.४ भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना
६.५ मवाळ–जहाल विचारसरणी
६.६ सशस्त्र क्रांतिकारकांचे लढे
६.७ महात्मा गांधीजींची नि:शस्त्र प्रतिकार चळवळ
६.८ आझाद हिंद सेना
६.९ १९४२ भारत छोडो आंदोलन

या पाठात आपण भारतीयांनी वसाहतवादाविरुद्ध केलेला संघर्ष अभ्यासणार आहोत.

## ६.१ १८५७ पूर्वीचे लढे

१८१८ मध्ये खानदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. सातपुडा, सातमाळा आणि अजिंठ्याच्या परिसरातील भिल्ल एकत्र आले. दुसऱ्या बाजीरावाचे विश्वासू सहकारी त्रिंबकजी डेंगळे कैदेतून निसटले आणि त्यांनी भिल्लांना प्रेरणा दिली. त्रिंबकजी डेंगळे यांचे पुतणे गोंदाजी व महिपा यांनी या उठावाचे नेतृत्व केले. या उठावात हजारो भिल्लांनी भाग घेतला.

कॅप्टन ब्रिग्ज याने या भिल्लांची कोंडी करण्यास सुरुवात केली. त्यांची रसद बंद केली. इंग्रजी सत्तेचा प्रमुख माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने काही भिल्लांनाच वाटसरूंचे संरक्षण करण्याच्या कामावर नेमले. काही भिल्लांना नोकऱ्या व पेन्शन द्यायला सुरुवात केली. एका बाजूला भिल्लांना अशा सवलती देत असताना दुसऱ्या बाजूने मात्र त्यांची गळचेपी करण्यास सुरुवात केली. मेजर मोरिन याने भिल्लांना शरण येण्यास भाग पाडले. १८२२ च्या दरम्यान 'हरिया' या भिल्लांच्या म्होरक्याचा उठाव कॅप्टन रॉबिन्सन याने दडपला. भिल्लांचा उठाव लेफ्टनंट औट्रॅम याने मोडून काढला. त्याचबरोबर त्याने भिल्लांमध्ये राहून त्यांच्यात विश्वासही निर्माण केला. त्यांना शहरी जीवनात आणण्याचा त्याने प्रयत्न केला. माफीचे जाहीरनामे, जमिनी देणे, तगाई, मागील गुन्ह्यांची माफी, सैन्यात भरती यांमुळे भिल्लांचे उठाव करण्याचे प्रमाण पुढील काळात कमी झाले.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पाइकांचा उठाव :** ओडिशात मध्ययुगीन काळापासून पाइक पद्धती अस्तित्वात होती. तिथल्या निरनिराळ्या स्वतंत्र राजांचे जे खडे सैनिक होते, त्यांना 'पाइक' असे म्हणत. राजांनी या पाइकांना जमिनी मोफत कसण्यास दिल्या होत्या. त्या कसून ते आपला उदरनिर्वाह करत. त्या बदल्यात युद्धाचा प्रसंग उद्भवला तर त्यांनी आपल्या राजांच्या बाजूने लढाईला उभे राहायचे अशी अट होती.

इ.स.१८०३ मध्ये इंग्रजांनी नागपूरकर भोसल्यांकडून ओडिशा जिंकून घेतले. इंग्रजांनी पाइकांच्या वंशपरंपरागत जमिनी काढून घेतल्या. त्यामुळे पाइक संतापले. तसेच इंग्रजांनी लावलेल्या करांमुळे मिठाच्या किमतीत वाढ होऊन सामान्य लोकांचे जीवन असह्य झाले. याचा परिणाम इ.स.१८१७ मध्ये इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला. या उठावाचे नेतृत्व बक्षी जगबंधू विद्याधर यांनी केले.

हंसाजी नाईक यांचे राज्य आजच्या नांदेड प्रदेशात होते. त्यांनी निजामाच्या राज्यात सामील होण्यास नकार दिला. उलट निजामाचे काही किल्ले त्यांनी जिंकले. त्यामुळे युद्ध सुरू होणे अपरिहार्य होते. मेजर पिटमन, कॅप्टन इव्हान्स, कॅप्टन टेलर यांच्या नेतृत्वाखाली ४०० सैनिकांची फौज निजामाच्या रक्षणासाठी चालून आली. हे युद्ध २५ दिवस चालले. अखेर हंसाजींचा पराभव झाला.

चितूरसिंग यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात रामोशी समाजाच्या लोकांनी उठाव केला. संतू नाईक



उमाजी नाईक

व उमाजी नाईक हे त्यांचे म्होरके होते. पुण्याहून मुंबईला जाणारा सावकारी ऐवज त्यांनी ताब्यात घेतला. १८२४ मध्ये उमाजी नाईक यांनी पुण्याजवळील भांबुर्डे येथील सरकारी तिजोरी ताब्यात घेतली. त्यांनी इंग्रजांच्या नाकी दम आणला. या सगळ्या प्रकाराला आळा घालण्यासाठी उमाजी आणि त्यांचे सहकारी भुजबा, पांड्या व येसाजी

**माहीत आहे का तुम्हांला ?**

उमाजी नाईक यांनी ब्रिटिशांच्या विरोधात जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यात म्हटले आहे,

'युरोपीय लोक आपल्या देशात जेथे सापडतील, तेथे पकडून ठार मारावेत. मग ते अधिकारी अगर लष्करी शिपाई-कोणीही असोत. युरोपियनास मारण्याचे हे काम कोणी उत्कृष्टपणे बजावतील, त्यांना रोख बक्षिसे, इनामे, जहागिरी वगैरे या नव्या सरकारकडून देण्यात येतील. इंग्रजी राज्यात ज्यांची वतने, हक्क व मिळकती बुडाल्या असतील, त्यांना आपले गेलेले हक्क परत मिळविण्याची संधी आली आहे. तिचा उपयोग करून घ्यावा. सरकारच्या फौजेत हिंदी शिपाई, स्वार, पायदळ वगैरे आहेत, त्यांनी नोकऱ्या सोडून बाहेर निघावे. साहेबाचे हुकूम पाळू नयेत. ही आज्ञा न मानल्यास नवीन सरकारकडून त्यांना सजा होईल. युरोपियनांचे बंगले जाळावेत. सरकारी तिजोऱ्या लुटाव्या. लुटीचा पैसा त्यांना माफ केला जाईल. सरकारास वसूल भरू नये. हिंदू व मुसलमान कोणी असोत, त्यांनी हा आमचा हुकूम मानावा. इंग्रजी राज्य बुडणार, हे भाकीत खरे होण्याची ही वेळ आहे.'

यांच्यासाठी सरकारने प्रत्येकी ५ हजार रुपयांचे इनाम घोषित केले. गावकऱ्यांनी त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, पैसा देऊ नये, असे आदेश हा उठाव मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी काढला. सरकारने वतने जप्त करण्याची धमकी दिली. उमाजींबद्दलची माहिती सरकारला ताबडतोब दिलीच पाहिजे असा आदेश दिला. शरण येणाऱ्यांना माफी देण्यात आली. कॅप्टन डेव्हिस घोडदळाच्या पाच कंपन्या घेऊन उमाजींच्या पाठलागावर निघाला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सातारा, वाई, भोर, कोल्हापूर येथे सतत संघर्ष चालू होता. कॅप्टन मॅकिन्टोशने उमाजींचा पाठलाग सुरू केला. उमाजींनी इंग्रजांना ठार मारण्यासाठी आदेश दिले. अखेर भोरजवळ इंग्रजांनी उमाजींना पकडले. उमाजी नाईक यांच्यावर खटला भरून त्यांना पुणे येथे फाशी देण्यात आली.

१८२८ मध्ये महादेवगडचा किल्लेदार फोंडसावंत तांदुळवाडीकर याने उठाव केला. मात्र, इंग्रजांनी हा उठाव मोडून काढला.

इंग्रजांचे धोरण पाहून सावंतवाडीतील सरदारांनी एकत्र येऊन उठाव केला. परंतु स्पूनर या पोलिटिकल एजंटने* हा उठाव मोडून काढला. त्यानंतरही या उठावात सामील असलेल्या सरदारांपैकी काहींनी ब्रिटिशांविरुद्ध एक होऊन लढण्याचा प्रयत्न केला. मात्र १८४५ मध्ये या परिसरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. कॅप्टन औट्रॅम याने हा उठाव पूर्णतः मोडून काढला.

**इंग्रज सरकारचा भारतीय संस्थानिकांच्या दरबारातील प्रतिनिधी*

कोल्हापूर संस्थानात किल्ल्यांचे संरक्षण करणारे गडकरी असत. मराठ्यांच्या राज्यात त्यांना वेतन मिळे. परंतु कंपनी सरकारच्या राजवटीत गडकऱ्यांचे अधिकार आणि वेतन नष्ट करण्यात आले. त्याविरुद्ध कोल्हापूर जवळील सामानगडावर पहिला संघर्ष सुरू झाला. कॅप्टन औट्रॅम याच्या नेतृत्वाखाली इंग्रजांच्या फौजा आल्या. १८४४ मध्ये पन्हाळा, पावनगड, विशाळगड उठाववाल्यांच्या ताब्यात आले. त्यानंतर मद्रासकडून इंग्रजांची सुसज्ज फौज आल्याने गडकऱ्यांना शरणागती पत्करावी लागली.

### ६.२ १८५७ चा स्वातंत्र्यलढा

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामागे ब्रिटिश फौजेतील

भारतीय सैनिकांचा असंतोष व राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक कारणे होती. ब्रिटिश फौजेतील भारतीय सैनिकांना देण्यात येणारी वागणूक आणि त्यांच्यावर असणारी बंधने यामुळे सैनिकात असंतोष वाढत होता. भारतीय सैनिकांच्या भत्त्यात कपात, त्यांना समुद्र ओलांडण्याची सक्ती, कवायतीच्या वेळी होणारा अपमान, नोकरीतील बदल्यांबाबत केला जाणारा पक्षपात, कार्यक्षमतेवर होणारा अन्याय, वरिष्ठ पदांवर बढती न मिळणे यांमुळे भारतीय सैनिक दुखावले होते.

गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने दत्तक वारसाहक्क नामंजूर केल्याने भारतीय संस्थानिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. सातारा, जैतपूर, संबळपूर, उदेपूर, नागपूर, झाशी ही संस्थाने डलहौसीने खालसा केली.

संस्थाने खालसा केल्यामुळे संस्थानांमधील सैनिक बेकार झाले. शेतीवर या अतिरिक्त सैनिकांचा भार पडला. राज्यकारभाराच्या माध्यमातून कंपनी सरकार धर्मबुडवेपणा करीत आहे, अशी समजूत लोकांच्या मनात मूळ धरू लागली होती. संस्थाने खालसा करण्याबरोबरच ब्रिटिशांनी वतनेही जप्त केली होती. त्यामुळे नाराज असणारा स्थानिक वर्ग मोठा होता.

भारतीय परंपरेचा, येथील पीकपद्धती व हवामानाचा विचार न करता भारतात कायमधारा, रयतवारी, महालवारी या पद्धतीचे प्रयोग इंग्रजांनी केले. त्यामुळे शेतकरी कंगाल, जमीनदार आणि कंपनी सरकार श्रीमंत होत गेले. पूर्वी शेतसारा वस्तूरूपात भरता येत होता. आता तो रोख स्वरूपात द्यावा लागे. पीक येवो न येवो पण कर भरावाच लागे. यातच दुष्काळ आला तर शेतकऱ्यांची अवस्था बिकट होई. दुष्काळ, साथीचे रोग यांचा सर्वाधिक फटका माणसे, जनावरे यांना बसायचा. भारतीयांच्या समस्यांच्या संदर्भात ब्रिटिशांचा दृष्टिकोन सहानुभूतीशून्य असायचा. सावकार आणि सरकार यांच्या कचाट्यात शेतकरी सापडला. पूर्वी जमिनीची विक्री करता येत नसे. अडचणीत सापडलेला शेतकरी नाईलाजापोटी रोख पैशांसाठी जमीन विकू लागला आणि अधिकच अडचणीत आला. कंपनीने जमीन विक्रीयोग्य वस्तू बनवून टाकली. इंग्रज मळेवाल्यांनी येथे नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. निळीच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांची अवस्था भीषण होती. सार्वत्रिक बेकारी, असंतोष, अविश्वास यांनी भारतभर सामान्य जनतेचे जगणे अवघड केले होते.

**करून पहा.**

कायमधारा, रयतवारी, महालवारी पद्धतींबद्दल अधिक माहिती मिळवा आणि चर्चा करा. सध्या चालू असलेल्या ‘आणेवारी’ पद्धतीबद्दल माहिती मिळवा.


आर्थिक पिळवणुकीबरोबरच धर्मांतर, भारतीयांच्या रूढी, परंपरा याबाबतची ब्रिटिशांची धोरणे या गोष्टींमुळे भारतीयांच्या मनात ब्रिटिशांबद्दल असलेल्या असंतोषात भर पडत गेली.

इंग्रजांनी १८५६ साली हिंदी सैनिकांच्या हाती लांब पल्ल्याच्या एनफिल्ड बंदुका व त्यात वापरायची नवी काडतुसे दिली. काडतुसांस गाय व डुकराची चरबी लावलेली आहे अशी बातमी पसरली. काडतुस वापरण्यापूर्वी ते दाताने तोडावे लागे. भारतीय सैनिकांना आपल्या तोंडाचा स्पर्श अशा काडतुसांना व्हावा, ही कल्पनाच धर्मसंकटात टाकणारी होती. सुरुवातीला ज्या शिपायांनी ही काडतुसे वापरण्यास नकार दिला त्यांचे उठाव इंग्रजांनी मोडून काढले. मार्च १८५७ मध्ये बराकपूर छावणीत मंगल पांडे यांनी असंतोषाला तोंड फोडले. इंग्रजांनी मंगल पांडे यांना फाशी दिली. सैनिकांमधील असंतोष वाढला होता. या घटनेच्या पाठोपाठ लखनौच्या शिपायांनी उठाव केला. मेरठ येथील घोडदळाच्या कंपन्यांनी उठाव केला. या सगळ्या धामधुमीत इंग्रजांना ठार मारणे, त्यांच्या कुटुंबियांस धडा शिकवणे, प्रसंगी कत्तल करणे, घरे जाळणे असे प्रकार सुरू झाले. शिपाई दिल्लीच्या दिशेने चालून गेले.

१२ मे १८५७ रोजी हिंदी शिपायांचे दिल्लीवर पूर्णपणे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यांनी मुघल बादशाह बहादुरशाह यांच्याकडे लढ्याचे नेतृत्व दिले. भारताचा सम्राट म्हणून त्यांच्या नावाने द्वाही



बहादुरशाह




फिरवण्यात आली. बहादुरशाह यांस 'शहनशाहा-इ-हिंदुस्तान' बनविण्यात आले. १८५७ चे नेतृत्व मुघल बादशाहच्या हाती असले तरी प्रत्यक्षात मात्र ते नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल, मौलवी अहमदउल्ला, कुंवरसिंग व बख्तखान यांनी केले. दिल्ली, कानपूर, लखनौ, झाशी येथील व पश्चिम बिहारच्या भागातील उठावाचे स्वरूप विशेष उग्र होते. दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी बख्तखान यांनी आपल्या शिरावर घेतली.

२७ मे १८५७ रोजी दिल्ली परत मिळवण्याच्या उद्देशाने ब्रिटिश सैन्य दिल्लीस आले. दिल्ली हस्तगत करण्यासाठी इंग्रजांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली. या युद्धात ब्रिगेडिअर जॉन निकोलस मारला गेला. सर जॉन लॉरेन्स व शीख पलटणीमुळे ब्रिटिशांनी दिल्ली जिंकली. ब्रिटिश जनरल हडसनने बहादुरशाहास अटक केली व रंगूनला (म्यानमार) पाठविले. बहादुरशाह यांचे १८६२ मध्ये तिकडेच निधन झाले.

त्यापूर्वीच अयोध्या, लखनौ व वायव्य प्रांतात उठावाने वेग घेतला. अलिगढ, इटावा, मथुरा, लखनौ, बरेली, आझमगढ, फैजाबाद, कानपूर, झाशी, अहमदाबाद

येथे असंतोष वणव्यासारखा पसरला.

पंजाबमध्ये जालंधर, लुधियाना, मुलतान, सियालकोट येथे शिपायांनी उठावाचे सक्रिय स्वागत केले. मध्य प्रांतातील ग्वालियर, इंदौर, महू, सागर येथेही अशाच स्वरूपाच्या घटना घडल्या. नसिराबाद येथील लष्करी छावणीत व उर्वरित राजस्थानमध्येही उठाव झाला.

ढाका, चितगाव, मदारीगंज (सध्याच्या बांगलादेशमधील), भागलपूर (बिहार) येथे उठावाचे लोण पोहोचले. बिहारमध्ये पाटण्याजवळ दिनापूरच्या शिपायांनी उठाव केला व पश्चिम बिहारमधील जमीनदार कुवरसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी लढा दिला. कुवरसिंह यांना हजारीबाग (झारखंड), देवगड, संबळपूर (ओडिशा) येथून चांगला प्रतिसाद मिळाला.


नानासाहेब पेशवे

नानासाहेब पेशवे यांनी कानपूर येथे उठावाचे नेतृत्व केले. इंग्रज सेनापती हॅवलॉक कानपुरात दाखल झाला. नानासाहेब व तात्या टोपे यांनी कानपूर स्वतःच्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी झाला. ब्रिटिश सैन्याचा मुख्य कमांडर सर कॉलीन कॅम्पबेल याने तात्या टोपेंचा पराभव केला आणि कानपूर परत मिळवले.


तात्या टोपे

१८५७ ची ही घटना म्हणजे भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होय. या स्वातंत्र्ययुद्धामध्ये सुरुवातीला तात्या टोपे, अवधच्या बेगम हजरत महल यांनी आघाडी घेतली. हॅवलॉक व औट्रॅम यांच्या नेतृत्वाखाली इंग्रज सैन्याला सुरुवातीला यश मिळत नव्हते. तेव्हा नेपाळचा राजा जंग बहादूर गुरखा पलटणी घेऊन ब्रिटिशांच्या मदतीस गेला. हिंदी सैन्याचे नेतृत्व मौलवी अहमदउल्ला यांनी केले. कॉलीन कॅम्पबेलने आपला शिपाईगिरीचा अनुभव पणास लावून लखनौवर वर्चस्व मिळवले.

गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग याच्या आदेशावरून मद्रासचा कर्नल नील सुसज्ज लष्कर घेऊन वाराणसी, अलाहाबाद घेण्यास आला. येथे सर्वत्र उठावकर्त्यांना जनतेचा पाठिंबा होता. कर्नल नीलने हिंदी सैन्याच्या गोळीबाराला तोफांनी उत्तर दिले. कत्तली करणे, फासावर लटकवणे या प्रकारांनी आपल्या क्रौर्याचे प्रदर्शन नीलने केले. वाराणसीची बातमी कळताच अलाहाबादच्या शिपायांनी उठाव केला. युरोपियनांस सूड म्हणून ठार केले. तेव्हा नीलने अलाहाबादला कूच करून भारतीयांची सरसकट कत्तल केली. इंग्रजांनी अत्याचारांचा कळस गाठला.

**करून पहा.**

कोकणातील वरसई येथील विष्णूभट गोडसे हे उठावाच्या काळात झाशी परिसरात होते. त्यांनी लिहिलेले 'माझा प्रवास' हे पुस्तक वाचा.

झाशीत हिंदी सैन्याने ब्रिटिशांच्या विरोधात उठाव केला. तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांच्या मदतीने झाशीत राणी लक्ष्मीबाईंच्या नेतृत्वाखाली उठावकर्ते संघटित झाले. सर ह्यू रोज याने झाशीस वेढा दिला. तात्या टोपे राणीच्या मदतीला आले; पण ह्यू रोज याने त्यांचा पराभव केला. ब्रिटिशांनी काल्पी जिंकले. झाशीच्या राणीस युद्धात वीरमरण आले. ग्वालियरचा सरदार मानसिंह याने तात्या टोपे यांना विश्वासघाताने इंग्रजांच्या हवाली केले. त्यांना १८५९ मध्ये फाशी देण्यात आली. या धामधुमीत नानासाहेब पेशवे, दुसऱ्या बाजीरावाची पत्नी, पुतणे रावसाहेब नेपाळमध्ये गेले व तिकडेच कायम राहिले.


राणी लक्ष्मीबाई

महाराष्ट्रात साताऱ्यात रंगो बापूजी गुप्ते यांनी उठाव घडवून आणण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. गुप्ते यांच्या सहकाऱ्यांना शिक्षा देण्यात आल्या. नरगुंदचे संस्थानिक बाबासाहेब भावे यांनी १८५८ मध्ये उठाव केला. मुंबईतील कटाची कल्पना इंग्रजांना येताच त्यांनी

कटवाल्यांना तोफेच्या तोंडी दिले. खानदेशात भीमा नाईक, कजारसिंग नाईक यांनी सात लाखांचा सरकारी खजिना लुटला. अंबापाणी (जळगाव जिल्हा) येथे भिल्ल आणि इंग्रज यांच्यात लढाई झाली. भिल्लांचा पराभव झाला. कित्येक भिल्लांना अटक झाली. कितीतरी जणांवर लष्करी कोर्टात खटले चालवून त्यांना फाशी देण्यात आले.

कोल्हापूर येथे उठावाची बातमी पोहचताच अगोदरच तयारीत असलेल्या रामजी शिरसाट यांनी सरकारी खजिना ताब्यात घेतला व स्वातंत्र्ययुद्धात सहभागी होण्यास तयार असलेले सैन्य गोळा करण्यास सुरुवात केली. पुढे याला अधिक प्रतिसाद म्हणून कोल्हापूरच्या राजघराण्यातील चिमासाहेब यांनी उठावकर्त्यांचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली. बेळगाव, धारवाड, कोल्हापूर येथे उठावास प्रतिसाद मिळाला.

१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध जवळजवळ वर्ष-सव्वा वर्ष चालू होते. दिल्ली, मेरठ, कानपूर, लखनौ, ग्वालियर इत्यादी ठिकाणी लढलेल्या हिंदी शिपायांची संख्या सुमारे एक लाखाच्या आसपास जाईल एवढी मोठी होती. शस्त्रबळ, शौर्य, धैर्य यातही ते कमी नव्हते तरीही या लढ्यात भारतीयांना अपयश आले.

१८५७ च्या लढ्याच्या प्रसंगी भारतीयांच्या मनात उफाळलेला असंतोष लक्षात घेऊन इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने 'राणीचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला. त्यामध्ये सर्व भारतीय आमचे प्रजाजन आहेत असे म्हणत राणीने भारतीयांना उद्देशून काही आश्वासने दिली. या आश्वासनांमध्ये भारतीय प्रजाजनांमध्ये वंश, धर्म, जात किंवा जन्मस्थान या निकषांच्या आधारे कोणताही भेद केला जाणार नाही असे म्हटले होते. तसेच नोकऱ्या गुणवत्तेच्या निकषावर दिल्या जातील, धार्मिक बाबतीत ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करणार नाही, संस्थानिकांशी केलेल्या करारांचे पालन केले जाईल, संस्थाने खालसा केली जाणार नाहीत इत्यादी आश्वासनांचा समावेश या जाहीरनाम्यात होता.

भारतीयांवरही या घटनेचा खोलवर परिणाम झाला. प्रादेशिक निष्ठांच्या जागी राष्ट्रीय भावनेचा उदय होऊ लागला. ब्रिटिशांबरोबर लढा देण्यासाठी वापरलेले सशस्त्र मार्ग निरुपयोगी ठरल्यामुळे नवे मार्ग शोधण्याची गरज भारतीयांना जाणवू लागली.

पुढे भारतीयांची एकजूट होऊ नये म्हणून 'फोडा व राज्य करा' या नीतिचा वापर ब्रिटिशांनी केला.

### ६.३ भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी

भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ही स्वातंत्र्य चळवळीतील १८५७ नंतरची निर्णायक घटना होय. व्यापक मान्यता असलेली ही पहिलीच भारतीय संघटना होय.

१८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी 'लॅण्ड होल्डर्स असोसिएशन' संस्था जमीनदार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी स्थापन केली. १८३९ मध्ये राजा राममोहन रॉय यांचे स्नेही विल्यम ॲडॅम्स यांनी लंडनमध्ये 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' काढून कार्य सुरू केले. इंग्लंडमध्ये राहणाऱ्यांना ब्रिटिश इंडियात काय चालले आहे हे कळावे म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. द्वारकानाथ टागोर यांचे स्नेही जॉर्ज थॉम्पसन यांनी 'बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी' स्थापन केली. १८५१ मध्ये लँड होल्डर्स असोसिएशन आणि बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी या दोन्ही एकत्र करून 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'ची संस्था स्थापण्यात आली. या संस्थेने हरिश्चंद्र मुखर्जी यांच्या पुढाकाराने भारतीय जनतेच्या तक्रारी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पाठवल्या. याच काळात 'मद्रास नेटीव्ह असोसिएशन' ने सुद्धा इंग्रजांच्या विरोधात सूर आळवायला सुरुवात केली. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या मदतीने 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ही संस्था लंडन येथे सुरू करून जागृतीचे प्रयत्न केले. बंगालमधील 'इंडिया लीग' संस्थेचे काम १८७५ सालापासून सुरू होते. पुढे सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 'इंडियन असोसिएशन' संस्था स्थापली. बॅनर्जींनी समान राजकीय हितसंबंधांच्या व आशाआकांक्षांच्या जाणिवांद्वारे भारतातील भिन्नवंशीय व भिन्न जातींच्या लोकांची एकी घडवून आणण्यासाठी ही संस्था प्रयत्न करील असे सांगितले. याच संस्थेने १८८३ मध्ये कोलकाता येथे भारतातील विविध प्रांतांच्या प्रतिनिधींची परिषद घेतली.

१८८४ मध्ये स्थापन झालेली 'मद्रास महाजन सभा' ही एक महत्त्वाची संघटना होती. या सुमारास मुंबईत इंग्रजी विद्येचे आणि नवसुधारणांचे वारे वाहू लागले. जानेवारी १८८५ मध्ये न्या.काशिनाथ त्र्यंबक तेलंग,

फिरोजशहा मेहता इत्यादींनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' ही संस्था स्थापन केली.

### ६.४ भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना

२८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयाच्या सभागृहात इंडियन नॅशनल कॉंग्रेस उर्फ भारतीय राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन झाले. या अधिवेशनात ७२ प्रतिनिधी उपस्थित होते. व्योमेशचंद्र बॅनर्जी हे राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, रहीमतुल्ला सयानी, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी मान्यवर मंडळी अधिवेशनात सहभागी झाली. भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम या ब्रिटिश अधिकाऱ्यानेही पुढाकार घेतला होता. पहिल्या अधिवेशनात एकूण नऊ ठराव संमत करण्यात आले. इंग्रजांच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात यावा, मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात मोठ्या प्रमाणावर लोकनियुक्त प्रतिनिधी असावेत, प्रशासकीय सेवांमध्ये भारतीय लोकांस वाव द्यावा, सनदी नोकरीच्या परीक्षा हिंदुस्थानात घ्याव्यात, लष्करी खर्च वाढवू नये, उच्च शिक्षणावर अधिक खर्च करावा, तांत्रिक शिक्षणाची सोय करावी इत्यादी मागण्या करण्यात आल्या.

### ६.५ मवाळ-जहाल विचारसरणी

याच काळात विशेषतः महाराष्ट्रात 'आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा' हा वाद सुरू झाला होता. स्वातंत्र्य मिळाले की समाज सुधारेल ही जहाल गटाची विचारसरणी होती. तर समाज सुधारल्याशिवाय



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**कलम १२४ अ आणि महाराष्ट्र :** २५ नोव्हेंबर १८७० रोजी जेम्स फिटझ् स्टीफन यांनी 'कलम १२४ अ' भारतीय दंडविधानात समाविष्ट केले. या कलमान्वये 'हिंदुस्तानातील सरकारविषयी शब्द, लेखन, चिन्ह किंवा यांसारख्या कोणत्याही घटकांनी अप्रीती निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्याला दंडाची, तुरुंगवासाची किंवा फाशीची शिक्षा देण्यात येईल' असे जाहीर करण्यात आले. या कायद्यानुसार शिक्षा झालेले पहिले साप्ताहिक म्हणजे 'बंगवासी' होय. आमच्या धार्मिक प्रथा परंपरांमध्ये इंग्रज हस्तक्षेप करत आहेत असा आक्षेप बंगालमधील 'बंगवासी' साप्ताहिकाने घेतला. यामुळे बंगवासी साप्ताहिकाला भारतात सर्वप्रथम राजद्रोहाच्या आरोपाला सामोरे जावे लागले.

१५ जून १८९७ रोजी पुण्यातून प्रसिद्ध झालेल्या केसरीच्या अंकात 'शिवाजीचे उद्गार' ही कविता प्रसिद्ध झाली. या कवितेच्या अनुषंगाने लोकमान्य टिळकांनी काही अग्रलेख लिहिले. यात 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे', 'राजद्रोह कशाला म्हणतात?' या अग्रलेखांचा समावेश होता. सरकारविरुद्ध असंतोष निर्माण करण्याच्या आरोपाखाली '१२४ अ' कलमान्वये राजद्रोही ठरून शिक्षा झालेले लोकमान्य टिळक हे हिंदुस्थानातील पहिले संपादक होत.

१४ मार्च १८७८ रोजी 'देशी भाषा वृत्तपत्र कायदा' लागू झाला. या कायद्यान्वये हिंदुस्थानातील ब्रिटिश सरकारविषयी लेखनाद्वारे अप्रीती निर्माण करणारा तसेच लोकांमध्ये वंश, जात आणि धर्म यांच्या नावाखाली परस्परांविषयी द्वेषभाव पसरवणारे लेखन करणे आणि छापणे अशा गुन्ह्यांविरोधात उपाययोजना केली गेली. या कायद्याच्या विरोधात कोलकाता येथे देशी वृत्तपत्रकारांची एक परिषद भरवण्यात आली होती. देशी संपादकांची अशी परिषद घेऊन सरकारच्या जुलमी कायद्याला विरोध करण्याची कल्पना दोन मराठी माणसांची होती. गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी ही परिषद आयोजित करण्यात प्रमुख भूमिका बजावली.

वरील कायद्यांच्या अंतर्गत इंग्रज सरकारने मराठी भाषेतील २१० पुस्तके जप्त केली होती. महाराष्ट्रात लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, गणेश दामोदर सावरकर यांच्या विरुद्ध खटले चालवण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे '१८५७ चे स्वातंत्र्य समर' हे पुस्तक आक्षिप्त (जप्त झालेल्या) साहित्यात होते.

स्वातंत्र्य अपूर्ण आहे अशी मवाळ गटाची विचारसरणी होती. समाज सुधारण्यासाठी ब्रिटिश सरकारची मदत घेण्यास हरकत नाही असे मवाळ गटाला वाटे. या गटाला ‘मवाळ’ असे म्हटले जाई.

गोपाळ गणेश आगरकर हे सुधारकांचे अग्रणी होते. आधी आपण सुधारले पाहिजे, आपले घर सुधारले पाहिजे असे ते म्हणत. जहालांचे नेते लोकमान्य टिळक म्हणत, हे घरच माझे नाही ! ते अगोदर ताब्यात घेऊ या. मग आपण हव्या त्या सुधारणा करू.

फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले हे मवाळांचे नेते होते. सरकारला आपण आपली गाऱ्हाणी साधार पटवून देऊ शकलो तर सरकार आपल्याला निराश करणार नाही असे मवाळ गटाला प्रामाणिकपणे वाटे. अर्ज, विनंत्या अगर भाषणे करून इंग्रजी सत्ता बधणार नाही असे लोकमान्य टिळकांच्या गटाचे ठाम मत होते.


लोकमान्य टिळक

राष्ट्रीय सभेतील मतभेद १९०७ सालच्या सुरत येथे झालेल्या अधिवेशनात विकोपाला गेले. स्वदेशी व बहिष्कार हे ठराव बाजूला सारण्याचा मवाळ नेत्यांचा प्रयत्न होता. तो यशस्वी होऊ नये अशी जहाल गटाची खटपट होती. यामुळे अधिवेशनाच्या वेळी तणाव वाढला. तडजोड अशक्य झाली अखेरीस राष्ट्रीय सभा दुभंगली.

राष्ट्रीय सभेच्या कार्याला शह देण्यासाठी लॉर्ड कर्झन याने बंगाल प्रांताची फाळणी करण्याचा घाट घातला. बंगालच्या फाळणीनंतर सरकारने जहाल नेत्यांविरुद्ध कडक कारवाई केली. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना सहा वर्षे मंडालेच्या तुरूंगात पाठवले. बिपिनचंद्र पाल यांना कारावासाची शिक्षा ठोठावली तर लाला लजपतराय यांना हद्दपार केले.

लोकमान्य टिळक १९१४ मध्ये कारावासाची शिक्षा भोगून भारतात परत आले. त्यानंतर जहाल व मवाळ गटांची एकजूट होऊन ते १९१६ मध्ये काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनात पुन्हा एकत्र आले.


**माहीत आहे का तुम्हांला ?**

पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरूंगातून सुटून आले होते. ब्रिटिश साम्राज्य युद्धाच्या अडचणीत सापडले आहे. तेव्हा आपण स्वराज्याच्या दृष्टीने फायदा उठवला पाहिजे असा विचार लोकमान्य टिळकांनी मांडला होता. मुंबईचा गव्हर्नर विलिंग्डन याने युद्ध साहाय्य मिळवण्यासाठी नेत्यांची सभा बोलवली. तेव्हा स्वराज्य द्यायचे कबूल करत असाल तर युद्धाला सैनिक पुरवू, असे लोकमान्य टिळकांनी स्पष्ट सांगितले. गव्हर्नरने विरोध करताच लोकमान्य टिळक कोणाचीही पर्वा न करता तेथून तडक उठून गेले. टिळकांचे हे धोरण प्रतियोगी सहकारिता म्हणून ओळखले जाते.

## ६.६ सशस्त्र क्रांतिकारकांचे लढे

ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध भारतात विविध मार्गांनी आंदोलने झाली. त्यावरील एक मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. शासनयंत्रणा खिळखिळी करणे, सरकारचा लोकांना वाटणारा दरारा नाहीसा करणे अशा मार्गांनी सत्ता उधळून टाकणे हे सशस्त्र क्रांतिकारकांचे प्रमुख उद्दिष्ट होते.

पंजाबमध्ये रामसिंह कुका यांनी सरकारविरोधी उठावाचे आयोजन केले होते. महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी सरकारविरुद्ध उठाव केला. पुण्यात प्लेगचा बंदोबस्त करताना प्लेग कमिशनर रँड याने जुलूम-जबरदस्ती केली. त्याची चीड येऊन दामोदर आणि बाळकृष्ण या चापेकर बंधूंनी रँडची हत्या केली.

१८९९ मध्ये गणेश दामोदर सावरकर आणि त्यांचे बंधू विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने नाशिक येथे क्रांतिकारकांची ‘मित्र मेळा’ ही गुप्त संघटना स्थापन झाली. याच संघटनेला १९०४ मध्ये ‘अभिनव भारत’ हे नाव देण्यात आले. याच वर्षी विनायक दामोदर सावरकर हे उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. त्यांनी अभिनव


स्वातंत्र्यवीर सावरकर

भारत संघटनेच्या सदस्यांना क्रांतिकारी वाङ्मय, पिस्तुले इत्यादी साहित्य पाठवण्यास सुरुवात केली. त्यांनी जोसेफ मॅझिनी या इटालियन क्रांतिकारकाचे चरित्र लिहिले. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिला. अभिनव भारत संघटनेच्या कार्याचा सुगावा सरकारला लागला. सरकारने गणेश दामोदर सावरकर यांना अटक केली. जॅक्सन या इंग्रज न्यायाधीशाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या शिक्षेचा बदला घेण्यासाठी अनंत लक्ष्मण कान्हेरे या युवकाने नाशिक येथे न्यायदंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी जॅक्सनची हत्या केली. जॅक्सनच्या हत्येचा संबंध सरकारने विनायक दामोदर सावरकर यांच्याशी जोडला आणि सावरकरांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. न्यायालयाने त्यांना पन्नास वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावून अंदमान येथे रवाना केले.

बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही क्रांतिकारी संघटना कार्यरत होती. अरविंद घोष व त्यांचे बंधू बारींद्रकुमार घोष हे या संघटनेचे प्रमुख होते. कोलकत्याजवळील माणिकताळा येथे या समितीचे बॉम्ब तयार करण्याचे केंद्र होते. १९०८ मध्ये खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी या अनुशीलन समितीच्या सदस्यांनी किंग्जफोर्ड या जुलमी न्यायाधीशाला ठार करण्याची योजना आखली. त्यांनी ज्या गाडीवर बॉम्ब टाकला ती गाडी किंग्जफोर्डची नव्हती. या हल्ल्यात गाडीतील दोन इंग्लिश स्त्रिया मृत्यूमुखी पडल्या. प्रफुल्ल चाकी यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली. खुदीराम बोस पोलिसांच्या हाती लागले. त्यांना फाशी देण्यात आले.

श्यामजी कृष्ण वर्मा यांनी लंडन येथे 'इंडिया हाउस'ची स्थापना केली होती. या संस्थेमार्फत भारतीय तरुणांना इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिल्या जात. त्यांच्याच गटातील मादाम कामा या एक समाजवादी क्रांतिकारक होत्या. जर्मनीत स्टुटगार्ट येथे भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेत त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला. याच परिषदेत मादाम कामा यांनी क्रांतिकारकांच्या कल्पनेतील भारताचा ध्वज


श्यामजी कृष्ण वर्मा


मादाम कामा

फडकावला होता. पंजाबमधील मदनलाल धिंग्रा इंग्लंड येथे उच्च शिक्षण घेण्यासाठी गेले होते. तेथे धिंग्रा क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर आणि श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या संपर्कात आले. धिंग्रा अभिनव भारतचे सदस्य झाले. त्यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला ठार केले. कारण हा अधिकारी सावरकर यांच्या मागावर होता. त्याबद्दल धिंग्रा यांना फाशी देण्यात आली.

अमेरिका व कॅनडा येथील भारतीयांनी 'गदर' या संघटनेची स्थापना केली होती. लाला हरदयाळ, भाई परमानंद, डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे इत्यादी क्रांतिकारक या संघटनेचे प्रमुख नेते होते. 'गदर' म्हणजे विद्रोह. 'गदर' हे या संघटनेच्या मुखपत्राचे नाव होते. राष्ट्रप्रेम व क्रांती यांचा संदेश या मुखपत्राने भारतीयांना दिला. या कार्यात हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे यांचा विशेष सहभाग होता.

क्रांतिकारकांनी क्रांती कार्यासाठी लागणारा पैसा जमवण्यासाठी रेल्वेतून नेला जाणारा सरकारी खजिना काकोरी या उत्तर प्रदेशातील स्टेशनजवळ ताब्यात घेतला. यालाच 'काकोरी कट' म्हटले जाते. सरकारने तात्काळ कारवाई करून क्रांतिकारकांना अटकेत टाकले. त्यांच्यावर खटले चालवण्यात आले. अशफाक उल्ला, रामप्रसाद बिस्मिल, रोशन सिंग, राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात आले.

याच दरम्यान भारतात कार्ल मार्क्सचे क्रांतिकारी विचार अनुसरणाऱ्या तरूणांचा 'साम्यवादी पक्ष' स्थापन झाला. वसाहतवादी ब्रिटिश राज्य उलथवून श्रमिकांचे राज्य स्थापन करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. या विचारसरणीच्या तरुणांवर सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नावरून खटले चालवण्यात आले. या संदर्भात मीरत खटला आणि कानपूर खटला विशेष गाजले. या खटल्यामध्ये कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद, केशव नीळकंठ जोगळेकर यांचा समावेश होता.

क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव इत्यादी तरूण क्रांतिकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे

होते. १९२८ मध्ये त्यांनी दिल्ली येथे 'हिंदुस्तान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या संघटनेची स्थापना केली. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे हे त्या संघटनेचे उद्‌दिष्ट होते. शेतकरी, कामगारांचे शोषण करणारी अन्याय्य व्यवस्था त्यांना उलथून टाकायची होती. शस्त्रे गोळा करणे आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे या कामांसाठी या संघटनेचा 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी' हा एक स्वतंत्र विभाग होता. त्याचे प्रमुख चंद्रशेखर आझाद हे होते.


भगतसिंग


राजगुरू


सुखदेव


या संघटनेच्या सदस्यांनी अनेक धाडसी कृत्ये केली. भगतसिंग व राजगुरू यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी सॉंडर्स या अधिकाऱ्याला धडा शिकवला. नागरी हक्कांची पायमल्ली करणारी दोन विधेयके यावेळी सरकारने मध्यवर्ती विधिमंडळात दाखल केली. त्यांचा निषेध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी विधिमंडळात बॉम्बस्फोट केला व ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. राजद्रोहाच्या आरोपाखाली भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना १९३१ मध्ये लाहोर येथे फाशी देण्यात आली. चंद्रशेखर आझाद यांनी अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांशी संघर्ष केला. या संघर्षात त्यांनी हौतात्म्य पत्करले.

सूर्य सेन हे बंगालमधील चितगाव येथील क्रांतिगटाचे प्रमुख होते. चितगाव येथील शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना सूर्य सेन यांनी आखली. तेथील शस्त्रास्त्रे ताब्यात घेतली. चळवळ भरात असतानाच सूर्य सेन व त्यांचे काही सहकारी पोलिसांच्या हाती सापडले. सूर्य सेन व त्यांच्या बारा सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. या गटातील कल्पना दत्त यांना जन्मठेप झाली. प्रीतिलता वड्डेदार यांनी पोलिसांच्या हाती न लागता आत्माहुती दिली. शांती घोष व सुनीती चौधरी या दोन शाळकरी मुलींनी जिल्हा न्यायाधीश चार्लस् बकलँड याला ठार केले. या दोघींनाही पकडण्यात आले. बीना दास यांनी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सभासद) कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात स्टॅन्ले जॅकसन या गव्हर्नरवर गोळ्या झाडून त्याला मारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या अपयशी ठरल्या. त्यांना ९ वर्षे सश्रम कारावास भोगावा लागला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये क्रांतिकारी चळवळीने महत्त्वाचे योगदान दिले आहे. क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेशी लढताना साहस व निर्धाराचे दर्शन घडवले. त्यांचे राष्ट्रप्रेम व समर्पणवृत्ती अजोड होती. त्यांचे बलिदान भारतीयांना स्फूर्तिदायी ठरले आहे.

### ६.७ महात्मा गांधीजींची नि:शस्त्र प्रतिकार चळवळ

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० मध्ये राष्ट्रीय चळवळीची सूत्रे महात्मा गांधीकडे आली. गांधीजींच्या नेतृत्वशैलीने व लढ्याच्या अभिनव तंत्राने राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली.


महात्मा गांधी


गांधीजींच्या कार्याला दक्षिण आफ्रिकेमध्ये सुरुवात झाली. दक्षिण आफ्रिकेतील इंग्रजांच्या राजवटीत आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना व तेथील भारतीय रहिवाशांना हीन व तुच्छ समजले जाई. त्यांच्यावर विविध जाचक निर्बंध लादले गेले होते. गांधीजींनी या धोरणाविरुद्ध संघर्ष केला. या लढ्यात त्यांनी यश मिळवले. १९१५ मध्ये गांधीजी भारतात परतले.

गांधीजींनी १९१७ मध्ये बिहारमधील चंपारण्य येथील शेतकऱ्यांच्या प्रश्नांत लक्ष घातले. ब्रिटिश मळेमालक तेथील शेतकऱ्यांवर निळीच्या लागवडीची सक्ती करत. शेतकऱ्यांनी तयार केलेली नीळ कमी किमतीला विकत घेत. या शोषणाविरुद्ध व शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाचा निर्णय घेतला. तेव्हा सरकारने नीळ लागवडीची सक्ती बंद केली व मळेवाल्यांच्या कचाट्यातून शेतकऱ्यांची मुक्तता झाली.

देशामध्ये वाढत चाललेल्या राष्ट्रीय आंदोलनाला आळा घालण्यासाठी सरकारने सर सिडने रौलट या ब्रिटिश न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली एक समिति

नेमली. या समितीच्या शिफारशींनुसार १९१९ साली ‘रौलट कायदा’ करण्यात आला. या कायद्यानुसार कोणाही भारतीयाला विनावॉरंट तुरुंगात पाठवणे, विनाचौकशी खटला दाखल करणे इत्यादी अधिकार सरकारला देण्यात आले. या कायद्याच्या निषेधार्थ गांधीजींनी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. ६ एप्रिल १९१९ रोजी हरताळ पाळण्याचे आवाहन जनतेला केले.

रौलट कायद्याविरोधी सत्याग्रही लढ्याने पंजाबमध्ये प्रखर स्वरूप धारण केले. १३ एप्रिल १९१९ हा बैसाखी या सणाचा दिवस होता. बैसाखीनिमित्त अमृतसरमधील जालियनवाला बागेत आयोजित केलेल्या सभेसाठी हजारो लोक जमले होते. त्यातील बहुसंख्य लोकांना सभाबंदीच्या हुकुमाची कल्पना नव्हती. जनरल डायरने लोकांना पूर्वसूचना न देता जमावावर भीषण गोळीबार केला. या गोळीबारात शेकडो लोक मारले गेले व हजारांवर जखमी झाले. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे साऱ्या भारतभर संतापाची लाट उसळली. रवींद्रनाथ टागोरांनी हत्याकांडाचा तीव्र शब्दांत निषेध करून ब्रिटिश सरकारने त्यांना दिलेल्या ‘सर’ या पदवीचा त्याग केला.


रवींद्रनाथ टागोर

जालियनवाला बागेतील हत्याकांडाने उभा देश हादरून गेला. त्या भयकारी दृश्याचे वर्णन कुसुमाग्रजांनी आपल्या ‘जालियनवाला बाग’ या कवितेत केले आहे.

*रक्ताचे नच ओघळ सुकले अजुनि क्रुसावरचे*
*विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनि शब्दांचे*
*मंगल तव गीतांचा होतो मंदिरात घोष –*
*“प्रेम, शांति अन् क्षमा यांमध्ये वसतो परमेश !”*

*आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत*
*निःशस्त्रांच्या रक्तामांसामध्ये नाहतात*
*मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलांबायकांत*
*जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिपद रीत !*

*पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास*
*नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास;*
*असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात*
*एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात !*

१९२० सालच्या नागपूर येथील अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकाराच्या देशव्यापी चळवळीला पाठिंबा देणारा ठराव संमत केला. असहकार आंदोलनाची सर्व सूत्रे महात्मा गांधींकडे सोपवण्यात आली. असहकाराच्या ठरावान्वये शाळा, महाविद्यालये, विधिमंडळे, न्यायालये, सरकारी कचेऱ्या, परदेशी माल यांच्यावर बहिष्कार घालण्याचे ठरले.

असहकार आंदोलनाला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी मोठ्या संख्येने असहकार चळवळीत सामील झाले. चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, एम. आर. जयकर, सैफुद्दिन किचलु, विठ्ठलभाई पटेल, वल्लभभाई पटेल, राजगोपालाचारी अशा अनेक प्रथितयश वकीलांनी आपल्या वकिली व्यवसायाचा त्याग केला व ते चळवळीत सहभागी झाले. ठिकठिकाणी परदेशी कापडांच्या होळ्या भडकू लागल्या. गांधीजींच्या असहकाराच्या आवाहनाला शेतकरी वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांप्रमाणेच कामगार वर्गानेही सरकारविरोधी आंदोलनात मोठ्या प्रमाणात भाग घेतला. देशभर संपांचे सत्र सुरू झाले. १९२१ या एका वर्षात ३९६ संप झाले. राष्ट्रीय सभेच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणच्या संपांचे नेतृत्व केले. स्वराज्य आणि स्वदेशी यांचे प्रतिक झालेला ‘चरखा’ घरोघरी पोचवण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

ब्रिटिश सरकारने मिठासारख्या जीवनावश्यक वस्तूवर कर लादला होता. हा अन्यायकारक कर बंद व्हावा म्हणून गांधीजींनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. गांधीजींनी १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमातून गुजरातच्या समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या ठिकाणी पदयात्रा नेली. ६ एप्रिल रोजी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावर मीठ उचलून मिठाच्या कायद्याचा भंग केला.

### ६.८ आझाद हिंद सेना

१९३९ साली जर्मनीचा नेता हिटलर याने युरोपात दुसऱ्या महायुद्धाची ठिणगी पाडली. ब्रिटिश सरकारने भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात उतरत असल्याचा निर्णय परस्पर घेतला. या निर्णयाला


नेताजी सुभाषचंद्र बोस

महात्मा गांधीजी आणि काँग्रेस यांचा विरोध होता. या युद्धात जपान जर्मनीच्या बाजूने उतरला. जपानने आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले. ब्रिटिश सैन्यातील अनेक भारतीय सैनिक जपानच्या हाती लागले. त्यातूनच रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची निर्मिती केली. याच सेनेचे नेतृत्व नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केले. सुभाषचंद्र बोस यांनी १९४३ मध्ये सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. १९४३ च्या अखेरीस नेताजींनी अंदमान व निकोबार बेटे जिंकून ताब्यात घेतली. ''तुम मुझे खून दो । मैं तुम्हें आजादी दूँगा ।'' ही घोषणा त्यांनी लोकप्रिय केली. १९४४ मध्ये त्यांनी आराकानचा प्रदेश मिळवला. तसेच आसामच्या पूर्वसीमेवरील ठाणी जिंकून घेतली. परंतु त्यांची इंफाळची मोहीम अर्धवट राहिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आझाद हिंद सेनेचे सैनिक नेटाने लढले.

### ६.९ १९४२ भारत छोडो आंदोलन

राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथे 'ब्रिटिशांनी भारत सोडून जावे' हा ठराव मंजूर केला. त्या ठरावावर मुंबई येथील अधिवेशनात शिक्कामोर्तब व्हायचे होते. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर राष्ट्रीय सभेचे अधिवेशन मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाले.



मौलाना आझाद

८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी या अधिवेशनात मांडलेला 'छोडो भारत' ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला. ब्रिटिशांनी तत्काळ भारत सोडावा अशी मागणी करण्यात आली. तसेच गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी अहिंसक आंदोलन सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला. गांधीजी म्हणाले, ''हे आंदोलन केवळ राष्ट्रीय सभेचे नसून सर्व भारतीयांचे आहे. प्रत्येक स्त्री-पुरूषाने या क्षणापासून आपण स्वतंत्र आहोत असे समजावे आणि लढ्यासाठी सिद्ध व्हावे.'' हा निकराचा लढा आहे हे सांगताना गांधीजी पुढे म्हणाले, ''आज मी तुम्हांला एक मंत्र देणार आहे. तो म्हणजे 'करेंगे या मरेंगे', ही आपली प्रतिज्ञा असली पाहिजे. या प्रतिज्ञेसाठी बलिदानाची तयारी ठेवा.'' गांधीजींच्या या शब्दांनी देशात नवे चैतन्य निर्माण झाले.



पंडित जवाहरलाल नेहरू

**तुम्हांला माहीत करून घ्यायला आवडेल :**

**१९४२ च्या भारत छोडो आंदोलनातील प्रमुख नेते इंग्रजांची दिशाभूल करण्यासाठी खालील टोपण नावांनी वावरत होते.**

सुचेता कृपलानी - दादी, बहेनजी
अच्युतराव पटवर्धन - कुसुम
राम मनोहर लोहिया - डॉक्टर
सादीक अली - सुशिला, सत्या
बाबा राघवदास - दीदी
अरूणा असफअली - कदम
एस.एम.जोशी - इमामअली

आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ते चिरडून टाकण्याचा सरकारने प्रयत्न केला. ९ ऑगस्टचा दिवस उजाडण्यापूर्वीच गांधीजी, मौलाना आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल इत्यादी प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. सरकारने सभा, भाषणे, मोर्चे, निदर्शने यांवर बंदी घातली. राष्ट्रीय सभेची देशभरातील सर्व कार्यालये ताब्यात घेतली. महाराष्ट्रातील चिमूर, आष्टी, यावली, महाड, गारगोटी इत्यादी अनेक गावांतून आबालवृद्धांनी नेटाने आणि असीम धैर्याने दिलेले लढे अविस्मरणीय ठरले.

१९४२ सालच्या अखेरीस या जनआंदोलनाला नवे वळण लागले. आंदोलनाचे नेतृत्व भूमिगत झालेल्या तरूण समाजवादी कार्यकर्त्यांकडे आले. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे इत्यादी नेते या कार्यात अग्रेसर होते.

देशात अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर क्रांतिकारी गट स्थापन झाले. कर्जत तालुक्यात भाई कोतवाल यांचा 'आझाद दस्ता', नागपूरच्या जनरल

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याची अमेरिका-सिंगापूर येथे दखल.

**अमेरिका** – दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेतील 'लाईफ' या साप्ताहिकाने भारताला तात्काळ स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी केली. ''भारतीय स्वातंत्र्य हा केवळ भारताचा प्रश्न नाही. तो मानवी स्वातंत्र्याचा प्रश्न आहे.'' असे निवेदन अल्बर्ट आईनस्टाईन, लुई फिशर, एडगर स्नो, वेन्डेल विल्की, जॉन गुंटार, पर्ल बक इत्यादींनी स्वतःच्या स्वाक्षरीनिशी काढले.

**सिंगापूर** – ''भारतीय स्वातंत्र्य आताच, आता नाही तर कधीच नाही'', ''भारत भारतवासीयांचा'' अशा घोषणांचे फलक घेऊन शोनान (सिंगापूर) मध्ये हजारो भारतीयांनी एक विशाल मिरवणूक काढली.

इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या नेतृत्वाखाली मलायातील सर्व मोठ्या शहरात ब्रिटिशविरोधी निदर्शने झाली. मेदान व सुमात्रामध्येही (इंडोनेशिया) भव्य निदर्शने झाली.

आवारी यांची 'लालसेना' इत्यादी गटांनी कित्येक महिने सरकारला त्राही भगवान करून सोडले. मुंबईला विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता व त्यांच्या साथीदारांनी 'आझाद रेडिओ' हे एक प्रक्षेपण केंद्र स्थापन केले.


क्रांतिसिंह नाना पाटील

१९४२ मध्ये देशाच्या काही भागात ब्रिटिश शासन यंत्रणा उलथून पाडण्यात लोकांना यश आले. बंगाल मधील मिदनापूर जिल्ह्यात, उत्तर प्रदेशातील बलिया व आझमगडच्या भागात, बिहारमधील भागलपूर व पूर्णिया जिल्ह्यांत लोकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आणि तेथील राज्यकारभार आपल्या हाती घेतला.

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात 'प्रतिसरकार' १९४२ मध्ये स्थापन केले. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी तेथील ब्रिटिश शासन संपुष्टात आणले आणि जनतेचे सरकार स्थापन केले. कर गोळा करणे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे, खटल्यांचा निकाल देणे, गुन्हेगारांना शिक्षा करणे इत्यादी कामे या सरकारतर्फे केली जात.

**इतिहासाचे साधन – मौखिक साधने**

१९४२ नंतरच्या काळात बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. या काळात बंगालमध्ये क्रांतिकारकांनी राष्ट्रीय सरकार उभारले. या सरकारच्या नेत्यांनी आपल्या अनुयायांसमोर एक आदर्श घालून दिला. अजय मुखर्जी (जे स्वातंत्र्योत्तर भारतात पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री झाले) यांनी 'छोडो भारत' या ग्रंथाचे कर्ते श्रीपाद केळकर यांना एक मुलाखत दिली. या मुलाखतीमधून आपणास राष्ट्रीय नेत्यांचे धीरोदात्त वर्तन, दुष्काळाची तीव्रता आणि त्यासंबंधीचे मौखिक पुरावे इतिहास समजून घेण्यासाठी किती महत्त्वाचे आहेत हे समजते. मुलाखतीतील त्यांचे पुढील वाक्य महत्त्वाचे आहे, ''दुष्काळाच्या काळात सतत नऊ महिने आम्ही सबंध दिवसात फक्त तीन छटाक भात व थोडीशी डाळ खाऊन काढले.''

१ शेर = ०.९३३१०५ किलो
१६ छटाक = १ शेर
४ छटाक = पावशेर

याप्रमाणे ३ छटाक म्हणजे पावशेराहून थोडे कमी.

या काळात भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला. 'छोडो भारत' आंदोलनातून भारतीय जनतेचा प्रखर ब्रिटिश विरोध व्यक्त झाला. या सर्व घटनांमुळे यापुढे फार काळ भारतात आपली सत्ता टिकवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली. ब्रिटिश साम्राज्याचा शेवट त्यांना डोळ्यांपुढे दिसू लागला. त्यात फेब्रुवारी १९४६ मध्ये मुंबई येथे झालेल्या नाविकांच्या उठावाने भर पडली.

भारतीय स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात असताना बॅरिस्टर महमंद अली जिना आणि त्यांच्या मुस्लीम लीग या पक्षाने स्वतंत्र राष्ट्राचा आग्रह धरला. देशभर अनेक

ठिकाणी धार्मिक दंगली उसळल्या त्याचे पर्यवसान भारताच्या फाळणीत होऊन ऑगस्ट १९४७ मध्ये भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली.

**करून पहा.**

तुमच्या परिसरातील क्रांतिकारक, स्वातंत्र्ययोद्धे यांची माहिती संग्रहित करून त्यावर आधारित चित्रांचे सादरीकरण करा.

इतिहास असे सांगतो की, भारतीयांनी वसाहतवादाविरुद्ध लढण्याचा आदर्श जगासमोर ठेवला. त्यातून पारतंत्र्यातील अनेक देशांना स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा मिळाली.

स्वतंत्र भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे 'भारताच्या संविधानाचे शिल्पकार' आहेत. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध लढताना स्वातंत्र्य, समता, बंधुता व लोकशाही या मूल्यांवरील निष्ठा भारतीयांनी उराशी बाळगल्या होत्या. ही मूल्ये भारतीय संविधानाचा पाया आहेत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. हंसाजी नाईक यांचे स्वतंत्र राज्य ........ जिल्ह्यात होते.
(अ) सातारा (ब) नांदेड
(क) पुणे (ड) नागपूर

२. बिहारमधील ब्रिटिश मळेमालक तेथील शेतकऱ्यांवर ........ लागवडीची सक्ती करत.
(अ) निळीच्या (ब) चहाच्या
(क) कॉफीच्या (ड) उसाच्या

३. भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ........ होते.
(अ) द्वारकानाथ टागोर
(ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी
(क) दादाभाई नौरोजी
(ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | कुवरसिंह | – | लखनौ |
| २. | नानासाहेब पेशवे | – | कानपूर |
| ३. | राणी लक्ष्मीबाई | – | झाशी |
| ४. | चिमासाहेब | – | कोल्हापूर |

**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. १९४२ मध्ये महाराष्ट्रात स्थापन झालेल्या प्रतिसरकारचे कार्यक्षेत्र —
२. १९४३ मध्ये आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांकडून जिंकून घेतलेली भारतीय बेटे —

**प्र.३ टीपा लिहा.**

१. जहाल विचारसरणी
२. आझाद हिंद सेना
३. प्रतिसरकार

**प्र.४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. १८२२ च्या अखेरीस लेफ्टनंट औट्रॅम भिल्लांचा उठाव मोडून काढण्यात यशस्वी झाला.
२. रवींद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला.

**प्र.५ तुमचे मत नोंदवा.**

१. वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.
२. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वा.सावकर यांच्या मते पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते.

**उपक्रम**

(अ) द रायझिंग-बॅलॅड ऑफ मंगल पांडे (ब) द लिजंड ऑफ भगतसिंग (क) खेले हम जी जान से हे हिंदी चित्रपट पाहून त्यांतील घटनांची सत्यता पडताळून पहा.

# ७. भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण

७.१ निर्वसाहतीकरण ते एकीकरण
७.२ दादरा व नगर-हवेली
७.३ गोवा
७.४ पुदुच्चेरी

वसाहतवाद्यांचे वसाहतींवरील वर्चस्व संपुष्टात येणे आणि त्यांनी वसाहतींमधील स्थानिक लोकांच्या हाती सत्ता सुपूर्द करणे म्हणजे 'निर्वसाहतीकरण' होय. वसाहतवादाला विरोध, स्वातंत्र्यलढा आणि वसाहतींना मिळालेले स्वातंत्र्य हे निर्वसाहतीकरणाचे तीन टप्पे आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र त्यावेळी भारतामध्ये अनेक छोटी छोटी संस्थाने अस्तित्वात होती. भारतात सामील होणे किंवा न होणे हे ठरवण्याचा अधिकार या संस्थानांना देण्यात आला होता. संस्थानांनी भारतात सामील न होण्याचा निर्णय घेतला असता तर भारताचे एकीकरण करणे अवघड होते. परंतु भारताचे पहिले उपप्रधानमंत्री आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नांतून संस्थाने भारतामध्ये विलीन होण्यास तयार झाल्यामुळे देशाचे एकत्रीकरण होणे शक्य झाले. या पाठात आपण याविषयी माहिती घेणार आहोत.

## ७.१ निर्वसाहतीकरण ते एकीकरण

भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतात सहाशेपेक्षा अधिक लहान-मोठी संस्थाने होती. स्वतंत्र भारतापुढील हा मोठा प्रश्न होता. असहकार आंदोलनाच्या प्रभावामुळे संस्थानांमध्ये राजकीय जागृतीला सुरुवात झाली. संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांनी अतिशय मुत्सद्दीपणे मार्ग काढला. त्यांनी संस्थानिकांना विश्वासात घेऊन सर्वांना मान्य होईल असा 'सामीलनामा' तयार केला. जुनागढ, हैदराबाद व काश्मीर या संस्थानांचा अपवाद वगळता इतर संस्थानांकडून या सामीलनाम्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि सर्व संस्थाने भारतात विलीन झाली. सरदार वल्लभभाई पटेल यांनी कणखर भूमिका घेऊन जुनागढ, हैदराबाद आणि काश्मीर या तीन संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडवला.


सरदार वल्लभभाई पटेल

**जुनागढ :** हे गुजरातमधील सौराष्ट्र भागातील एक संस्थान होते. तेथील प्रजा भारताच्या बाजूने तर जुनागढचा नवाब पाकिस्तानच्या बाजूने होता. जनतेने नवाबाच्या या निर्णयाला विरोध केला. नवाब पाकिस्तानात पळून गेला. फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले.

**हैदराबाद मुक्तिसंग्राम :** हैदराबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. त्यामध्ये तेलुगु, कन्नड, मराठी भाषक प्रदेश होते. तेथील सत्ताधीश निजामाने प्रजेच्या नागरी व राजकीय हक्कांचा संकोच केला. आपले हक्क मिळवण्यासाठी संस्थानातील जनतेने तेलंगण भागात आंध्र परिषद, मराठवाडा भागात 'महाराष्ट्र परिषद' व कर्नाटक भागात 'कर्नाटक परिषद' या संस्था स्थापन केल्या. संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी समर्थपणे केले. त्यांना संस्थानातील तिन्ही विभागातील निष्ठावान कार्यकर्त्यांनी मोलाची साथ दिली. स्वामींनी स्थापन केलेल्या हैदराबाद स्टेट काँग्रेसने संस्थानातील विलिनीकरणाच्या लढ्याला चालना दिली आणि लढा तीव्र केला.


स्वामी रामानंद तीर्थ

हैदराबाद स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे असा ठराव केला. निजामाने स्वतःचे वर्चस्व गमावण्याच्या भीतीने ठरावास विरोध केला. त्याचा कल पाकिस्तानकडे होता. प्रजा भारताच्या बाजूने तर निजाम प्रजेच्या विरोधात अशी परिस्थिती उद्भवली. प्रजेला धडा शिकवण्यासाठी निजामाचा हस्तक कासीम रझवी याने निजामाच्या पाठिंब्याने 'रझाकार' नावाची

संघटना स्थापन केली. कासीम रझवी व त्याची रझाकार संघटना यांनी लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या प्रजेवर अत्याचार केले. निजाम आपल्या भूमिकेवर अडून राहिला. सामोपचाराचे धोरण फेटाळून चर्चेचे दरवाजे बंद केले. अखेरीस भारत सरकारने निजामाविरुद्ध पोलीस कारवाई (ऑपरेशन पोलो) सुरू केली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

**हे करून पहा.**

आंतरजालाच्या मदतीने हैदराबाद मुक्तिसंग्रामातील वृत्तपत्रांची माहिती मिळवा.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**हैदराबाद मुक्तिसंग्रामातील मराठवाड्याचे योगदान :** या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, दिगंबरराव बिंदू, आ.कृ.वाघमारे, अनंतराव भालेराव, फुलचंद गांधी, माणिकचंद पहाडे, देवीसिंग चौहान, आशाताई वाघमारे, दगडाबाई शेळके इत्यादींचा सक्रिय सहभाग होता. तसेच या लढ्यात वेदप्रकाश, श्यामलाल, गोविंद पानसरे, श्रीधर वर्तक, बहिर्जी शिंदे, जनार्दन मामा इत्यादींनी हौतात्म्य पत्करले. हैदराबादच्या मुक्तिलढ्यात मराठवाड्यातील नेत्यांचा व जनतेचा सिंहाचा वाटा होता. १७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा दिवस मराठवाड्यात 'मराठवाडा मुक्तिदिन' म्हणून साजरा केला जातो.

**काश्मीरची समस्या :** भारत स्वतंत्र झाल्यावर भारत आणि पाकिस्तान यांपैकी कोणत्याही एका देशात सामील न होण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरचा राजा हरिसिंग याने घेतला होता. काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. यासाठी पाकिस्तान हरिसिंगावर दडपण आणू लागले. २२ ऑक्टोबर १९४७ रोजी या संस्थानावर पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांनी आक्रमण केले. दोन्ही देशांपासून आपले स्वतंत्र अस्तित्व राखू इच्छिणाऱ्या राजा हरिसिंगने काश्मीरच्या संरक्षणासाठी भारताकडे लष्करी सहकार्य मागितले. २७ ऑक्टोबर १९४७ रोजी राजा हरिसिंगने आपले संस्थान भारतात विलीन करण्यास परवानगी दिली. भारत सरकारकडे आपला सामीलनामा सुपूर्द केला. अशा प्रकारे काश्मीर भारतात विलीन झाल्यानंतर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी गेले. लष्कराने काश्मीरचा मोठा भाग घुसखोरांच्या हातून परत मिळवला. काही भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. जानेवारी १९४८ मध्ये भारताने काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेला. दोन देशांमधील काश्मीरच्या या वादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. काश्मीरमधून पाकिस्तानी सैन्य काढून घेणे राष्ट्रसंघाला देखील शक्य झाले नाही. परंतु प्रौढमताधिकाराच्या आधारे तत्कालीन नॅशनल कॉन्फरन्स पक्षाच्या सरकारने घटनासभेसाठी मतदान घेतले. घटनासभेने भारतात विलीन होण्यावर शिक्कामोर्तब केले. जम्मू-काश्मीरची घटना अमलात आली व तेव्हापासून जम्मू-काश्मीर हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० अन्वये काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा प्रदान करण्यात आला होता.

## ७.२ दादरा व नगर-हवेली

गुजरातच्या समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर असलेल्या आणि दमणगंगा नदीच्या उत्तरेकडील किनाऱ्यावर वसलेल्या दादरा व नगर-हवेली या प्रदेशांवर पोर्तुगिजांची सत्ता होती. या भागावर त्यांनी गव्हर्नरची नेमणूक केली होती. १५ ऑगस्ट १९४७ नंतर हा भाग पोर्तुगिजांनी भारताच्या ताब्यात देऊन निघून जाणे अपेक्षित होते. परंतु पोर्तुगीज गेले नाहीत. स्थानिक जनता पोर्तुगिजांच्या विरुद्ध सक्रीय झाली. 'युनायटेड फ्रंट ऑफ गोवन्स', 'आझाद गोमंतक दल' यांनी परस्पर सहकार्य करून हा भाग पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त करण्याची मोहीम आखली. १९५४ मध्ये फ्रान्सिस मस्कारन्हीस, विमल सरदेसाई या आझाद गोमंतकच्या नेत्यांनी चळवळ तीव्र केली. कार्यकर्त्यांनी प्रखर आंदोलनाच्या माध्यमातून नगर-हवेलीचा भाग घेतला. युनायटेड फ्रंट ऑफ गोवन्स संघटनेने दादरा भागावर नियंत्रण मिळवले. आझाद गोमंतक परिषदेच्या 'राष्ट्रवादी

मुक्ती सेनेने' नरोली, पिंपरिया, सिल्व्हासाचा भाग ताब्यात घेतला. स्थानिक पोलीस ठाणी आणि प्रशासकीय कार्यालयांवर हल्ले चढवले. जनतेचा प्रक्षोभ लक्षात घेऊन पोर्तुगीज सैन्याने माघार घेतली. पोर्तुगीज कॅप्टन फिडाल्गो याने शरणागती पत्करली. केंद्र सरकारने के.जी. बदलानी या अधिकाऱ्यास त्या भागात प्रशासन सुरळीत करण्यासाठी पाठवले. त्यांनी भारत सरकारशी केलेल्या करारानुसार दादरा व नगर हवेलीचा भाग कायदेशीररित्या २ ऑगस्ट १९५४ रोजी भारताकडे हस्तांतरीत झाला. या लढ्यात विश्वनाथ लवंदे, राजाभाऊ वाकणकर, सुधीर फडके, नानासाहेब काजरेकर, निळूभाऊ लिमये, वसंत झांजले इत्यादींनी भाग घेतला होता. यानंतर १९६१ मध्ये या भागाला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला.

### ७.३ गोवा

गोव्यातील पोर्तुगीज सत्ता झुगारून देण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच प्रयत्न सुरू झाले होते. १९२८ मध्ये मुंबईत गोवा काँग्रेस कमिटीची स्थापना झाली. डॉ.टी.बी.कुन्हा गोवा काँग्रेस कमिटीचे प्रमुख होते. १९२९ मध्ये गोवा काँग्रेस भारतीय राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत असलेली एक शाखा झाली.



डॉ.टी.बी.कुन्हा

१९३९ मध्ये 'छोडो गोवा' अशी पत्रके संपूर्ण गोव्यात लावण्यात आली आणि संयुक्त आघाडीचे अध्यक्ष फ्रान्सिस मस्कारन्हीस यांनी भारतीय राष्ट्रध्वज फडकावला. १९४६ मध्ये डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचे आंदोलन झाले. लोहियांना पोर्तुगीज सरकारने पकडून हद्दपार केले. मडगाव येथील सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल डॉ.टी.बी.कुन्हा, पुरूषोत्तम काकोडकर, डॉ.राम हेगडे, डॉ.पी.पी. शिरोडकर, गोपाळ मयेकर यांना अटक झाली. डॉ.कुन्हा यांना आठ वर्षे तुरूंगवासाची शिक्षा ठोठावली गेली. त्यांना पोर्तुगालमधील तुरूंगात ठेवण्यात आले. पुढे त्यांना भारतात आणल्यावर त्यांनी 'आझाद गोवा' आणि 'स्वतंत्र गोवा' अशी वृत्तपत्रे सुरू केली.



सेनापती बापट

भारत स्वतंत्र झाल्यावर गोवा मुक्तीलढा महाराष्ट्रातील चळवळीचा एक भाग बनला. १९५४ मध्ये पुण्यात गोवा विमोचन सहायक समितीची स्थापना झाली. केशवराव जेधे, ना. ग. गोरे, जयंतराव टिळक यांनी या समितीचे नेतृत्व स्वीकारले. नानासाहेब गोरे आणि सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही गोव्यात गेले. त्यांच्यातील एका पथकाने पणजीच्या किल्ल्यावर भारताचा तिरंगा ध्वज फडकवला. आचार्य प्र.के.अत्रे यांनी आपल्या 'मराठा' या दैनिकातून लढ्यास बळ दिले.

पंडित महादेवशास्त्री जोशी, शिरूभाऊ लिमये, पीटर अल्वारिस, सुधा जोशी इत्यादी कार्यकर्ते लढ्यात सामील झाले. या लढ्यात मोहन रानडे यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी पोर्तुगीज सत्तेविरुद्ध पद्धतशीर प्रचार सुरू केला. त्यांनी आझाद गोमंतक दलाच्या सहकार्याने सशस्त्र हालचाली सुरू केल्या. त्यांनी पोलीस स्टेशनवर हल्ला केला असता पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ते जखमी झाले. पोर्तुगीज सरकारने त्यांना १९७२ पर्यंत तुरूंगात ठेवले.

**हे करून पहा.**

पणजीच्या किल्ल्याची माहिती मिळवा व त्या माहितीच्या आधारे भित्तिपत्रक तयार करा.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकभावनेची दखल घेऊन लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. 'ऑपरेशन विजय' या सांकेतिक नावाने भारतीय सैन्य गोव्यात उतरले. स्थानिक जनतेनेही सैन्याला मदत केली. पोर्तुगिजांनी पेरलेल्या भू-सुरूंगांबद्दल त्यांनी सैन्याला माहिती दिली. ४८ तासांच्या आत पोर्तुगीज शरण आले. १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा भारतीय संघराज्यात सामील झाले. गोव्याचे साडेचारशे वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.




## ७.४ पुदुच्चेरी (पाँडिचेरी)

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी पुदुच्चेरीचा भाग फ्रेंचांच्या ताब्यात होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांना घालवून दिल्यास पोर्तुगीज आणि फ्रेंच स्वत:हून निघून जातील असे भारतीयांना वाटत होते. पुदुच्चेरी, कारिकल, माहे आणि यानम हे एकमेकांशी निगडीत नसणारे प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील चंद्रनगरचा प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यात होता. फ्रान्स सरकार आपल्या ताब्यातील प्रदेश सोडायला तयार नव्हते. पुदुच्चेरी येथील कामगार नेते व्ही. सुबय्या यांच्या नेतृत्वाखाली लोक संघटीत झाले. त्याची दखल घेऊन भारत सरकारने फ्रान्स सरकारकडे पुदुच्चेरी भारताला परत करण्याची आग्रही मागणी केली. जून १९४८ मध्ये दोन्ही सरकारांमध्ये करार होऊन पुदुच्चेरीच्या विलिनीकरणाचा निर्णय घेण्यात आला. वाटाघाटी, आंदोलन आणि प्रत्यक्ष कारवाई या मार्गाने पुदुच्चेरीचा प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली.

सन १९४९-५० मध्ये सार्वमतादवारे चंद्रनगर भारतात विलीन झाले.

पुढे १३ ऑक्टोबर १९५४ रोजी फ्रान्स आणि भारत या उभय सरकारांमध्ये विलीनीकरणाची प्रक्रिया निश्चित झाली. विधिमंडळ आणि नगरपालिकांमध्ये विलीनीकरणाच्या बाजूने मतदान झाले. १ नोव्हेंबर १९५४ रोजी भारताला या सगळ्या फ्रेंच वसाहतींचा ताबा मिळाला. १९६२ मध्ये या कराराला फ्रान्सच्या संसदेने मान्यता दिली. १९६३ मध्ये पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश झाला.

प्रधानमंत्री पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने भारतातील संस्थानांचे प्रदेश भारतीय संघराज्याचे घटक बनले आणि भारताच्या एकीकरणाची प्रक्रियाही पूर्ण झाली.

पुढील पाठात आपण जागतिक महायुद्धे आणि भारत याविषयी माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. गोवा येथे इ.स.१९४६ मध्ये ............ यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचे आंदोलन झाले.
(अ) डॉ.राम मनोहर लोहिया
(ब) डॉ.टी.बी.कुन्हा
(क) डॉ.पी.पी.शिरोडकर (ड) डॉ.राम हेगडे

२. हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व ............ यांनी समर्थपणे केले.
(अ) राजा हरिसिंग
(ब) स्वामी रामानंद तीर्थ
(क) पंडित महादेवशास्त्री जोशी
(ड) केशवराव जेधे

३. भारतामध्ये ............ यांच्या प्रयत्नातून अनेक संस्थाने विलीन झाली.
(अ) जयंतराव टिळक
(ब) सरदार वल्लभभाई पटेल
(क) पंडित जवाहरलाल नेहरू
(ड) डॉ.टी.बी.कुन्हा

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | हैदराबाद संस्थानचे विलिनीकरण | – स्वामी रामानंद तीर्थ |
| २. | काश्मीर संस्थानचे विलिनीकरण | – शेख अब्दुल्ला |
| ३. | गोवा मुक्तिलढ्यातील मोलाचे योगदान | – मोहन रानडे |
| ४. | पुदुच्चेरी येथील कामगार नेते | – व्ही.सुबय्या |


**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात विलीन न झालेले सौराष्ट्रातील संस्थान –
२. गोवा काँग्रेस कमिटीचे प्रमुख –

**प्र.३ पृष्ठ क्र.५६ वरील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारताच्या वायव्य दिशेकडील राष्ट्र कोणते ?
२. भारतातील पोर्तुगिजांचे सत्ताकेंद्र कोणते ?
३. पूर्व किनारपट्टीवरील फ्रेंचांची सत्ताकेंद्रे कोणती ?
४. भारताच्या दक्षिणेस कोणते राष्ट्र कोणते ?

**प्र.४ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.५ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.
२. पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला.

**प्र.६ तुमचे मत नोंदवा.**

१. हैदराबाद संस्थानात आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र परिषदांची स्थापना झाली.
२. इ.स.१९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली.

**उपक्रम**

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील एक महत्वपूर्ण घटना 'गोर्टा हत्याकांड' याविषयी माहिती मिळवण्यासाठी या संकेतस्थळाला भेट द्या – www.bhausahebumate.com

# ८. जागतिक महायुद्धे आणि भारत


८.१ पहिले महायुद्ध (इ.स.१९१४ ते १९१८)
८.२ दुसरे महायुद्ध (इ.स.१९३९ ते १९४५)
८.३ महायुद्धे आणि भारत
   ८.३.१ पहिले महायुद्ध आणि भारत
   ८.३.२ दुसरे महायुद्ध आणि भारत
८.४ महायुद्धाचे भारतावरील परिणाम


विसाव्या शतकात दोन महायुद्धे झाली. ही दोन महायुद्धे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील सर्वात महत्त्वाच्या घटना होत्या. यामुळे जग बदलले. त्याचा भारतावर काय परिणाम झाला, याची माहिती या पाठात आपण घेणार आहोत.

## ८.१ पहिले महायुद्ध (इ.स.१९१४ ते १९१८)

१९१४ मध्ये पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले. साम्राज्य वाढवू इच्छिणाऱ्या युरोपीय राष्ट्रांमधील स्पर्धा हे या युद्धाचे मुख्य कारण होते.

**पहिल्या महायुद्धाची कारणे :** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्षेत्रांत नवनवे शोध लागत होते. उत्पादनासाठी यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात होता. त्यासाठी कच्च्या मालाचा पुरवठा आवश्यक होता. कारखान्यात तयार झालेला पक्का माल विकण्यासाठी बाजारपेठा मिळवणे क्रमप्राप्त होते. साम्राज्यवादी राष्ट्रांना या दोन्ही गरजा भागवण्यासाठी नवनवे प्रदेश काबीज करण्याची गरज भासू लागली. त्यामुळे पुष्कळ वेळा युरोपातील देशांमध्ये युद्धाचा प्रसंग येई. त्यासाठी युरोपातील बड्या राष्ट्रांना सैन्यबळ व शस्त्रबळ एकसारखे वाढवत राहावे लागे.

इंग्लंड, फ्रान्स, रशिया, पोर्तुगाल, हॉलंड, बेल्जियम, स्पेन इत्यादी राष्ट्रांनी आफ्रिका व आशिया खंडात साम्राज्यविस्तार केला होता. प्रथम महायुद्धपूर्व युरोपमध्ये इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, रशिया, फ्रान्स आणि इटली ही राष्ट्रे प्रमुख होती. या राष्ट्रांचे परस्परविरोधी गट निर्माण झाले. प्रत्येक राष्ट्र आपले सैन्यबळ, नाविक दळ वाढवू लागले; संहारक शस्त्रास्त्रे बनवण्यावर भर देऊ लागले. यामुळे युरोपात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

**पहिल्या महायुद्धाचे तात्कालिक कारण :** ऑस्ट्रियन राजपुत्र आर्च ड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड आणि त्याची पत्नी यांचा सर्बियात एका सर्बियन माथेफिरूने खून केला. या प्रकरणात सर्बियाचा हात असावा, अशी ऑस्ट्रियाची खात्री होती. त्यामुळे ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. तेव्हा रशिया सर्बियाच्या मदतीला धावून गेला. या दोन लढाऊ राष्ट्रांची बाजू युरोपातील अनेक बड्या राष्ट्रांनी घेतली. ऑस्ट्रिया, हंगेरी यांनी सर्बियाविरुद्ध दडपशाही आरंभली. जर्मनीने ऑस्ट्रियाची बाजू घेतली. बेल्जियम हा देश तटस्थ होता. तरीही जर्मनीने बेल्जियमवर हल्ला करून तो देश आपल्या वर्चस्वाखाली आणला. इंग्लंडने बेल्जियमला पाठिंबा दिला. इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया ही अक्ष राष्ट्रे एका बाजूस आणि इंग्लंड, फ्रान्स, रशिया ही दोस्त राष्ट्रे दुसऱ्या बाजूस, असे दोन गट पडले. पुढे इटली दोस्त राष्ट्रांच्या गटात सामील झाला. महायुद्धाच्या अखेरच्या काळात अमेरिका युद्धात सहभागी झाली.

१९१६ मध्ये उत्तर समुद्रातील जेटलंड येथे जर्मनी आणि इंग्लंड यांच्यात नाविक युद्ध होऊन त्यात जर्मन आरमाराचा पूर्ण पराभव झाला. १९१८ मध्ये व्हर्सायचा तह होऊन युद्ध संपले.

**राष्ट्रसंघाची स्थापना :** पहिल्या महायुद्धासारखे युद्ध पुन्हा होऊ नये, त्यासाठी उपाययोजना करायला हवी असे सर्व राष्ट्रांना वाटू लागले. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन हे शांतताप्रेमी आणि ध्येयवादी होते. सर्व प्रमुख राष्ट्रांची मिळून एक संघटना असावी. राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद सामोपचाराने मिटवले जावेत, जगात शांतता प्रस्थापित व्हावी अशी त्यांची भूमिका होती. या हेतूने 'राष्ट्रसंघ' ही संस्था स्थापन करण्यात आली. महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादी राष्ट्रांना या संघटनेत सभासद होण्यास

मज्जाव करण्यात आला. अमेरिकेने राष्ट्रसंघ ही संकल्पना मांडली. मात्र अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व घेतले नाही. राष्ट्रसंघात इंग्लंड आणि फ्रान्स या देशांचेच वर्चस्व राहिले.

### ८.२ दुसरे महायुद्ध (इ.स.१९३९ ते १९४५)

पहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध अधिक संहारक ठरले. पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत ते अधिक व्यापक तर होतेच; परंतु या युद्धात अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला.

**महायुद्धाची कारणे :** राष्ट्रसंघाला राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद मिटवण्यात यश मिळाले नाही. हिटलरच्या नाझी पक्षाने जर्मनीमध्ये सत्ता हस्तगत केली. व्हर्सायच्या तहात जर्मनीवर लादलेल्या अपमानकारक अटी झुगारून जर्मनीला पुन्हा सामर्थ्यशाली करण्यासाठी हिटलरने जोरदार लष्करी तयारी सुरू केली. मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ, आरमार आणि वायुदल वाढवण्यावर भर दिला. सोव्हिएट रशिया हे नवे साम्यवादी राष्ट्र बलिष्ठ होत होते. त्यामुळे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इत्यादी देश अस्वस्थ झाले होते. सोव्हिएट रशिया साम्राज्यवादी जर्मनीचा मोठा शत्रू होता. सोव्हिएट रशिया बलिष्ठ होऊ नये म्हणून जर्मनीच्या आक्रमक धोरणाकडे इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी दुर्लक्ष केले. सन १९३८ मध्ये हिटलरने चेकोस्लाव्हाकियाकडून बहुसंख्यांक जर्मन वस्ती असलेला सुडेटन प्रांत व इतर मुलुख मिळवला. हिटलरने १९३९ मध्ये पोलंडवर हल्ला केला. वास्तविक पोलंड हे सर्व राष्ट्रांनी मान्य केलेले एक तटस्थ राष्ट्र होते. पण पोलंडचा तटस्थपणा झुगारून हिटलरने पोलंडवर आक्रमण करून ते जिंकले. त्यामुळे इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

जर्मनी युरोपचे लचके तोडू लागला. युद्धाच्या आरंभी जर्मनीने पोलंड जिंकले होते. डेन्मार्क जर्मनीला शरण आले. नॉर्वेने जर्मनीसमोर पांढरे निशाण उभारले. अल्पावधीतच हॉलंड आणि बेल्जियम जिंकून जर्मन फौजांनी पॅरिसच्या रोखाने दौड मारली. फ्रान्सची अभेद्य तटबंदी फोडून जर्मनीने पॅरिसवर हल्ला केला. जर्मनीने फ्रान्स जिंकून घेतला. जर्मनीने इ.स.१९४० मध्ये इंग्लंडवर हल्ला केला व डंकर्क येथे असलेल्या ब्रिटिश फौजांवर जोरदार हल्ला चढवला. इंग्लंडने मोठ्या कुशलतेने १९४० च्या मे महिन्यात डंकर्कहून आपले अडीच लाख सैनिक हलवले. जगाच्या इतिहासातील ही फार मोठी लष्करी हालचाल होती. या काळात इंग्लंडचे प्रधानमंत्री नेव्हिल चेंबर्लेन यांनी राजीनामा दिल्यावर विन्स्टन चर्चिल यांनी प्रधानमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली.

#### अधिक माहितीसाठी

**फॅसिस्टवाद :** लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य व समता यांच्या विरुद्ध असलेली एक विचारसरणी. फॅसिझम हा शब्द 'फॅसिस' या मूळ लॅटिन शब्दापासून आलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर बेनिटो मुसोलिनी या इटलीमधील नेत्याने १९२२ साली जी चळवळ उभारली तिला त्याने फॅसिझम (Fascism) असे नाव दिले. लोकशाही संस्था आणि प्रक्रियांना विरोध, कृतिप्रधानता, सर्वंकष राज्यवाद, साम्राज्यवाद, सत्तेचे केंद्रीकरण, आक्रमक राष्ट्रवाद, युद्ध आणि हिंसाचाराचे समर्थन अशी फॅसिझमची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील.

**नाझीवाद :** फॅसिझमचे दुसरे रूप म्हणजे नाझीवाद. नाझीवादात वंश श्रेष्ठत्वास महत्त्व दिलेले होते. हिटलरने जर्मनीत ज्यू वंशीयांची हत्या याच भूमिकेतून केली होती. नाझीवाद हा फॅसिझमचा एक अतिरेकी व विकृत प्रकार मानावा लागेल.

१९३९ मध्ये हिटलरने स्टॅलिनबरोबर केलेला अनाक्रमणाचा करार मोडून सोव्हिएट रशियावर हल्ला चढवला. नाझी सैन्य मुसंडी मारत स्टॅलिनग्राडच्या दिशेने आगेकूच करत होते, तर रशियन फौजा माघार घेत होत्या. पण नोव्हेंबर १९४३ मध्ये स्टॅलिनग्राड येथे तीन लक्ष जर्मन नाझी फौज सोव्हिएट रशियाच्या कोंडीत सापडली. मार्शल जॉर्जी झुकॉव्हच्या नेतृत्वाखाली सोव्हिएट रशियाने जर्मन सैनिकांना पराभूत केले. मित्र राष्ट्रांनी बर्लिनचा पाडाव केला. याच सुमारास हिटलरने भूमिगत होऊन आत्महत्या केली. याअगोदर इटलीच्या मुसोलिनीचा पाडाव होऊन त्याचा अंत झाला होता.

उत्तर आफ्रिकेतही जर्मनीचा पराभव होऊन जर्मन सैनिक शरण आले होते.

जपानने जर्मनीच्या बाजूने युद्धात उडी घेतली होती. १९४१ मध्ये जपानने पर्लहार्बरवर बॉम्बहल्ला केला आणि अमेरिकेचा नाविक तळ निकामी केला. यामुळे अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध पुकारले. अशा रीतीने या युद्धाला व्यापक स्वरूप आले. पुढे फिलीपाईन्स, म्यानमार, मलाया, सिंगापूर हे देश जपानने जिंकले. तसेच आसाम, आराकान, इंफाळ या भागापर्यंत जपानने धडक मारली. तेव्हा इंग्लंडने जपानचा प्रतिकार केला. अमेरिकेने जपानच्या ताब्यातून फिलीपाईन्स परत घेतले. जपान शरण येत नाही असे पाहून अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला आणि पुढे नागासाकी या शहरावर दुसरा अणुबॉम्ब टाकला. अखेरीस १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपान शरण आला आणि हे दुसरे महायुद्ध संपले.

## ८.३ महायुद्धे आणि भारत

**८.३.१ पहिले महायुद्ध आणि भारत :** पहिल्या महायुद्धात इंग्लंडने आपली वसाहत असणाऱ्या भारताला त्याची इच्छा असो वा नसो युद्धात सहभागी करून घेतले. भारताने इंग्लंडला पैसे, अन्नधान्य, कापड, युद्धसामग्री तसेच मनुष्यबळ या रूपात मदत केली. १९१९-२० अखेरपर्यंत हिंदुस्थानमधील ब्रिटिश सरकारने सुमारे १९ अब्ज रूपये युद्धासाठी मदत केली.

| इंग्लंडने भारतातून पाठवलेले सैनिक | |
|---|---|
| **प्रदेश** | **भारतीय अधिकारी व सैनिक** |
| फ्रान्स | १,३८,६०८ |
| पूर्व आफ्रिका | ४७,७०४ |
| मेसोपोटेमिया | ६,७५,३९१ |
| इजिप्त | १,४४,०२६ |
| गॅलिपोली | ४,९५० |
| सालोनिका | ९,९३१ |
| एडन | २६,२०५ |
| इराणी आखात | ४९,१९८ |
| | **१०,९६,०१३** |



पहिले महायुद्ध - शौर्यस्तंभ, पुणे

पहिल्या महायुद्धात शौर्य गाजवणाऱ्या १७ भारतीय सैनिकांना ‘व्हिक्टोरिया क्रॉस’ हे पदक देण्यात आले. या युद्धात भारताने इंग्लंडला भरीव मदत केली. दारूगोळा, शस्त्रास्त्रे, कापड, तंबू, ताग, छोट्या नौका, इमारती लाकूड, रेल्वे आणि वाहतूक साधने इत्यादी साधनसामग्री भारतातून युरोपात पाठवली. १९१८ च्या अखेरपर्यंत १ अब्ज ४० लक्ष रूपयांची युद्धसामग्री भारतातून ब्रिटिशांनी नेली.

या महायुद्धाचे पडसाद विविध क्षेत्रांवर उमटले. यात लष्करी युद्ध सामग्रीचे उत्पादन, नागरी उद्योगधंदे, व्यापार, आर्थिक धोरणे, सागरी वाहतूक, दळणवळण, शेती व अन्नधान्य उत्पादन, इंधनपुरवठा, संरक्षण व्यवस्था इत्यादी क्षेत्रांचा समावेश आहे. या युद्धामुळे भारताच्या औद्योगिकीकरणास चालना मिळाली. यामुळे झालेले प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बदल लोखंड, पोलाद, कोळसा व खाण उद्योगात दिसून आले. पहिल्या महायुद्धानंतर भारतात मोटार वाहतूक आणि मोटार गाड्यांच्या संख्येत वाढ झाली. युद्धकाळ व युद्धानंतरच्या काळात भारतीय व्यापारात सुमारे ३३ कोटी रूपयांची निर्यातीत घट झाली. शेतीमालाला मंदी आली तर औद्योगिक मालाच्या किंमती वाढल्या. अन्नधान्याची निर्यात इंग्लंड व मित्रराष्ट्रांना करण्यात येऊ

लागल्यामुळे भारतीयांची अन्नधान्याची गरज भागणे अवघड झाले. भारतात अन्नधान्याच्या किंमती वाढू लागल्या.

पहिल्या महायुद्धातील सहभागाचे भारतावर संमिश्र परिणाम झाले. संरक्षणाच्या संदर्भात भारतीय सैनिक आणि भारतीय नेते यांच्या लक्षात काही गोष्टी आल्या. युरोपात लढताना आपली शस्त्रास्त्रे अन्य राष्ट्रांपेक्षा कमी दर्जाची आहेत हे लक्षात आले. विमाने, अप्रगत यांत्रिक साधने व तोफखाना, अपुऱ्या वैद्यकीय सुविधा, सैन्याच्या आधुनिकीकरणाकडे दुर्लक्ष, सैन्याच्या शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाकडे डोळेझाक, युद्धोपयोगी सामग्रीचे राखीव साठे नसणे यांमुळे आपण किती मागे आहोत हे भारतीयांच्या लक्षात आले. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी ब्रिटिश सरकारने एक समिती स्थापन केली. या समितीने लष्करातील सुधारणांच्या संदर्भात सूचना केल्या.

१९१७ मध्ये गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड आणि एडवर्ड सॅम्युअल मॉंटेग्यू (सेक्रेटरी ऑफ स्टेट ऑफ इंडिया) यांनी भारतातील ब्रिटिश प्रशासनात कोणत्या सुधारणा करता येतील त्याचा एक अहवाल तयार केला. या अहवालात नागरी तरतुदींबरोबरच लष्करी सुधारणाही त्यांनी सुचवल्या होत्या. त्यानुसार १९१७ मध्ये गव्हर्नर जनरल आणि व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड आणि सेक्रेटरी स्टेट ऑफ इंडिया एडविन सॅम्युअल मॉंटेग्यू यांनी भारतीयांना पुढील आश्वासने दिली. सैन्यात जात, वंश, धर्म यांचा विचार न करता हिंदी सैनिकांना पदे देण्यात येतील. सैन्यात योग्य प्रमाणात हिंदी सैनिक भरती करण्यात येईल. इंग्लंडमधील सॅंडहर्स्ट अकादमीप्रमाणे हिंदुस्थानात अकादमी स्थापण्यात येईल. या अकादमीत १० जागा हिंदी तरुणांसाठी असतील. इंदौर येथील लष्करी महाविद्यालयातून सैनिकी शिक्षण घेतलेल्यांना 'किंग्ज कमिशन' देण्यात येईल. घोडदळात कपात करण्यात येईल. प्रादेशिक सेना अधिक सुसज्ज करण्यात येईल. त्याप्रमाणे कार्यवाही सुरू करण्यात आली. १९२१ मध्ये हिंदुस्थानात युद्धोपयोगी 'वस्तू व पुरवठा' हे नवे खाते सुरू करण्यात आले. भारतीय वायुसेनेचा पाया विस्तृत करण्यास या महायुद्धाचा उपयोग झाला. हिंदी नौदलाने इराणच्या आखातात स्वतःचे कर्तृत्व दाखवले.

या संदर्भात लोकमान्य टिळकांनी महायुद्धकाळात केसरी या वृत्तपत्रात लेख लिहून व भाषणांमधून वायुसेनेला आणि हिंदुस्थानच्या जागतिक राजकारणातील स्थानाला महत्त्व द्या, हिंदी लोकांना लष्करातील अधिकारपदे देताना भेदभाव करू नका अशी आग्रही मागणी केली. पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश सत्तेला युद्धकार्यात मदत करण्यासंदर्भात टिळकांनी, गांधीजींनी व अन्य नेत्यांनी विधायक दृष्टी दाखवली. पहिल्या महायुद्धात सहभागी होण्याचा फायदा आपल्याला भविष्यात मिळेल, यावर त्यांचा विश्वास होता. यात त्यांची दूरदृष्टी लक्षात येते.

**कॉंग्रेस आणि संरक्षण धोरण :** अखिल भारतीय राष्ट्रीय सभेने स्थापनेपासूनच संरक्षणविषयक अनेक ठराव केले होते. यात पुढील ठरावांचा समावेश होता.

- हिंदी नागरिकांना आत्मरक्षणासाठी व देशरक्षणासाठी शिक्षण व उत्तेजन द्यावे.
- संरक्षणखर्च कमी करावा पण ते अशक्य असल्यास इतर बाबींवरील खर्चात कपात करावी.
- हिंदी तरूणांना प्रादेशिक सैन्यदलात प्रवेश द्यावा.
- राणीच्या जाहीरनाम्यानुसार सैन्यात वरिष्ठ हुद्द्यांच्या जागा हिंदी लोकांना द्याव्यात.
- संरक्षण विद्यालय स्थापन करावे.
- लोकसेना व सेवाभावी दले स्थापन करावीत.
- ब्रिटिशांनी हिंदुस्थानच्या संरक्षण खर्चाचा काही भाग उचलावा.

असे ठराव करून कॉंग्रेसने आपल्या संरक्षणविषयक मागण्यांची दिशा दाखवून दिली. परंतु ब्रिटिश सरकारने वरील ठरावांच्या संदर्भात स्वहितकारी धोरण ठेवले.

इंग्रज साम्राज्यशाहीने सुरू केलेल्या या युद्धात हिंदुस्थानला ओढण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपली कन्या इंदिरा यांना या काळाचे वर्णन करणाऱ्या पत्रात म्हटले आहे,

**पहिले महायुद्ध आणि टिस्को :** पहिल्या महायुद्धाचा आणि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनीचा (टिस्को) जवळचा संबंध आहे. पहिल्या महायुद्धात जमिनीवरच्या युद्धात सैनिकांच्या वेगवान हालचाली, युद्धसामग्रीची हलवाहलव यासाठी रेल्वेशिवाय दुसरा पर्याय नव्हता. युरोपात इंग्लंडला उत्तम रेल्वे रूळांची गरज होती आणि इराकच्या प्रदेशातील लष्करी हालचालींसाठी इंग्रजांना रेल्वे रूळ आवश्यक होते. इंग्रजांची गरज ही कंपनीसाठी संधी ठरली. कंपनीने अहोरात्र कष्ट करून सुमारे १५०० मैल लांबी भरेल एवढे रूळ पुरवले. भारतीय कंपनीला पोलादी रूळ तयार करता येणार नाहीत असेच इंग्लंडमधील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत होते. परंतु भारतीयांनी त्यावर मात केली. पहिले महायुद्ध संपल्यावर जानेवारी १९१९ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड टिस्कोच्या कारखान्यावर आले. चेम्सफोर्ड यांनी भाषणात इजिप्त, पॅलेस्टाईन आणि पूर्व आफ्रिकेत दोस्त राष्ट्रांना जे यश मिळाले त्यात भारताने पुरवलेल्या रेल्वे रूळांना विजयाचे श्रेय दिले. भारतीय लोकांनी मनात आणले तर ते काय करू शकतात याचीच साक्ष व्हाईसरॉयने दिली.

''हे हिंदुस्थानचे युद्ध नव्हते. हिंदुस्थानचे जर्मनीशी भांडण नव्हते आणि तुर्कस्तानशीही नव्हते. हिंदुस्थानला या बाबतीत मतच नव्हते. हिंदुस्थान इंग्लंडची वसाहत होती. मालकिणीच्या पदराला धरून जाणे तिला भागच होते.''

हिंदुस्थानात दारिद्र्य होते. त्यामुळे सैन्य भरतीला अडचण नव्हती. सुमारे अकरा लाख हिंदी सैनिक पहिल्या महायुद्धात लढले. हिंदी सैनिकांनी इंग्लंडची बाजू सावरून धरली. दीडशे कोटी रुपये हिंदुस्थानतर्फे युद्धाला मदत म्हणून इंग्लंडला देण्यात आले.

महायुद्धाच्या काळात भारतातील कित्येक लोक देशांतर करू लागले. कॅनडा, अमेरिकेला जाऊ लागले. कॅनडाचे सरकार हे ब्रिटिश सरकारच्या हातातले बाहुले होते. त्यांनी हिंदी लोकांना थारा देण्याचे नाकारले. बाबा गुरूदितसिंग यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या कामगाटा मारू जहाजाला कॅनडाने आपल्या बंदरात व्हँकुव्हर नांगर टाकू दिला नाही. हे परागंदा झालेले हिंदी लोक परत भारतात आले. 'कामागाटा मारू' हे जहाज कोलकाताच्या जवळच्या 'बजबज' या बंदरात पोहचले. जहाजातील उतारूंनी ताबडतोब आपापल्या गावी जावे असे त्यांना इंग्रज अधिकाऱ्यांनी सांगितले. लोकांनी तो हुकूम मोडला. इंग्रज अधिकाऱ्यांनी गोळीबार केला. त्यात ३० लोक ठार झाले. इंग्रजांच्या या निर्दयीपणामुळे देशात प्रचंड प्रक्षोभ माजला.

जर्मनी हा देश राष्ट्रवादी होता. भारतावरही राष्ट्रवादाचा विलक्षण प्रभाव होता. पण जर्मन राष्ट्रवाद आणि भारतीय राष्ट्रवाद यात मूलतः असलेला फरक लक्षात घेतला पाहिजे. जर्मनी इतरांचे प्रदेश आपल्या घशाखाली घालून आपले राष्ट्र बलिष्ठ व मोठे करण्यासाठी आक्रमण करत होता, तर भारताचा राष्ट्रवाद भारताच्या पायातील गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी झटत होता. आपल्याच देशात नव्हे तर जगभर लोकशाहीचे वर्चस्व व्हावे अशा व्यापक ध्येयावर भारतीय राष्ट्रवाद आधारलेला होता. ॲबिसिनिया, स्पेन, चीन इत्यादी ठिकाणी लोकशाहीचे लढे चालू होते. त्या ठिकाणी भारतीयांच्या वतीने शुश्रुषापथके, स्वयंसेवक, अन्नधान्ये इत्यादी मदत पाठवली गेली. जर्मनीत वंशभेद प्रबळ होता. हिटलरने लाखो ज्यूंची कत्तल केली होती. पण भारतात मात्र प्रथमपासून निरनिराळ्या धर्मांचे, वंशाचे आणि जातीचे लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहत आले आहेत. हे भारतीय राष्ट्रवादाचे वैशिष्ट्य आणि मोठेपण दिसून येते.

**८.३.२ दुसरे महायुद्ध आणि भारत :** १९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध घडून आले. युद्धकाळात भारताने उत्तर आफ्रिका, इजिप्त, इराक, इराण, ग्रीस, म्यानमार व मलाया येथील युद्धात सहभाग घेतला. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर मलाया, इंडोनेशिया आणि चीन येथील पुनर्रचनेच्या कार्यात भारतीय सैन्याने

आपले योगदान दिले. भारतीय वायुसेनेने आसाम आणि म्यानमार येथील लढायांमध्ये भाग घेतला. भारतीय नौसेनेने अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील लढाईत सक्रीय सहभाग नोंदवला. या युद्धात इंग्लंडने विजय मिळवण्यासाठी भारताचे शोषण केले. भारताचा या युद्धाशी काहीही संबंध नसताना त्याला या युद्धात ओढले. भारतीय भूमीचा वापर त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी केला. युरोपातील दोस्त राष्ट्रांसाठी औद्योगिक उत्पादने, कपडे, जीवनोपयोगी सामुग्री पुरवणारी हक्काची वसाहत म्हणून ब्रिटन भारताकडे बघत होता. युद्धसामुग्रीच्या संदर्भात सुरूंग, रणगाडे, जहाज दुरूस्ती, पोलादी नळ, रेल्वेचे रूळ व बांधणी साहित्य, रेल्वेचे डबे, लाकूड, तारायंत्रांचे खांब, छोट्या युद्धनौका व बोटी, अन्नधान्य, कापड, तंबू, बूट, औषधे, स्फोटके, दारूगोळा इत्यादी माल पाठवण्यात येत होता. यासाठी ब्रिटिशांनी अनेक कारखाने भारतात उभारले.

**अधिक माहितीसाठी :** दुसऱ्या महायुद्धात ज्या हिंदी सैनिक आणि अधिकाऱ्यांनी विलक्षण शौर्य गाजवले त्यांना त्या काळातील शौर्याचे सर्वोच्च पदक (व्हिक्टोरिया क्रॉस) देण्यात आले होते. अशा ३१ सैनिक व अधिकाऱ्यांना व्हिक्टोरिया क्रॉस देण्यात आले. यात महाराष्ट्रातील नाईक यशवंत घाडगे (पाचवी मराठा लाइट इन्फंट्री), सैनिक नामदेवराव जाधव (पाचवी मराठा लाइट इन्फंट्री) या दोघांचा समावेश होता.

## ८.४ महायुद्धांचे भारतावरील परिणाम

युद्धकाळात इंग्लंडला मनुष्यबळाची व पैशांची गरज निर्माण झाली. त्यासाठी सरकारने भारतातही लष्कर भरती सुरू केली. प्रसंगी सैन्यभरतीची सक्ती केली. पैसा उभारता यावा म्हणून भारतीय जनतेवर जादा कर लादले. व्यापार व उद्योगधंद्यावरील करांत मोठ्या प्रमाणात वाढ केली. युद्धकाळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या. वाढलेल्या महागाईबरोबरच या काळात औद्योगिक मंदीमुळे बेकारीचे संकटही भारतीयांपुढे उभे राहिले.

या परिस्थितीला ब्रिटिशांची शोषक सत्ता कारणीभूत आहे याची भारतीयांना जाणीव झाली. कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय हे सगळेच ब्रिटिश सत्तेच्या विरोधात राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने सामील झाले.

सप्टेंबर १९३९ मध्ये युरोपात दुसरे महायुद्ध भडकले. इंग्लंड व फ्रान्स यांच्याविरुद्ध जर्मनी व इटली असे युद्धाचे प्रारंभीचे स्वरूप होते. जर्मनीविरुद्ध इंग्लंडने युद्ध पुकारताच भारतही इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाल्याची घोषणा त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी केली.

व्हाईसरॉयच्या या घोषणेचा राष्ट्रीय सभेने निषेध केला. जर्मनीतील व इटलीतील आक्रमक हुकुमशाही विचारप्रणालींना जसा राष्ट्रीय सभेचा प्रखर विरोध होता तसाच तो इंग्लंडच्या साम्राज्यवादाला व वसाहतवादालाही होता. युरोपात लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपण जर्मनी व इटलीविरुद्ध लढत आहोत असा इंग्लंडचा दावा होता. तो खरा असेल तर इंग्लंडने भारताला तात्काळ स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी राष्ट्रीय सभेने केली. स्वतंत्र भारत जर्मनीविरुद्ध इंग्लंडला युद्धात मदत करील असे आश्वासनही राष्ट्रीय सभेने दिले. भारतात इंग्लंडचे साम्राज्यवादी शासन कायम राहणार असेल तर इंग्लंडच्या युद्धकार्याला भारत मदत करणार नाही असे राष्ट्रीय सभेने घोषित केले. महायुद्ध सुरू असेपर्यंत भारतासंबंधी कोणताही निर्णय इंग्लंडचे सरकार घेणार नाही असे लिनलिथगो यांनी जाहीर केले. तेव्हा इंग्लंडच्या युद्धकार्यात सहभागी व्हायचे नाही असा निर्णय राष्ट्रीय सभेने घेतला.

याच सुमारास भारताच्या पूर्व सीमेनजीक हजारो भारतीय सैनिक ब्रिटिशांविरुद्ध युद्ध करण्यास उभे ठाकले. हे आझाद हिंद फौजेचे सैनिक होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हे त्यांचे नेते होते. इंग्लंड महायुद्धात गुंतलेले असताना भारतात प्रखर जनआंदोलन सुरू करावे व भारताला स्वतंत्र करण्यासाठी, गरज भासली तर इंग्लंडच्या शत्रूचीही मदत घ्यावी असे त्यांचे मत होते. आझाद हिंद सेना आपल्या ध्येयप्राप्तीसाठी अविरत झुंजली. अशा पद्धतीने आझाद हिंद सेनेने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपले योगदान दिले.

१९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यात दुसरे महायुद्ध थांबले. त्यात इंग्लंडला विजय मिळाला खरा, परंतु

युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक हानी व मनुष्य हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे इंग्लंडची शक्ती कमी झाली. तशातच भारतीय जनता आणि भारतीय सैनिक यांच्यावरील ब्रिटिश सत्तेचा दरारा नाहीसा झाल्याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाल्यामुळे भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय इंग्लंडने घेतला.

दोन महायुद्धांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली. यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण केली पाहिजे या जाणीवेतून पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ आणि दुसऱ्या महायुद्धानंतर 'संयुक्त राष्ट्रे' या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेच्या कार्यात भारताने आपले भरीव योगदान दिलेले आहे.

पुढील पाठात आपण आशिया आणि आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाची माहिती घेणार आहोत.

**अधिक माहितीसाठी**

**डॉ.द्वारकानाथ कोटणीस :** डॉ.कोटणीस यांचा जन्म १० ऑक्टोबर १९१० रोजी सोलापूर येथे झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चीनच्या जखमी सैनिकांची सेवा करण्याचे काम त्यांनी केले. १९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले तेव्हा चिनी सरकारच्या मागणीप्रमाणे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जखमी चिनी सैनिकांची सेवा करण्यासाठी पाच डॉक्टर चीनला पाठवले. त्यात डॉ.द्वारकानाथ कोटणीस मुख्य होते. त्यांनी पाच वर्षे चिनी सैनिकांची देखभाल केली. डॉ.कोटणीस यांचे प्लेगच्या साथीत ९ डिसेंबर १९४२ रोजी निधन झाले. डॉ.कोटणीस यांचा त्याग व समर्पण वृत्तींनी भारत व चीन या देशांत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. प्रसिद्ध चित्रपटनिर्माते व्ही.शांताराम यांनी 'डॉ. कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट निर्माण करून कोटणीसांची स्मृती चिरस्थायी केली आहे.


डॉ.द्वारकानाथ कोटणीस

डॉ.कोटणीसांचे सोलापूर येथील घर 'स्मारक' म्हणून घोषित केले आहे. तेथे डॉ.कोटणीस यांच्याशी संबंधित गोष्टींचे संग्रहालय आहे.

**अधिक माहितीसाठी :** दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १७ इन्फंट्री डिव्हिजन अंतर्गत सॅम हरमुसजी फ्रामजी जमशेटजी माणकेशा यांना म्यानमारमध्ये जपानी सैन्याचे हल्ले रोखण्यासाठी पाठवण्यात आले होते. सॅम माणकेशा हे प्रभारी कमांडर होते. त्यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने सितांग ब्रिजवर हल्ला केला. हे महत्त्वाचे ठाणे जिंकणे गरजेचे होते. सॅम माणकेशा यांच्यावर शत्रू तुटून पडला. जपान्यांच्या मशिनगनमधून झालेल्या गोळीबारात माणकेशा यांच्या अंगात नऊ गोळ्या घुसल्या. माणकेशा यांच्या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांचे वरिष्ठ कमांडिंग ऑफिसर मेजर जनरल डी.टी.कोवान हे स्वतः आले होते. त्यांनी स्वतःच्या छातीवरील 'मिलिटरी क्रॉस' हे पदक माणकेशा यांच्या छातीवर लावले. हे पदक फक्त जिवंत सैनिकांनाच दिले जाते. माणकेशा यांना दवाखान्यात नेण्यात आले. पुढे ते स्वतंत्र भारतातील पहिले 'फील्ड मार्शल' झाले.

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा .................... देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.

(अ) जर्मनी (ब) अमेरिका
(क) हंगेरी (ड) रशिया

२. अमेरिकेने .................... या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.

(अ) नागासाकी (ब) हिरोशिमा
(क) पर्लहार्बर (ड) स्टॅलिनग्राड

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| १. अमेरिका | – | वुड्रो विल्सन |
| २. इंग्लंड | – | विन्स्टन चर्चिल |
| ३. जर्मनी | – | हिटलर |
| ४. इटली | – | लिनलिथगो |

**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. पहिल्या महायुद्धातील इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांचा गट –

२. पहिल्या महायुद्धातील जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया या राष्ट्रांचा गट –

**प्र.३ टीपा लिहा.**

१. राष्ट्रसंघ

२. डॉ.कोटणीस

**प्र.४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले.

२. इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.

**प्र.५ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. दुसऱ्या महायुद्धाची कारणे लिहा.

२. भारतीय लोक राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने का सामील झाले?

**उपक्रम**

डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांनी चीनमध्ये केलेल्या कार्याची माहिती संकलित करा.

# ९. जग : निर्वसाहतीकरण

९.१ निर्वसाहतीकरण : आशिया
९.२ निर्वसाहतीकरण : आफ्रिका

या पाठात आशिया आणि आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाचा आढावा आपणास घ्यायचा आहे. निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया आपण काही उदाहरणांच्या आधारे समजून घेऊ.

## ९.१ निर्वसाहतीकरण : आशिया

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्वसाहतीकरण प्रक्रियेने वेग घेतला. युरोपीय राष्ट्रांचे आपआपसांतील संघर्ष, पहिले व दुसरे महायुद्ध आणि वसाहतींमधील वसाहतवादविरोधी चळवळी यांमुळे निर्वसाहतीकरणाला चालना मिळाली. वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे वैचारिकदृष्ट्या युरोपला शक्य नव्हते. इंग्लंडला अमेरिकेची मदत घेण्यावाचून पर्याय नव्हता. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्याची चळवळ कळसाला पोहोचली होती. यामुळे इंग्लंडला वास्तवाची जाणीव झाली. यातूनच पुढे पहिल्या महायुद्धानंतर काही

**अधिक माहितीसाठी :** निर्वसाहतीकरणास चालना मिळण्यास अटलांटिक सनद कारणीभूत आहे. जगाची रचना कशी असावी या संदर्भात दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलीन रूझवेल्ट आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी जी घोषणा केली तिला 'अटलांटिक सनद' असे म्हणतात. 'इंग्लंड-अमेरिकादी दोस्त राष्ट्रांना कोणाचेही राज्य लुबाडायचे नाही, युद्धोत्तर काळात होणारे राजकीय व भौगोलिक फरक स्थानिक लोकांच्या इच्छेनुसारच करण्यात येतील व जगातील सर्व लोकांना स्वयंनिर्णयाचा हक्क राहील' असे या घोषणेत म्हटले होते.



विन्स्टन चर्चिल

**जाणून घ्या.**
अटलांटिक सनदीमधील तरतुदींची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा. वर्गात याबाबत चर्चा करा.

वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली.

पहिल्या महायुद्धात जर्मनी व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला. या राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या वसाहतींच्या शासनव्यवस्थेसाठी राष्ट्रसंघाने विश्वस्त पद्धती आणली. इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांना विश्वस्त म्हणून कार्य करण्यास सांगितले. भारतापाठोपाठ सायप्रस, माल्टा हे देश स्वतंत्र झाले. १९७१ मध्ये ब्रिटनने इराणच्या आखातातून सैन्य काढून घेतले. पुढे सिंगापूरमधून इंग्लंड बाहेर पडले. फ्रेंच प्रभुत्वाखालील इंडोचायना, मोरोक्को, ट्युनिशिया, अल्जेरिया स्वतंत्र झाले. विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दक्षिण आफ्रिका स्वतंत्र झाला. वसाहतवाद संपुष्टात येऊन हळूहळू निर्वसाहतीकरण घडून आले. हे घडून येण्यास संयुक्त राष्ट्रे ही संघटना कारणीभूत ठरली.

**मालदीव :** मालदीवमध्ये १५०७ मध्ये पोर्तुगिजांनी प्रवेश केला. तेव्हापासून मालदीव गोव्यातील पोर्तुगिजांकडे खंडणी पाठवू लागले. १५७३ मध्ये पोर्तुगिजांची सत्ता मलबार येथील मुहम्मद ठाकुरूफानु अल आझम याने संपुष्टात आणली. तो सुलतान झाल्यावर त्याने डचांशी करार करून या बेटांची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली. तेव्हापासून मालदीवचा सुलतान डचांची सत्ता असणाऱ्या श्रीलंकेकडे (सिलोन) खंडणी पाठवू लागला. त्यानंतर हा प्रदेश ब्रिटिशांनी ताब्यात घेतला. ब्रिटिशांनी येथे हवाई तळ आणि रेडिओ केंद्र उभारले. ब्रिटिशांनी भातशेती करण्यासाठी भारतातील मजूर तेथे नेले होते. २६ जुलै १९६५ रोजी कोलंबो येथे झालेल्या करारानुसार मालदीवला स्वातंत्र्य मिळाले.

**श्रीलंका :** ब्रिटिशांनी श्रीलंका (सिलोन) येथे १७९८ ते १९४८ पर्यंत राज्य केले. डच आणि पोर्तुगीज

यांचा पराभव करून ब्रिटिशांनी श्रीलंका ताब्यात घेतले. ब्रिटिश सत्तेविरोधात श्रीलंकेमध्ये उठाव झाले. श्रीलंकेमध्ये कॉफी लागवडीच्या क्षेत्रात काम करण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक तमिळ मजूर दक्षिण भारतातून नेले. कॉफी, चहा, रबर आणि नारळ यांच्या उत्पादन व विक्रीत ब्रिटिशांनी व्यापारी वर्चस्व मिळवले. ब्रिटिशांनी कोलंबो हे जागतिक बंदर म्हणून नावारूपास आणले. श्रीलंकेत ब्रिटिशांनी महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन केली आणि बौद्ध धर्माच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले. १९४८ मध्ये श्रीलंका हा देश ब्रिटिश वर्चस्वातून पूर्णपणे मुक्त झाला.

**म्यानमार (ब्रह्मदेश) :** इ.स.१५९९ मध्ये पोर्तुगिजांनी म्यानमारच्या राजाचा पराभव केला. या पराभवामुळे पोर्तुगिजांना म्यानमारमध्ये प्रवेश करणे सोपे झाले. इ.स.१६११ मध्ये म्यानमारमधील विविध राजघराण्यांनी एकत्र येऊन पोर्तुगिजांचा पराभव केला आणि देशाचे एकत्रीकरण केले. पुढे त्यांनी विस्तारवादाचा आश्रय घेऊन मणिपूर आणि आसामच्या भागावर ताबा मिळवला. ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेशास धोका उत्पन्न झाल्यामुळे ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली. १८२६ च्या पहिल्या युद्धात ब्रिटिशांनी म्यानमारचा पराभव करून आसाम, मणिपूर ही राज्ये जिंकून घेतली. तसेच दुसऱ्या युद्धातही त्यांनी म्यानमारचा पराभव केला. याच दरम्यान फ्रान्सने म्यानमारमधील 'अप्पर बर्मा' या भागाचा ताबा घेतला. तिसऱ्या युद्धात इंग्लंडने मंडाले या भागाचा ताबा घेतला. पुढे ब्रिटिशांनी संपूर्ण म्यानमार आपल्या वर्चस्वाखाली आणले.

ब्रिटिशांनी म्यानमार ब्रिटिश भारताचा एक प्रांत म्हणून भारतात समाविष्ट केला. त्यानंतर १९३५ च्या कायद्यानुसार म्यानमार (ब्रह्मदेश) भारतापासून वेगळा करण्यात आला. ब्रिटिशांनी म्यानमारला स्वयंशासनाची मुभा दिली. १९३७ नंतर आँग सॅन यांच्या नेतृत्वाखाली बर्मी लोकांनी 'बर्मा इंडिपेन्डन्स आर्मी' ही संघटना उभारली. त्यांनी दुसऱ्या महायुद्धकाळात जपानला सहकार्य केले. म्यानमारमध्ये ब्रिटिशांची पीछेहाट होऊ लागली. १९४५ मध्ये ब्रिटिशांनी अमेरिकेच्या सहकार्याने म्यानमारमध्ये पुन्हा सत्ता मजबूत केली. देश सांभाळायचा असल्यास लोकमताकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे लक्षात घेऊन ब्रिटिशांनी आँग सॅन यांना उपाध्यक्ष केले. ४ जानेवारी १९४८ रोजी ब्रिटिशांनी म्यानमारला स्वातंत्र्य दिले.

## ९.२ निर्वसाहतीकरण : आफ्रिका

१९५० ते १९६५ या १५ वर्षांच्या अवधीत आफ्रिकेतील वसाहतींनी परकीय वसाहतवाद्यांचे वर्चस्व झुगारून टाकले. युरोपीय वसाहतवादी राष्ट्रांनी लादलेली शिक्षणपद्धती परकीय होती. याच शिक्षणपद्धतीतून शिकून तयार झालेले नेते वसाहतींना लाभले. या शिक्षण पद्धतीमुळे अमेरिकन स्वातंत्र्यलढा, फ्रेंच राज्यक्रांती, राष्ट्रवाद यांचे ज्ञान आफ्रिकेतील लोकांना झाले होते. त्यातूनच राष्ट्रीयत्वाची भावना आफ्रिकेतील देशांमध्ये निर्माण झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेतील राष्ट्रवादाला अधिकच चालना मिळाली. इंग्लंड व फ्रान्सने आफ्रिकन वसाहतींना हळूहळू काही अधिकार द्यायला सुरुवात केली. त्यातून स्वातंत्र्याची चळवळ अधिकच तीव्र होत गेली.

**बांडुंग परिषद :** भारताने १९४७ मध्ये पहिली आशियाई परिषद घेतली. त्या परिषदेत आशियातील २५ राष्ट्रांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेत झालेल्या चर्चेतून आशियाई प्रादेशिकतावादाची संकल्पना आकाराला आली. आशियातील जनतेचे प्रश्न, आशियाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समस्यांकडे लक्ष वेधणे व परस्पर सहकार्यावर भर देण्यासंबंधी विचार-विनिमय झाला. या पार्श्वभूमीवर १९५५ मध्ये इंडोनेशियात बांडुंग येथे पहिली आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांची परिषद भरली. या परिषदेत आफ्रो-आशियाई जनतेच्या प्रश्नांची चर्चा, जागतिक शांततेस प्राधान्य आणि सहकार्यावर भर देण्याचे ठरले.

**आफ्रिकी ऐक्य कल्पना :** आफ्रिकी ऐक्याचा विचार प्रथम एच.एस. विल्यम्स याने मांडला. त्याने लंडनमध्ये १९०० मध्ये पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद भरवली. या परिषदेस हजर असणाऱ्या डब्ल्यू. इ. बी. ड्यूब्वा या कृष्णवर्णीय नेत्याने या कल्पनेस पहिल्या महायुद्धानंतर चालना दिली. १९१९ मध्ये पॅरिस येथे त्याने 'अखिल आफ्रिका ऐक्य परिषद' भरवली. त्याच्या पुढाकाराने पुढे आणखी काही परिषदा

झाल्या. यातूनच आफ्रिका खंडात आफ्रिकी ऐक्याची कल्पना लोकांच्या मनात रूजू लागली. या संदर्भात १९४५ मध्ये मँचेस्टर येथे परिषद भरली होती. या परिषदेत आफ्रिकी नेत्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

**आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरण :** १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. तेव्हा लायबेरिया आणि इथिओपिया वगळता संपूर्ण आफ्रिका खंड युरोपीय राष्ट्रांच्या सत्तेखाली होता. पहिल्या महायुद्धादरम्यान सहभागी असलेल्या राष्ट्रांच्या वसाहती आफ्रिकेत असल्याने अप्रत्यक्षरीत्या या वसाहती युद्धात ओढल्या गेल्या. पहिले महायुद्ध सुरू होताच इंग्लंड व फ्रान्स यांनी जर्मनीच्या ताब्यात असणाऱ्या आफ्रिकन वसाहती जिंकून घेण्यासाठी त्यांच्यावर हल्ले केले. महायुद्धात जर्मनीचा पराभव होताच जेत्या राष्ट्रांना पराभूत राष्ट्रांच्या ताब्यातील वसाहती आपल्या ताब्यात घेण्याची तीव्र इच्छा झाली.

अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी या प्रसंगी पुढील भूमिका मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार जेत्या राष्ट्रांनी विश्वस्त या नात्याने वसाहती सांभाळणे योग्य होते. वसाहतींना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळणे आवश्यक होते. राष्ट्रसंघाने परस्पर सामंजस्याने असे ठरवले की १९१९ मध्ये ब्रिटन, फ्रान्स व बेल्जियम या तीन राष्ट्रांनी आफ्रिकेमधील जर्मन वसाहती आपसात विभागून घ्याव्यात. या वसाहतींच्या राज्यकारभारावर देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रसंघाने ११ सभासदांचे एक स्थायी मंडळ नेमले.


वुड्रो विल्सन

१९२० मध्ये केप कॉलनी, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट आणि ट्रान्सवाल या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे दक्षिण आफ्रिका हे राज्य निर्माण झाले. परंतु त्यांच्यावरील गोऱ्या लोकांचे वर्चस्व संपले नव्हते. दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर इजिप्त स्वतंत्र राष्ट्र झाले. त्यानंतर लिबिया, ट्युनिशिया, मोरोक्को, अल्जेरिया आणि घाना ही राज्ये एकापाठोपाठ स्वतंत्र झाली.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मध्य आफ्रिकेतील आयव्हरी कोस्ट, मादागास्कर, माली यांसारख्या एकूण १२ फ्रेंच वसाहतीही स्वतंत्र झाल्या. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रांच्या विश्वस्त मंडळाच्या देखरेखीखालील कॅमेरून, सोमालिया इत्यादी वसाहती तसेच विविध युरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाखालील इतर वसाहतीही स्वतंत्र झाल्या.

या सगळ्या राष्ट्रांपैकी अल्जेरियाला मात्र कडवा संघर्ष करावा लागला. १९६२ मध्ये सार्वमताच्या आधारावर अल्जेरियाला स्वातंत्र्य मिळाले. टांगानिका व झांजीबार यांचे 'टांझानिया संयुक्त प्रजासत्ताक' या नावाने एप्रिल १९६४ मध्ये एकत्रीकरण झाले.

दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदरच्या काळात इटलीने इथिओपिया, लिबिया जिंकले आणि हा प्रदेश स्वतःच्या साम्राज्याला जोडला. मुसोलिनी या इटलीच्या हुकूमशहाने लिबिया व इथिओपिया या प्रदेशातून इजिप्त व ब्रिटिश वसाहतींवर हल्ला केला होता.

दुसऱ्या महायुद्धात आफ्रिकेतील युद्धक्षेत्राचा विस्तार उत्तरेत मोरोक्को व लिबियापासून पूर्वेस इथिओपिया व सोमालीलँड पर्यंत होता. इटलीमुळे आणि जर्मन सेनापती रोमेल याच्या चढाईमुळे ब्रिटिशांच्या आफ्रिकेतील साम्राज्यास धोका निर्माण झाला. यावेळी ब्रिटिश सैन्यात सामील असणाऱ्या भारतीय सैनिकांनी पराक्रमाची शर्थ केली. आफ्रिकेत ब्रिटिश सैन्याने इटली व जर्मनीच्या संयुक्त फौजांना मागे हटवले. १९४५ मध्ये महायुद्ध संपताच जर्मनी-इटलीस आफ्रिकेतील आपल्या वसाहती गमवाव्या लागल्या.

**चर्चा करा.**

आशिया आणि आफ्रिका खंडात ब्रिटिशांच्या वसाहती कोठे होत्या याची यादी करा व त्या वसाहती केव्हा व कशा स्वतंत्र झाल्या याबाबत गटचर्चा करा.

दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला. आशिया-आफ्रिका खंडात स्वातंत्र्य चळवळींचे वारे वेगाने वाहू लागले. या खंडांमध्ये

जागरूकता वाढली. कालौघात या दोन्ही खंडातील अनेक देश स्वतंत्र झाले. या राष्ट्रांकडे अमेरिका-रशिया यांचे लक्ष होतेच. या नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गटात सामील करून घेण्याची स्पर्धा महासत्तांमध्ये सुरू झाली.

पुढील पाठात आपण 'शीतयुद्ध' आणि त्याचे भारतावरील परिणाम याविषयी माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. पहिल्या महायुद्धात ............ व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला.
(अ) अमेरिका (ब) फ्रान्स
(क) इंग्लंड (ड) जर्मनी

२. १९३५ मध्ये ............ भारतापासून वेगळा करण्यात आला.
(अ) म्यानमार (ब) श्रीलंका
(क) मालदीव (ड) इराण

३. १९४७ मध्ये पहिली ............ परिषद भरवली गेली.
(अ) ऐक्य (ब) आशियाई
(क) अटलांटिक (ड) मँचेस्टर

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| १. बांडुंग | - | बांडुंग परिषद |
| २. पॅरिस | - | १९१९ मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| ३. लंडन | - | १९०० मधील अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| ४. मँचेस्टर | - | आशियाई ऐक्य परिषद |

**प्र.२ दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१. दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली. कारण -
(अ) आफ्रिकेतील वसाहतींनी परकीयांचे वर्चस्व झुगारून टाकले.
(ब) आफ्रिकेत पाश्चात्य शिक्षणपद्धती होती.
(क) दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरुवात केली.
(ड) पाश्चात्य देश दुसऱ्या महायुद्धात गुंतले.

**प्र.३ टीपा लिहा.**

१. बांडुंग परिषद
२. आफ्रिकी ऐक्य कल्पना

**प्र.४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.
२. दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला.

**उपक्रम**

आंतरजालाच्या (इंटरनेट) साहाय्याने आशिया आणि आफ्रिका या खंडातील फ्रेंच वसाहतींविषयी माहिती मिळवा.

# १०. शीतयुद्‌ध

१०.१ शीतयुद्‌ध व्याख्या
१०.२ नाटो, ॲन्झुस, सीएटो, सेंटो, वॉर्सा करार
१०.३ अलिप्ततावाद-भारताची भूमिका
१०.४ वसाहतवाद विरोधातील भारताची भूमिका
१०.५ सार्क
१०.६ राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ)

या पाठात आपण 'शीतयुद्‌ध' ही संकल्पना समजून घेणार आहेत.

## १०.१ शीतयुद्‌ध व्याख्या

दुसऱ्या महायुद्‌धानंतर एका बाजूला भांडवलशाही राष्ट्रे व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यात सत्ता व प्रभाव यासाठी जो संघर्ष सुरू झाला त्याला 'शीतयुद्‌ध' म्हणतात.

दुसऱ्या महायुद्‌धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्‌ध) हा शब्दप्रयोग वापरला. कोल्डवॉर संकल्पनेत पुढील घटकांचा समावेश आहे.

**शीतयुद्‌ध**
- (१) प्रत्यक्ष युद्‌धाचा अभाव
- (२) तीव्र शस्त्रस्पर्धा
- (३) आक्रमक राजनीति
- (४) आंतरराष्ट्रीय पातळीवर परस्पर अविश्वास
- (५) राजकीय व आर्थिक दबाव
- (६) तत्त्व प्रणालींचा संघर्ष

**शीतयुद्‌धाची पार्श्वभूमी :** शीतयुद्‌ध घडून येण्यास दुसरे महायुद्‌ध कारणीभूत ठरले. इंग्लंड व फ्रान्स यांचे महत्व कमी झाले. या महायुद्‌धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोप तर अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड यांनी पश्चिम युरोपवर प्रभुत्व मिळवले. यामुळे युद्‌ध संपल्यावर युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन घडून आले. सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणालीचा स्वीकार केला. अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. यातून शीतयुद्‌ध आकाराला आले.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

साम्यवादी विचारसरणीच्या प्रभावाखालील पूर्व युरोप आणि लोकशाहीचा पुरस्कार करणारा पश्चिम युरोप यांच्या विभाजनाला उद्‌देशून इंग्लंडचे प्रधानमंत्री सर विन्स्टन चर्चिल यांनी 'पोलादी पडदा' ही संज्ञा वापरली.

**हे करून पहा.**

संयुक्त राष्ट्रे या संघटनेची माहिती आंतरजालाच्या मदतीने गोळा करा. विद्यार्थ्यांचे गट पाडून संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विविध शाखांची माहिती एकत्र करा.

**शीतयुद्‌धाची वाटचाल :** दुसरे महायुद्‌ध संपल्यावर अमेरिकेने 'मार्शल प्लॅन'ची योजना आखून युरोपीय राष्ट्रांना साम्यवादापासून रोखण्यासाठी आर्थिक मदत सुरू केली. याच्या विरोधात रशियाने आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळींना प्रोत्साहन दिले. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यात युरोपच्या पूर्व आणि पश्चिम विभागणीने तणाव निर्माण झाला. या दोन राष्ट्रांमध्ये प्रत्यक्ष समोरासमोर युद्‌ध झाले नाही. जग तिसऱ्या महायुद्‌धाच्या उंबरठ्यापर्यंत पोहचले आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु, उभयपक्षी सामंजस्याचे धोरण अवलंबले गेले. दोन्ही राष्ट्रे कायम युद्‌धाच्या तयारीत, दोन्ही राष्ट्रांमध्ये तणाव मात्र प्रत्यक्ष युद्‌ध नाही

या परिस्थितीला ढोबळमानाने शीतयुद्ध म्हटले जाते.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर युरोपची विभागणी राजकीय, आर्थिक, लष्करी या मुद्द्यांच्या आधारे झाली. परंतु विचारप्रणालीचा स्वीकार हा महत्त्वाचा मुद्दा शीतयुद्धामागे होता.

साम्यवादी सोव्हिएट रशियाच्या विचारसरणीत उत्पन्नाच्या स्रोतांची सरकारी मालकी हा मध्यवर्ती विचार आहे तर अमेरिकेच्या भांडवलशाही विचारसरणीत उत्पन्नाच्या स्रोतांच्या खासगी मालकीचा विचार मध्यवर्ती आहे.

शीतयुद्धाची व्याप्ती युरोपपुरती मर्यादित न राहता ती आशिया खंडातही पसरली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. यात सोव्हिएट रशिया आणि चीन यांच्यातील लष्करी करार आणि उत्तर आणि दक्षिण कोरिया यांच्यातील संघर्ष या महत्त्वाच्या घटना होत.

सोव्हिएट रशियाचे प्रमुख जोसेफ स्टॅलिन यांच्या काळात शीतयुद्ध सुरू झाले. त्यांच्यानंतर सोव्हिएट रशियाचे प्रमुखपदी निकिता क्रुश्चेव्ह आले. आण्विक युद्धाची संहारकता काय असू शकते याची त्यांना कल्पना असल्यामुळे त्यांनी सोव्हिएट रशियाची भूतकाळातील भूमिका बदलून वास्तववादी धोरण स्वीकारले. त्यांनी सोव्हिएट रशिया आणि अमेरिका यांच्या शांततामय सहजीवनावर भर दिला. या धोरणातूनच या दोन्ही राष्ट्रांच्या प्रमुखांची भेट घडून आली.

| सोव्हिएट रशिया गट | अमेरिका गट |
|---|---|
| पूर्व जर्मनी, पोलंड, चेकोस्लाव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया, अल्बानिया | नेदरलँड, डेन्मार्क, बेल्जियम, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, ग्रीस, ग्रेट ब्रिटन |
| विचारप्रणाली : साम्यवादी | भांडवलशाही |
| अर्थव्यवस्था : सरकारी मालकी | मुख्यतः खासगी मालकी |
| सुरक्षा गट : वॉर्सा करार १९५० सोव्हिएट रशिया व चीन यांच्यात करार | नाटो, अॅन्झुस, सीएटो, सेंटो |

१९५९ मध्ये कॅम्प डेव्हिड येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर आणि सोव्हिएट रशियाचे निकिता क्रुश्चेव्ह यांची भेट घडून आली.

१९६१ मध्ये सोव्हिएट रशियाने बर्लिनची भिंत उभारली. यामुळे पश्चिम बर्लिन आणि पूर्व बर्लिन यांच्यातील संबंध संपला. या घटनेतून युरोपात तणाव वाढला. १९६२ मध्ये शीतयुद्धाच्या तणावाचे केंद्र क्यूबा हा देश ठरला. क्यूबा देशातील क्षेपणास्त्र पेचप्रसंगामुळे अमेरिका आणि रशिया यांच्यात तणाव वाढला. हा तणाव कमी करण्यासाठी उभयपक्षी करार, तात्काळ दूरध्वनीवर संवाद साधण्यासाठी हॉटलाईन इत्यादी उपाय योजले गेले. १९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएट रशियाचे नेते ब्रेझनेव्ह मॉस्को येथे भेटले. या दोन राष्ट्रांच्या शिखर परिषदेत आण्विक क्षेपणास्त्रांच्या संख्येवर मर्यादा आणण्यावर एकमत झाले. उभय देशांमधील तणाव कमी होण्यास या परिषदेने सुरूवात झाली. या ताणतणाव कमी करण्याच्या प्रक्रियेस 'देतांत' म्हणतात. पुढे अमेरिकन अध्यक्षांनी चीनला भेट देऊन साम्यवादी चीनच्या शासनाला मान्यता दिली.

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीमध्ये व्हेटोचा वापर करून मित्र राष्ट्रांची बाजू घेणे, विविध लष्करी करार, आर्थिक देवाण-घेवाण, व्यापारी सवलती, मित्र राष्ट्रांचा दर्जा देणे या माध्यमातून या दोन्ही सत्तांनी जगभर गटबाजीला प्रोत्साहन दिले. दोन विचारधारांमधील फरक, एकमेकांची भीती, अविश्वासाचे वातावरण, साम्यवाद विरुद्ध भांडवलशाही, गैरसमज दूर करणाऱ्या यंत्रणेचा अभाव, एकमेकांना समजून घेण्याच्या वृत्तीचा अभाव यांमुळे शीतयुद्ध अधिकच धगधगत राहिले.

**देतांत पर्व :** अमेरिका आणि सोव्हिएट रशियाने देतांत प्रक्रिया चालू ठेवण्याची भूमिका घेतली. यातूनच १९७३ मध्ये फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे झालेल्या परिषदेत व्हिएतनाम युद्ध समाप्त करण्याचे प्रयत्न जोरात सुरू झाले. १९७५ च्या हेलसिंकी परिषदेने शांततेची चर्चा अधिकच पुढे नेली. या परिषदेस अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या प्रमुख राष्ट्रांबरोबरच युरोपातील ३५ राष्ट्रे सहभागी झाली. पूर्व आणि पश्चिम युरोपियन देशांमधील तणाव कमी करण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. १९७८ च्या कॅम्प डेव्हिड परिषदेने

इस्रायल आणि अरब यांच्यातील वाद सोडवण्याच्या प्रयत्नांवर भर देण्यात आला.

१९७९ यावर्षी इराणमध्ये राजकीय क्रांती झाली. इराणच्या 'शाह'ची हकालपट्टी होऊन आयातोल्ला खोमेनी यांची सत्ता इराणमध्ये आली. इराणने अमेरिकेबरोबरचे राजनैतिक संबंध संपवून सेंटो कराराचा त्याग केला. सोव्हिएट रशियाने अफगाणिस्तानमध्ये कारमाल यांच्या नेतृत्वाखाली १९७९ मध्ये समाजवादी सरकार स्थापले.

सोव्हिएट रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये अंतराळयान आणि अण्वस्त्रांच्या क्षेत्रांतील स्पर्धा प्रथमपासूनच होती. पुढे लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे दोन्ही देशांनी विकसित केली. त्यानंतर अण्वस्त्रांची संख्या व तीव्रता कमी करण्यासाठी त्यांच्यामध्ये करारही झाले.

खेळांच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न झाला. सोव्हिएट रशियाच्या अफगाणिस्तानमधील हस्तक्षेपामुळे अमेरिकेने मॉस्को येथील ऑलिंपिकवर बहिष्कार टाकला.

तिसरे महायुद्ध केव्हाही होऊ शकते याची जाणीव अमेरिका व सोव्हिएट रशिया या देशांना होती. ते टाळण्यासाठी उभयपक्षींनी आण्विक क्षेपणास्त्रांच्या वापरावर मर्यादा घालणारा करार केला.

**गोर्बाचेव्ह यांचा कालखंड :** १९८५ मध्ये गोर्बाचेव्ह कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस झाले आणि सोव्हिएट रशियाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. गोर्बाचेव्ह यांच्या काळात शीतयुद्धाची अखेर झाली. त्यांनी 'पेरेस्त्रॉइका' आणि 'ग्लासनोस्त'च्या माध्यमातून रशियात बदल घडवून आणले. पेरेस्त्रॉइका म्हणजे पुनर्रचना आणि ग्लासनोस्त म्हणजे खुलेपणा. या काळात रशियातील अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. गोर्बाचेव्ह यांनी राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. मुक्त निवडणुकांचा पुरस्कार केला. साम्यवादी पक्षाची मक्तेदारी संपुष्टात आणण्याचे प्रयत्न केले. अर्थव्यवस्थेवरील केंद्रिय नियंत्रण कमी केले. लेखक, पत्रकार आणि बुद्धिवंतांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले. पूर्व–पश्चिम जर्मनीतील भेद संपवून जर्मनीच्या एकीकरणास चालना देणारे गोर्बाचेव्ह मायदेशाला एकत्र ठेवू शकले नाहीत. त्यांच्याच काळात सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन एकसंध सोव्हिएट रशियाचे अस्तित्व संपुष्टात आले. १९९१ नंतर जगाच्या इतिहासात शीतयुद्धोत्तर जग आणि सोव्हिएट रशियानंतरचे जग हे दोन नवे शब्दप्रयोग वापरात आले.


मिखाईल गोर्बाचेव्ह

| सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर उदयाला आलेले देश | | | |
|---|---|---|---|
| (१) | एस्टोनिया | (९) | तुर्कमेनिस्तान |
| (२) | लाटव्हीया | (१०) | उझबेकिस्तान |
| (३) | लिथुआनिया | (११) | ताजिकिस्तान |
| (४) | बेलारूस | (१२) | किरगिझस्तान |
| (५) | मॉल्डोव्हा | (१३) | रशिया |
| (६) | जॉर्जिया | (१४) | युक्रेन |
| (७) | आर्मेनिया | (१५) | कझाकस्तान |
| (८) | अॅझरबैजान | | |

**शीतयुद्धाचे परिणाम :** शीतयुद्धाच्या काळात झालेल्या राष्ट्राराष्ट्रांमध्ये गैरसमज, जगाचे दोन गटात विभाजन, गुप्त राजकीय हालचाली व करारांस प्राधान्य, निःशस्त्रीकरणाकडे दुर्लक्ष, विज्ञानाचा संहारक अस्त्र निर्मितीसाठी वापर, अन्न, वस्त्र, निवारा आणि लोकसंख्या या महत्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे यासारख्या गोष्टींमुळे मानवाचे भवितव्य धोक्यात आले. शीतयुद्धाची अवस्था कायम ठेवण्यासाठी दोन्ही राष्ट्रांना अफाट खर्च आला.

सोव्हिएट रशियाच्या पाडावाचे पर्यावसन अमेरिका ही एकमेव महासत्ता होण्यात झाला.

आता आपण शीतयुद्ध काळातील अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनी घडवून आणलेले करार पाहूयात.

## १०.२ नाटो, अॅन्झुस, सीएटो, सेंटो, वॉर्सा करार

**नाटो** (North Atlantic Treaty Organisation - 1949) : सोव्हिएट रशियाच्या विस्तारवादाविरुद्ध युरोपीय राष्ट्रांना लष्करी संरक्षण देण्यासाठी 'नाटो' या संघटनेची स्थापना करण्यात आली. नॉर्वे, फ्रान्स, इटली, डेन्मार्क, ग्रेट ब्रिटन, अमेरिका,

**जाणून घ्या.**

१९४५ मध्ये मित्र राष्ट्रांनी बर्लिन ही जर्मनीची राजधानी काबीज केली. जर्मनीच्या पुनर्रचनेची योजना आखण्यात आली. फ्रान्सला या योजनेत सामील करून घेण्याची रशियाची इच्छा नव्हती. कारण रशियाच्या मते फ्रान्सचा या विजयात काहीच हातभार नव्हता. तरीही जर्मनीच्या पुनर्रचनेच्या योजनेत ग्रेट ब्रिटन, अमेरिका आणि फ्रान्सचा सहभाग होता. यातून जो वाद निर्माण झाला तो 'बर्लिन संघर्ष' म्हणून ओळखला जातो. जर्मनीचे पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी असे विभाजन झाले. पूर्व जर्मनी रशियाच्या अंकित होती तर पश्चिम जर्मनी इंग्लंड-अमेरिकेच्या. १९६१ साली सोव्हिएट रशियाने बर्लिनची भिंत उभारायला सुरुवात केली. या भिंतीमुळे नागरिकांची आपल्या आप्तेष्टांपासून ताटातूट झाली. या भिंतीविषयी जर्मन नागरिकांच्या मनात तिरस्कार होता. ते या भिंतीस 'Wall of shame' म्हणून संबोधत. पुढे १९८९ ते १९९० या कालखंडात ही भिंत पूर्णपणे पाडून जर्मनीचे एकीकरण केले गेले.

नेदरलँड, पोर्तुगाल, तुर्कस्तान, पश्चिम जर्मनी, ग्रीस, बेल्जियम, कॅनडा, आइसलँड, लक्झेंबर्ग आणि स्पेन इत्यादी देश नाटो या संघटनेचे सभासद होते.

नाटो बोधचिन्ह

नाटो करारात पुढील महत्त्वाची कलमे होती – करारातील कोणत्याही एक अथवा त्याहून अधिक राष्ट्रांवर कोणीही आक्रमण केल्यास ते सर्वांवरील आक्रमण मानले जाईल. नाटोचे सभासद देश शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी प्रयत्न करतील. सभासद राष्ट्रांनी परस्परांतील प्रश्न विचारविनिमयाने सोडवावेत.

नाटोचे प्रमुख केंद्र पॅरिसमध्ये आहे. नाटोचे महत्त्वाचे निर्णय अमेरिका घेत असे. पुढील काळात नाटोला प्रत्युत्तर देण्यासाठी सोव्हिएट रशियाने साम्यवादी राष्ट्रांचा वॉर्सा करार घडवून आणला.

**ॲन्झुस करार** (ANZUS) **:** १ सप्टेंबर १९५१ रोजी ऑस्ट्रेलिया (A), न्यूझीलंड (NZ) आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका (US) या राष्ट्रांनी एक करार केला. ही राष्ट्रे पॅसिफिक महासागराशी संबंधित आहेत. या राष्ट्रांनी मिळून स्वसंरक्षणार्थ केलेला करार 'ॲन्झुस' नावाने ओळखला जातो. 'पॅसिफिकमधील त्रिपक्षीय संरक्षण करार' असे या कराराचे वर्णन करतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर बदलत चाललेल्या परिस्थितीत साम्यवादापासून रक्षण व्हावे म्हणून ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांनी अमेरिकेबरोबर करार केला. ब्रिटिश राष्ट्रकुलातील राष्ट्रांनी स्वतंत्रपणे अमेरिकेशी लष्करी करार केल्याचे हे पहिलेच उदाहरण होते. याचा अर्थ स्पष्टच होता की त्यांना युनायटेड किंग्डम आणि फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते. पॅसिफिक महासागरात असणाऱ्या देशांना साम्यवादी चीनपासून संरक्षण मिळावे असाही एक हेतू या कराराचा होता.

ॲन्झुस बोधचिन्ह

**सीएटो** (SEATO-Southeast Asia Treaty Organisation) : इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान, थायलंड आणि फिलीपाईन्स या देशांनी एकत्र येऊन ८ सप्टेंबर १९५४ रोजी एक करार केला. आग्नेय आशियातील राष्ट्रांसाठी संरक्षण देण्याच्या उद्देशाने हा करार मनिला (फिलीपाईन्स) येथे करण्यात आला. हा करार आग्नेय आशियाई संरक्षणविषयक करार म्हणूनही ओळखला जातो. या कराराचा मुख्य उद्देश आग्नेय आशियात साम्यवादाचा प्रसार रोखणे हाच होता. आपल्या गटाचे संरक्षण करणे, या करारावर सह्या करणाऱ्या कोणत्याही एका राष्ट्रावर आक्रमण झाल्यास अन्य राष्ट्रांनी

सीएटो बोधचिन्ह

त्या आक्रमणाचा सामूहिकरीत्या प्रतिकार करायचा व आक्रमणाव्यतिरिक्त एकमेकांना सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सहकार्य करायचे असे ठरले. वास्तवात मात्र या करारात खूपच अडचणी होत्या. कराराचे नाव आग्नेय आशिया असले तरी या करारात आशियातील थायलंड, फिलीपाईन्स आणि पाकिस्तान एवढेच देश होते. उरलेले देश पाश्चिमात्य होते. त्यांचा आग्नेय आशियाशी ना भौगोलिक संबंध होता ना ऐतिहासिक. एकमेकांपासून हे देश कित्येक किलोमीटर दूरवर होते. त्यांना एकमेकांच्या प्रश्नांची सखोल जाणीव नव्हती. त्यामुळे लष्करीदृष्ट्या या कराराची कुवत मर्यादित होती. सीएटो या संघटनेचे मुख्यालय थायलंडमध्ये होते. या संघटनेकडे स्वतःचे सैन्य नव्हते. १९७३ मध्ये पाकिस्तान या संघटनेतून बाहेर पडला. १९७५ मध्ये फ्रान्सने या संघटनेची आर्थिक रसद रोखली. ३० जून १९७७ रोजी या संघटनेचे औपचारिकरीत्या विसर्जन झाले.

**सेंटो (CENTO-Central Treaty Organisation) :** सेंटोचे सुरुवातीचा नाव 'बगदाद करार' असे होते. हा शीतयुद्धकालीन करार होय. २४ फेब्रुवारी १९५५ रोजी या करारावर इराण, तुर्कस्तान व इराक या राष्ट्रांनी सही केली. त्यानंतर इंग्लंड व पाकिस्तान ही राष्ट्रे त्यामध्ये सामील झाली. अमेरिका या करारामध्ये सहभागी सभासद होती. परस्परांचे संरक्षण करण्यासाठी हा करार घडून आला.

सेंटो बोधचिन्ह

१९५८ मध्ये इराकमध्ये नवे सरकार आले. इराकमधील क्रांतिकारकांनी पाश्चिमात्यांना अनुकूल असणारे सरकार उलथवून टाकले. नव्या शासनाने बगदाद करारास विरोध केला. त्यामुळे इराक या करारातून बाहेर पडला. त्यानंतर बगदाद कराराचे सेंटो करारात रूपांतर झाले. कराराचे मुख्यालय बगदादमधून अंकारा (तुर्कस्तान) येथे नेण्यात आले.

सोव्हिएट रशियाच्या साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी अमेरिकेने सेंटो कराराला प्रोत्साहन दिले. अमेरिका या करारातील सदस्य राष्ट्रांना आर्थिक व लष्करी मदत करू लागली. सोव्हिएट रशियाने या करारातील एखाद्या राष्ट्रावर हल्ला केल्यास सर्व राष्ट्रांनी एकत्रित प्रतिकार करायचा असे धोरण ठरले.

प्रत्यक्षात मात्र या करारान्वये कोणत्याही राष्ट्राला सुरक्षा उपलब्ध करून देण्याची चारही राष्ट्रांपैकी एकाचीही कुवत नव्हती. ग्रेट ब्रिटन वगळता अन्य तीन राष्ट्रांच्या आर्थिक व तांत्रिक विकासाकडे लक्ष देण्यास अमेरिकेलाही वेळ नव्हता. त्यामुळे चारही राष्ट्रांमध्ये अंतर्गत असमाधान होते. करारान्वये एकमेकांचे हितसंबंध गुंतवून घेण्यापेक्षा आपले आपण स्वतंत्र धोरण राबवावे या मतावर राष्ट्रे आली. पुढे इराण आणि पाकिस्तान या करारातून बाहेर पडले आणि सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

**सोव्हिएट रशिया-चीन सुरक्षा करार :** सोव्हिएट रशिया आणि चीन यांच्यात १९५० मध्ये संरक्षणात्मक करार घडून आलेला होता. या करारानुसार सोव्हिएट रशियाने चीनला आर्थिक, औद्योगिक, तंत्रज्ञान इत्यादी मदत करण्याचे मान्य केले.

**वॉर्सा करार :** युरोपमध्ये अमेरिकेच्या धोरणांना विरोध करण्यासाठी सोव्हिएट रशियाने 'वॉर्सा करार' घडवून आणला. वॉर्सा करारात सोव्हिएट रशिया, अल्बानिया, बल्गेरिया, चेकोस्लाव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड आणि रूमानिया या राष्ट्रांचा समावेश होता. १९६८ मध्ये अल्बानियाने गटाचे सदस्यत्व सोडले.

## १०.३ अलिप्ततावाद-भारताची भूमिका (Non-Aligned Movement-NAM))

दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्या गटात सामील न होता स्वतःचा विकास स्वतःच करणे, स्वतःची धोरणे ठरवून शांततेचा मार्ग अवलंबणे असे धोरण भारताने स्वीकारले. हे धोरण म्हणजे 'अलिप्ततावाद' होय.

'नाम'च्या स्थापनेत पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.सुकार्नो (इंडोनेशिया), क्वामे नखुमा (घाना), गमाल अब्दुल नासेर (इजिप्त) आणि मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) यांनी

'नाम' बोधचिन्ह

पुढाकार घेतला.

**अलिप्ततावादी राष्ट्र :** अलिप्ततावादी राष्ट्र कोणाला म्हणावे ? 'जी राष्ट्रे शांततामय सहजीवनाच्या आधारे, स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणाचा पाठपुरावा करतात, इतर परतंत्र देशातील स्वातंत्र्य संग्रामांना पाठिंबा देतात आणि महासत्तांनी स्थापन केलेल्या लष्करी करारात किंवा महासत्तांशी द्विपक्षी करारात स्वतःला गुंतवून घेत नाहीत, त्यांना अलिप्ततावादी राष्ट्रे मानण्यात येते.'

'अलिप्ततावाद' ही कल्पना युद्धापेक्षा शांततेशी निगडीत आहे म्हणून ती विधायक आहे.

१९६१ मध्ये बेलग्रेड येथे परिषद भरली. बेलग्रेड परिषदेस २५ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शांततेचे आवाहन करणारे २७ कलमी निवेदन परिषदेच्या शेवटी करण्यात आले. यात पुढील मागण्यांचा समावेश होता. आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिका विभागात आक्रमणाच्या सर्व कारवाया बंद करा, अल्जेरिया आणि अंगोला या देशांना स्वातंत्र्य द्या, ट्युनिशियातून फ्रेंच फौजा मागे घ्या, कांगोमधील हस्तक्षेप थांबवा, दक्षिण आफ्रिकेने वर्णद्वेषी धोरण सोडावे, पॅलेस्टाइन मधील अरबांना न्याय्य हक्क मिळावेत अशा मागण्या या परिषदेत करण्यात आल्या.

**अलिप्ततावादी चळवळीचे निकष**

१९६१ सालच्या बेलग्रेड परिषदेत पुढील निकषांना मान्यता मिळाली.

(१) असा देश ज्याने वेगळ्या राजकीय व सामाजिक यंत्रणेसह राज्याच्या सहअस्तित्वावर आधारित स्वतंत्र धोरण अवलंबले असेल.

(२) राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळींना पाठिंबा देणारा देश.

(३) शीतयुद्धाच्या संदर्भात कोणत्याही बहुपक्षीय करारात सदस्य नसणारा देश.

(४) महासत्तावादाशी निगडित कोणताही द्विपक्षीय लष्करी करार अथवा प्रादेशिक संरक्षण करार न केलेला देश.

(५) लष्करी तळ कोणत्याही विदेशी सत्तेच्या विशेषतः महासत्तेच्या प्रतिस्पर्धी देशांच्या हाती न देणारा देश.

बेलग्रेड नंतरची कैरो परिषद (ऑक्टोबर १९६४) महत्त्वाची परिषद होय. या परिषदेत प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. लष्करी गट आणि परदेशांचे लष्करी तळ या विरुद्ध जागतिक लोकमत तयार करण्याचे आवाहन या परिषदेत करण्यात आले. सप्टेंबर १९७० मध्ये लुसाका (झांबिया) येथे अलिप्ततावादी राष्ट्रांची तिसरी परिषद भरली. अलिप्ततावादी देशांनी आपले ऐक्य बळकट करावे, लष्करी करारांना विरोध करण्याचे धोरण चालू ठेवावे, आंतरराष्ट्रीय संबंधात समानता यावी व शस्त्रकपात व्हावी म्हणून प्रयत्न करावे असे ठरले. याशिवाय वसाहतवाद व वंशद्वेष नष्ट करावा, आपसातील सहकार्यावर भर द्यावा व संयुक्त राष्ट्रे ही संघटना अधिक बळकट करावी असे या परिषदेत ठरले. १९७३ मध्ये अल्जिअर्स येथे चौथी शिखर परिषद भरली. एक नवी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था व आंतरराष्ट्रीय वृत्तसंकलन व वृत्तप्रसार व्यवस्था निर्माण करण्याची मागणी या परिषदेत पुढे आली. १९७६ मध्ये कोलंबो येथे पाचवी परिषद भरली. जागतिक अर्थव्यवस्थेवरील बड्या राष्ट्रांचा प्रभाव कमी करून नवी जागतिक अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्याचे या परिषदेत ठरले. १९७९ मध्ये क्यूबातील हॅवाना येथे परिषद झाल्यावर नवी दिल्ली येथे १९८३ मध्ये परिषद भरली. या परिषदेत पॅलेस्टाईनची अरब जनता व नैऋत्य आफ्रिकेची संघटना यांच्या स्वातंत्र्यलढ्यास एकमुखाने पाठिंबा देण्यात आला.

भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी नवी दिल्लीच्या शिखर परिषदेत 'स्वातंत्र्य, विकास, शस्त्रकपात आणि शांतता या मुद्द्यांवर भर दिला होता. अलिप्ततावादी राष्ट्रांची आर्थिक प्रगती घडवून आणण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट्य चळवळीसमोर होते. १९८६ च्या हरारे येथील परिषदेत दक्षिण आफ्रिकेला लागून असलेल्या राष्ट्रांच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापण्यात आला. नामिबियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आणि दक्षिण आफ्रिकेचे वंशद्वेषी धोरण यावर चर्चा करण्यात आली. १९९२ च्या जकार्ता परिषदेत विकसनशील देशांना व्यापारासाठी अधिक सवलती द्या, संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा समितीची पुनर्रचना करा या मागण्या पुढे आल्या.

१९९२ ते २०१६ मधील व्हेनेझुएलाच्या 'नाम' परिषदेपर्यंतच्या कार्याचा आढावा घ्या.

### १०.४ वसाहतवाद विरोधातील भारताची भूमिका

जगातील एक महान लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून भारताची ओळख आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदरच जागतिक राजकारणात भारताने भाग घेऊन साम्राज्यवादाविरुद्ध आवाज उठवला होता. स्वातंत्र्य मिळताच भारताने आंतरराष्ट्रीय राजकरणात सक्रिय तटस्थता स्वीकारली. याचा अर्थ भारत कोणत्याही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नाबाबत उदासीन नाही परंतु तो जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी उत्सुक आहे. भारत कोणत्याही परक्या राष्ट्राचा हस्तक्षेप सहन करणार नाही. भारताला दुसऱ्या राष्ट्राच्या प्रादेशिक अखंडत्वाबद्दल, सार्वभौमत्वाबद्दल आदर राहील. कोणत्याही राष्ट्रावर भारत आक्रमण करणार नाही. सहजीवनाचे तत्त्व मान्य करून 'जगा व जगू द्या' यावर भारताचा भर आहे. या संदर्भात पुढील उदाहरणे महत्त्वाची आहेत.

१९४९ मध्ये दिल्ली येथे एक परिषद भरली होती. या परिषदेत इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यात आला. या परिषदेत १९५० पूर्वी इंडोनेशियातून डचांनी माघार घ्यावी आणि त्या देशास स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी करण्यात आली. भारताने आफ्रिका खंडासंदर्भात जी भूमिका घेतली ती महत्त्वाची आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये आफ्रिकेची बाजू जोरदारपणे मांडली. आफ्रिकेतील राष्ट्रांना, विशेषतः विश्वस्त राष्ट्रांच्या ताब्यातील प्रदेशांना स्वातंत्र्य लवकर मिळावे म्हणून भारताने पुढाकार घेतला. परकीय सत्तांनी (वसाहतवादी युरोपीय राष्ट्रांनी) वसाहतींमधून निघून जावे असा आग्रह भारताने धरला. संयुक्त राष्ट्रांशी निगडीत अशा विविध जागतिक संस्थांनी आपले कार्यक्षेत्र आफिक्रेत वाढवून आपल्या कार्याचा फायदा आफ्रिकेस द्यावा असा आग्रह भारताने धरला. दक्षिण आफ्रिकेतील स्थानिक लोकांना जी अपमानास्पद वागणूक देण्यात येते त्याबाबत भारताने संयुक्त राष्ट्रसंघात प्रश्न उपस्थित केले. आफ्रिका खंडात व्यापाराच्या निमित्ताने आणि साखर उद्योगात काम करण्यासाठी हजारो भारतीय पूर्वीच पोचले होते. १८९६ मध्ये हिंदी कामगार केनिया-युगांडा लोहमार्ग बांधण्यासाठी गेले होते. महात्मा गांधीजींनी आफ्रिकेला स्वातंत्र्य मिळवण्याचा 'सत्याग्रह' हा एक नवा मार्ग दाखवला होता. अशा रीतीने भारताने वसाहतवादविरोधात प्रभावी भूमिका बजावली.

### १०.५ सार्क

**दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (SAARC - South Asian Association for Regional Cooperation):** आशिया खंडात आर्थिक, सामाजिक विकासासाठी एखादी संघटना असावी असे बांगलादेशचे तत्कालीन प्रमुख झिया-उर-रहमान यांना वाटत होते. त्यांच्या कल्पनेतून बांगलादेश, भारत, भूटान, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, नेपाळ या देशांच्या परराष्ट्र सचिवांची १९८१ मध्ये एक बैठक झाली. ही बैठक कोलंबो येथे झाली. या बैठकीत प्रादेशिक सहकार्यासाठी नियोजन, कृषी, ग्रामीण विकास, आरोग्य, लोकसंख्या आणि व्यापार या विषयांवर सहकार्य करण्याचे ठरले. १९८३ मध्ये दिल्ली येथे या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत सार्कचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. १९८५ मध्ये ढाका येथे सार्कची स्थापना झाली. या परिषदेत पुढील ध्येये निश्चित करण्यात आली.

(१) सदस्य राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणे आणि विकासाचा वेग वाढविणे. (२) दहशतवाद, अंमली पदार्थांची तस्करी अशा विघातक गोष्टींना विरोध करणे. (३) परस्पर विश्वास वाढविण्यासाठी सामंजस्याचे वातावरण निर्माण करून समस्या निराकरण करणे. (४) प्रादेशिक, विभागीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समविचारी संघटनांशी सहकार्य करणे. (५) आंतरराष्ट्रीय पातळीवर सामायिक हितासाठी प्रयत्न करणे.

SAARC

सार्क बोधचिन्ह

या ध्येयांच्या पार्श्वभूमीवर सार्क संघटनेची रचना पुढीलप्रमाणे करण्यात आली. सार्कचे मुख्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे ठेवून वर्षातून एक बैठक आवश्यक करण्यात आली. सरचिटणीस,

सात संचालक आणि कर्मचारी वर्ग यांच्या खर्चासाठी वार्षिक वर्गणीची पद्धत स्वीकारण्यात आली. सार्कच्या मुख्य सचिवपदाचा कार्यकाल तीन वर्षांचा आणि प्रत्येक राष्ट्राला एकेकदा संधी देण्याचे ठरले.

सार्कच्या पहिल्याच अधिवेशनात सहभागी राष्ट्रांनी जे घोषणापत्र केले त्यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रे या संघटनेच्या सनदेनुसार आणि अलिप्ततावादाच्या सिद्धान्तानुसार विशेषतः 'राष्ट्रीय स्वातंत्र्य, भौगोलिक एकता, समानता, अंतर्गत वादात बळाचा वापर न करणे, अंतर्गत बाबींत हस्तक्षेप न करणे व परस्पर संघर्ष शांततामय मार्गाने सोडवणे' या तत्त्वांचे आचरण करण्याची हमी दिलेली आहे. हे घोषणापत्र प्रत्यक्ष आणण्याचे कार्य सार्क राष्ट्रांची मंत्रिपरिषद आणि स्थायी समिती करते.

**सार्क समोरील आव्हाने :** सदस्य राष्ट्रांमधील आर्थिक विषमता, संरक्षणावरचा खर्च, दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी, कृषी क्षेत्राचा अपुरा विकास, वाढता दहशतवाद, लोकसंख्या विस्फोट, अपुरा व्यापार, भिन्न राज्यपद्धती, धार्मिक-भाषिक विविधता असे अनेक प्रश्न सार्कसमोर आहेत.

**सार्कचे यश :** या संघटनेने आतापर्यंत काही क्षेत्रांत चांगली कामगिरी बजावली आहे. यात बांगलादेशमध्ये कृषी माहिती केंद्र सुरू करून बी-बियाणे, पशुधन आणि मत्स्योत्पादन यात संशोधन सुरू झाले. ढाका येथे सार्क हवामान संशोधन केंद्र स्थापले, काठमांडूमध्ये अस्थिरोग निवारण केंद्र सुरू झाले. सार्क देशांमध्ये पर्यटनास चालना देण्यात आली. दक्षिण आशियातील गरिबी कमी करण्यासाठी सार्कने 'आशिया प्रशांत क्षेत्रीय आर्थिक व सामाजिक मंडळ' यांच्या मदतीने प्रयत्न केले. व्यापार वृद्धीसाठी 'उच्चस्तरीय आर्थिक सहकार्य मंडळ' स्थापण्यात आले. सार्क दस्तऐवज केंद्रांच्या माध्यमातून माहिती पुरविण्याची सोय करण्यात आली. इस्लामाबाद येथे सार्क मनुष्यबळ विकास केंद्र स्थापण्यात आले. अमली पदार्थ व्यापार विरोधी करार करण्यात आले. डाकसेवा, दळणवळण अशासारख्या महत्त्वाच्या विषयांवर समित्या स्थापण्यात आल्या.

दक्षिण आशियातील देशांमध्ये आपसातील व्यापार वृद्धिंगत व्हावा म्हणून १९९३ मध्ये 'दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापार करार' (South Asian Preferential Trade Arrangement-SAPTA) आणि २००४ मध्ये 'दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र' (South Asian Free Trade Area-SAFTA) हे दोन करार करण्यात आले.

> **हे करून पहा.**
> इ.स.२०१४ पर्यंत झालेल्या सार्क परिषदांची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.

## १०.६ राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ)

इंग्लंडच्या साम्राज्यात असणाऱ्या परंतु कालौघात स्वतंत्र झालेल्या काही राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय संघटना म्हणजे 'राष्ट्रकुल' होय.

साम्राज्याअंतर्गत विविध वसाहतींचे गव्हर्नर आणि प्रशासक यांनी एकमेकांच्या अनुभवांची देवाणघेवाण करावी, राजकीय आणि प्रशासकीय धोरणात एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न करावा, या उद्देशाने ही संस्था उभारली गेली.

१९१७ मध्ये कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांना ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्त राज्यांचा दर्जा इंग्लंडकडून मिळाला. १९३१ मध्ये आपल्या सर्व वसाहतींना क्रमाक्रमाने स्वायत्तता देण्याचे धोरण इंग्लंडने जाहीर केले. इंग्लंडच्या संसदेने 'स्टॅच्यूट ऑफ वेस्टमिन्स्टर' हा कायदा केला. या कायद्यान्वये राष्ट्रकुलास मान्यता देण्यात आली. प्रथेनुसार या संघटनेचे प्रमुखपद ब्रिटिश राजा अथवा राणीकडे आहे. राष्ट्रकुलाचे लंडनमध्ये स्वतंत्र सचिवालय स्थापण्यात आले. स्वयंस्फूर्त सहकार्य हे राष्ट्रकुलचे पायाभूत तत्त्व होय.

दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिका-आशिया खंडातील इंग्लंडच्या वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले. त्याचे श्रेय काही अंशी तरी राष्ट्रकुलला द्यावयास हवे. वसाहतींमध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रीय संग्रामांमुळे आणि बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे ब्रिटिश साम्राज्याचे विघटन अपरिहार्य ठरले. त्याचबरोबर वसाहतवाद विरोधी चळवळींना राष्ट्रकुलच्या अस्तित्वामुळे चालना मिळाली. त्याचप्रमाणे या प्रदेशांना स्वातंत्र्य देण्याबाबत ब्रिटनमधील काही स्तरांमध्ये जो मानसिक विरोध होता; तो राष्ट्रकुल

संघटनेमुळे काहीसा कमी झाला. विशेषतः स्वतंत्र झाल्यानंतरही भारताने राष्ट्रकुल संघटनेसोबत राहण्याचा निर्णय घेतल्याने हे होऊ शकले.

**राष्ट्रकुल आणि भारत :** १९४८ मध्ये राजस्थान येथील जयपूरमध्ये भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात पंडित नेहरू यांनी राष्ट्रकुलामध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. समता आणि सार्वभौमत्वाच्या तत्त्वाच्या आधारे भारत राष्ट्रकुलचा सदस्य झाला. या निर्णयास तत्कालीन परिस्थितीची पार्श्वभूमी होती. भारतास लागणाऱ्या लष्करी सामग्रीचा इंग्लंडकडून होणारा पुरवठा, भारतास मिळणाऱ्या परकीय हुंडणावळीच्या सुविधा, भारताच्या निर्यात मालास ब्रिटिश बाजारपेठेत मिळणारी जकात सवलत आणि पाकिस्तानच्या भारताविरोधी प्रचारास अटकाव करण्यासाठी खुले असणारे राष्ट्रकुल व्यासपीठ याचा विचार करून भारताने राष्ट्रकुल या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले.

या शिवाय 'कॉमनवेल्थ गेम्स' मध्ये भारताचा प्रमुख सहभाग आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांतील हौशी खेळाडूंचे 'ब्रिटिश एंपायर गेम्स' हे ऑलिंपिकच्या धर्तीवर सामने व्हायचे. या



राष्ट्रकुल-बोधचिन्ह

क्रीडा स्पर्धांची कल्पना रेव्हरंड ॲस्टली कूपर यांनी मांडली होती. १९५० पासून या खेळांना कॉमनवेल्थ गेम्स (राष्ट्रकुल क्रीडासामने) म्हणून ओळखले जाऊ लागले. १९११ मध्ये पाचव्या जॉर्जच्या राज्यारोहण प्रसंगी साम्राज्योत्सव झाला. या प्रसंगी इंग्लंडमधील 'क्रिस्टल पॅलेस' येथे या सामन्यांना सुरुवात झाली.

१९८६ मधील राष्ट्रकुल स्पर्धा विशेष गाजल्या. या स्पर्धेवर ३२ राष्ट्रांनी बहिष्कार टाकला. ग्रेट ब्रिटनने दक्षिण आफ्रिका संबंधीचे वर्णविद्वेषी धोरण बदलावे असा आग्रह या राष्ट्रांनी धरला होता. इंग्लंडने आपले धोरण बदलले नाही म्हणून भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी या स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. एकविसाव्या शतकात भारत या स्पर्धेत लक्षणीय कामगिरी बजावत आहे.

पुढील दोन पाठांत भारत देश कसा बदलत आहे याविषयी माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. सिएटो संघटनेचे मुख्यालय ............ येथे होते.
   (अ) थायलंड (ब) फिलीपाईन्स
   (क) पाकिस्तान (ड) ग्रेट ब्रिटन

२. १९८६ च्या ............ येथील परिषदेतील आफ्रिकेच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.
   (अ) जकार्ता (ब) हरारे
   (क) नामिबिया (ड) इंडोनेशिया

**प्र.२ (अ) ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**


१. ३० जून १९७७ रोजी या संघटनेचे औपचारिकरीत्या विसर्जन झाले –

२. कॉमनवेल्थ गेम्सची संकल्पना यांनी मांडली –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१. ॲन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही. कारण –
   (अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्व वाढू द्यायचे नव्हते.
   (ब) हा लष्करी करार होता.
   (क) हा गुप्त करार होता.
   (ड) हा फक्त मित्रदेशांतील करार होता.

**प्र.३ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ टीपा लिहा.**

१. शीतयुद्ध

२. अलिप्ततावाद

**प्र.५ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

२. सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे.

**प्र.६ तुमचे मत नोंदवा.**

१. अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले.

२. भारताने वसाहतवादाविरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.

**उपक्रम**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांची आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा.

# ११. बदलता भारत-भाग १


११.१ जागतिकीकरण
११.२ विविध क्षेत्रांतील बदल
११.२.१ ग्रामीण भागाच्या विकासाच्या योजना
११.२.२ नागरी विकासाच्या योजना
११.२.३ संपर्क साधने
११.३ अर्थक्षेत्र
११.४ ब्रिक्स
११.५ विज्ञान आणि तंत्रज्ञान
११.६ संरक्षणविषयक घडामोडी
११.७ युवकांसंदर्भातील धोरण
११.८ माहितीचा अधिकार अधिनियम २००५
११.९ राज्यांची पुनर्रचना


१९९० पासून भारताने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती ही या पाठाची मध्यवर्ती कल्पना आहे. १९९० नंतर विविध क्षेत्रांत झालेल्या सुधारणा, तंत्रज्ञानाची प्रगती याची माहिती आपण काही प्रातिनिधिक उदाहरणांच्या आधारे घेणार आहेत.

## ११.१ जागतिकीकरण

१९९० पूर्वीचा भारत आणि नंतरचा भारत यात प्रचंड अंतर आहे. १९९१ नंतर भारताने आर्थिक उदारीकरणाचे जे धोरण स्वीकारले त्यामुळे भारत बदलून गेला.

**गॅट करार :** दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनेक राष्ट्रांनी स्व-राष्ट्राच्या व्यापारी हितासाठी संरक्षक कर किंवा जकातींचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे व्यापारात घट झाली. या समस्येवर विचार-विनिमय करण्यासाठी क्यूबामध्ये ५६ राष्ट्रांची बैठक झाली. या बैठकीत आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी एक कायमस्वरूपी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापण्याचे ठरले. १९४७ च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो 'गॅट' करार म्हणून ओळखला जातो. हा करार म्हणजे जगातील पहिला बहुदेशीय व्यापारी करार होय. या करारानुसार उत्पादन आणि विनिमय या मार्गांद्वारे आर्थिक विकास करणे, परममित्र राष्ट्रोचित व्यवहार (मोस्ट फेव्हर्ड नेशन्स ट्रीटमेंट) करणे या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले होते.

गॅट करारानुसार दरवर्षी जिनिव्हा येथे या संघटनेचे अधिवेशन भरत असे. या अधिवेशनात सभासद देशांचे प्रतिनिधी उपस्थित राहत. प्रत्येक देशाला एक मत होते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडी-अडचणींविषयी या अधिवेशनात चर्चा होऊन निर्णय घेतले जायचे. गॅटचे रूपांतर पुढे जागतिक व्यापार संघटनेत झाले.

**जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation) :** संपूर्ण जग व्यापारासाठी खुले करणे या प्राथमिक उद्देशाने १ जानेवारी १९९५ रोजी जगातील १२३ राष्ट्रांनी एक संघटना स्थापन केली. ही संघटना म्हणजे 'जागतिक व्यापारी संघटना' होय. भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले.


आर्थर डंकेल

WTO चे महासंचालक आर्थर डंकेल यांनी जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेसाठी पायाभूत असणारा एक मसुदा तयार केला. हा मसुदा 'डंकेल प्रस्ताव' म्हणून ओळखला जातो. सरकारी जकात आणि अन्य निर्बंधांपासून मुक्त व्यापार हा या मसुद्याचा गाभा होता. यालाच 'उदारीकरण' असे म्हणतात. सहभागी सदस्य राष्ट्रांनी एक नियमावली सर्वानुमते स्वीकारून आंतरराष्ट्रीय व्यापारास चालना देण्याचे सूत्र मान्य केले गेले. सुरुवातीला अनुदाने, आयात-निर्यात, परकीय गुंतवणूक, संरक्षित क्षेत्रे, शेती, तंत्रज्ञान आणि सेवाक्षेत्र या विषयीच्या तरतुदी करण्यात आल्या.

भारताने सदस्यत्व स्वीकारल्यानंतर आर्थिक प्रगतीवर भर दिला. या संदर्भात तत्कालीन प्रधानमंत्री पी.व्ही. नरसिंहराव, अर्थमंत्री मनमोहन सिंग यांचे योगदान मोलाचे होते. हे धोरण आणखी पुढे नेण्याचे कार्य प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी आणि त्यांच्यानंतरचे प्रधानमंत्री मनमोहन सिंह यांनी केले. या संघटनेच्या २००६ मध्ये

प्रसिद्ध झालेल्या अहवालामध्ये भारताच्या वाढणाऱ्या आर्थिक विकासदराची नोंद विशेषत्वाने घेतली आहे. परकीय थेट गुंतवणुकीत वाढ, दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात झालेली घट, बालमृत्यूंच्या संख्येमध्ये घट, साक्षरता, पिण्याचे पाणी, सांडपाणी या संदर्भातील सोयी-सुविधांची वाढती उपलब्धता या गोष्टींची नोंदही या अहवालात आहे. आयात निर्बंध हटवणे, बौद्धिक मालमत्तेच्या अधिकारांबाबत सुधारणा, पेटंट कायद्यात सुधारणा या मार्गांद्वारे भारताने जागतिक अर्थकारणात स्वतःला जोडून घेतले आहे.

### ११.२ विविध क्षेत्रांतील बदल

देश बदलत आहे हे कसे ओळखावे तर त्याची काही सूचक चिन्हे असतात. ग्रामीण भाग बदलत आहे का? आपल्या आजूबाजूचे रस्ते बदलत आहेत का? वाहतूक व्यवस्था सुधारत आहे का? शहरे कात टाकत आहेत का? संपर्क यंत्रणा बदलत चालली आहे का? संरक्षण व्यवस्था युद्ध तयारीच्या आणि संरक्षणाच्या आधुनिकीकरणाला प्राधान्य देत आहे का? नागरिकांना त्यांचे अधिकार योग्य पद्धतीने वापरता येतात का? या प्रश्नांची उत्तरे सकारात्मक असतील तर बदल घडत आहेत असे नक्की समजावे. चला तर विविध क्षेत्रात काय-काय बदल घडून आले ते समजून घेऊ या.

#### ११.२.१ ग्रामीण भागाच्या विकासाच्या योजना

जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होऊ नये, शहरे आणि ग्रामीण भाग यात विकासाचा असमतोल निर्माण होऊ नये म्हणून ग्रामीण विकासाच्या अनेक योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. या योजना सुरू करताना पूर्वीच्या काही योजनांचा आढावा घेऊन योजनांना नव्या योजनांची जोड देण्यात आली आहे. काही जुन्या योजना नव्या योजनांमध्ये विलीन करण्यात आलेल्या आहेत.

वाढत्या लोकसंख्येसाठी रोजगार निर्माण करणे हे सरकारपुढचे एक मोठे आव्हान आहे. सरकारने यासाठी ज्या उपाययोजना केल्या आहेत त्यांची आपण थोडक्यात माहिती घेऊ या.

**प्रधानमंत्री रोजगार योजना :** सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने २ ऑक्टोबर १९९३ रोजी ही योजना सुरू केली. या योजनेत शहरी व ग्रामीण तरुणांना रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

महात्मा गांधीजींच्या जन्मदिवसाचा मुहूर्त साधूनच 'प्रधानमंत्री रोजगार योजना' आणि 'रोजगार हमी योजना' सुरू झाल्या. रोजगार हमी योजनेमध्ये कृषी क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगाराची हमी देण्यात आली होती. शेतीचे काम नसेल त्या दिवसांमध्ये जो मागेल त्याला काम देणे हाच या योजनेचा उद्देश होता. सुरुवातीला भारतातील २५७ जिल्ह्यांमधून ही योजना सुरू झाली. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक गरजू कुटुंबातील दोन तरुणांना १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. डिसेंबर २००१ मध्ये ही योजना ग्रामीण रोजगार योजनेत विलीन करण्यात आली.

१९९८ मध्ये शेतकऱ्यांना अडी-अडचणीच्या वेळी आधार मिळावा म्हणून 'किसान क्रेडीट कार्ड' योजना सुरू झाली. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू विकत घेण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी ही योजना सुरू झाली. पुढे कार्डधारक शेतकऱ्यांसाठी अपघात विमा सुविधा सुरू झाली.

**सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना :** १९९९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास योजना, स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांकरता प्रशिक्षण कार्यक्रम, ग्रामीण महिला व बालविकास कार्यक्रम, ग्रामीण कारागीरांना आधुनिक अवजारांच्या वाटपाचा कार्यक्रम, गंगा कल्याण योजना, दहा लाख विहिरी खोदण्याची योजना अशा सर्व योजना एकत्र करण्यात येऊन वरील योजना सुरू करण्यात आली. २००५-०६ मध्ये या योजनेचे बारा लाख सात हजार लाभार्थी होते.

**जवाहर ग्राम-समृद्धी योजना :** १९९९ मध्ये ग्रामीण भागातील बेरोजगार स्त्री-पुरुषांना पुरेसा रोजगार देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. २००१ मध्ये या योजनेचे 'संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने'त विलिनीकरण करण्यात आले.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :** 'रोजगार आश्वासन

योजना' आणि 'जवाहर ग्राम-समृद्धी योजना' यांचे विलीनीकरण करून २००१ मध्ये ही योजना सुरू झाली. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, कामाच्या बदल्यात धान्य देणे इत्यादी तरतुदी या योजनेत होत्या. २००४ मध्ये देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक मागे असणाऱ्या १५० जिल्ह्यांमध्ये 'कामाच्या बदल्यात धान्य' ही योजना राबवण्यास सुरुवात झाली. दुष्काळापासून संरक्षणासाठी जलसंवर्धन व शेतजमिनींचा विकास यावर भर देण्यात आला. २००६ मध्ये ही योजना 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' योजनेत समाविष्ट करण्यात आली.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी :** ग्रामीण भागातील आर्थिक विषमता, दारिद्र्य, उपासमार आणि बेरोजगारी यांचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने ही योजना केंद्र सरकारने सुरू केली. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस किमान १०० दिवस काम करण्याची हमी दिली गेली. २००८ पर्यंत भारतातील सुमारे ३५० जिल्ह्यांत ही योजना सुरू झाली.

**कृषी व पशुधन :** बदलत्या भारताबरोबरच कृषी क्षेत्रही बदलत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ५४% च्या आसपासची लोकसंख्या कृषी आणि कृषीसंबंधित क्षेत्राशी निगडीत आहे. 'मृदा स्वास्थ्य कार्ड योजने' द्वारे (Soil Health Card Scheme) जमिनीची सुपीकता वाढवावी, उत्पादन वाढवावे हे उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत (Pradhan Mantri Krishi Sinchan Yojana) कृषीसाठी पाण्याची उपलब्धता करून देणे, सिंचनासाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देणे याला प्राधान्य दिले आहे. कृषी विकास योजने अंतर्गत सेंद्रीय शेती आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा उद्देश आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पशुपालन, डेअरी, मत्स्यविभाग, कृषी संशोधन व शिक्षणावर भर देण्यात येत आहे. कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण असा त्रिसूत्री कार्यक्रम राबवण्यावर भर देण्यात आला.

२००७ मध्ये शेतकऱ्यांसाठी एक राष्ट्रीय धोरण आखण्यात आले. कृषीसाठी ज्या विविध योजना तयार करण्यात आल्या, त्यांचे दृश्य परिणाम हळूहळू दिसू लागले आहेत. पीक विमा योजनेंतर्गत नैसर्गिक संकटे, कीटकनाशके, आजारपण, प्रतिकूल हवामान यामुळे पीक नष्ट झाल्यास शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची सोय झाली. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्रांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. कृषीविषयक प्रदर्शनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत नवे तंत्रज्ञान, शेतीतील नवेनवे प्रयोग पोहचवण्यात येत आहेत. देशी वाणाची बीजे आणि देशी गोवंश यांना प्राधान्य दिले आहे. शेळी या पाळीव प्राण्यासंदर्भात अखिल भारतीय पातळीवर संशोधन करण्यात आले. आदिवासी पाड्यांमध्ये लोकांचे दैनंदिन जीवनमान सुधारण्यासाठी शेळी या पाळीव प्राण्याच्या संगोपनावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. शेळी हा त्यांच्या जगण्याचा आधार झाला आहे. ग्रामीण भागातील कुक्कुटपालनावर विशेष लक्ष दिले गेले. अशा विविध प्रयत्नांमधून भारत पशुपालन, दूध उत्पादन, डेअरी विकास, मत्स्यपालन, पशुधन उत्पादन, अंडी, लोकर उत्पादन, मांस उत्पादन या क्षेत्रात प्रगती करत आहे. राष्ट्रीय पशुधन मिशनच्या माध्यमातून पशुधनासंदर्भात भारताने २०१४-१५ पासून जोरदार प्रगती करायला सुरुवात केली. यात चारा उपलब्धता, कर्ज उपलब्धी, पशुपालकांचे संघटन करणे व त्यांच्या अडी-अडचणी समजून घेणे यांवर भर देण्यात येत आहे. भारतात पशूंची गणना सर्वप्रथम १९१९-२० मध्ये झाली. २०१२ मध्ये एकोणिसावी पशू गणना करण्यात आली. भारतात पूर्वी मासे पकडण्याचा व्यवसाय महत्वाचा होता. त्याची जागा मत्स्यपालनाने घेतली आहे. हे क्षेत्र वेगाने विकसित होत आहे.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :** २००० मध्ये ग्रामीण भागाच्या विकासात पक्क्या रस्त्यांचे महत्त्व जाणून केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' सुरू केली. सुरुवातीला एक हजारपर्यंत लोकसंख्या असणारी गावे पक्क्या रस्त्यांनी जोडण्याचे काम सुरू झाले. २००१ मध्ये ही योजना 'प्रधानमंत्री ग्रामोदय

योजने'त समाविष्ट करण्यात आली. २००५ पर्यंत सुमारे ७५००० कि.मी. लांबीचे रस्ते या योजनेअंतर्गत बांधण्यात आले. देशाच्या आर्थिक प्रगतीचा लाभ ग्रामीण भागातील लोकांना विशेषत्वाने होऊन त्यांचे जीवन बदलून जावे हा या योजनेचा उद्देश होता. आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, घरे, रस्ते आणि वीज या सुविधांचा विकास करण्यासाठी ही योजना अंमलात आणली गेली.

### ११.२.२ नागरी विकासाच्या योजना

**जवाहरलाल नेहरू नागरी राष्ट्रीय पुनरुत्थान मिशन :** ही शहरांचा चेहरामोहरा बदलणारी योजना २००५ मध्ये सुरू झाली. या योजनेतून देशातील प्रमुख रस्ते, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, सांडपाणी व मलनि:सारण व्यवस्था, गरीब वस्ती विकास सुधारणा कार्यक्रमांना चालना देण्यात आली.

**सुवर्ण चतुष्कोन योजना :** १९९८ मध्ये केंद्र सरकारने दिल्ली-मुंबई-चेन्नई-कोलकाता या चार शहरांना जोडणाऱ्या महामार्गाच्या योजनेची घोषणा केली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून ही योजना राबविण्याचे ठरले. देशाच्या चारही भागांना जोडणारे दोन महामार्ग विकसित करणे, देशातील महत्वाच्या बंदरांपर्यंत जलद वाहतुकीच्या सोयी करणे इत्यादी कामांचा वरील योजनेत समावेश होता. जानेवारी २००८ पर्यंत एकूण ७३०० कि. मी. लांबीच्या महामार्गांचे जवळपास एक चतुर्थांश काम पूर्ण होऊन या योजनेने गती घेतली आहे.

**मेट्रो रेल्वे :** २००२ मध्ये दिल्ली शहरात 'मेट्रो रेल्वे' सुरू झाली. जमिनीवर आणि जमिनीच्या खाली धावणाऱ्या मेट्रोमुळे भारतातील महानगरांच्या वाहतूक व्यवस्थेत बदल घडून येत आहे. मेट्रोमुळे वाहतूक जलद झाली.

### ११.२.३ संपर्क साधने

**टपाल खाते :** इ.स.१७६६ मध्ये इंग्रजांनी भारतात टपाल खाते सुरू केले. त्याला आता अडीच शतके उलटून गेली आहेत. एके काळी फक्त पत्रांची देवाण-घेवाण करणाऱ्या पोस्टाने एकविसाव्या शतकात कात टाकली आहे. पोस्टाने आर्थिक क्षेत्रातसुद्धा पदार्पण केले आहे. पोस्टाच्या वतीने बचत खाते, मुदत ठेवी, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF), किसान विकास पत्र, सुकन्या समृद्धी खाते इत्यादी योजना राबवल्या जातात. यासाठी ऑगस्ट २०१८ पर्यंत २३,५५७ पोस्ट ऑफिसेसचे रूपांतर कोअर बँकिंग सोल्युशन (Core Banking Solutions) मध्ये करण्यात आले. ऑटोमेटेड टेलर मशिन (ATM) सुरू करण्यात आली. 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'ची म्युच्युअल फंड संबंधित उत्पादने ग्राहकांसाठी पोस्ट ऑफिसेसमधून उपलब्ध करून देण्यात आली आहेत. परदेशातून भारतात एखाद्या व्यक्तीला पैसे पाठवण्याच्या यंत्रणेत पोस्ट खाते महत्वाची भूमिका बजावत आहे.

**माहिती मिळवा.**

नॅशनल पेन्शन स्कीम, प्रधानमंत्री विमा सुरक्षा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, भारतीय पोस्ट पेमेंटस् बँक

**स्पीड पोस्ट :** या सेवेने पोस्टाचा चेहरामोहरा बदलला आहे. १९८६ मध्ये सुरू झालेल्या या सेवेने सध्या दर महिन्याला सुमारे तीन कोटीपेक्षा अधिक पत्रे वा पार्सल पाठवली जातात. स्पीड पोस्ट अंतर्गत पत्र पाठवल्यास पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीच्या मोबाईलवर पत्र पोचवल्याचा एसएमएस येतो. यामुळे पोस्टाची सेवा अधिक विश्वसनीय आणि गतिमान झाली आहे. याच्याच जोडीला पासपोर्ट सुविधा उपलब्धी, व्यावसायिक पार्सल, कॅश ऑन डिलीव्हरी, लॉजिस्टिक्स पोस्ट, हवाई माल वाहतूक याही क्षेत्रात पोस्टाने गती घेतली आहे. पूर्वी मोठ्या प्रमाणावर वस्तू, पत्रे, छापील मजकूर पाठवताना पत्र घडी घालून पाकिटात टाकणे, पाकिट चिकटवणे, पत्ता चिकटवणे इत्यादी कामे करावी लागत. आता पोस्ट खाते या सर्व गोष्टी स्वतःच जादा शुल्क आकारून करू लागले आहे. यामुळे पोस्टाचा व्यवसाय वाढला आहे. एक लाख पंचावन्न हजार पोस्ट ऑफिसेसच्या माध्यमातून विविध बिले, राख्या, दिवाळी शुभेच्छापत्रे इत्यादी सुविधा पुरवल्या जात आहेत.

ऋषिकेश व गंगोत्री येथून गंगाजल उपलब्ध करून

ते ग्राहकांपर्यंत पोहचवण्याची व्यवस्था २०१६ पासून सुरू झाली आहे. याच्याच जोडीला स्वतःचे छायाचित्र वापरून स्टॅम्प तयार करणे, नवीन तिकिटे विक्रीसाठी उपलब्ध करून देणे, तिकिटे संग्राहकांसाठी विशेष योजना राबवणे यासाठी ८० पोस्ट ऑफिसमधून 'पोस्ट-शॉप' योजना सुरू करण्यात आली आहे.

**माहिती मिळवूया.**

पोस्ट ऑफिस प्रमुखांची मुलाखत घेऊन माहिती मिळवा. सार्वभौम सुवर्णरोखे, इलेक्ट्रॉनिक इंडियन पोस्टल ऑर्डर, ई-डाकघर, ई-डाक, ई-पेमेंट पोर्टल, मोबाईल ॲप इत्यादी सेवांची माहिती जाणून घ्या.

**जाणून घेऊया.**

'रफी अहमद किडवाई नॅशनल पोर्टल ॲकॅडमी' (गाझियाबाद) या पोस्टासंदर्भातील संस्थेची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने जाणून घ्या.




टपाल तिकिट संग्राहकांकडे टपालखाते लक्ष देते. टपाल तिकिटे गोळा करणे हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठा छंद आहे. संग्राहकांसाठी कमी संख्येत, उत्कृष्ट कलात्मक दृष्टीची तिकिटे छापली जातात. एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या वर्षात पोस्ट विभागाने विविध विषयांशी संबंधित ५० तिकिटे छापली. यात मेघालयातील गुंफा, दुर्मीळ पक्षी, रामायण, महाभारत, भारतीय खाद्यपदार्थ, घरटी, कलात्मक विहिरी (उदा., गुजरातमधील राणी की बाव), हातपंखे, सूर्यमाला, भारतातील शिरोभूषण (उदा., पगडी, गांधी टोपी), चंपारण्य सत्याग्रहाची शताब्दी इत्यादी विषयांचा समावेश आहे. वेगवेगळ्या ४० देशांत भारतीय दूतावासाच्या माध्यमातून रामायणासंदर्भातील तिकिटे प्रकाशित करण्यात आली आहेत.

## ११.३ अर्थक्षेत्र

या क्षेत्रात अभूतपूर्व घडामोडी घडून आल्या. येथे एक उदाहरण अभ्यासासाठी घेतलेले आहे.

**स्वतंत्र निर्गुंतवणूक मंत्रालय :** उदारीकरणाच्या धोरणातून सार्वजनिक क्षेत्रातून शासनाची गुंतवणूक काढून घेण्याच्या भूमिकेतून भारत सरकारने हे मंत्रालय स्थापन केले. खाणउद्योग, तेलशोधन व शुद्धीकरण, रस्ते, बंदरे, दूरसंचार क्षेत्र, ऊर्जा क्षेत्र यातील गुंतवणूक हळूहळू कमी करण्याकडे सरकारने लक्ष दिले. सन २००२ मध्ये विमानवाहतूक, तेलक्षेत्र, दूरसंचार या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस सरकारने परवानगी दिली. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) या नव्या धोरणांमुळे आत्मविश्वास वाढलेल्या भारतीय कंपन्यांनी २००५ मध्ये पोलाद, औषध निर्मिती, चहा आणि मोटार उद्योगातील काही परदेशी कंपन्या विकत घेतल्या आणि जागतिक व्यापारात स्वतःचे स्थान दृढ केले.

सन २०१६ मध्ये या मंत्रालयाचे नाव 'डिपार्टमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट अँड पब्लिक ॲसेट मॅनेजमेंट' (दिपम) असे करण्यात आले.

## ११.४ ब्रिक्स

ब्रिक्स संघटनेची स्थापना (२००६), ब्राझील, रशिया, भारत, चीन, साऊथ आफ्रिका या राष्ट्रांच्या पुढाकाराने झाली. या देशांच्या नावातील आद्याक्षरे घेऊन BRICS नाव तयार झाले. या राष्ट्रांमधील व्यापार वाढवणे या उद्देशाने ब्रिक्सची स्थापना झाली आहे. २०१९ मध्ये ब्रिक्स राष्ट्रांची ११ वी परिषद ब्राझील येथे झाली. या परिषदेचा मध्यवर्ती विषय 'Economic Growth for an Innovative Future' असा होता. या परिषदेत वैज्ञानिक सहकार्य, तंत्रज्ञान व नवोन्मेष, डिजिटल अर्थव्यवस्था, बहुराष्ट्रीय गुन्हेगारी, आर्थिक गैरव्यवहार इत्यादी विषयांवर चर्चा झाली. (संदर्भ : BRICS.org.pib.nic.in)

## ११.५ विज्ञान आणि तंत्रज्ञान

या भागात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मोजक्या घटनांचा आढावा घेतलेला आहे.

पुण्यातील सी-डॅकच्या (सेंटर फॉर डेव्हलपमेंट

ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग) पुढाकाराने 'परम-८०००' हा महासंगणक निर्माण करण्यात आला होता. 'परम-१००००' हा महासंगणक १९९८ मध्ये आकाराला आला. या महासंगणकाची गणिती क्षमता प्रचंड होती. यामुळे भारताचा महासंगणकाच्या जागतिक बाजारपेठेत प्रवेश झाला. महासंगणक निर्मितीचे उच्च तंत्रज्ञान प्राप्त असलेल्या जगातील प्रमुख देशांमध्ये भारताला स्थान मिळाले. १९९९ मध्ये यापेक्षा अधिक विकसित असा 'परमपद्म' महासंगणक तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. २००३ मध्ये परमपद्म महासंगणक राष्ट्राला समर्पित करण्यात आला.

उदारीकरणाचा फायदा भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाला मिळाला. केंद्र सरकारचे सॉफ्टवेअर क्षेत्राच्या विकासासाठीचे अनुकूल धोरण, उद्योजकांची दूरदृष्टी, संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचा भारतभर झालेला प्रसार, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे कुशल संगणक अभियंते यांच्यामुळे १९९५-९६ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत सॉफ्टवेअर क्षेत्राचा वाटा ३.२% होता, तो २००५ नंतर २५% हून अधिक झाला.

१९९५ मध्ये भारतातील प्रमुख महानगरात इंटरनेट सेवा सुरू झाली. २००४ मध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ही कंपनी सॉफ्टवेअर सेवा पुरवणारी आशियातील सर्वात मोठी कंपनी ठरली. पुणे आणि बंगळुरु ही माहिती तंत्रज्ञान उद्योगाची विशेष केंद्रे म्हणून प्रसिद्धीला आली. भारतातील आंतरजाल तंत्राचा उपयोग करणाऱ्यांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय अभियंत्यांना जगभर वाढती मागणी आहे.

विज्ञानाच्या क्षेत्रात आपली अण्वस्त्रसज्जता सिद्ध करण्यासाठी भारताने राजस्थानमधील पोखरण येथे दोन वेळा अणुस्फोट चाचणी केली. समुद्र, समुद्रकिनारे आणि हवामान यांविषयी उपयोगी माहिती गोळा करण्यासाठी 'ओशनसॅट' या भारताच्या उपग्रहाचे ध्रुवीय कक्षेत पदार्पण झाले. २००० मध्ये दूरध्वनी सेवा, सेल्युलर फोन, इंटरनेट, ब्रॉडबँड सेवा देण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) कंपनीची स्थापना झाली.

भारतीय विज्ञान काँग्रेस संस्था (Indian Science Congress Association) : या संस्थेची स्थापना १५ जानेवारी १९१४ रोजी झाली. भारतातील वैज्ञानिक वातावरणास प्रोत्साहन व शोधनिबंध, संशोधनपत्रिका, नियतकालिके यांचे प्रकाशन करणे हा उद्देश. १९७५ मध्ये ६२ व्या संमेलनाचे अध्यक्षपद प्रथमच महिला वैज्ञानिक असीमा चॅटर्जी यांनी भूषवले. (Pib.nic.in, dst.gov.in)

२००७ मध्ये भारताने अवकाश संशोधनातील एका नव्या क्षेत्रात पदार्पण केले. इटलीचा उपग्रह भारताने व्यापारी तत्त्वावर अंतराळात सोडला. हे काम मिळवण्यासाठी अन्य राष्ट्रांनी चढ्या दराने किंमत आकारली होती. भारताने वाजवी किंमत आकारून हे काम केले. तरीही भारताला या व्यवहारातून नफा मिळाला. व्यापारी तत्त्वावर काम करण्यापूर्वी भारताने अर्जेंटिना, बेल्जियम, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया आणि जर्मनी या देशांचे उपग्रह अंतराळात सोडले होते. २००८ मध्ये भारताने प्रक्षेपित केलेल्या 'चांद्रयान-१' या उपग्रहाद्वारे चंद्रावर पाण्याचे पुरावे सापडले. त्यानंतर 'मंगळयान' आणि 'चांद्रयान-२' हे उपग्रह सोडले.

**VVPAT - Voter Verified Paper Audit Trail**

भारत सरकारने २०११ मध्ये नागालँडच्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी या यंत्राचा वापर करण्यास सुरुवात केली. २०१९ पासून लोकसभा निवडणुकीसाठी या यंत्रांचा सार्वत्रिक वापर झाला. मतदाराला आपण कोणाला मत दिलेले आहे हे यंत्रातील स्लीपद्वारे तपासता येते. मतदानानंतर काही सेकंदांसाठी मतदाराला स्लीप दिसते. मतदाराला या यंत्राद्वारे स्वतःच्या मताची खात्री करता येते.

### ११.६ संरक्षणविषयक घडामोडी

१९९९ मध्ये पाकिस्तानने काश्मीरमध्ये घुसखोरी केली. या घुसखोरीतून भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले. हे युद्ध प्रामुख्याने कारगिल-द्रास भागात घडले.

यामुळे या युद्धास कारगिल युद्ध म्हणतात. 'ऑपरेशन विजय' या मोहिमेअंतर्गत भारताने पाकिस्तानला नमवले. या युद्धाच्या निमित्ताने लष्कराच्या आधुनिकीकरणावर भर देण्याची गरज निर्माण झाली. लष्कराचे आधुनिकीकरण, शस्त्रास्त्र सज्जता, सैनिकांचे प्रशिक्षण या संदर्भात अधिक जागरूकता आली.

२००९ मध्ये भारताने अण्वस्त्र वाहून नेणाऱ्या 'अरिहंत' या पाणबुडीची निर्मिती केली. ही भारतातील पहिली अत्याधुनिक अशी अण्वस्त्रवाहक पाणबुडी होय. अशा पाणबुडीची निर्मिती करण्याचे तंत्रज्ञान साध्य करणारा भारत हा जगातील सहावा देश ठरला. या प्रकल्पात सरकारने खासगी उद्योजकांचीसुद्धा मदत घेतली होती.




पुढील काळात भारताने संरक्षण क्षेत्रात स्वदेशी (मेक इन इंडिया) तंत्रज्ञान वापरणे, सैन्यात महिला अधिकाऱ्यांची भरती याकडे लक्ष दिले. याच्याच जोडीला भारताने विविध देशांच्या सैन्यांबरोबर लष्करी सराव करण्यावर भर दिला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करणे, दहशतवाद्यांशी मुकाबला करणे, स्वतःच्या क्षमता वाढवणे, दहशतवादाचा बिमोड करताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर कसा करता येईल यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या धोरणातून भारत आणि ओमान देशाचे लष्कर यांच्यात हिमाचल प्रदेशातील 'बकलोह' येथे संयुक्त सराव झाला. नेपाळी सैन्याबरोबरच्या सरावात डोंगराळ भागात दहशतवाद्यांशी कसे लढायचे यावर भर देण्यात आला. जम्मू-काश्मीर रायफल्सचे सैनिक आणि मंगोलियाचे लष्कर यांच्यात संयुक्त सराव झाला. भारत व अमेरिका यांच्या संयुक्त सैन्याचा सराव अमेरिकेत झाला. श्रीलंकेच्या सैन्याबरोबरचा संयुक्त सराव महाराष्ट्र राज्यातील पुणे शहरात आयोजित केला गेला. या सरावात अर्धनागरी क्षेत्रातील दहशतवादविरोधात कृती कशी करता येईल संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. रशियाबरोबर भारतीय सैन्याचा संयुक्त सराव रशियात आयोजित करण्यात आला होता. असेच सराव बांगलादेश आणि इंग्लंड यांच्या बरोबरही आयोजित करण्यात आले होते.

या सरावांमुळे दोन्ही देशातील तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण होते. समस्या सोडवण्याचे अभिनव मार्ग हाताळले जातात. शस्त्रास्त्रांच्या आधुनिकीकरणामुळे संशोधनाला दिशा मिळते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतीय सैन्याने विदेशी महिला सैन्य अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. चेन्नईमध्ये आयोजित केलेल्या या प्रशिक्षणात अफगाण सैन्याच्या वायुदलातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शारीरिक क्षमतांचा विकास, अत्याधुनिक शस्त्रास्त्र प्रशिक्षण, रणनीति, संवादकौशल्ये, नेतृत्व प्रशिक्षण या गोष्टींचा समावेश होता. २०१६ मध्ये भारतीय हवाई दलात लढाऊ वैमानिक म्हणून प्रथमच तीन महिला कमिशन अधिकाऱ्यांना घेण्यात आले. यात अवनी चतुर्वेदी, भावना कांत, मोहना सिंह यांचा समावेश आहे. त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्या फ्लाईंग ऑफिसर पदावर कार्यरत आहेत.

सैन्यदलात प्रवेश करणे हा तरुण-तरुणींसाठी आपली कारकीर्द घडवण्याचा उत्तम मार्ग आहे. महिलांसाठी सैन्यात किमान आठ विभागात अल्पकालीन सेवा करण्याची (Short Service Commission) संधी उपलब्ध आहे. यात अल्पकाळासाठी लष्करात सेवा करता येते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातूनसुद्धा महिलांना सैन्यात भरती होता येते. ज्यांनी एनसीसीचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असेल त्यांना काही जागा राखीव असतात.

### ११.७ युवकांसंदर्भातील धोरण

भारत हा सर्वाधिक युवा लोकसंख्या असणारा देश आहे. वय १५ ते २९ असणाऱ्यांना युवक संबोधले

जाते. या युवकांना शिक्षणाच्या संधी, कौशल्य उपलब्ध करून दिल्यास हा युवावर्ग भारताच्या विकासात महत्त्वाचे योगदान देऊ शकेल. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या 'नेहरू युवा केंद्र संघटन' या संस्थेच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षण देणे सुरू झाले. या केंद्राच्या अखत्यारीतून जेवढे कार्यक्रम चालू होते ते 'राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रम' यात विलीन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अंतर्गत साक्षरता, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता, कुटुंबकल्याण, पर्यावरण संरक्षण, सामाजिक प्रश्नांसदर्भात जागृती, ग्रामीण विकास, कौशल्य विकास, स्वयंरोजगार इत्यादी विषयांवर भर देण्यात आला.

१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय युवक दिन' म्हणून पाळला जातो. जानेवारी महिन्यात राष्ट्रीय युवक महोत्सव साजरा करण्यात येतो. केंद्र सरकार आणि एखादे राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने हा समारोह आयोजित करण्यात येतो. युवकांमधील विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला जातो.

युवकांच्या साहसी वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी 'युथ हॉस्टेल्स' (युवकांसाठी वसतिगृहे) स्थापन करण्यात आली आहेत. केंद्र आणि राज्य यांच्या सहकार्याने ही वसतिगृहे उभारण्यात आली आहेत. युवकांना भारतात विविध ठिकाणी (ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या) कमीत कमी खर्चात राहण्याची सोय झाली. अशी जवळपास ८३ वसतिगृहे अस्तित्वात आली.

'स्काऊट आणि गाईड' संघटनेच्या माध्यमातून, राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme), राष्ट्रीय छात्र सेना (National Cadet Corps) इत्यादींसारख्या योजनांच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

## ११.८ माहितीचा अधिकार अधिनियम २००५

'माहितीचा कायदा' जगात सर्वप्रथम स्वीडन या देशाने १७७६ मध्ये लागू केला. संयुक्त राष्ट्रसंघाने इ.स.१९४६ मध्ये 'माहितीचा अधिकार' हा मानवाचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले. १९८२ मध्ये जयपूर शहरातील एल.के.कुलवाल यांनी या कामी पुढाकार घेतला. जयपूर शहरातील अस्वच्छतेच्या संदर्भात नगरपालिका काय कार्यवाही करते हे समजून घेण्यासाठी कुलवाल यांनी एक अर्ज केला. या संदर्भात उच्च न्यायालयातील खटल्यात न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात 'माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार' असल्याचे स्पष्ट केले. श्रीमती अरूणा रॉय यांनी १९९० मध्ये राजस्थानमध्ये 'मजदूर किसान शक्ती संघटन' चळवळ चालवली. या चळवळीने माहिती अधिकाराची गरज व्यक्त केली. बिलासपूरचे तत्कालीन विभागीय आयुक्त हर्ष मंडर यांनी सप्टेंबर १९९६ मध्ये 'अन्नधान्य वितरण व्यवस्था व रोजगार विनिमय' याबाबतची माहिती उघड करण्याचे धाडस दाखवले. अण्णा हजारे यांचे महाराष्ट्रातील माहितीच्या अधिकाराबाबतचे २००१ चे आंदोलन निर्णायक ठरले. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार कायदा १२ ऑक्टोबर २००५ पासून महाराष्ट्रात लागू झाला.


अण्णा हजारे

या कायद्यानुसार माहितीचा अर्थ अभिलेख (रेकार्ड), दस्तावेज (डॉक्युमेंटस्), ज्ञापने (मेमो), ई-मेल, अभिप्राय, सल्ला, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या (लॉगबुक), निविदा (टेंडर्स), अहवाल, पत्रव्यवहार, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवलेली आधारसामग्री (डेटा), इतकेच नव्हे तर सार्वजनिक प्राधिकरणात अस्तित्वात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली उपलब्ध होऊ शकणारी एखाद्या खासगी संस्थेविषयीची वा व्यक्तिविषयक माहिती या सगळ्याचा माहिती (इन्फरमेशन) या व्याख्येत समावेश होतो.

'माहितीचा अधिकार' (राईट टू इन्फरमेशन) या शब्दात माहिती मिळवण्याचे नागरिकांचे हक्क दिलेले असून त्यामध्ये कामाची, दस्तावेजांची वा अभिलेखांची पाहणी करणे, त्यासाठी दस्तवेजांच्या किंवा अभिलेखांच्या

अधिकृत प्रती मिळवणे, टिपणे काढणे, उतारे मिळवणे, प्रमाणित सामग्रीचे नमुने मिळवणे आणि सीडी, फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या व अशा स्वरूपात किंवा ही माहिती जर संगणकात साठवलेली असेल तर तिच्या मुद्रित प्रती मिळवण्याचा अधिकार अधोरेखित झाला आहे.

नागरिक सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून माहिती मागवू शकतात.

### ११.९ राज्यांची पुनर्रचना

इ.स.२००० हे वर्ष नवीन राज्यांच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे ठरले. या वर्षात मोठ्या राज्यांचे (मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार) विभाजन झाले आणि नवी राज्ये उदयाला आली. छत्तीसगढ (१ नोव्हेंबर २०००), उत्तराखंड (९ नोव्हेंबर २०००) आणि झारखंड (१५ नोव्हेंबर २०००) अशी तीन राज्ये उदयाला आली. भारताची भाषावार प्रांतरचना झाल्यावर प्रथमच अशा प्रकारे राज्यांची निर्मिती झाली.

**छत्तीसगढ :** छत्तीसगढ राज्य निर्माण करण्यात यावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम करण्यात आली. भारत स्वतंत्र झाल्यावर प्रांतरचनेच्या संदर्भात नेमलेल्या फाजल अली आयोगाने 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीची मागणी फेटाळली. १९९८ मध्ये मध्यप्रदेश विधानसभेत 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीचा ठराव मान्य झाला. पुढे केंद्र सरकारच्या पुढाकाराने छत्तीसगढ हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

**उत्तराखंड :** गढवाल व कुमाऊँ भागातील जनतेने १९३० मध्येच उत्तराखंड राज्याची मागणी केली होती. १९३८ च्या काँग्रेस अधिवेशनात त्याला पाठिंबा देण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात फाजल अली आयोगाने उत्तराखंड राज्याची मागणी फेटाळली. १९५७ पासून या भागातील जनतेने स्वतंत्र राज्यासाठी आंदोलन सुरू केले. १९७३ मध्ये 'उत्तराखंड पर्वतीय राज्य परिषद' स्थापन झाली. १९९४ मध्ये लोकआंदोलन तीव्र झाले. लोकांच्या भावनेची दखल घेऊन उत्तरप्रदेश राज्याच्या विधानसभेत स्वतंत्र राज्याचा ठराव संमत करण्यात आला. २००० मध्ये उत्तरांचल हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. पुढे त्याचे उत्तराखंड असे नामांतर झाले.

**झारखंड :** १९२९ मध्ये झारखंड राज्याची मागणी पुढे आली. १९४७ मध्ये अखिल भारतीय झारखंड पार्टीची स्थापना होऊन राज्यनिर्मितीच्या मागणीला वेग देण्यात आला. १९७३ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना स्वतंत्र राज्यनिर्मितीचे निवेदन देण्यात आले. १९९४ मध्ये बिहारच्या विधानसभेत झारखंड विकास स्वायत्त मंडळ स्थापनेचे विधेयक मंजूर झाले. ऑगस्ट २००० मध्ये बिहारचे विभाजन करून स्वतंत्र झारखंड राज्य स्थापन करण्याची तरतूद असणारे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

**तेलंगण :** हे राज्य २०१४ मध्ये अस्तित्वात आले. हे राज्य त्यापूर्वी आंध्र प्रदेश या राज्याचा भाग होते. तेलंगण राष्ट्रीय समितीने तेलंगण हे वेगळे राज्य घोषित करण्यासाठी आंदोलन सुरू केले. २००१ मध्ये भारत सरकारने तेलंगण हे स्वतंत्र राज्य होणार असे जाहीर केले. २०१४ मध्ये संसदेने या प्रस्तावास मान्यता दिली. २ जून २०१४ रोजी तेलंगण हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

**जम्मू-काश्मीर व लडाख :** स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतील ३७० व्या कलमान्वये या राज्याला विशेष दर्जा देण्यात आला होता.

१९४७ मध्ये प्रेमनाथ डोग्रा यांनी 'प्रजा परिषद पक्ष' स्थापन केला. या पक्षाने सुरुवातीला 'एक विधान, एक प्रधान, एक निशाण' अशी घोषणा दिली. १९५२ मध्ये 'एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशाण नही चलेंगे, नहीं चलेंगे' अशी घोषणा पुढे आली. जम्मू-काश्मीरचे भारतात संपूर्ण विलिनीकरण व्हावे अशी या पक्षाची मागणी होती. सत्तेवर असणारा नॅशनल कॉन्फरन्स पक्ष मात्र राज्याची स्वायत्तता गमवायला तयार नव्हता. जनसंघाचे नेते डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी संपूर्ण विलिनीकरणाच्या मागणीला पाठिंबा दिला. २०१९ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय घेतला. ३१ ऑक्टोबर २०१९ पासून जम्मू-काश्मीर राज्याऐवजी जम्मू-काश्मीर

आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले.

पुढील पाठात आपण भारतातील सामाजिक, क्रीडा व पर्यटन या क्षेत्रांविषयी माहिती घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. १९४७ च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो .................... करार म्हणून ओळखला जातो.
(अ) सिएटो (ब) नाटो
(क) गॅट (ड) सार्क

२. १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम .................... या देशात माहितीचा कायदा लागू झाला.
(अ) स्वीडन (ब) फ्रान्स
(क) इंग्लंड (ड) भारत

३. स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन .................... म्हणून साजरा केला जातो.
(अ) राष्ट्रीय शिक्षण दिन
(ब) राष्ट्रीय युवक दिन
(क) राष्ट्रीय एकात्मता दिन
(ड) राष्ट्रीय विज्ञान दिन


**प्र.२ (अ) ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. २००४ मध्ये ही कंपनी सॉफ्टवेअर सेवा पुरवणारी आशियातील सर्वात मोठी कंपनी ठरली –
२. २००२ मध्ये या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. कारण –
(अ) भारताला इतर देशांशी व्यापारी स्पर्धा करायची होती.
(ब) भारत जागतिक अर्थव्यवस्थेपासून लांब राहू शकत नाही.
(क) भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.
(ड) भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व करायचे होते.

**प्र.३ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ टीपा लिहा.**

१. भारत सरकारचे युवक धोरण
२. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना
३. स्पीड पोस्ट

**प्र.५ तुमचे मत नोंदवा.**

भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.

**प्र.६ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोणत्या योजना राबवल्या गेल्या?

**प्र.७ खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.
(अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली?
(ब) माहितीची व्याख्या
(क) माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क

**उपक्रम**

भारतातील घटक राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि त्यांच्या राजधानीच्या शहरांची नावे आंतरजालाच्या मदतीने शोधा.

# १२. बदलता भारत–भाग २

- १२.१ सामाजिक क्षेत्र
  - १२.१.१ आरोग्य
  - १२.१.२ पर्यावरण
  - १२.१.३ शिक्षण
- १२.२ क्रीडा क्षेत्र
- १२.३ सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन क्षेत्र

## १२.१ सामाजिक क्षेत्र

बदलत्या भारताचे प्रतिबिंब सामाजिक क्षेत्रातही उमटल्याचे दिसते. विविध कायद्यांच्या आधारे सामाजिक विषमता दूर करून आर्थिक विकास समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचवण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे. या दृष्टीने १९९३ चा 'मानव अधिकार संरक्षण कायदा' महत्त्वाचा आहे. या कायद्यान्वये 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ची (नॅशनल ह्यूमन राईट्स कमिशन) स्थापना करण्यात आली. जगण्याचे स्वातंत्र्य, समानता इत्यादी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि हे हक्क नाकारले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी हा आयोग स्थापन झाला. या कायद्यानुसार वृत्तपत्रात किंवा प्रसिद्धी माध्यमांमध्ये अन्यायासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल आयोग घेऊ शकतो. अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते किंवा सामाजिक संस्था तक्रार दाखल करू शकतात. २००५ मध्ये घरगुती हिंसाचार विरोधी कायदा संमत झाला. कुटुंबातील स्त्रियांना संरक्षण देण्यासाठी हा कायदा करण्यात आला. या कायद्यातील सगळ्यात लक्षणीय तरतूद म्हणजे 'आपल्या राहत्या घरावर पीडित महिलेची कायदेशीर मालकी असो वा नसो घरात राहण्याचा हक्क तिला आहे.'

२०११ च्या जनगणनेत ६ वर्षापर्यंतच्या वयोगटात दरहजार मुलांमागे मुलींचं प्रमाण ९१४ इतके घसरल्याचे पुढे आले. या आकडेवारीतून संभाव्य संकटाची चाहूल लागताच महिला संघटनांनी याविरोधात आवाज उठवला. महाराष्ट्र शासनाने गर्भलिंग तपासणी व गर्भलिंगनिदान यांवर बंदी घालणारा कायदा केला आणि 'लेक लाडकी' हे अभियान राबवले. यामुळे परिस्थितीत बदल होत आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**



हमीद दलवाई

हमीद दलवाई यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रभावामुळे १९७० मध्ये 'मुस्लीम सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना केली. मुस्लीम स्त्रियांच्या हक्कांसंबंधी कार्य करण्यावर त्यांचा भर होता. तोंडी तलाक पद्धतीला दलवाई यांनी विरोध केला. इ.स.२०१९ मध्ये संसदेने संमत केलेल्या कायद्यानुसार तिहेरी तलाक पद्धती रद्दबातल करण्यात आली आहे.

धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्र म्हणून भारतातील सर्व नागरिकांना एकच समान नागरी कायदा असावा असे त्यांचे मत होते.

### १२.१.१ आरोग्य

**पोलिओ निर्मूलन :** बदलत्या भारताचे प्रतिबिंब आरोग्याच्या क्षेत्रातही उमटले. १९९५ मध्ये भारत सरकारच्या आरोग्य विभागातर्फे 'पल्स पोलिओ' लसीकरणाची मोहीम सुरू झाली. जागतिक आरोग्य संघटना (WHO), युनिसेफ, रोटरी इंटरनॅशनल आणि भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवण्यात आली. ही मोहीम पोलिओ रोगाचे उच्चाटन करण्यासाठी होती. पाच वर्षे वयापर्यंतचे एकही बालक–



दो बूँद जिंदगी के

लसीकरणातून वगळले जाणार नाही असा चंग बांधून ही मोहीम राबवण्यात आली. ही योजना यशस्वी होण्यासाठी शिबिरे, घरोघरी लसीकरण, प्रसार माध्यमातून जाहिराती यांसारख्या उपायांचा अवलंब करण्यात आला.

**आयुष :** आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, होमिओपॅथी इत्यादी चिकित्सापद्धतींच्या विकासासाठी १९९५ मध्ये केंद्र सरकारच्या 'आरोग्य व कुटुंबकल्याण' मंत्रालयाने स्वतंत्र विभाग स्थापन केला. २००९ पासून हा विभाग 'डिपार्टमेंट ऑफ आयुर्वेद, योग अँड नॅचरोपॅथी, युनानी, सिद्ध अँड होमिओपॅथी' (AYUSH) या नावाने ओळखला जातो. या विभागाच्या वतीने या चिकित्सा प्रणालींच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा करणे, गुणवत्तावाढ, संशोधन, औषधप्रमाणीकरण यावर भर देण्यात येत आहे.

**करून पहा.**

NRHM - राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन कार्यक्रमातून जनतेला होणाऱ्या फायद्यांची यादी करा.

### १२.१.२ पर्यावरण

**प्रदूषण :** वायू प्रदूषणाचा प्रश्न भारतातील सर्वच राज्यांना कमी अधिक प्रमाणात भेडसावत आहे. वाहनांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण हा मोठा चिंतेचा विषय आहे. सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट संस्थेने दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास करून या प्रश्नाची तीव्रता जनतेसमोर मांडली. प्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे वाहनांची वाढती संख्या, वाहनांच्या देखभालीकडे दुर्लक्ष अशा कारणांमुळे आणि वाहनांच्या धुरातून हवेत मिसळणारे घातक वायू आणि काजळीचे कण हे दिल्लीच्या प्रदूषणाला प्रामुख्याने कारणीभूत आहेत असे सिद्ध झाले आहे. या प्रदूषणाचा परिणाम दिल्लीतील वारसा वास्तूंवरही होत आहे. या प्रश्नावर उपाय म्हणून घनीकृत नैसर्गिक वायू (सीएनजी-कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस) वापरण्याची शिफारस संस्थेने केली. या शिफारशीच्या आधारे १९९८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील सर्व सार्वजनिक वाहनांमध्ये सीएनजीचा वापर करण्याचा निर्णय दिला. पुढे 'नो पीयूसी नो इन्शुरन्स पॉलिसी' (PUC-Pollution under Control) असे धोरण आले. पीयूसी प्रमाणपत्र असल्याशिवाय वाहन विमा काढता येणार नाही किंवा त्याचे नूतनीकरण करता येणार नाही असे धोरण अमलात आले. यामुळे पीयूसी प्रमाणपत्र देणारी केंद्रे सुरू झाली. कारखान्यांतील रासायनिक प्रक्रियांमुळे प्रदूषित झालेले पाणी नद्यांमध्ये सोडणे हे जलप्रदूषणाचे मुख्य कारण आहे.

पर्यावरण रक्षणासाठी अनेक व्यक्तींनी मोलाची कामगिरी बजावली आहे. सुंदरलाल बहुगुणा ('चिपको' आंदोलन), मेधा पाटकर ('नर्मदा बचाव' आंदोलन) आणि डॉ.राजेंद्र सिंह ('जलसंधारण' क्षेत्र) यांचे कार्य अत्यंत महत्वाचे मानले जाते.

प्लॅस्टिकसारख्या मानवनिर्मित, अविघटनशील पदार्थांमुळे आणि रासायनिक खते व कीटकनाशके यांच्यामुळेही पाणी व अन्नधान्याचे प्रदूषण वाढते आहे. तसेच या सर्वांमुळे जमिनीचा कस कमी होतो. त्यामुळे माणसे, प्राणी आणि वनस्पती यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊन आरोग्याला हानी पोचवणारी परिस्थिती निर्माण होत आहे.

**करून पहा.**

वायूप्रदूषण रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याची यादी करा.

पर्यावरणाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील तीन प्रयोगांची विशेष दखल घेणे आवश्यक आहे.

**राहीबाई पोपेरे :** ८ मार्च २०१८ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्रातील राहीबाई पोपेरे यांना नारी शक्ती पुरस्कार दिला. 'कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन समिती'च्या माध्यमातून केलेल्या कामाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. त्या बीजमाता (सीडमदर) या टोपण नावाने सर्वत्र ओळखल्या जातात. देशी वाण निर्माण करणे, त्याचे जतन करून ठेवणे, त्याला पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे हे काम त्यांनी केले आहे. संकरीत धान्य आणि भाजीपाला खाऊन त्यांचा नातू आजारी पडला. त्यावर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून राहीबाईंना देशी वाण वापरणे हा उपाय सुचला. त्यांनी स्वतःच्या



राहीबाई पोपेरे

कुटुंबासाठी लागणारे धान्य आणि भाजीपाला देशी वाणातून निर्माण करण्याचे ठरवले. घरात खाण्यासाठी देशी वाण पिकवायचे आणि पीक आल्यावर त्यातून निवडक बिया साठवून ठेवायच्या असे काम त्यांनी सुरू केले. कारले, पालक, तांदुळजा, गोड वाल, कडू वाल, घेवडा, भुईमूग, वरई, ढवूळ भात, काळभात, आंबेमोहोर, उडीद अशा विविध प्रकारच्या भाज्या, रानभाज्या आणि कडधान्यांचे वाण त्यांनी जपले. स्वतःच्या घरापासून सुरू झालेला उपक्रम त्यांनी बचतगटाच्या माध्यमातून सर्वत्र पोहचवायला सुरुवात केली. भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशनच्या (बाएफ) सहकार्याने हा उपक्रम फोफावला.

राहीबाई मातीच्या मडक्यात देशी वाणाचे बियाणे जतन करतात. मातीच्या मडक्याला शेणामातीने लिंपतात. त्यामुळे बियाणांना भुंगे किंवा मुंग्या लागत नाहीत. मडक्यात राखेचा व कडुनिंबाचा वापर करतात. आता या बियाणे बँकेत ५० हून अधिक पिकांचे, ३० हून अधिक भाजीपाल्याचे वाण जमा झाले आहेत. बीबीसीने २०१८ मध्ये विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या जगभरातील १०० महिलांची निवड केली. त्यात राहीबाईंचा समावेश आहे.

**भाऊ काटदरे :** सह्याद्री निसर्ग मित्र या संस्थेच्या माध्यमातून भाऊ काटदरे व त्यांचे सहकारी निसर्ग संवर्धनाचे कार्य करतात. इ.स.१९९९ मध्ये पांढऱ्या पोटाचा समुद्री गरूड या पक्ष्याचे अस्तित्व धोक्यात आल्याचे भाऊंनी वाचले. या पक्ष्याचा बचाव आणि संवर्धन करण्यासाठी भाऊंनी रत्नागिरी जिल्ह्यात काम सुरू केले. रत्नागिरी जिल्ह्याला असणारा समुद्रकिनारा पायी हिंडून लोकांमध्ये या पक्ष्यांसंदर्भात जागृती केली. या प्रवासात त्यांनी ६२ घरट्यांची स्थाने शोधून काढली. हे करत असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती बंदराच्या आसपास वेंगुर्ला रॉक्सजवळ बंद्रा बेटावर भाऊ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तस्करीच्या घटना दिसल्या. तस्कर लोक पाकोळ्यांची घरटी विकून विदेशातून पैसे मिळवत होते. पाकोळ्यांना संरक्षण देणे गरजेचे होते. या घटनेमुळे आणि संस्थेच्या प्रयत्नातून पाकोळ्यांचा समावेश भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या शेड्यूल 'I' मध्ये झाला. सह्याद्री निसर्गमित्र संस्थेचे हे मोठे काम होय.


भाऊ काटदरे

याच संस्थेने आणखी एक महत्त्वाचे काम कासवांच्या संदर्भात केले. 'वेळास'च्या समुद्रकिनाऱ्यावर 'ऑलिव्ह रिडले' जातीची कासवे अंडी घालण्यासाठी येतात, त्यांच्या संरक्षणाची मोहीम उभारली. पहिल्याच वर्षी कासवांची ५० घरटी संरक्षित करण्यात आली. त्यातून २७३४ कासवे समुद्रात गेली. या घटनेच्या निमित्ताने 'कासव महोत्सव' आयोजित करण्यात आला. कासव समुद्रात जाताना बघायला देश-परदेशांतून शेकडो पर्यटक यायला लागले. त्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण होताच गावातच स्थानिकांच्या घरात 'होम स्टे' पर्यटन विकसित केले गेले. ग्रामस्थांना प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे निसर्ग संवर्धनातून पर्यटन उभे राहिले. संपूर्ण महाराष्ट्रात या कामाची दखल घेण्यात आली. भाऊ काटदरे आणि त्यांचे सहकारी सह्याद्री निसर्ग मित्र या संस्थेच्या माध्यमातून दुर्मीळ असणारे खवले मांजर वाचवा मोहीम चालवत आहेत.

**प्रेमसागर मेस्त्री :** भारतात गिधाडांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होत आहे. गिधाडे म्हणजे निसर्गातील सफाई करणारे स्वच्छतादूत. रायगड परिसरात 'लाँगबील व्हल्चर' आणि 'व्हाईटबॅक व्हल्चर' अशा गिधाडांच्या दोन जाती आढळतात. त्यांची संख्या वाढवणे, त्यांच्या खाण्यासाठी अन्न उपलब्ध करून देणे यासाठी प्रेमसागर मेस्त्री आणि त्यांचे सहकारी Society for Eco Endangered Species Conservation and Protection (SEESCAP) संस्थेच्या माध्यमातून कार्यरत आहेत. प्राण्यांना दिले जाणारे औषध गिधाडांसाठी काहीवेळा विष ठरते. उंच झाडांची कमी झालेली संख्या, अन्नाची कमतरता यांमुळे गिधाडांचे अस्तित्व धोक्यात आले होते. ही परिस्थिती बदलण्यात सी-स्कॅप संस्थेला यश मिळत आहे.

### १२.१.३ शिक्षण

१९९० हे 'आंतरराष्ट्रीय साक्षरता' वर्ष म्हणून जाहीर झाले होते. त्या पार्श्वभूमीवर केरळ सरकारने आपले पूर्ण राज्य साक्षर करण्याचा चंग बांधला आणि ही कामगिरी भारतात सर्वप्रथम करून दाखविली.

त्यानुसार केरळ हे पूर्णतः साक्षर होणारे भारतातील पहिले राज्य ठरले.

**करून पहा.**

१९९० हे आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष होते. याच प्रकारे काही वैशिष्ट्यपूर्ण वर्षे आणि योजना यांची सांगड घालून यादी तयार करा.

केरळच्या साक्षरता मोहिमेत वाचणे, लिहिणे, गणितातील कौशल्ये आत्मसात करणे, स्वच्छतेचे महत्त्व, बालकांचे लसीकरण, सहकारी तत्त्वावरील शेती आणि बचतीचे महत्त्व या उपक्रमांचा समावेश होता. ही मोहीम राबवत असताना काही नव्याच समस्या समोर उभ्या ठाकल्या. साक्षरता मोहिमेत सामील होणाऱ्या अनेक ज्येष्ठ नागरिकांमध्ये दृष्टिदोष होते. अकुशल कामगारांचे डोळे तपासणे, चष्मा करवून घेणे या गोष्टी नागरिकांना आर्थिकदृष्ट्या महाग वाटत होत्या. यावर उपाय म्हणून मोफत नेत्र तपासणी शिबिर आणि चष्मे वाटप उपक्रम राबवण्यात आला. यामुळे हे लोक साक्षरता वर्गाला येऊ लागले. सरकार आणि लोक एकत्र आले तर संकटांवर विधायक इच्छाशक्ती कशी मात करू शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

एर्नाकुलम हा केरळमधील जिल्हा ४ फेब्रुवारी १९९० मध्ये पूर्णतः १०० टक्के साक्षर झालेला जिल्हा होय.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

मुलांना मातृभाषेप्रमाणेच इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय घेतला. ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे या कौशल्यांवर भर देण्यात येऊन इंग्रजी भाषा शिकणे आनंददायी करण्यावर भर देण्यात आला. या अभ्यासक्रमाला अनुसरून उत्तम, सचित्र पाठ्यपुस्तके तयार करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने (बालभारती) पार पाडली. या उपक्रमाचे राष्ट्रीय ज्ञान आयोगाने कौतुक केले.

### प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी १९९४ मध्ये डिस्ट्रीक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्राम (DPEP) हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ, हरयाणा व आसाम या सात राज्यांत हा कार्यक्रम राबविण्यात आला. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के पटनोंदणी, उपस्थिती, विद्यार्थी गळती रोखणे, इत्यादी उद्दिष्टांचा यात समावेश होता. या उपक्रमासाठी जागतिक बँकेने आर्थिक मदत दिली होती.

**शालेय पोषण आहार :** या उपक्रमाद्वारे प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांचे योग्य पोषण व्हावे म्हणून 'माध्यान्ह भोजन योजना' १५ ऑगस्ट १९९५ पासून सुरू झाली. पोषक घटकांनी युक्त असा शिजवलेला आहार देण्यास सुरुवात झाली. जेथे हे शक्य नव्हते तेथे प्रतिविद्यार्थी धान्य पुरवण्याची सोय करण्यात आली.

**सर्व शिक्षा अभियान :** 'सारे शिकू या, पुढे जाऊ या' असे ध्येयवाक्य बाळगून सर्व शिक्षा अभियान २००१ मध्ये सुरू झाले. त्या अगोदर ८६ व्या घटना दुरूस्तीद्वारे ६ ते १४ वयोगटातील मुलांना 'मोफत शिक्षणाचा मूलभूत अधिकार' देण्यात आला. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील विषमता दूर करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश होता. ही योजना यशस्वी होण्यासाठी यापूर्वीच्या खडू-फळा योजना, पोषक आहार योजना अशा सर्व योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले. मुलींचे शिक्षण, दिव्यांगांचे शिक्षण याकडे या योजनेत विशेष लक्ष देण्यात आले.

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी २००४ मध्ये 'एज्युसॅट' हा उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला. भारताचे ६ विभाग कल्पून ६ वाहिन्यांची सोय देशभरात करण्यात आली. या उपग्रहामुळे भारतभर प्रादेशिक भाषांमधून शैक्षणिक कार्यक्रम सुरू झाले.

### १२.२ क्रीडा क्षेत्र

एकेकाळी ऑलिंपिकमध्ये हॉकी हा खेळ भारताला सतत विजय मिळवून देत होता. कुस्तीमध्ये खाशाबा जाधव यांनी ऑलिंपिकमध्ये भारताचा झेंडा उंचावला. जागतिकीकरणानंतरच्या कालखंडात भारताच्या

**शिक्षण – विशेष संदर्भ महाराष्ट्र**

बदलत्या भारताचे प्रतिबिंब आपणांस शिक्षण क्षेत्रातही उमटल्याचे दिसते. दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांच्या रचनेत काही बदल सुचविले. यानुसार नव्या अभ्यासक्रमात लोकशाही तत्वे, सामाजिक न्याय, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांच्या जाणीवा, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण रक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, लोकसंख्या, शिक्षण, वैज्ञानिक वृत्ती यांवर भर देण्यात येत आहे. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला पूरक असणाऱ्या विविधतेतील एकतेस चालना देण्याचा प्रयत्न अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करण्यात येऊ लागला. वरील उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी राज्यपातळीवर शिक्षकांचे व्यापक प्रमाणावर प्रशिक्षण करण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या धर्तीवर राज्य साक्षरता मिशन स्थापण्यात आले. यामुळे राज्यभर शिक्षणाच्या प्रशिक्षण आणि पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात जागृती निर्माण झाली.

१९९० मध्ये आचार्य राममूर्ती समितीचा अहवाल केंद्र शासनास प्राप्त झाला. या समितीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची चिकित्सा केली आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, स्त्रिया व मागासवर्गीयांचे शिक्षण, शैक्षणिक लोकशाही या मुद्द्यांवर समितीत भर दिला. शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क असावा आणि शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या खर्चातील वाटा वाढवावा, अशी शिफारस करण्यात आली.

याखेरीज शिक्षणखात्याने शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या दप्तराचे ओझे किती असावे याचाही विचार केला गेला आणि त्याचे प्रमाण ठरवले गेले. बालवाडीतील प्रवेशासाठी मुलांच्या मुलाखतीवर बंदी घालण्यात आली. नव्या सहस्रकात सरकारने सर्व शिक्षा मोहिमेच्या अंतर्गत सर्व मुलांना शाळेत दाखल करा, शिक्षणाचा दर्जा वाढवणे, शिक्षणातील स्त्री-पुरुष तफावत नाहिशी करणे, २०१० पर्यंत शाळांमध्ये संपूर्ण उपस्थितीचे उद्‌दिष्ट साध्य करण्याचे ठरले. शालेय विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी म्हणून शासनाने पूरक पुस्तकांची योजना कार्यान्वित केली.

केंद्रशासन, संरक्षण दल यात नोकरी करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना बदली झाल्यावर शैक्षणिक समस्यांना तोंड द्यायला लागू नये म्हणून देशात सर्वत्र सारखा अभ्यासक्रम असणाऱ्या केंद्रीय विद्यालयांची साखळी उभारण्यात आली. या विद्यालयांमध्ये अभ्यासाबरोबरच खेळांवर भर, अभ्यासेतर उपक्रम यावर भर देण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील रात्रशाळा, साखरशाळा या उपक्रमांची विशेष दखल घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात पहिली रात्रशाळा पुण्यात महात्मा जोतीराव फुले यांनी एकोणिसाव्या शतकात सुरू केली. यातूनच प्रेरणा घेऊन अनेक रात्रशाळा राज्यात चालू आहेत. दिवसभर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त आहे. राज्यात ऊसतोडणी हंगामाच्या कामात शेकडो कामगार विविध साखर कारखान्यांच्या ठिकाणी जातात. या कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी सोय म्हणून साखर कारखान्यांच्या परिसरात 'साखरशाळा' सुरू करण्यात आल्या आहेत. राज्यात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे. यातूनच सिंधुदुर्ग व वर्धा जिल्हे पूर्ण साक्षर झाले. तसेच प्रौढशिक्षणाच्या कार्यासही गती मिळाली आहे. शासनाने शालेय विद्यार्थ्यांसाठी पूरक वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली.

कानाकोपऱ्यातून अनेक खेळाडू पुढे आले. ज्याच्याकडे कौशल्य आहे तोच खेळाडू पुढे जाणार हे जागतिकीकरणाने घडवून आणले. या काळाचे वैशिष्ट्य म्हणजे भूतकाळातील यशाच्या आधारे



खाशाबा जाधव

कोणत्याही खेळाडूला वर्तमान किंवा भविष्यात स्वतःचे स्थान अबाधित राखण्याची खात्री नाही. सर्वच क्षेत्रांतील खेळाडूंना आपली कामगिरी वारंवार सिद्ध करणे अनिवार्य असते.

रोज नवे-नवे विक्रम घडत आहेत. खेळाचे स्वरूप बदलत चालले आहे. खेळातील वेळासंदर्भात बदल होत

आहेत. क्रिकेटचे उदाहरण घेऊया. पूर्वी पाच दिवस चालणारे क्रिकेटचे सामने पुढे एका दिवसावर आले. एका दिवसाचे सामने पुढे २० षटकापर्यंत सीमित झाले. पूर्वी कुस्ती चितपट होईपर्यंत चालायची. आता ती गुणपद्धतीनेसुद्धा खेळतात.

कबड्डी, हॉकी, क्रिकेट, जलतरण, बॅडमिंटन, भारोत्तोलन (वेटलिफ्टिंग), नेमबाजी, बुद्धिबळ, मोटर स्पोर्टस्, स्काय डायव्हिंग, मुष्टियुद्ध, तिरंदाजी, कुस्ती, फुटबॉल, टेनिस, टेबल-टेनिस, बिलियर्डस, मल्लखांब अशांसारखे अनेक खेळ आज खेळले जातात. प्रसारमाध्यमांनी, वृत्तवाहिन्यांनी या खेळांना स्वतंत्र जागा दिली आहे.

भारतीय पातळीवर खेळांशी संबंधित नियतकालिके सुरू झाली आहेत. काही वाहिन्या फक्त खेळांना वाहिल्या आहेत. या वाहिन्यांचा प्रेक्षकवर्ग, वाहिन्यांवरील जाहिराती, जाहिरातींचा वेळ आणि खर्च यांमधून एक स्वतंत्र अर्थविश्व आकाराला आलेले आहे.

भारतभर आता प्रत्येक खेळाच्या संघटना उभ्या राहिल्या आहेत. संघटना खेळाडूंमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक करीत आहेत. उदा., फुटबॉलसारख्या खेळात एखाद्या खेळाडूला क्लब दत्तक घेतो. त्या खेळाडूंची काळजी घेतात. या खेळाडूच्या नावाने तो क्लब ओळखला जातो. तो खेळाडू काही कालावधीसाठी क्लबशी करारबद्ध होतो. क्रिकेटचे आयपीएल सामने, एकदिवसीय विश्वकरंडक सामने,ट्वेंटी-ट्वेंटी विश्वचषक सामने, प्रो कबड्डी लीग या सारख्या खेळांना जगभरचे प्रेक्षक लाभले आहेत. या जगभरच्या प्रसारणाच्या हक्कांमुळे खेळाडूंच्या मानधनात भर पडली. त्यामुळे खेळाडूंचे जीवन बदलून गेले आहे.


सचिन तेंडुलकर

शासन खेळाडूंच्या कामगिरीची दखल घेत असते. एखाद्या खेळाडूने अभूतपूर्व कामगिरी केल्यास सरकार त्याचा विशेष सन्मान करीत आहे. सचिन तेंडुलकर यांच्या १०० शतकांच्या कामगिरीचा विचार करून भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान दिला. त्यांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती केली. समाजाचाही खेळाडूंकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. खेळाकडे व्यावसायिक कारकीर्द म्हणून पाहिले जात आहे. शालेय-महाविद्यालयीन शिक्षणात खेळ हा अविभाज्य घटक झाला आहे.

**क्रीडा धोरण :** आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय खेळाडूंचा वाढत चाललेला सहभाग, खेळात विज्ञानाचा वाढता वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान यांमुळे प्रत्येक देश आपल्या क्रीडा धोरणाबद्दल दक्ष आहे. भारत सरकारने २००१ मध्ये क्रीडा धोरणाची घोषणा केली. खेळांचा विस्तार करणे, खेळाडूंना खेळांमध्ये प्रावीण्य मिळवण्यास मदत करणे, खेळांसाठी पूरक आणि मूलभूत सोयी उभारणे, राष्ट्रीय क्रीडा फेडरेशन आणि सहयोगी संस्थांना मदत करणे व खेळाडूंचा शोध घेणे, खेळांच्या प्रसारासाठी लोकसहभाग व जागृती करणे ही क्रीडा धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

२०११ मध्ये भारत सरकारने 'या आणि खेळा' ही योजना सुरू केली. या योजनेच्या अंतर्गत स्पोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियाने जवाहरलाल नेहरू स्टेडिअम, डॉ.करणसिंह शुटींग रेंज, डॉ.एस.पी.एम. स्विमिंग पूल संकुल, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम ही दिल्लीतील पाच क्रीडा संकुले खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आली. याखेरीज येथे खेळायला येणाऱ्या मुलांसाठी SAI च्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्याची संधी मिळू लागली. याच्याच पुढचा टप्पा म्हणजे मणिपूरमध्ये 'नॅशनल स्पोर्टस् युनिव्हर्सिटी'ची स्थापना होय. येथे खेळांचे प्रशिक्षण, खेळांचे व्यवस्थापन, क्रीडा मानसशास्त्र इत्यादी विषयांचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. याशिवाय संशोधनालाही प्रोत्साहन दिले जाते. २०१८-१९ पासून एम.एस्सी. (खेळांचे प्रशिक्षण) व एम.ए. (खेळांचे मानसशास्त्र) यांचे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाले.

**खेलो इंडिया :** २०१७ पासून भारत सरकारने पूर्वीच्या काही योजना आणि नवी उद्दिष्टे एकत्र करून ही योजना सुरू केली. खेळांना व्यापक जनाधार देणे आणि खेळांमध्ये उत्तम दर्जा गाठणे यासाठी ही योजना सुरू झाली. या योजनेचे १२ घटक आहेत. यात शालेय पातळीपासून विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करणे, मुलींचा

सहभाग वाढवणे इत्यादींचा समावेश आहे.

खेळांच्या विकासासाठी राष्ट्रीय खेळ विकास कोष (National Sports Development Fund) स्थापन करण्यात आला. त्या कोषाला देणगी दिल्यास त्या रकमेवर आयकरात १००% सूट आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद लाईफटाईम अचिव्हमेंट पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, मौलाना अबुल कलाम आझाद ट्रॉफी, राष्ट्रीय खेल प्रोत्साहन इत्यादी पुरस्कार दिले जातात. ऑलिंपिक खेळात सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूस भारत सरकार ७५ लाख रुपयांचे बक्षिस देते. पॅरा ऑलिंपिक, एशियाड, राष्ट्रकुल, विश्वकप, आशियाई चॅम्पियनशिप, आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्पर्धा, दिव्यांगांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धा, दृष्टीहीन खेळाडूंची क्रिकेट स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक अथवा विजेतेपद मिळवणाऱ्या संघास रोख बक्षिसे, खेळाडूंना नोकऱ्या दिल्या जातात.

याशिवाय विजेत्या खेळाडूंना निवृत्त झाल्यावर पेन्शन दिली जाते. एप्रिल २०१८ पासून ऑलिंपिक खेळातील विजेत्यास दर महिना २० हजार रूपये तर आशियाई खेळातील विजेत्यास बारा हजार रुपये दरमहा देण्यात येतात.

या सर्व मार्गांनी भारत सरकार खेळाकडे युवकांचे लक्ष वेधून घेत आहे. विद्यार्थ्यांना खेळांत करिअरच्या विविध संधी आता मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेल्या आहेत.

## १२.३ सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन क्षेत्र

पर्यटन हे क्षेत्र दिवसेंदिवस अधिक प्रगत, विकसित होत जाणारे क्षेत्र आहे. या क्षेत्रातून आपल्या देशास परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळते. भारताला भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या आणि त्यातून मिळणाऱ्या परकीय उत्पन्नात प्रतिवर्षी वाढ होत आहे. विदेशी पर्यटकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून गृह, पर्यटन आणि विदेश मंत्रालय यांनी एकत्र येऊन ई-व्हिसा सुविधा सुरू केली. यात ई-व्यावसायिक व्हिसा, ई-मेडिकल व्हिसा, ई-व्हिसा सुविधा देण्यात आल्या. २०१६ पासून या पर्यटकांना हिंदी, इंग्रजीशिवाय १० परकीय भाषांमध्ये आठवड्याचे सर्व दिवस आणि २४ तास माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अरबी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, जपानी, कोरियन, चिनी, पोर्तुगीज, रशियन आणि स्पॅनिश भाषेत पर्यटकांना त्यांच्या मोबाईलवर माहिती दिली जाते. १३६३ या क्रमांकावर दूरध्वनी केल्यास पर्यटकांना पर्यटन मंत्रालयाच्या वतीने माहिती उपलब्ध करून दिली जाते. या योजनेअंतर्गत क्रुझवरील पर्यटन, साहसी क्रीडा पर्यटन, आरोग्य योजनांशी संबंधित पर्यटन, गोल्फ, पोलो, पर्यावरणपूरक पर्यटन, चित्रपटविषयक महोत्सव इत्यादी विषयांचा समावेश आहे.

पर्यटकांशी कसे वागावे, त्यांना कोणत्या प्रकारची मदत करावी, या संदर्भातील वागण्या-बोलण्याचे शिष्टाचार यांचे पद्धतशीर शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. पर्यटकांना राहण्याची उत्कृष्ट सोय करण्यासाठी हॉटेल्स निर्माण करण्यात आली आहेत. आतिथ्य आणि हॉटेल व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या उत्तम संस्था अनेक शहरात आहेत.

**करून पहा.**

- पर्यटनातून कोणकोणते रोजगार निर्माण होतात त्याची यादी तयार करा.
- भारतातील ऐतिहासिक पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी उपाय सुचवा.

पर्यटनास उभारी देण्यासाठी तसेच अधिकाधिक पर्यटक आकर्षित करण्यासाठी 'अतुल्य भारत' ही मोहीम राबवण्यात आली. स्वदेशातील पर्यटनास चालना देण्यासाठी डिस्कव्हरी चॅनेलच्या सहकार्याने 'गो नॉर्थईस्ट' (ईशान्य भारताकडे चला) हा दूरदर्शनवरील कार्यक्रम प्रदर्शित करण्यात येऊ लागला. स्वदेश दर्शन यात्रेअंतर्गत भारतात १३ प्रकारच्या यात्रा आयोजित करण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने हिमालय परिक्षेत्र, समुद्री तटवर्ती प्रदेश, बौद्ध तत्वज्ञानाशी संबंधित क्षेत्रे इत्यादी ठिकाणांचा समावेश आहे.


संपूर्ण जगाला भारतातील वैशिष्ट्यपूर्ण स्थळांची

**इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज** (INTACH) : या संस्थेची स्थापना १९८४ मध्ये नवी दिल्ली येथे करण्यात आली. INTACH चे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. आज देशभरात २०० हून अधिक शाखांसह INTACH ला वारसा जतन व जागृती करणारी भारतातील मोठी संस्था म्हणून ओळखले जाते. मागील ३५ वर्षांत INTACH ने केवळ नैसर्गिक आणि मानव निर्मित वारसाच नव्हे तर अमूर्त वारसा संवर्धनाचे काम केले आहे. आर्किटेक्चरल हेरिटेज, नैसर्गिक वारसा, भौतिक वारसा, अमूर्त सांस्कृतिक वारसा, हेरिटेज एज्युकेशन अँड कम्युनिकेशन सर्व्हिसेस (एचईसीएस), शिल्प कक्ष, विविध शाखा, इंटॅक हेरिटेज ॲकॅडमी, हेरिटेज टुरिझम, लिस्टिंग सेल, लायब्ररी, अभिलेखागार आणि सूची, नोंदी व त्या संदर्भातील पत्रव्यवहार अशा विविध विभागांतून INTACH कार्य करते. INTACH चे महाराष्ट्र राज्यातही प्रभावी काम आहे.

अधिक संदर्भासाठी : www.intach.org

**माहीत आहे का तुम्हांला ?**

गुलाबी शहर अर्थात जयपूर शहराला युनेस्कोने जागतिक वारसा दर्जा दिला. ६ जुलै २०१९ पासून हे वारसा स्थळ युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झाले. हा निर्णय 'युनेस्को वर्ल्ड हेरिटेज कमिटी'च्या सभेत घेण्यात आला. ही सभा अझरबैजानमधील बाकु या भागात भरली होती.



जयपूरमधील हवामहल

माहिती व्हावी म्हणून २०१६-१७ मध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमातून प्रचार सुरू करण्यात आला. बीबीसी, डिस्कव्हरी, हिस्ट्री अशा जागतिक वाहिन्यांवरून भारतातील ऐतिहासिक, नैसर्गिक वारसास्थळांची माहिती देण्यात येते. त्याआधारे अमेरिका, फ्रान्स, जपान इत्यादी देशांमधून भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्राचीन तीर्थक्षेत्रे व आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाची ९५ स्थळे 'प्रसाद' योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. स्वदेश दर्शन तथा महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वरचा त्यात समावेश आहे. केंद्र सरकारचे पर्यटन मंत्रालय आणि फेडरेशन ऑफ असोसिएशन्स इन इंडियन टूरिझम ॲण्ड हॉस्पिटॅलिटी (FAITH) यांनी इंडियन टूरिझम मार्ट २०१८ चे आयोजन केले होते. आंतरराष्ट्रीय धर्तीवर आयोजित केलेले हे पहिलेच टूरिझम मार्ट होय.

या पाठात आपण सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण, क्रीडा आणि पर्यटन या क्षेत्रांचा मागोवा घेतला आहे. बदलत्या भारताचे काही प्रातिनिधिक पैलू आपण अभ्यासले.

२१व्या शतकात एका बाजूला संधी तर दुसऱ्या बाजूला समस्या आहेत. विविध संधीचा फायदा घेऊन समस्यांवर मात करण्याची जबाबदारी आपणावरच आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. १९९५ मध्ये भारत सरकारचा आरोग्य विभागातर्फे ......................... लसीकरणाची मोहीम सुरू झाली.

(अ) गोवर-रुबेला (ब) पल्स पोलिओ
(क) बीसीजी (ड) त्रिगुणी

२. एर्नाकुलम हा १००% साक्षर झालेला जिल्हा ......................... राज्यात आहे.

(अ) गुजरात (ब) केरळ
(क) कर्नाटक (ड) तमिळनाडू

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग | - मानवी हक्कांचे संरक्षण |
| २. सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हायरनमेंट | - दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास |
| ३. सी-स्कॅप | - कासवांचे जतन करणारी संस्था |
| ४. इंटॅक | - वारशाविषयी जतन व जागृती करणारी संस्था |

**प्र.२ ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधीची नावे लिहा.**

१. मानव अधिकार संरक्षण कायद्यान्वये स्थापन झालेला आयोग -

२. भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान मिळवणारा खेळाडू -

**प्र.३ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ टीपा लिहा.**

१. सर्व शिक्षा अभियान
२. वायू प्रदूषण
३. पोलिओ निर्मूलन

**प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारत सरकारचे क्रीडा धोरण स्पष्ट करा.
२. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाकडून कोणत्या सुविधा सुरू केल्या आहेत?

**प्र.६ तुमचे मत लिहा.**

१. संरक्षणविषयक सराव दोन राष्ट्रांनी एकत्र करणे आवश्यक असते.
२. पर्यटनस्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.

**उपक्रम**

पर्यटनक्षेत्रात कोणते व्यवसाय चालतात, त्यांची यादी करा.

सदर कालरेषेत काही निवडक घटनांचा समावेश केला आहे. याप्रमाणे तुम्हीसुद्धा कालरेषा तयार करू शकता.

**१८८१-१९००**

- १८८४ साऊथ न्यू गिनी बेट ब्रिटिश साम्राज्यात
- १८९५ इटलीपासून इथिओपिआ स्वतंत्र
- १८९८ हाँगकाँग बंदर ९९ वर्षे कराराने ब्रिटनकडे
- १८९८ स्पेन वि.अमेरिका युद्ध-क्यूबाला स्वातंत्र्य
- १८९९ फिलीपिन्स-प्यूएर्टो रिको अमेरिकेच्या वसाहती

**१९०१-१९२०**

- १९१४ पहिले जागतिक महायुद्ध.
- १९१६-१७ बोल्शेविक राज्यक्रांती. लेनिनचा उदय.
- १९१७ बाल्फोर जाहिरनामा पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा करार.
- १९१९ व्हर्सायचा तह.
- १९२० राष्ट्रसंघ स्थापना.

**१९२१-१९४०**

- १९२२ इजिप्त स्वतंत्र.
- १९३१ जपानने मांचुरिया घेतला.
- १९३५ इटलीने इथिओपिया जिंकले.
- १९३९ दुसरे जागतिक महायुद्ध सुरू.

**१९४१-१९६०**

- १९४३ फ्रान्सकडून लॅबनॉन मुक्त.
- १९४५ अणुबाँबचा स्फोट.
- १९४६ सीरिया मुक्त.
- १९४७ भारत स्वतंत्र.
- १९४९ अमेरिकेचा नाटो करार.
- १९४९ जर्मनीची फाळणी.
- १९५१ अँझुस करार.
- १९५५ वॉर्सा करार.

**१९६१-१९८०**

- १९६१ बर्लिन भिंत उभारली.
- १९६४ झांबिया स्वतंत्र.

**१९८१-१९९०**

- १९८१ पहिले अमेरिकन यान अंतराळात.
- १९८५ गोर्बाचेव्ह रशियाचे प्रमुख.
- १९८७ ग्लासनोस्त व पेरेस्त्रॉइका

**१९९१-२०००**

- १९९१ जर्मनीचे एकत्रीकरण
- १९९१ सोव्हिएट रशियाचे विघटन
- १९९८ परम-१०००० महासंगणकाची निर्मिती
- २००० भारताकडून इराकला तीन लाख टन गहू निर्यात.


कालरेषा : जागतिक घडामोडी (१८८४ ते २०००)


### अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळांना भेट द्या.


1. कार्ताझ https://en.wikipedia.org/wiki/Cartaz
2. पर्यटनासाठी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी www.tourism.gov.in
3. Communications and Information Technology - www.indiapost.gov.in
4. भारत संचार निगम लिमिटेड - (BSNL) www.bsnl.co.in
5. संरक्षण मंत्रालय : www.ddpmod.mod.gov.in, www.drdo.gov.in, www.indiannavy.nic.in, www.indianairforce.nic.in
6. शिक्षण www.mhrd.gov.in
7. पर्यावरण www.envfor.nic.in
8. भारतीय रिझर्व्ह बँक www.rbi.org.in
9. खादी एवं ग्रामोद्योग आयोग www.kvic.org.in
10. परमाणू ऊर्जा विभाग www.dae.nic.in
11. अंतरिक्ष कार्यक्रम www.isro.org
12. राष्ट्रीय युवा नीति www.yas.nic.in
13. WWI https://www.youtube.com/watch?v=QPdFo8nwkZI
14. WWI Map https://www.mapsofworld.com/world-war-i/
15. WW II https://www.youtube.com/playlist?list=PL3H6z037pboEcDk1Nvu6uQK9_oYtv1hJx
16. WWII Map https://www.mapsofworld.com/answers/history/countries-won-world-war-ii/
17. शीतयुद्ध - https://en.wikipedia.org/wiki/File:New_Cold_War_Map_1980.png
18. Iron curtain map https://en.wikipedia.org/wiki/Iron_Curtain#/media/File:Iron_Curtain_map.svg
19. सार्क http://saarc-sec.org/about-saarc
20. Balbharati https://www.youtube.com/watch?v=MiZngFxhBxM

# छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ

- सामान्य रयतेच्या कल्याणासाठी स्थापन केलेल्या स्वराज्य स्थापनेची कथा उलगडणारे पुस्तक.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्तुंग कार्य व त्यामागची तेवढीच उत्तुंग व उदात्त भूमिका वाचकांसमोर आणणारे प्रेरणादायी वाचन साहित्य.
- इतिहास वाचनासाठी पूरक असे संदर्भ पुस्तक.







- इतिहास वाचनासाठी पूरक अशी संदर्भ पुस्तके.
- निवडक लेखक, इतिहासकारांचे प्रेरणादायी लेख.

**पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेतस्थळावर भेट द्या.**

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.
मराठी इतिहास इयत्ता बारावी

₹ 68.00